20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )A 1

DGS/ SBT/ MAP/ 12:00

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मुंबईतील सांताक्रूज येथील वाकोला येथे १८ वर्षीय युवतीचे अपहरण करुन तिच्यावर बलात्कार केल्याबाबत**

**(१) * १३१९२ डॉ. निलम गोऱ्हे , श्री. विलास अवचट , डॉ. दिपक सावंत , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाकोल्यातील भारतनगर ब्रीजवरुन घरी परतणाऱ्या एका १८ वर्षीच्या युवतीचे चार अज्ञात युवकांनी अपहरण करुन, तिच्यावर बलात्कार केल्याची घटना दिनांक २६ डिसेंबर, २००५ रोजी वा त्या सुमारास घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार चार अज्ञात युवकांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे काय,

(४) असल्यास, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) प्रस्तुत घटनेत युवतीवर बलात्कार झालेला नसून एका युवकावर चार व्यक्तींनी जबरीने अनैसर्गिक संभोग केला आहे.

(२),(३) व (४) प्रस्तुत घटनेतील फिर्यादी दिनांक २५-१२-२००५ रोजी रात्री २२.२० वाजता कुर्ला सी.एस.टी.रोड वरुन बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्सकडे येणाऱ्या पुलावरुन येत असताना फिर्यादीस जबरदस्तीने उचलून कारमध्ये घालून धारावी खाडीजवळच्या रस्त्याच्या कडेला झुडपात नेऊन कारमधील चार इसमानी फिर्यादीवर आळीपाळीने अनैसर्गिक संभोग केला व त्याचेजवळील ऐवज लूटून नेला. या प्रकरणी कुर्ला पोलीस ठाणे गु.र.क्र.४२०/०५ कलम ३६३,३७७,३९३,३९८,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित २ आरोपींना अटक करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, या घटनेच्या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली होती त्यामध्ये १८ वर्षाच्या युवतीचे ४ लोकांनी अपहरण केल्याचे म्हटले होते. त्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३१९२...

डॉ. नीलम गोऱ्हे...

वाकोला पोलीस स्टेशनला आम्ही शिष्टमंडळ नेऊन निवेदन दिले. त्यामुळे बातमी छापून आल्यानंतर हा प्रश्न दिला असे नाही. त्या निवेदनावर आमदार म्हणून माझी सही असतांना त्याचे उत्तर मला देण्यात आले नाही. या घटनेच्या संदर्भात त्या मुलीचे पुनर्वसन करण्याची व्यवस्था केली आहे काय? या संदर्भात आज सकाळी मी त्या पोलीस स्टेशनला फोन केला असता, उपायुक्त श्री. शिंदे मला म्हणाले की, अशी घटना घडली नसेल तर काय करणार? अशाप्रकारची घटना घडली नसल्याचे उत्तर पोलीस स्टेशनमधून मला देण्यात आले. सभापती महोदय, अशाप्रकारचे अनैतिक अत्याचाराच्या घटना मुंबईमध्ये वारंवार घडत आहेत. १७-१८ वर्षाच्या तरुण मुलांना पकडून त्यांना तृतीय पंथी बनविण्यासाठी त्यांचे इंद्रीय काढून टाकण्याचा प्रकार चेंबूरमध्ये घडला आहे. अशाप्रकारचा लैगिक अत्याचार त्यांच्यावर करण्यात येत आहे. प्रश्न असा आहे की, अशाप्रकारे तरुण मुलांवर अनैसर्गिकरित्या अत्याचार करणाऱ्या काही टोळया मुंबई शहरात कार्यरत आहेत. तशाप्रकारच्या घटना वारंवार आपल्यासमोर येत आहेत. या टोळयांना पकडण्यासाठी आपण कोणती पावले उचलणार आहात? यासंदर्भात कारवाई करण्यासाठी ३७७ हे कलम पुरेसे नसेल तर कायद्यामध्ये बदल करुन समलिंगी संबंधामध्ये अत्याचार करणाऱ्यांवर आपण कडक कारवाई करणार आहात काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात आल्यानंतर ते एकमेकांच्या सहमतीने हा प्रकार करीत असल्याचे आढळले. या प्रकरणामध्ये ३७७ कलम लावण्यात आले असून जर त्यामध्ये एखादी टोळी कार्यरत असेल तर त्याबाबत निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा माझ्या विभागामध्ये प्रकार घडल्यानंतर त्याची संपूर्ण माहिती घेतली. त्यावरुन असे समजले की, एका स्त्रीवर बलात्कार झालेला नसून समलिंगी संबंधामध्ये भाग घेणाऱ्या लोकांचा हा प्रकार आहे. प्रश्न असा आहे की, या प्रकरणात भाग घेणाऱ्या युवकांची नावे काय आहेत? ते कोणत्या विभागात राहात आहेत. आणि ज्या जागी येऊन त्यांनी बलात्कार केला, त्या ठिकाणी ते अन्य कोणते व्यवसाय करीत आहेत काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणात भाग घेणारी मुले १) मोहम्मद सलीउल्लाह खान, वय २० वर्षे २) इकबाल शेख, वय २१ वर्षे आणि ज्याच्यावर अत्याचार झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. १३१९२...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे...

आहे त्याचे नाव अमजदअली शेख आहे. त्याठिकाणी दोघे भाऊ टेलरिंगचे काम करीत होते. ज्याच्यावर अत्याचार झाला आहे त्याच्या भावाच्या मित्राने तो अत्याचार केला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : ज्या मुलावर अत्याचार झाला आहे तो त्या ठिकाणी राहात आहे कां?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ही मुले त्या भागात राहात असून अत्याचार पिडीत मुलाच्या भावाचा मित्र देखील त्याच भागात राहाणारा आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13192 (पुढे सुरु.....

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ही घटना अतिशय लांछनास्पद अशाप्रकारची घडलेली आहे. अशाप्रकारच्या घटना वारंवार व्हायला लागल्या तर ते राज्याला शोभादायक नाही. माझा प्रश्न असा आहे की,रात्री 10-30 वाजता ही घटना घडली. गुन्हा कोणत्या तारखेला नोंदविलेला आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, दोन आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. त्यांची अटक किती दिवसामध्ये अपेक्षित आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ही घटना दिनांक 25-12-2005 रोजी रात्री 10.30 ते 12-15 या दरम्यान धारावी खाडीजवळच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपात ही घटना घडली. फिर्यादिने आरोपीला ओळखले. यामध्ये दोन आरोपी सापडले. त्यांनी त्याला 100 रुपये दिलेले होते. वाईट कृत्य करत असताना दुसरे दोघे तेथे आले आणि हा घाणेरडा प्रकार त्यांनी केला. दुसरे दोन आरोपी पळून गेले. त्यांचा शोध चालू आहे.

श्री.विलास अवचट : पोलीस हे जनतेचे मित्र आहेत असे आपण म्हणतो. त्यांनी सौजन्याची वागणूक द्यावी असेही आपण म्हणतो. या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी पोलीस उप आयुक्तांना सांगून देखील त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही, उडवा उडवीची उत्तरे दिली. ही लोकप्रतिनिधींची अवस्था असेल तर सामान्य माणसाचे काय ? त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ? उर्वरित दोन आरोपींना अटक व्हायची आहे. पोलिसांनी मनावर घेतले तर यासाठी थर्ड डिग्री लावून या आरोपींकडून पळून गेलेल्या आरोपींची ते माहिती घेऊ शकतात. त्यांच्याकडून फरारी आरोपींची माहिती मिळालेली आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी लोक प्रतिनिधींना डी.सी.पी.नी अशाप्रकारे उत्तर देणे योग्य नाही,असा मुद्दा उपस्थित केला. या अधिकाऱ्यांना निश्चितपणे कडक शब्दात सूचना देण्यात येतील. लोकप्रतिनिधींनी काही विचारले तर लोकप्रतिनिधींना सौजन्याने माहिती देण्यासंबंधात सूचना देण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी आरोपीला थर्ड डिग्री लावून त्याच्याकडून माहिती घेण्याबाबत सुचविले. परंतु पकडण्यात आलेले दोन आरोपी वेगळे आहेत आणि फरारी झालेले दोन आरोपी वेगळे आहेत.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विश्रांतीगृहासाठी**

**नियमबाह्य पध्दतीने कार्पेट खरेदी केल्याबाबत**

**(2) * 15002 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 9285 ला दिनांक 8 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे प्रदेशातील, पुणे सांगली, सातारा, कोल्हापूर व सोलापूर या विभागातील राज्य परिवहन विश्रामगृहासाठी संबंधीत अधिकाऱ्यांनी अधिकार नसताना नियमबाह्य पध्दतीने रु.7 लाख 70 हजार 260 रुपयांचे कार्पेट खरेदी केल्याबद्दल राज्य परिवहन महामंडळाने केलेल्या चौकशीत जे 36 अधिकारी दोषी आढळलेत त्यांना सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे काय,

(2) संबंधीत 36 अधिकाऱ्यांविरुध्द पोलीसात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम,श्री.सुरुपसिंग नाईक यांच्याकरिता** : (1) नाही. सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत चौकशी होऊन प्रथम दर्शनी गुन्हा झाल्याचे आढळून आल्याने श्री.स.ह.गव्हाणे,प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे व इतर राज्य परिवहन अधिकारी व कर्मचारी असे एकूण 57 आरोपी विरुध्द संबंधित पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला असून गुन्ह्यांचा तपास चालू आहे. यापैकी श्री.स.ह.गव्हाणे, तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे यांना दि. 27.12.2005 पासून निलंबित करण्यात आले आहे.

(2) पी.व्ही.सी.कारपेट नियमबाह्य खरेदी संदर्भात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

1) सोलापूर येथे फौजदारी चावडी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाअंती पुरवा आढळून येत नसल्याने प्रकरण चीफ ज्युडिशिल मॅजिस्ट्रेट सोलापूर यांच्या कोर्टात दि. 6.3.2006 रोजी निर्णयासाठी सादर करण्यात आलेले आहे.

2) कोल्हापूर येथील शाहुपूरी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

3) सांगली शहर पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास करुन प्रकरण निर्णयासाठी कोर्टात सादर केले आहे.

4) स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास सुरु आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5) सातारा शहर पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास पूर्ण होवून न्यायालयामध्ये प्रकरण निर्णयासाठी दि. 20.3.2006 रोजी सादर करण्यात आलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 7 लाख 70 हजार 260 रुपयाच्या कार्पेट खरेदीमध्ये घोटाळा झालेला आहे. उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "सुरक्षा व दक्षता खात्यामार्फत चौकशी होऊन प्रथमदर्शनी गुन्हा झाल्याचे आढळून आल्याने श्री.स.ह.गवहाणे, प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे व इतर राज्य परिवहन अधिकारी व कर्मचारी असे एकूण 57 आरोपींविरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुनहा दाखल केला असून गुन्ह्याचा तपास चालू आहे. या पैकी श्री.गव्हाणे यांना निलंबित करण्यात आले", असे म्हटलेले आहे. बाकीचे 56 अधिकारी आणि कर्मचारी अजूनही सेवेमध्ये आहेत, त्यांना का निलंबित करण्यात आले नाही ? चौकशीमध्ये किती रक्कमेची नियमबाह्य खरेदी झाल्याचे उघडकीस आले ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : जवळजवळ 36 कर्मचारी आणि अधिकारी यांची चौकशी केलेली आहे. यापैकी 28 प्रकरणामध्ये चौकशी पूर्ण झालेली आहे. त्या संबंधीचे प्रकरण कोर्टामध्ये सादर केलेले आहे. बाकीच्या आठ प्रकरणामध्ये पुणे आणि कोल्हापूर विभागामधील कर्मचाऱ्यांची चौकशी सुरु आहे. विभागवार पाहिले तर ज्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले आहेत, त्यांच्याकडून 7 लाखाचा भ्रष्टाचार झालेला आहे,असे चौकशीमध्ये दिसून येते.. या सर्व अधिकारी अणि कर्मचाऱ्यांच्यासंबंधात विश्वासघात करणे, फसवणूक करणे अशी कलमे लावलेली आहेत.

यानंतर श्री.बरवड (पुढे सुरु....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 15002 .... श्री. धर्मरावबाबा आत्राम...

या सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित केले आणि ते निलंबित राहिले तर ते काम करणार नाहीत आणि ही बाब आपल्याला थोडीफार अडचणीची होईल. ही प्रकरणे कोर्टाकडे दिल्यानंतर कोर्टाचे आदेश झाल्यानंतर जी कारवाई करावयाची असेल ती करण्यात येईल.

प्रा. शरद पाटील : या 7 लाख रुपयांच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात 57 लोकांवर आरोप झाले आणि त्यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली आहे. शासनाने श्री. गव्हाणे यांनाच निलंबित केले आहे. उर्वरित जे 56 लोक आहेत त्या 56 लोकांना निलंबित का केले नाही ? असा प्रश्न होता. वास्तविक पाहता त्यांच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर पुन्हा निर्दोष ठरेपर्यंत त्यांना कामावर ठेवणे योग्य होणार नाही. या 56 लोकांना निलंबित करणार काय ? पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या विभागात कार्पेटची जी खरेदी झाली ती एकत्रित खरेदी झाली की वेगवेगळ्या विभागामध्ये वेगवेगळ्या तऱ्हेने झाली ? याला हे 57 आरोपी एकत्रितपणे जबाबदार आहेत की त्यांनी वेगवेगळे निर्णय घेतले ? याबाबतीत नियमामध्ये काय तरतूद आहे ? कोणत्या पध्दतीने खरेदी करण्याची महामंडळाची कार्यपध्दती आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : श्री. गव्हाणे हे प्रादेशिक व्यवस्थापक आहेत. हे सर्व पाचही विभाग त्यांच्या अंतर्गत येत असल्यामुळे सर्व कार्पेट खरेदीचा व्यवहार त्यांच्या माध्यमातून झालेला होता. त्यामध्ये फार मोठी तफावत आढळून आली. काही नातेवाईकांना टेंडर देणे, खोटे रिसीट तयार करणे वगैरे प्रकार झालेले आहेत. सर्व 57 लोकांना निलंबित करता येणार नाही. प्रादेशिक व्यवस्थापक श्री. गव्हाणे यांच्या हाताखाली ते काम झाले असल्यामुळे त्यांना निलंबित केले आहे. मागच्यावेळी हा प्रश्न विधान परिषदेमध्ये आला होता आणि याच सभागृहात आपण त्यांना सस्पेंड केलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : हा जो निर्णय घेतलेला आहे तो चांगला आहे. कारण मुळात श्री. गव्हाणे हे जबाबदार आहेत. आणखी जे 57 आरोपी आहेत त्यांना अटक केली तर हा गुन्हेगार सुटून जाईल. एकाच ठिकाणी चार्ज केंद्रित करुन 7 लाख रुपये मंजूर करताना यामध्ये

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 15002 .... श्री. मधुकर सरपोतदार ....

रिक्विझिशन करणारे, खरेदी करणारे, बिल देणारे असे जास्तीत जास्त दोन तीन प्रमुख गुन्हेगार आहेत असे समजून आपल्याला पुढे जावे लागेल. शासनाने श्री. गव्हाणे यांना निलंबित केले आहे. तेथील अकाऊंटंट आणि परचेस मॅनेजर किंवा परचेसिंग करणारे हे दोन लोक कोण आहेत याची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : 28 प्रकरणे कोर्टाकडे दिलेली आहेत. इन्व्हेस्टिगेशन झालेले आहे. पोलिसांकडे गुन्हा दाखल केलेला आहे. कोर्ट जो निर्णय देईल त्याप्रमाणे कारवाई होणार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : या नियमबाह्य खरेदीची जी रक्कम आहे ती संबंधितांकडून वसूल करण्याची कारवाई शासन करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ही सगळी प्रकरणे कोर्टामध्ये असल्यामुळे कोर्टाकडून जी शिक्षा होईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : यामध्ये साडेसात लाख रुपयांचा भ्रष्टाचार हा संगनमताने करण्यात आलेला आहे. त्यामुळे केवळ प्रादेशिक व्यवस्थापक श्री. गव्हाणे यांच्यावर केलेली निलंबनाची कारवाई पुरेशी नसून या 57 लोकांपैकी प्रमुख्याने जे महत्वाचे लोक या भ्रष्टाचाराशी संबंधित आहेत त्यांना देखील त्वरित निलंबित करण्याची कारवाई शासन करील काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : या प्रश्नाचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे.

श्री. अनंत तरे : श्री. गव्हाणे यांच्या बाबतीत खूप तक्रारी आलेल्या आहेत. यापूर्वी त्यांच्या बाबतीत अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराची चौकशी सुरु होती काय ? त्यासंदर्भात काही कारवाई झालेली आहे काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 15002....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, एस.टी.महामंडळामध्ये टायर्स्, स्पेअर पार्टस्, कार्पेट खरेदीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. या प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये "कोल्हापूर येथील शाहूपुरी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तसेच सांगली शहर पोलीस स्टेशन येथे दाखल केलेल्या गुन्हयाचा तपास सुरु आहे, तसेच स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपास सुरु आहे." असे म्हटलेले आहे. तेव्हा हा तपास करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या 8 प्रकरणांमध्ये पुणे, कोल्हापूर येथील तपास प्रगतीपथावर आहे. पोलीस चौकशी सुरु आहे. तपास पूर्ण झाल्यावर प्रकरण कोर्टात दाखल करण्यात येईल.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.बरवड 12:15

**मुंबई येथील सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक यांनी प्रेयसीचा खून करुन तिचा मृतदेह धावत्या गाडीतून फेकून दिल्याची घडलेली घटना**

**(३) * १३३२२ श्री. संजय दत्त , श्री. नतिकोद्दीन खतिब , श्रीमती सुधा जोशी , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. सुधाकर गणगणे , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांनी ड्युटीवर असतानाच अनैतिक संबंधातून प्रेयसीचा खून करुन तिचा मृतदेह धावत्या गाडीतून एल्फिन्स्टन उड्डाणपुलाजवळ फेकून देऊन पलायन केल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर, २००५ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर सहाय्यक पोलिस उपनिरीक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर. आर. पाटील यांच्याकरिता :** (१) होय.

(२), (३) व (४) या प्रकरणी ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३९८/०५, भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१ अन्वये ३०-१२-२००५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून सदर आरोपी पोलीस विभागात सहाय्यक पोलीस उप निरीक्षक म्हणून कार्यरत होता, त्यास निलंबित केले असुन, गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री. संजय दत्त : पोलीस शिपाई सुनील मोरे याच्या प्रकरणानंतर शासनाने पोलिसांसंबंधी कडक धोरण स्वीकारण्याचे जाहीर केले. तरी सुध्दा पोलीस अधिका-यांकडून मुंबईमध्ये गुन्हे होतच आहेत. माझा प्रश्न असा आहे की, पोलिसांच्या वृत्तीमध्ये परिवर्तन करण्यामध्ये शासनाला अपयश आलेले आहे काय ? असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, आणि नसल्यास पोलिसांकडून अशा प्रकारचे गुन्हे वारंवार होतात, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या घटनेमध्ये पोलीस उपनिरीक्षकाची जी प्रेयसी होती तिचे आणि त्याचे 4 वर्षापासून संबंध होते. या पोलिसाने गुन्हा केल्यानंतर त्याला सोडलेले नाही. त्याला अटक करण्यात आलेली आहे.

श्रीमती सुधा जोशी : समाजाला आणि विशेषत: पोलिसांना काय झालेले आहे हे काही समजत नाही. बलात्काराच्या घटना वारंवार घडत आहेत. या प्रकरणी 4 महिने झाले तरी अजूनही तपास चालू आहे. आरोपी सापडलेला आहे, प्रेतही सापडलेले आहे. तेव्हा हा तपास केव्हा पूर्ण होईल ? पोस्टमार्टेमचा रिपोर्ट काय आहे ?

===3==



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 13322...)

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ही घटना घडून 4 महिने झालेले आहेत, हे खरे आहे. कोर्टामध्ये दोषारोप दाखल केलेले आहेत, हेही खरे आहे. आरोपीला अटक केलेली आहे. तीक्ष्ण हत्याराने वार केल्यामुळे अति रक्तस्त्राव होऊन मृत्यू आला, असे पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये म्हटलेले आहे. हा रिपोर्ट कोर्टामध्ये पाठविण्यात आलेला आहे.

श्रीमती सुधा जोशी : तिला बेदम मारहाण झाल्याचे पोस्टमार्टेममध्ये नमूद केलेले आहे काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : तीक्ष्ण हत्याने वार केल्यामुळे अति रक्तस्त्राव होऊन मृत्यू आला, असा पोस्टमार्टेम रिपोर्ट आहे.

श्री. सुधाकर गणगणे : या प्रकरणी तपास किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : कोर्टामध्ये दोषारोप पाठविलेले आहेत.

**सभापती** : कोर्टामध्ये चार्जशीट दाखल केलेली आहे. म्हणजे तपास पूर्ण झालेला आहे अशी वस्तुस्थिती आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, होय.

श्री. सुधाकर गणगणे : तपासाचे स्वरुप काय आहे ?

**सभापती** : मृत्यू कशामुळे आला, या प्रश्नाचे उत्तर राज्यमंत्री महोदयांनी द्यावे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 12:20

ता.प्र.क्र. 13322 पुढे सुरु ...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मयत प्रेयसी ही त्या सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकाला आठवडयातून 2/3 वेळेला भेटत होती. त्यादिवशी त्याने रात्री तिला बोलाविले. दोघांनीही दारु घेतली आणि त्यांच्यात बाचाबाची होऊन झटापट झाली. मयत प्रेयसी सतत त्या पोलिसाकडे पैशाची मागणी करीत होती. तसेच त्याच्या बायकोला सुध्दा हे कळले. त्यानंतर पोलिसाने जीपमध्ये तिला मारले आणि त्यानंतर शस्त्राने वार करुन तिचा खून केला.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी आणि माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी मूलभूत प्रश्न विचारला होता . या प्रकरणाचा तपास पूर्ण झ ालेला आहे आणि चार्जशीट दाखल केले आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. 90 दिवसात आरोपपत्र दाखल केले आहे काय ? आरोपी सध्या अटकेत आहे की जामिनावर सुटला आहे ? जामिनावर बाहेर येण्यासाठी उशिरा तपास केला जात आहे काय ? आरोपी चार्जशीट दाखल करण्याच्या आधी बाहेर आला आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 27.3.2006 रोजी महानगरदंडाधिकारी, दादर, मुंबई यांच्याकडे कोर्ट केस क्र. 369/pw/06 अन्वये दोषारोपपत्र दाखल केले आहे.

**सभापती** : या गुन्हयाचा तपास पूर्ण झाला आहे. मयत स्त्रीला तीक्ष्ण हत्यारांनी जखमी केले होते आणि मारहाण केली होती. आरोपीला अटक करुन चार्जशीट दाखल केले आहे. आरोपी सध्या तुरुंगात आहे की जामिनावर आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत मध्यवर्ती कारागृहात आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, पोलिसांकडून अशा प्रकारच्या गुन्हयाच्या घटना वारवांर होत आहेत याचे कारण काय ? पोलिसांना सर्वसाधारणपणे आठ तास काम असते. परंतु प्रत्यक्षात मात्र पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना 24-48 तास डयूटी करावी लागते याचे कारण काय ?

उत्तर नाही.

---

.....2

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) E -2

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगमउ नंतर 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नाशिक जिल्ह्यातील खंबाळे (ता. इगतपूरी) येथील माध्यमिक आश्रमशाळेतील १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू**

**(४) * १७०८६ श्री. अरविंद सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील खंबाळे (ता. इगतपूरी) येथील माध्यमिक आश्रमशाळेतील १० वीत शिकणारा विद्यार्थी सदाशिव एकनाथ लिलके याचा दिनांक २८ फेब्रुवारी, २००६ रोजी वा त्या सुमारास संशयास्पद मृत्यू झाल्याचे उघडकीस आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळेतील मुख्याध्यापकांनी सदाशिव याचा मृतदेह पालकांच्या ताब्यात न देता परस्पर अंत्यसंस्कार केला हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदाशिव याचा मृतदेह पालकांच्या ताब्यात न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार संबंधित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांवर व व्यवस्थापनेवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे,श्री. आर. आर. पाटील यांच्याकरिता** (१) सदर विद्यार्थ्यांने दि. २०-२-२००६ रोजी खंबाळे शिवारात घाटी रेल्वे स्टेशनजवळ कामयानी एक्सप्रेसखाली आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) मुख्याध्यापकांनी मृतदेहावर अंत्यसंस्कार केले हे खरे नाही.

(३) मयताने दि. २०-२-२००६ रोजी आत्महत्या केल्यानंतर दि. २३-२-२००६ पर्यंत मृताची ओळख न पटल्याने व प्रेत कुजू लागल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार प्रेताचा दफनविधी करण्यात आला आहे. त्यामुळे मयताचा मृतदेह त्यांच्या पालकाच्या ताब्यात देता आला नाही.

(४), (५) व (६) आश्रमशाळेत रहाणारा कु. सदाशिव लिलके हा दि. १६-२-२००६ रोजी रात्रौ मुलींची वसतीगृहातील एका विद्यार्थीनीच्या खोलीत जबरदस्तीने गेला असता त्या विद्यार्थीनीने त्याच्याविरुध्द शिक्षकांकडे तक्रार केली. त्यावेळी शिक्षकांनी त्याला असे न करण्याबाबत समजावून सांगितले होते.

सदर विद्यार्थ्यांने आश्रमशाळेत घडलेल्या प्रकाराने त्याची बदनामी झाली म्हणून रेल्वेखाली आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे.

.....३



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, ही घटना २८.२.२००६ रोजी घडली आहे. या शाळेतील विद्यार्थी सदाशिव लिलके याचा मृत्यू झाला आहे. मयत मुलाच्या पालकांना मुलाचा मृत्यू संशयास्पद झाला आहे असे वाटल्याने त्यांनी अप्पर आयुक्त,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना निवेदन दिले आहे. हे निवेदन दिल्यानंतर असे आदेश दिले गेले की ७ दिवसांच्या आत या घटनेची सत्यस्थिती काय आहे याचा अहवाल द्यावा ही गोष्ट खरी आहे काय ? आदेशांचे स्वरुप काय आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, कोणत्याही प्रकारची तक्रार अप्पर आयुक्तांकडे आलेली नाही. सदरहू मुलगा ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेच्या लेडीज होस्टेलमध्ये तो गेला त्यावेळी तेथील मुलींनी त्याला येऊ नको असे सांगितले आणि सरांकडे तक्रार केली. सरांनी त्याला समजावून सांगितले. तो हुशार मुलगा होता आणि त्याच्या पालकांनी कोणताही संशय व्यक्त केलेला नाही.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17086...

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, विद्यार्थ्याने दिनांक 20 मार्च 2006 रोजी आत्महत्या केली व दिनांक 23 मार्च 2006 रोजी मृताची ओळख न पटल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार प्रेताचा दफनविधी करण्यात आला. तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, सदर प्रेत हे शवागरामध्ये ठेवण्यात आले होते काय ? या प्रेताचे शवविच्छेदन करण्यात आले आहे काय ? तसेच, शवागरामध्ये प्रेत किती दिवस ठेवण्यात येते ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या विद्यार्थ्याचा रेल्वेखाली येऊन अपघात झाला. या विद्यार्थ्याचे दोन तुकडे झाले. मृताचे पालकांची वाट पाहण्यासाठी तीन दिवस प्रेत ठेवण्यात आले होते. परंतु, तिसऱ्या दिवशी प्रेत ठेवण्याच्या अवस्थेत नाही अशा सूचना डॉक्टरांनी दिल्यामुळे शासकीय नियमाप्रमाणे अंत्यसंस्कार करण्यात आलेले आहेत.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, हा प्रकार आत्महत्येचा आहे की खुनाचा आहे ? येथे शासनाच्यावतीने आत्महत्या केलेली आहे असे नमूद करण्यात आली आहे. या मुलाने आत्महत्या केली हे शासन कशावरून सांगत आहे ? तीन दिवस विद्यार्थी आश्रमशाळेत नव्हता म्हणून आश्रमशाळेच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क का साधलेला नाही ? याचा अर्थ हा संपूण प्रकार आश्रमशाळा व्यवस्थापनाचा आहे. तीन दिवस आश्रमशाळेत मुलगा नाही असे त्याच्या वडिलांना न कळविण्याचे कारण काय आहे ? तसेच, तीन दिवसामध्ये प्रेतावर अंत्यसंस्कार करण्यात आलेले आहे. खरे म्हणजे शवागरामध्ये आठ-आठ दिवस प्रेत राहते. असे असताना तीन दिवसांमध्ये प्रेतावर अत्यंसस्कार करण्याचे कारण काय आहे ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित विद्यार्थी आश्रमशाळेत नाही असे त्याच्या पालकांना स्पष्टपणे कळविण्यात आले होते म्हणूनच सगळीकडे त्या विद्यार्थीची चौकशी करण्यात येत होती. या विद्यार्थीची चौकशी करीत असताना त्याचा रेल्वे खाली येऊन अपघात मृत्यु पावल्याचे कळले. यासंबंधी रेल्वे इंजिनचा चालक श्री.रामकिशन वर्मा याची जबानी घेतली असता, सदर विद्यार्थी रेल्वे रूळावर उभा होता. हॉन वाजवून देखील तो बाजूला होत नव्हता. परंतु, ज्यावेळी गाडी एकदम जवळ आली, त्यावेळी त्याने बाजूला उडी मारण्याचा प्रयत्न केला. दरम्यान गाडी वेगात असल्यामुळे त्याच्या अंगावरून गेली व त्याच्या देहाचे दोन तुकडे झाले. त्याचे प्रेताचे दोन तुकडे झाल्यामुळे ते तीन दिवसाहून अधिक काळ ठेवण्यासारखे नसल्यामुळे शासकीय नियमाप्रमाणे अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17086 ....

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, हा विद्यार्थी रात्रीच्या वेळी मुलींच्या खोलीत कसा काय शिरला ? मुलींच्या खोलीला दरवाजा कुलूप नव्हते काय ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थी हे भजनाच्या कार्यक्रमाला गेले होते. परंतु, संबंधित मुलगी ही प्रकृती बरी नसल्यामुळे भजनाच्या कार्यक्रमाला गेली नव्हती. तेव्हा तो मुलगा तिच्या खोलीमध्ये गेला होता.

श्री.धोंडिराम राठोड : सभापती महोदय, ही आश्रमशाळा शासकीय आहे की, अशासकीय आहे ? या मुलाचे अत्यंसंस्कार कोणी केले ? अधीक्षक असताना हा मुलगा मुलीच्या खोलीमध्ये कसा गेला ? तेव्हा अधीक्षक नव्हते काय ? याप्रकरणी अधीक्षकाला जबाबदार धरले आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि... 12:30

ता.प्र.क्र.17086....

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, आदिवासी सेवा आश्रमशाळा, खंबाळे या गावातील ही आश्रमशाळा आहे. त्या ठिकाणी भजनाचा कार्यक्रम असल्यामुळे सर्व विद्यार्थी तो कार्यक्रम ऐकावयास गेले, परंतु तो मुलगा गेला नाही. तसेच त्याच आश्रमशाळेतील एका मुलीची प्रकृती ठिक नसल्यामुळे ती सुध्दा आश्रमशाळेतच होती. त्यामुळे तो मुलगा त्या मुलीकडे गेला होता. परंतु मुलीने त्याला बाहेर पाठविले आणि त्यानंतर तिने शिक्षकांकडे या संदर्भात तक्रार केली.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मुलगा मिसिंग झाला होता हे खरे आहे. त्यामुळे मिसिंगसंदर्भात आश्रमशाळेने पोलिसांकडे तक्रार केली होती काय ? तसेच मृतदेह कुजलेला असल्यामुळे तो दहन करता आला असता. मग अशा परिस्थितीत मृतदेह दफन का केला ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, तो मुलगा हरवल्यानंतर आश्रमशाळेने त्याला शोधण्यासाठी प्रथम प्रयत्न केले. परंतु तो न सापडल्याने ते पोलीस स्टेशनमध्ये गेले. त्यावेळी पोलिसांनी त्यांना सांगितले की, अपघाताची अमुकअमुक घटना घडलेली आहे. त्यांनी त्या अपघाताबाबतची छायाचित्रे दाखविली. ते फोटो बघितल्यानंतर त्यांनी मुलाला ओळखले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "त्यावेळी शिक्षकांनी त्याला असे न करण्याबाबत समजावून सांगितले होते." माझा प्रश्न असा आहे की, समजाविण्याचे काम पर्यवेक्षक किंवा मुख्याध्यापक करतात. परंतु समजाविण्यासाठी काही तरी पध्दत असली पाहिजे. त्या व्यक्ती मुलांना समाजावून सांगतात की, धमकावून सांगतात याकडेही लक्ष दिले पाहिजे. त्यामुळे आश्रमशाळांचा विषय ज्या विभागाकडे येतो, त्यांना विद्यार्थ्यांना कशा प्रकारे समजावून सांगितले पाहिजे याबाबत आपण निश्चितपणे धोरण ठरवून दिले पाहिजे. विद्यार्थ्यांकडून चूक घडली तर ती कशी दुरुस्त करण्यात येईल याबाबतचा अहवाल आपल्या विभागाने आदिवासी विकास विभागाला पाठविला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी चांगली सूचना केली आहे. जर अशा प्रकारच्या घटना घडत असतील तर,संबंधित विभागाकडे निश्चितप्रकारे अशा सूचना पाठविण्यात येतील.

-------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.पो.ता.कंधार (जि.नांदेड) पोलिस ठाण्यातील ६ पोलिस कर्मचाऱ्यांनी पोलिस निरिक्षकाच्या जाचाला कंटाळून आत्मदहनाचा दिलेला इशारा**

**(५) * १३४३२ श्री. श्रीकांत जोशी , श्री. जगदिश गुप्ता , श्री.सागर मेघे , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.ता.कंधार (जि.नांदेड) पोलिस ठाण्यातील ६ पोलिस कर्मचाऱ्यांनी पोलिस निरिक्षकाच्या जाचाला कंटाळून आत्मदहनाचा इशारा पोलिस महासंचालकांना माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २००५ मध्ये वा त्या सुमारास दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिस महासंचालकांच्या कार्यालयातर्फे माहे जानेवारी २००६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास सदर आत्मदहनाचा इशारा देणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) या प्रकरणाचा तपास पूर्ण होऊन संबंधित दोषी व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) सदर तक्रार अर्ज चौकशी करुन अहवाल पाठविण्याकरिता पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडे पाठविला होता.

(३) सदर तक्रार अर्जाच्या संबंधाने पोलीस ठाणे कंधार येथे नेमणुकीस असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या समक्ष मुलाखती घेवून चौकशी केली असता त्यांनी पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द कोणतीही तक्रार नसल्याचे सांगितले. चौकशीत कोणीतरी खोडसाळपणे खोटा अर्ज दिल्याचे निष्पन्न झाल्याने व पोलीस निरीक्षक हे दोषी नसल्याचे सिध्द झाल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पोलीस स्टेशनमध्ये घडत असलेल्या अनेक गंभीर बाबी मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. कंधार येथे तीन खून झाले. माजी आमदार यशवंतराव भोसीकर यांच्या ड्रायव्हरचा सुध्दा खून झाला आहे. डोंगरी भागामध्ये बनावट आणि देशी दारुंचे अड्डे आहेत. हे अड्डे सुरु ठेवण्यासाठी काही अधिकाऱ्यांचे त्यांना संरक्षण आहे. अवैध वाहतुक करणारे, हप्ते गोळा करणारे पोलीस इन्स्पेक्टर श्री.रेड्डी यांचे नातेवाईक आहेत. त्या नातेवाईकांनी पोलीस स्टेशन ताब्यात घेतल्यामुळे सहा पोलीस कर्मचाऱ्यांनी डी.जी. यांचेकडे तक्रार केली होती. डी.जी.यांनी ती तक्रार नांदेड जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांकडे पाठवून, चौकशी करण्यास सांगितले. वास्तविक पाहता त्यांची चौकशी अन्यत्र बदली करुन व्हावयास हवी होती. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, त्या पोलीस इन्स्पेक्टरला कार्यरत असलेल्याच ठिकाणी कायम ठेऊन, त्याची चौकशी करण्यात आली आहे हे खरे आहे काय ?

..3..



SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि... 12:30

ता.प्र.क्र.13432....

श्री.श्रीकांत जोशी....

आपण उत्तरामध्ये नमूद केले आहे की, "चौकशीत कोणीतरी खोडसाळपणे खोटा अर्ज दिल्याचे निष्पन्न झाल्याने व पोलीस निरिक्षक दोषी नसल्याचे सिध्द झाल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आली नाही." मग खोटया सहया आणि खोडसाळपणाचे कृत्य करणारे कोण आहेत याचा शोध आपण घेतला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, हे खरे आहे की, डी.जी.यांचेकडे तक्रार अर्ज आला होता. डी.जी.यांनी तो एस.पी. यांचेकडे पाठविला होता. संबंधित एस.पी. यांनी त्या सहा पोलीस कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष बोलावून, त्यांच्याकडे विचारणा केली. परंतु त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, अशा प्रकारचा कोणताही अर्ज आम्ही दिलेला नाही, तसेच अर्जावरील सहया सुध्दा आमच्या नाहीत. त्यामुळे हे खोडसाळपणाचे कृत्य कोणी केले आहे याबाबत चौकशी करण्यात येईल.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, अधिकाऱ्यांकडून आम्हाला त्रास होतो आहे अशा प्रकारचा ज्यांनी अर्ज केला असेल त्या अर्जावर त्यांनी सहया केल्या असल्या पाहिजेत.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 13432 ....**

डॉ. एन.पी.हिराणी ....

सभापती महोदय, कदाचित त्यांचे स्टेटमेंट नंतर काही कारणास्तव, दबाव आल्यानंतर ओरली घ्यावे लागले असेल. तरी, माझे माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहेत की, त्या अर्जावर तक्रार करणाऱ्या लोकांच्या सह्या आहेत का ? हा प्रकार खोडसळपणाचा असेल तर, ह्या सह्या चुकीच्या असतील, म्हणून त्याप्रमाणे आपणाकडून चौकशी करण्यात आली आहे का ? सभापती महोदय, त्या सह्या तक्रार करणाऱ्या लोकांच्याच आहेत की दुसऱ्यांनी केलेल्या आहेत ? त्याचप्रमाणे, त्या लोकांवर दबाव आल्यामुळे त्यांनी ते स्टेटमेंट विड्रॉ केले का ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी या संदर्भात आपणास मघाशीच सांगितले आहे की, ज्या कर्मचाऱ्यांच्या नावाने पत्र देण्यात आले आहे, त्या पत्रावर त्यांच्या सह्या नाहीत. तरी सुध्दा, डी.जीं.नी हे प्रकरण तेथील एस.पीं.ना पाठविले आणि हे प्रकरण तपासून घेण्याबाबत सांगितले. कारण ते प्रकरण आत्मदहनाचे आहे. या सहा कर्मचाऱ्यांची नांवे केंद्रे जमादार, राठोड कॉन्स्टेबल, इंगळे जमादार, शिंदे जमादार, शिंदे कॉन्स्टेबल, राठोड कॉन्स्टेबल अशी असून त्यांना एस.पी.नी बोलाऊन वस्तुस्थितीबद्दल विचारणा केली. हा अर्ज आम्ही केलेला नसून कोणीतरी खोडसाळपणा केलेला आहे, असा जबाब त्यांनी एस.पीं.ना दिला.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सांगितले की, डोंगरी भागात देशी आणि गावठी दारुचे अड्डे चालतात. ते सर्व त्या रेड्डीचे नातेवाईक आहेत. त्यांच्यावर कारवाई होऊ नये म्हणून दबाव येतो. त्याचप्रमाणे सभापती महोदय, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या वेळी याच रेड्डींनी मिरवणूकीला परवानगी नाकारली होती हे खरे आहे का ? सभापती महोदय, आमच्याकडे या संदर्भातील अर्ज आहे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीच्या मिरवणूकीस परवानगी नाकारली असेल तर याचा जरुर तपास करु. सन्माननीय सदस्यांकडे यासंबंधी संबंधितांचा अर्ज असेल तर तो आमच्याकडे पाठवावा. त्या संदर्भात निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 13432 ....**

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सहा जणांनी डी.जीं.कडे लेखी तक्रार केली आहे, त्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, त्या अर्जावर कर्मचाऱ्यांची फक्त नावे असून सह्या नाहीत. तरी, मला या संदर्भात असे विचारावयाचे आहे की, सहया नसलेल्या अर्जाची दखल घेण्याची एवढी कोणती आवश्यकता होती ? हे प्रकरण एस.पी. साहेबांकडे न पाठविता डी.जी. नी त्यांना व्यक्तीश: बोलवून चौकशी का केली नाही ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, त्या अर्जामध्ये आत्मदहनाचा उल्लेख होतो. या प्रकरणी चौकशी केली नाही तर आम्ही आत्मदहन करु, असे अर्जात नमूद करण्यात आले होते. यातील गांभीर्य लक्षात घेऊन ते प्रकरण डी.जीं.नी, एस.पी.कडे पाठविले आणि त्यांना चौकशी करण्यासंदर्भात सूचना दिल्या. त्याप्रमाणे चौकशी केलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी त्या ठिकाणच्या लोकांशी बोलणी केली आहे. त्या जिल्ह्यातील एस.पीं.चे पोलीस स्टेशनच्या पी.आय.शी चांगले संबंध आहेत. अशा प्रकरणात जिल्ह्याच्या बाहेरील अधिकाऱ्याकडून चौकशी केली जाते. तरी, आपण त्याप्रमाणे करणार का ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी आय.जीं.कडून केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, खात्यातर्फे आलेल्या उत्तरातून अजून काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. हा कोणीतरी खोडसाळपणा केला असून आम्ही अर्ज केलेला नाही असे त्या 6 पोलीस कर्मचाऱ्यांनी सांगितल्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. या खोडसाळपणा करणाऱ्यांना शोधून काढण्याची क्षमता पोलीस खात्यामध्ये असली पाहिजे. तरी, आपण त्यांना शोधून काढण्याचा प्रयत्न केला का ? आणि जर ही घटना असत्य असेल तर हे गंभीर प्रकरण वर्तमानपत्रात प्रसिध्द करणाऱ्यांवर, पोलीस खात्याविषयी संभ्रम निर्माण करण्यासंबंधात कोणती कारवाई केली ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13432...

श्री. दिवाकर रावते..

चौकशीत कोणीतरी खोडसाळपणे खोटा अर्ज दिल्याचे निष्पन्न झाल्याचे आपण उत्तरात म्हटलेले आहे, माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भातील बातम्या वर्तमानपत्रामध्ये आल्या होत्या, अशा असत्य बातम्या वर्तमानपत्राने छापल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणार काय ? या प्रकरणाचा शोध जर पोलीस घेऊ शकत नाही तर पोलीस सक्षम नाहीत असा त्याचा अर्थ होईल. म्हणून चूकीची आणि खोडसाळ माहिती देणाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी आय.जी. मार्फत करण्यात येईल. अशा प्रकारे कोणी खोडसाळपणे असत्य माहिती देण्याचा प्रयत्न केला असेल व ते चौकशीत निष्पन्न झाले तर संबंधीतांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

----------------

........2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गोरगावलेखंडी भोकर इंदगांव प्रजिमा-७ (ता. जि. जळगांव)**
**वरील पुलाच्या अंदाजपत्रकाबाबत**

**(६) * १६८०९ श्री. गुरुमुख जगवानी , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३ मार्च, २००५ रोजी वा त्या सुमारास (ता. जि. जळगांव) येथील गोरगावलेखंडी भोकर इंदगांव प्रजिमा-७ वर ३ कोटी ७५ लाख ११ किंमतीच्या पुलाचे अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जळगांव यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांना मंजूरीसाठी पाठविले असूनही अद्यापपावेतो या पुलाच्या कामास मंजुरी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रस्तावास मंजूरीसाठी लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) सदरहू प्रस्तावास त्वरीत मंजूरी देण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ, यांच्याकरिता** : (१) नाही. प्रमख जिल्हा मार्ग क्र ७ वर तापी नदीवर भोकर गावाजवळ रु.३५० लक्ष रकमेच्या पुलाचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठीचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, जळगांव यांनी मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना पाठवून त्याची प्रत शासनास पृष्ठांकित केली होती. त्यासोबत अंदाजपत्रक पाठविलेले नाही.

(२) व (३) या पुलाच्या कामासाठी व जोडरस्त्यांसाठी सुमारे ९.५० कोटी रु. खर्च येईल असा प्राथमिक अंदाज आहे. सध्या सर्वेक्षणाचे काम सुरु असुन त्यानंतर मोठ्या पुलाचे नकाशे अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, कोंकणभवन नवी मुंबई यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन कामाची निकड, निकष व अग्रक्रम तथा निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रस्तावित कामास मंजुरी देण्याचा विचार करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुमुख जगवानी यांनी त्यांच्या जळगांव जिल्हयातील व त्यांच्या मतदार संघातील एक महत्वाचा प्रश्न मांडलेला आहे. तापी नदीवरील भोकर गावाजवळील पूलाचे काम लवकर व्हावे या अर्थाने त्यांनी प्रश्न विचारला आहे, त्याला आपण असे उत्तर दिलेले आहे की, कामाची निकड, निकष, अग्रकम व निधीची उपलब्धता या चार बाबींचा विचार करुन कामास मंजूरी देण्याचा विचार करण्यात येईल. या पूलाच्या बांधकामाचे आदेश आपण अधिकाऱ्यांना दिलेले आहेत काय ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सदर पुलाचे काम व्हावे असा आमच्या खात्याचा विचार आहे, हा पूल पावसाळयात वाहतुकीसाठी बंद असतो व उन्हाळयामध्ये या पूलावरील रहदारीसाठी तात्पुरता पुलाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सदर पूलाचे सर्वेक्षण चालू आहे. पूलाचे संकल्प चित्र तयार आहे. सर्वेक्षण झाल्यानंतर सदर पुलाचे काम केले जाईल.

.......३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१३८०९...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सदर पुलाचे काम किती दिवसांत पूर्ण होईल, याची माहिती मंत्री महोदयांनी दिलेली नाही.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सदर पूलाच्या सर्वेक्षणाचे काम चालू आहे, सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर पूलाचे काम लवकरात लवकर करण्यात येईल.

--------------

.......४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील पोलीसांनी नागपूर, मुंबई, अमरावती, बुलढाणा व अकोला येथील ऑनलाईन लॉटरीवर घातलेल्या धाडी

**(७) * १३५४२ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीसांनी मुंबई, नागपूर, अमरावती, बुलढाणा व अकोला या ठिकाणी सुरु असलेल्या ऑनलाईन लॉटरी सेंटरवर दिनांक १६ डिसेंबर, २००५ रोजी वा त्या सुमारास धाडी घातल्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच भविष्यात ही लॉटरी कायमस्वरुपी बंद करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील, यांच्याकरिता** : (१) दि.१६-१२-२००५ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील ऑन लाईन लॉटरी सेंटर चालक यांनी लॉटरी रेग्युलेशन अॅक्टचे उल्लंघन करुन लोकांची फसवणूक केल्याचे दिसून आल्यामुळे धाडी टाकण्यात आल्या. परंतु, नागपूर, मुंबई, अमरावती व अकोला या ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या नाहीत.

(२) व (३) बुलढाणा जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत लॉटरी रेग्युलेशन अॅक्टचे उल्लंघन करणाऱ्या ऑन लाईन लॉटरी चालकांविरुध्द ७४ गुन्हे दाखल करुन १३० आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईविरुध्द लॉटरी सेंटर चालकांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, बुलढाणा जिल्हयामध्ये ऑन लाईन लॉटरी चालक यांनी लॉटरी रेग्युलेशन अॅक्टचे उल्लंघन करुन लोकांची फसवणूक केल्याचे दिसून आल्यामुळे धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. परंतु कीती घाडी टाकण्यात आल्या आहेत, १ आहेत का अनेक आहेत, त्याचा तपशील दिलेला नाही तो देण्यात यावा. तसेच नागपूर, मुंबई, अमरावती व अकोला या ठिकाणी धाडी टाकण्यात आलेल्या नाही, तेथे धाडी का टाकण्यात आलेल्या नाहीत, त्या ठिकाणी लॉटरी रेग्युलेशन अॅक्टचे उल्लंघन करण्यात आलेले नाही काय ? या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयामध्ये एकूण १७ पोलीस ठाण्याअंतर्गत ७४ ठिकाणी पोलीस अधिकाऱ्यांमार्फत धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. यामध्ये जवळ जवळ १०३ जणांना अटक करण्यात आलेली आहे. या धाडीमध्ये कॉम्प्युटर, स्कॅनर, प्रिंटर, व बोर्ड असे ३३ लाख रुपयांचे साहित्य मिळालेले आहे, हे सर्व साहित्य जप्त करण्यात आले आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13542...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे...

नागपूरमध्ये धाडी टाकण्यात आल्या नाहीत. कारण यापूर्वी टाकण्यात आलेल्या धाडीमध्ये ते लोक मिळाले. त्यामध्ये त्यांचे मोठमोठे एजंट होते त्यांना जागेवर अटक करण्यात आली. म्हणून त्याठिकाणी धाडी टाकण्यात आल्या नाहीत.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या प्रत्येक शहरात ऑनलाईन लॉटरी उघडपणे सुरु आहे. त्या लॉटरीमधून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. त्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे. माझा स्पष्ट प्रश्न असा आहे की, या लॉटरी व्यवसायासंदर्भात शासनाचे सर्वसाधारण धोरण काय आहे? लॉटरी बंद करण्याबाबत शासन कायदा करणार आहे काय?

श्री. आर. आर.पाटील : सभापती महोदय, लॉटरीच्या संदर्भात माननीय वित्तमंत्र्यांनी यापूर्वी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. वन डिजिटल लॉटरीला राज्यामध्ये बंदी आहे. त्याचप्रमाणे स्क्रॅच लॉटरीला सुध्दा प्रस्थापित कायद्याप्रमाणे बंदी आहे. परंतु टू डिजिट लॉटरी कायद्याप्रमाणे सुरु आहे. तेव्हा टू डिजिट लॉटरी सुध्दा बंद करण्याबाबत राज्य शासनाची स्पष्ट भूमिका आहे. साधारणपणे महाराष्ट्रात दररोज 2200 लॉटरीचे ड्रॉ निघतात. त्यामध्ये 24 ड्रॉ हे टू डिजिट लॉटरीचे, 336 ड्रॉ ऑनलाईन लॉटरीचे असे एकूण 360 ड्रॉ महाराष्ट्रात निघतात. यामध्ये 2200 पैकी 360 ड्रॉ महाराष्ट्रातील व बाकीचे ड्रॉ अन्य प्रांतातील असतील तर केवळ महाराष्ट्रातील ड्रॉ बंद करुन बाकीच्या राज्यातील सुरु असलेले ड्रॉ आपल्याला कसे बंद करता येतील? हा प्रश्न आहे. याबाबत माननीय वित्तमंत्र्यांनी यापूर्वी सांगितले होते की, टू डिजिट लॉटरी तरुणांना बिघडवीत असल्यामुळे, त्यामध्ये फसवणूक होत असल्यामुळे ती बंद करणे आवश्यक आहे. परंतु आपली लॉटरी बंद करावयाची आणि बाकीच्या प्रांतामधील लॉटरी आपल्याला बंद करता येऊ शकेल काय? यासंबंधी विधी व न्याय विभागाचा सल्ला मागविण्यात आला असून त्यांचा सल्ला आल्यानंतर या प्रश्नासंबंधी मंत्रिमंडळासमोर जाण्याची भूमिका घेऊन या संदर्भात ठोस धोरण स्वीकारले जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करुन क्रिकेटचे बेटींग चालत्या गाडीमध्ये सुरु असते. ऑनलाईन इंटरनेटचा वापर करुन हे प्रकार सुरु आहेत. महाराष्ट्रामधील लॉटऱ्या बंद करीत असतांना अन्य राज्यातील लॉटऱ्या बंद करण्याबाबत आपण विधी व न्याय विभागाकडे सल्ला मागितला असला तरी त्याबाबत आपल्याला केंद्र सरकारकडे जावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13542...

श्री. अरविंद सावंत...

लागेल. कारण या संदर्भात इतर राज्यांवर बंधने घालणे कठीण आहे. हा प्रश्न केवळ बुलढाणा जिल्हयाचा नाही. आपल्या महाराष्ट्रामध्ये ज्या 336 ऑन लाईन लॉटऱ्या आहेत त्या आपण तातडीने बंद करणार कां? आणि उर्वरित लॉटऱ्या बंद करण्यासाठी आपण केंद्र सरकारकडे मागणी करणार काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या राज्यातील लॉटरीच्या संदर्भात टू डिजिट लॉटरीचे प्राईस पे आऊट 91 टक्क्यापर्यंत जाते. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे ऑन लाईन लॉटरी 15-15 मिनिटांनी काढली जाते. त्यामुळे तरुण मुले त्या ड्रॉच्या ठिकाणी उभे राहतात. यामध्ये खेडापाडयातील तरुण मुले फार मोठया प्रमाणात आहारी गेली आहेत. या लॉटऱ्या बंद करण्याबाबत काही महिन्यापूर्वी केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र पाठविले व त्यांना विनंती केली की, यामध्ये प्राईस पे आऊट 91 टक्क्यापर्यंत जात आहे. व त्यामध्ये राज्याला 2 ते 3 टक्के फायदा मिळत आहे. आणि इतर राज्यामधील लॉटरीचे काम अर्धा ते एक टक्का या दराने मक्त्याने इतरांना दिले जात आहे. विशेषत: यामध्ये अरुणाचल प्रदेश वगैरे राज्यामधील लॉटरीचे पिक मोठया प्रमाणात असून त्यांनी ऑनलाईन लॉटरी इतरांना चालवायला दिली होती.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (पुढे सुरु...

20 ते 25 टक्के या दराने राज्याला फायदा मिळणार होता. दरम्यानच्या काळात देशामध्ये 1 टक्क्याचे कमिशन घेऊन काही नॉर्थ इस्टकडील राज्यांनी त्यांच्या राज्यात लॉटऱ्या चालविण्यास दिल्या. त्यांचे लायसन्स घेऊन देशभर लॉटऱ्या विकण्याची पध्दत सुरु केली. ज्या राज्यात लॉटरी चालू असते, ते राज्य दुसऱ्यांना लॉटरी चालविण्यासाठी मज्जाव करु शकत नाही, असा केंद्राचा कायदा आहे. म्हणून केंद्रीय गृह मंत्र्यांना पूर्वीच पत्र पाठविलेले होते. त्यानंतर आपल्या विनंती नुसार केंद्रीय गृहमंत्र्यांनी देंशातील अर्थमंत्र्यांची आणि देशातील वेगवेगळया पक्षांची बैठक बोलाविली. ती बैठक पार्लमेंट अनेक्चरमध्ये होऊन ऑफीशियली सगळयांची मते एकत्र झाल्यानंतर, आपण मत मांडले की, जर एखाद्या राज्याला लॉटरी चालवायची असेल तर किमान 15 ते 20 टक्के फायदा हा राज्याला मिळाला पाहिजे. एक आणि अर्धा टक्का असेल आणि प्राईस पे आऊट जेवढा जास्त असेल तेवढी ॲडीशनची ॲपॉर्च्युनिटी जास्त आहे. कारण नंबर ऑफ ड्रॉज वाढतात. प्राईस पे आऊट 8 टक्के, 10 टक्के असेल तरी ते चालू रहातात. देशातील लॉटरीच्या संबंधात समानता यायला पाहिजे, यासाठी केंद्राने एक समिती नेमली. काही राज्याने 20 टक्के आणि एका राज्याने 1 टक्का घ्यायचे, असे असमान धोरण होऊ नये, म्हणून यामध्ये समानता आणावी हा उद्देश आहे. जर राज्याला लॉटरी चालवायची असेल तर प्राईस पे आऊट समान असली पाहिजे. श्री.अरविंद सावंत : हा अर्थकारणाचा मुद्दा आहे की नैतिकतेचा मुद्दा आहे ?

श्री.जयंत पाटील : आपण नैतिकतेच्या आधारावरच केंद्र सरकारला पत्र पाठविलेले आहे. आपण त्यांना सांगितलेले आहे की, या देशात ॲडीशन वाढलेले आहे. फक्त महाराष्ट्रामध्येच नाही तर देशात सगळीकडेच लॉटरी बंद होण्याची गरज आहे.त्यामुळे आपण प्राईस पे आऊट 91 टक्के न ठेवता, ट्रॅडिशनल लॉटऱ्या प्रमाणे त्या 6 टक्के प्राईस पे आऊट होत्या त्यामुळे प्राईस पे आऊट जेवढा कमी तेवढी ॲडीक्शन कमी होऊ शकते. त्यामुळे प्राईस पे आऊट 20 टक्क्यावर ठेवावा किंवा वाढवावा, अशी आपण मागणी केली. त्यांनी छोटी समिती निर्माण केलेली आहे.त्यामध्ये केंद्र सरकारने काही निष्कर्ष काढून देशात समान धोरण, ॲडिक्शन कमी करणे या बाबी त्या समितीकडे आहेत, दोन डिजिटच्या लॉटरीमुळे निर्माण झालेले प्रकार बंद करावेत, या मानसिकतेने ते आलेले आहे. आपण आपल्या राज्यात भूमिका घेतलेली आहे की, आपल्या राज्यात दोन डिजिटची लॉटरी चालू देणे योग्य नाही. आपण आपली लॉटरी बंद करतो आहोत. ती बंद करण्याच्या संबंधात माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. तसेच दुसऱ्या राज्यातील लॉटरी

श्री.जयंत पाटील (पुढे सुरु....

बंद करण्यासाठी लॉटरी बोर्डाची दीड आठवड्यापूर्वी बैठक झाली. त्यामध्ये सर्वंकष विचार करुन आम्ही मंत्रीमंडळासमोर जातो आहोत. मंत्रीमंडळासमोर जाण्याचे कारण असे की, नुसते लॉटरी बंद म्हटली, तरी ती बंद होत नाही. मी या संबंधाने सन 2000 साली अशाप्रकारचा प्रयत्न केला होता. काही नियम बदलून दोन डिजिटची लॉटरी या राज्याने चालवू नये, म्हणून काही नियम आपण बदलले. दोन डिजिटच्या लॉटरीला आपण विरोध केला. परंतु गोहाती हायकोर्टाने आपल्या विरोधी निकाल दिला. आपण केलेल्या तरतुदी त्यांनी रद्द केल्या. त्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी हायर बेंचसमोर आपण गेलो. त्यांनी पुन्हा आपण केलेल्या तरतुदी रद्द केल्या. म्हणून आपण 2002 नंतर दोन डिजिट लॉटऱ्या त्यांना कॉम्पीट करण्यासाठी सुरु केल्या. पण जे ॲडिक्शन झालेले आहे, ते बंद करण्यासाठी आता आपल्या राज्यातील दोन डिजिट लॉटऱ्या पूर्णपणे बंद करत असतांना परराज्यातील बंद करण्यासाठी कायद्यामध्ये दुरुती करण्याचा विषय घेऊन आम्ही मंत्री मंडळासमोर जातो आहोत.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : तारांकित प्रश्न क्रमांक 16653....

(अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी उभे रहातात.)

...(अडथळा)...

**सभापती** : त्या प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांचे नाव आहे, त्यांनाही मला वेळ देता आलेला नाही.

....(अडथळा)...

श्री.दिवाकर रावते : जुगाराला कोर्ट मान्यता देत असेल तर या सभागृहाला काही मत नाही काय ? आम्ही त्या विषयी आमचे मत मांडायचे नाही काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब, हात वर करणाऱ्या सगळया सदस्यांना बोलण्यासठी परवानगी देण्यासारखी परिस्थिती नाही. तुम्हाला बोलण्यासाठी वेळ देत नाही असे झ ाालेले नाही...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे....

....(अडथळा)...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलतात.)

**सभापती** : सन्मानीय सदस्यांनी खाली बसावे. मी त्या प्रश्नाला जास्तीत जास्त वेळ देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

......(अडथळा)....

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार 12:55 वा.

ता.प्र.क्र. 13542 ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल शिक्षकांच्या एका प्रश्नावर 35 मिनिटांचा वेळ दिला त्यावेळी आम्ही तक्रार केली नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी आपला प्रश्न उपस्थित करावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न आहे.

**सभापती** : मी या प्रश्नाला 12 मिनिटे दिलेली आहेत.

श्री. दिवाकर रावते : आपले धोरण काँगेसधार्जिणे आहे.

**सभापती** : हे चुकीचे आहे. हा हेत्वारोप आहे. या आसनावर बसल्यानंतर मी "अ" किंवा "ब" पक्षाचा आहे असे कधीच दाखवलेले नाही. त्यामुळे आपण असे कसे म्हणत आहात ?

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शिक्षकांच्या संदर्भातील कोणता प्रश्न 35 मिनिटे चालला ?

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये काल मी 10 प्रश्न पुकारले आणि आपण 11 व्या प्रश्नापर्यंत गेलो होतो. आजचा हा जो प्रश्न होता त्याला मी 12 मिनिटे वेळ दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे ज्या ज्या वेळी प्रश्न विचारण्यासाठी हात वर करतात त्यातील 80 ते 85 टक्के वेळा मी त्यांना परवानगी देतो. मी सगळ्या सन्माननीय सदस्यांना परवानगी देण्याचा प्रयत्न करीत असतो. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांचेही नाव त्या प्रश्नामध्ये होते परंतु मला त्यांना प्रश्न विचारण्यास वेळ देता आला नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनाही मला वेळ देता आला नाही. असे असताना माझ्यावर असा हेत्वारोप करणे योग्य नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, असे असेल तर मी माफी मागतो.

**सभापती** : यामध्ये माफीचा प्रश्न नाही. सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी आपला प्रश्न उपस्थित करावा.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/ SBT/ MAP

**मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गाबाबत**

**(8) * 16653 श्री. प्रतापराव सोनवणे , डॉ. अशोक मोडक , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या भिवंडी इगतपूरी या टप्प्याचे चौपदरीकरण करण्यासाठी 54 हेक्टर वन जमिनीची आवश्यकता असून सुमारे 10 हजार झाडे तोडावी लागतील असे माहे सप्टेंबर, 2005 मध्ये वा त्या दरम्यान शासनाला आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, चौपदरीकरणासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच त्या जमिनीवरील झाडे तोडण्याबाबत केंद्रीय वन खात्याकडून परवानगी मिळविण्यासाठी कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) होय, अंशत: हे खरे आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र. 3 च्या वडपे ते गोंदे (कि.मी. 540/0 ते 440/0) या भागाचे चौपदरीकरणाच्या कामाचे नियोजन व अंमलबजावणी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली (NHAI) नाशिक यांचे मार्फत करण्यात येत असून Project Director (PIU), NHAI यांचेकडून उपलब्ध माहितीनुसार ठाणे वन विभागाच्या कार्यक्षेत्रातील 74.5 हेक्टर वन जमिनीच्या हस्तांतरणाबाबत वन विभागाकडे कार्यवाही सुरु आहे. तसेच या लांबीतील एकूण 16096 झाडे तोडण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(2) Project Director (PIU), NHAI नाशिक यांचेकडून उपलब्ध माहितीनुसार नाशिक जिल्ह्यातील झ ाडे तोडण्याबाबतची परवानगी प्राप्त करुन घेण्यात आली आहे. परंतु वाहतुकीची परवानगी (Transit pass) नसल्यामुळे वृक्ष तोडीची प्रक्रीया NHAI मार्फत तूर्त स्थगित ठेवण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे ठाणे वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील 74.5 हेक्टर वन जमीनीची चौपदरीकरणाच्या कामासाठी आवश्यकता भासणार आहे. त्याबाबतचे प्रस्ताव NHAI मार्फत वन विभागाकडे सादर केलेले असून पुढील कार्यवाही वन विभागामार्फत सुरु आहे.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये आम्ही ज्या ज्या शंका किंवा जे प्रश्न विचारले होते ते माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये मान्य केलेले आहेत. या ठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "अंशत: हे खरे आहे" असे म्हटले आहे. याचा अर्थ समजला तर बरे होईल. त्या ठिकाणी भिवंडी-इगतपुरी या टप्प्यामध्ये 74 हेक्टर वन जमीन आपल्याला हवी आहे. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर भिवंडी-इगतपुरी टप्प्यामधील रस्त्याच्या चौपदरीकरण्याच्या योजनेमध्ये सप्टेंबर, 2005 मध्ये प्रॉब्लेम्स लक्षात आले. मुळात हे चौपदरीकरण करण्यासाठी काय

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 16653..... डॉ. अशोक मोडक ....

काय काळजी घ्यावी लागणार आहे ? कोणते कोणते कंसल्टेशन्स करावे लागतील ? कोणत्या कोणत्या टप्प्यातून जावे लागणार आहे याची योजना शासनाने तयार केली आहे काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी असा प्रश्न विचारला की, "अंशत: खरे आहे" या उत्तराचा अर्थ काय ? याप्रश्नामध्ये आपण अशी माहिती दिली आहे की, 54 हेक्टर वन जमिनीची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी 54 हेक्टरऐवजी 74.5 हेक्टर वन जमिनीची आवश्यकता आहे. तसेच 10 हजार झाडे तोडावी लागतील असे प्रश्नामध्ये म्हटले आहे त्याऐवजी 16096 झाडे तोडावी लागतील अशी परिस्थिती आहे. त्यामुळे तशा पध्दतीचे उत्तर दिलेले आहे. हे पूर्ण काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली (NHAI) यांच्यामार्फत करण्यात येत आहे. यामध्ये काही जमीन नॉनफॉरेस्ट आहे तर काही जमीन फॉरेस्टची आहे. नाशिक जिल्ह्यामध्ये जी जमीन येते त्याला अधिकाऱ्यांनी परवानग्या देण्याची आवश्यकता होती. त्या परवानग्या दिलेल्या आहेत. ठाणे भागामध्ये एका ब्रिजच्या माध्यमातून, डोंगरातून हा मार्ग जातो. ती जागा आपल्या वन खात्याकडे आहे. ती जागा NHAI ने मागितलेली आहे. त्यासंदर्भात कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. आपले जे वन खाते आहे त्या खात्यामध्ये वेगवेगळ्या टप्प्यावर कार्यवाही सुरु आहे. केंद्रीय पर्यावरण विभागाची सुध्दा परवानगी लागेल. दरम्यानच्या काळात जेवढे काम चालू ठेवता येत होते तेवढे काम चालू ठेवलेले आहे. आपल्या राज्याचे माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांच्याबरोबर मी दोनतीन बैठका घेतलेल्या आहेत. यातून लवकरात लवकर मार्ग कसा काढता येईल यासंदर्भात मी प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 16653...) (श्री. छगन भुजबळ पुढे सुरु...)

हे प्रश्न लवकर मार्गी लागतील असे वाटते. या कामास परवानगी मिळण्याच्या संदर्भात आपण मदत करावयाची आहे.4 ऑगस्ट 2005ला वर्क ऑर्डर दिलेली असून या कामाला सुरुवात झालेली आहे. वन खात्याचे अतिशय क्लिष्ट कायदे आहेत. त्यामधून मार्ग काढण्याचा आमचा प्रयत्न सुरु आहे.

श्री. प्रताप सोनवणे : मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गाच्या भिवंडी इगतपुरी या टप्प्यामध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होऊन प्राणहानी होते. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी या रस्त्याचे चौपदरीकरण करणे गरजेचे आहे. मुंबई-धुळे महामार्गाचे चौपदरीकरण केले तर त्यामुळे वेळेची, इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाच्या बाबतीतही मदत होईल. शासनाच्या लालफितीच्या कारभारामुळे हे काम प्रलंबित राहिलेले आहे. या कामासाठी केन्द्राची देखील परवानगी घ्यावी लागणार आहे. तेव्हा वन खाते येत्या 15 दिवसामध्ये केन्द्राकडे या कामासंबंधीचा प्रस्ताव पाठविणार आहे काय ? तसेच भिवंडी ते धुळे या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री. छगन भुजबळ : कामाला सुरुवात झालेली आहे. झाडे तोडण्याचे काम सुरु झालेले आहे. जंगल तोड आणि ट्रान्सपोर्टेशनसाठी वेगळी परवानगी लागते. ती परवानगी घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. हे काम लवकरात लवकर व्हावे यादृष्टीने राज्य शासन केन्द्र स्तरावर प्रयत्न करीत आहे. हे काम 15 दिवसामध्ये होईल किंवा 15 दिवसामध्ये परवानगी मिळेल असे निश्चित सांगता येणार नाही. राज्याकडून भोपाळकडे हा प्रस्ताव पाठवावा लागतो. याबाबतीत फॉलोअप करणे एवढेच आमच्या हातामध्ये आहे. हे काम लवकर व्हावे यादृष्टीने आम्ही फॉलोअप करीत आहोत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी माझा तसा उद्देश नव्हता.

**सभापती** : ठीक आहे. प्रश्नोत्तराचा तास संपला.

---

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेतक-यांच्या आत्महत्याबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, शेषराव कोंडीबा मुंढे, राहाणार आगलगाव, ता.जिंतूर, जि. परभणी, 2) सुखदेव गोपीनाथ राठोड, राहाणार मंठा, ता. जि. बीड आणि 3) अब्दुल्ला शहा रहेमान शहा राहाणार जवखेडा ठेंड, ता. जि. जालना, या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्या करणा-यांची एकूण संख्या 367 इतकी झालेली आहे. विदर्भामध्ये आज एकही आत्महत्येही नोंद झाली नाही. धन्यवाद.

--



अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, एस.टी. महामंडळातील गैरकारभाराच्या संदर्भात मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

**सभापती** : प्रश्नात्तराच्या तासामध्ये पी.व्ही.सी.पाईप्स, कार्पेट यासंबंधीचा प्रश्न चर्चेला आहेला होता.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, त्याच विषयाच्या संदर्भात मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा होता. परंतु त्यावर चर्चा झालेली असल्यामुळे मी माझा औचित्याचा मुद्दा आता मांडत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, कोकणातील हापूस आंबा जगभर प्रसिध्द आहे. चालू हंगामामध्ये अल्फान्सो आंब्याच्या सुमारे दीड लाख पेटया कोकणातून मुंबईमध्ये येतात. जे.एन.पी.टी. येथे बंदरात चढ-उतार करणा-या क्रेन्समध्ये बिघाड झाल्यामुळे परदेशात जाणारे आंब्याचे वातानुकूलित कंटेनर बंदरातच अडकून पडले आहेत. माल साठवून ठेवणारे कोल्डस्टोअरेज नव्या कंटेनरना सामावून घेऊ शकत नाहीत. त्यामुळे आंब्याच्या दोन लाखाहून अधिक पेटया कंटेनर यार्डात पडून आहेत. परिणामी आंब्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे, ही वस्तुस्थिती मी शासनाच्या या औचित्याच्या मुद्याद्वारे निदर्शनास आणून देत आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी एका गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधणार आहे. महाराष्ट्रामध्ये परित्यक्त्यांचे अत्यंत ज्वलंत असे प्रश्न निर्माण झाल्याचे आपल्याला दिसून येईल. खरे म्हणजे पोलीस खात्याच्या हलगर्जीपणामुळे परित्यक्त्यांना जी वॉरंट काढली जातात त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे या महिलांना न्याय मिळत नाही. उलट त्यांचे प्रश्न वाढतात. या स्थितीत न्याय व्यवस्थेकडून आणि पोलीस खात्याकडून संवेदनशीलता अभावानेच आढळून येते. या परित्यक्त्यांना सोडून दिलेले असते. मूल होत नाही म्हणून आणि हुंडयासाठी टाकून दिलेले असते. व्यसनाधीनता असते. अनेक कारणांमुळे या महिला परित्यक्त्या असतात. या महिलांना धड माहेरची मंडळी मान देत नाहीत आणि सासरची मंडळी मानसिक त्रास देतात. अशा परिस्थितीमध्ये या महिलांकडे समाजाची वाईट नजर असते. कौटुंबिक न्यायालयांकडे वर्षानुवर्षे खटले पडून असतात. 5/5 वर्षे खटल्यांचा निकाल लागत नाही. वॉरंट बजावण्याचे काम पोलीस स्टेशनकडे असते. परंतु पोलीस याकडे दिरंगाई करतात. पोलीस स्टेशनचे सहकार्य मिळत नाही. नवरा असतो त्याला पकडून आणले जात नाही. गावात असला तरी पोलीस तो बाहेर आहे असे दाखवितात. वॉरंट काढलेले परत पाठविले जाते. गृहमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करते की या महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हा स्तरावर एक स्वतंत्र सेल निर्माण करण्यात यावा. या महिलांना पोटगी वेळच्या वेळी मिळण्यासाठी पोलीस स्टेशनने सहकार्य करावे तसेच संजय गांधी निराधार योजनेतून या महिलांना पैसे मिळावेत अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करते.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 13:05

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी,आठवी,नववी,दहावी, अकरावी,बारावी,तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

**सचिव** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी,आठवी,नववी,दहावी,अकरावी,बारावी,तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी,आठवी,नववी,दहावी,अकरावी,बारावी,तेरावी व चौदावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी. )

-----

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. बाबा सिद्दीकी (अन्न व नागरीपुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "चांदूर रेल्वे(जि.अमरावती) येथील वजन माप निरीक्षक यांनी वजने यंत्रे पंजीबध्द करण्यासाठी लाच घेतल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री धोंडिराम राठोड,संजय दत्त,मेजर सुधीर सावंत,सुधाकर गणगणे,यशवंतराव गडाख,नतिकोद्दीन खतिब,वि.प.स. यांच्या दिनांक 27 मार्च 2006 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 15737 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस: अधिक माहिती छापावी. )

----

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. व मु. शी : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अ-नुमती-ने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलास बाजार समितीचा सन 2004-2005 चा अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अठरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सतीश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादितचा सन 2001-2002 चा 36 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : छत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सतीश चतुर्वेदी (वस्त्रोद्योग मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मौलाना आजाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादितचा (मुंबई) सन 2000-2001, 2001-2002, 2002-2003 चा अनुक्रमे पहिला, दुसरा व तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : पहिला, दुसरा व तिसरा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने मासिक निधी विवरणपत्र सन 2006-2007 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : मासिक निधी विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मूकबधीर मुलींचे विद्यालय,गुरूकूल मलकापूर,जि.अकोला या शाळेतील विद्यार्थींना झालेल्या विषबाधेसंदर्भात नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा पहिला अहवाल.**

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने मूकबधीर मुलींचे विद्यालय,गुरूकूल मलकापूर,जि.अकोला या शाळेतील विद्यार्थींना झालेल्या विषबाधेसंदर्भात नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सभापती महोदय, हा अहवाल सादर करीत असताना सामाजिक न्याय विभागांतर्गत चालणाऱ्या अपंग संस्था त्यात शासकीय, खाजगी अनुदानित व विनाअनुदानित याकडे सभागृहाचे लक्ष वेधित आहे. राज्यात एकूण शासकीय 21, अशासकीय 610 व विनाअनुदानित 157 संस्था आहेत. यासाठी राज्य शासनाने सन 2005-2006 अर्थसंकल्पात 10 लाखाच्या जवळपास आर्थिक तरतूद केली आहे.

सभापती महोदय, राज्यात सन 2001 च्या जनगणनेनुसार अंध, मुके, बहिरे, अस्थिव्यंग व मतिमंद यासर्व अपंगाच्या प्रकारानुसार एकूण 15 ते 16 लाख व्यक्ती आहेत. या सर्वांना इतर सर्वसामान्य व्यक्तीप्रमाणे विकासाची संधी मिळावी यासाठी राज्य शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. आर्थिक भरीव तरतूद केलेली आहे. तथापि, या ठिकाणी खेदाने नमूद करावे लागते की, ज्या अशासकीय संस्था आहेत, त्या शाळा चालविताना राज्य शासनाच्या अनुदानाएवढा सुध्दा खर्च विद्यार्थ्यांवर करीत नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा संस्था केवळ शासकीय अनुदान घेण्यापुरत्याच अस्तित्त्वात आहेत किंवा कसे अशीही शंका वाटते.

सभापती महोदय, या समितीकडे विषबाधेची चौकशी करण्याचे काम दिले होते. या प्रकरणाची समितीने सखोल चौकशी केली आहे व काही शिफारशी सुध्दा केल्या आहेत. चौकशीअंती विषबाधा झाल्याची घटना जरी खरी असली तरी विषबाधाकशाने झाली याचीउ कारणे काय आहेत या बाबी समिती समोर निष्पन्न होऊ शकल्या नाहीत. मात्र, समितीने संस्थेस या प्रकरणी दोषी धरले आहे व त्याप्रमाणे संस्थेवर कारवाई करण्याची सुध्दा शिफारस समितीने केली आहे.

..3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मूकबधीर मुलींचे विद्यालय,गुरूकूल मलकापूर,जि.अकोला या शाळेतील विद्यार्थींना झालेल्या विषबाधेसंदर्भात नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करण्यात आला.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, विशिष्ट कामासाठी ही समिती नेमली होती. अजूनही या समितीचे अहवाल येणे बाकी आहेत काय ?

**सभापती** : माझ्या माध्यमातून हा प्रश्न नंतर समिती सदस्यांना विचारावा.

....

**माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अंतरिम अहवाल सादर करणे**.

श्री.सतिश चतुर्वेदी (माजी सैनिक कल्याण मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अंतरिम अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : माजी सैनिकांचे कल्याण तदर्थ समितीचा अंतरिम अहवाल सभागहाला सादर झाला आहे.

....

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.भारवि... 13:15

**पृ.शी./मु.शी.**: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती कांता नलावडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायत राज समितीचा तिसरा, चौथा, पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर करते.

पंचायती राज समितीने सन 2005-06 या कालावधीत जिल्हा परिषदांना दिलेल्या भेटी संबंधीचे चार अहवाल सभागृहात सादर करण्यात येत आहेत.

1. समितीने जिल्हा परिषदांना दिलेल्या भेटीच्यावेळी असे निदर्शनास आले की, जेल मधील कापड जिल्हा परिषदांमार्फत खरेदी केले जाते. परंतु पुरवठा करण्यासंबंधी कळवून देखील एक वर्षापर्यंत जेलकडून मालाचा पुरवठा होत नाही. त्यामुळे जेल मधील कापड खरेदीबाबतचे शासनाचे धोरण योग्य नाही. त्यामुळे खुल्या बाजारातून लागणा-या वस्तुंची खरेदी करण्यात यावी अशी समिति शिफारस करीत आहे.

2. एमएसएसआयडीसी कडून घेत असलेल्या वस्तु बाजार भावापेक्षा जास्त भावाने घ्याव्या लागतात. त्याबाबतसुध्दा विचार करणे गरजेचे आहे.

3. भंडारा जिल्हा परिषदेकडे मोठया प्रमाणात अफरातफरीची प्रकरणे झालेली आहेत. अफरातफरीच्या प्रकरणातील कागदपत्रे पोलिसांकडे दिल्यानंतर संबंधितांचे विभागीय चौकशीचे काम खोळंबून राहते. यासाठी मुळ कागदपत्रे पोलिसांकडे दिली जाणार असतील तर प्रमाणित केलेली कागदपत्रे विभागीय चौकशीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावीत. तसेच सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार एक वर्षामध्ये प्रकरण निकालात काढावीत यासंबंधी नव्याने परिपत्रक काढण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

4. कर्मचाऱ्यांकडील अफरातफरीच्या प्रकरणातील रक्कम वसूल करण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना सक्त ताकीद देण्यात येवून, त्यासंबंधीची कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

**सभापती** : पंचायत राज समितीचा तिसरा, चौथा, पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.सुधाकर गणगणे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा 2005-2006 या वर्षाचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

महोदय, इतर मागासर्गीयांचा प्रश्न केवळ दोन मिनिटांमध्ये सांगणे शक्य होणार नाही. जे समितीच्या अहवालात अपेक्षित आहे आणि समितीने शासनाला ज्या शिफारशी केल्या आहेत त्या लक्षात आणून देणे आवश्यक आहे. सध्या प्रचलीत असलेला आरक्षण कायदा हा विसंगत आहे. त्यामुळे प्रथम या कायद्यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. इतर मागासवर्गीयांना निरनिराळया स्तरांवर कशा प्रकारे सवलती मिळतील या दृष्टिकोनातून हा आरक्षण कायदा करणे आवश्यक आहे. राज्यामध्ये सध्या इतर मागासवर्गीयांच्या 19 टक्के शासकीय कर्मचाऱ्यांना सरळ सेवेमध्ये नोकरी मिळते. परंतु त्यांना पदोन्नती मात्र मिळत नाही. त्यामुळे त्यांना पदोन्नतीचे आरक्षण ठरविण्याबाबत या सभागृहात उप समिती नियुक्त करण्याचे जाहीर करण्यात आले होते. त्या समितीने अहवाल दिलेला आहे, परंतु त्यातील शिफारशींची अंमलबजावणी होत नाही. या उप समितीने तीन महिन्यांपूर्वी ज्या शिफारशी जाहीर केलेल्या आहेत त्या शिफारशी शासनाने स्वीकाराव्यात अशी या अहवालात शिफारस करण्यात आली आहे.

महोदय, राज्यातील इतर मागासवर्गीयांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोनातून, मग त्यामध्ये जात पडताळणीचे काम असो किंवा तत्सम सवलती देण्याचे काम असो, त्याबाबतची अंमलबजावणी करावयाची असेल तर जिल्हावार इतर मागासवर्ग कार्यालय करणे आवश्यक आहे. तसेच राज्य पातळीवर इतर मागासर्गीयांसाठी मंत्रालय आणि संचालनालय स्थापन करणे आवश्यक आहे.

महोदय, इतर मागार्सवर्गीयांची जनगणना 1932 सालापासून करण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांची जनगणना लवकरात लवकर करण्यात यावी यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस करावी. इतर मागासवर्गीयांसाठी महामंडळ स्थापन करण्यात आले आहे, परंतु त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद नसल्यामुळे 52 टक्के ओ.बी.सी. वर्गाला खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्टया न्याय मिळू शकत नाही. त्यामुळे या सर्व गोष्टींच्या बाबतीत समितीने आपल्या अहवालामध्ये शासनाला शिफारस केली आहे.

**सभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीलचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

--------- नंतर श्री.कांबळे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ KGS/ MHM यापूर्वी श्री. बोर्डे .. 13.20

**पृ.शी. व मु.शी.** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. विलास अवचट ( समिती सदस्य ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

" शुक्रवार, दिनांक 21 एप्रिल, 2006 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशसकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 20 एप्रिल, 2006 रोजी समितीची बैठक झाली. 150 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

1) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 33 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2) श्री. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 89 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक - 36 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे. "

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. विलास अवचट ( समिती सदस्य ) : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

..2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वये सूचना**

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी " दिनांक 4 एप्रिल, 2006 रोजी वा त्या सुमारास अकोला येथील शंकर नगरातील सिटी बेकरीत काम करणाऱ्या अमीर उल्ला खॉ या दहा वर्षीय बाल कामगारास बेकरी मालकाने गरम सळईचे चटके देण्याची घडलेली घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 18 एप्रिल, 2006 रोजी जळगांव येथील अँग्लो उर्दू कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक शफीक सिध्दीकी यास देश विघातक कारवाया प्रकरणी अटक करण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " गेल्या दहा पंधरा वर्षात कोकणातील हापूस आंब्याचे नैसर्गिक संकटामुळे झालेले हजारो रुपयांचे नुकसान व जे.एन.पी.टी बंदरातून आंब्याची निर्यात करण्यात आलेल्या अडचणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. वसंतराव खोटरे व इतर वि.प.स. यांनी " शासनाच्या संचालक, प्रशिक्षक या पदावर सन 1999 पासून सह संचालक पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तीन वर्ष कार्यकाळ झाल्यानंतरही बदल्या करण्यात न येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

----

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाच्या कामकाजाबाबत

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी मघाशी सभागृहाच्या कामकाजासंदर्भात विनंती केली होती की, सभागृहात आज नियम 93 अन्वयेची निवेदने आणि त्यानंतर लक्षवेधीच्या सूचना आहेत. सदनासमोर असलेली शासकीय विधयके आज जर प्रथम घेतली आणि त्यानंतर नियम 93 अन्वयेचे निवेदन व लक्षवेधी सूचना घेतल्या तर शासकीय विधेयके लवकर पूर्ण व्हायला मदत होईल. या दृष्टीने दोन्ही बाजुने या संदर्भात सांगितले तर कामकाज घेणे सोपे होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधेयके सुरु करायची तर सन्माननीय सदस्य सभागृहात नाहीत. या कामकाजपत्रिकेवर इतकी विधेयके दाखविली आहे ती सगळी घेणार की काय ? हे काम रात्री बारापर्यंत घ्यायचे का ?

**सभापती** : जेवढी विधेयके होतील, तेवढी घेऊ. आज आपण दुपारी 12 वाजता सदनाचे काम सुरु केले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाची वेळ दुपारी 12 ते सायंकाळी 5 आहे. सभागृहाचे कामकाज 5-6 वाजेपर्यंत संपेल का ?

**सभापती** : विधानसभेमध्ये काय झाले याचा उल्लेख येथे करावयाचा नाही असे म्हणतात. परंतु काहींनी सांगितले की, काल खालचे सभागृह रात्री सव्वा बारा वाजता संपले आणि आज सकाळी पुन्हा साडे दहा वाजता त्यांचे कामकाज सुरु झाले.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती..

सदनातील दोन्ही बाजूकडील सदस्यांना मी विचारीत आहे, आपण जर सहाकार्य केले तर आपणाला जास्तीत जास्त कामकाज आज पूर्ण करता येईल या दृष्टीने मी हे सांगत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी या सभागृहात आल्यापासून कामकाज सल्लागार समितीमध्ये सूचना करतो की, अधिवेशनाच्या शेवटी विधेयके चर्चेला येतात व शेवटच्या दोन दिवसांत भरपूर विधेयके कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात येतात. आम्ही येथे रात्रभर बसावे काय ? विधेयकावर चर्चा होऊन तो कायदा पास झाला पाहिजे हेच काम विधिमंडळाचे आहे त्यादृष्टीने विधेयक चर्चेला घेतली पाहिजेत.

**सभापती** : काल सुध्दा आपण येथे दोन विधेयके पास केलेली आहेत व प्रत्येक विधेयकावर सरासरी 2 ते 3 तास चर्चा कलेली आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आता नियम 93 अन्वये जी निवेदने आहेत ती घ्यावीत व त्यानंतर विधेयके घ्यावीत, नंतर लक्षवेधी व पुढील कामकाज घ्यावे.

**सभापती** : आता प्रथम आपण नियम 93 ची निवेदने घेऊ निवेदनानंतर विधेयके घेण्यात येतील.

( माननीय मुख्यमंत्री खाली बसून आम्हाला सहकार्य करा असे बोलतात )

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत तशा प्रकारे क्रमाने दाखविण्यात यावयास पाहिजे होते. आम्ही आपणाला नेहमी सहकार्य करीत आहोत. आम्ही आपणास प्रत्येक वेळी सहकार्य करतो, असे एकतरी विधेयक आपण दाखवा की आम्ही सहकार्य केलेले नाही.

**सभापती** : सन्माननीय सरपोतदार साहेब, दोन्ही बाजूकडील सदस्यांना विचारणा केल्यानंतर कामकाज पत्रिकेवरील एखादा विषय खालचा वर व वरचा खाली केला तर काही फरक पडू शकत नाही.

-----------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 13:25

**पृ.शी.**: जनावरांचा लाळ, खुरकुत या रोगाने झालेला मृत्यू

**मु.शी.**: जनावरांचा लाळ खुरकुत या रोगाने झालेला मृत्यू याबाबत सर्वश्री प्रा. शरद पाटील, जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अनिस अहमद (पशुसंवर्धन मंत्री ): सभापती महोदय, सर्वश्री. प्रा. शरद पाटील, श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी जनावरांचा लाळ, खुरकुत या रोगाने झालेला मृत्यू या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

.........3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये एकूण 71 जनावरे आजारी होती, त्यापैकी 39 जनावरे मृत झाली व 32 जनावरे औषधोपचाराने बरी झाली असे म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, जी 39 जनावरे मृत झाली त्यांच्या मालकांची उपासमार होऊ नये म्हणून शासन त्यांना काही मदत करणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, जानवरों को "फुट एंड माउथ" बीमारी हुई थी. जिन जानवरों की मृत्यु हो गई है, उनके मालिकों को कोई मुआवजा नहीं दिया गया है.

प्रा. शरद पाटील : क्या मृत जानवरों के मालिकों को मुआवजा देने का शासन का विचार है ?

(उत्तर नहीं दिया गया)

-----



अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सरदार सरोवर प्रकल्पाची उंची वाढविण्याबाबत

**मु.शी.**: सरदार सरोवर प्रकल्पाची उंची वाढविण्याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री ): सभापती महोदय, सर्वश्री. सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, वि.प.स. सरदार सरोवर प्रकल्पाची उंची वाढविण्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

.......5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय दिल्ली येथे गेले होते त्यावेळी सन्माननीय माजी विरोधी पक्षनेते श्री. नितीन गडकरी यांनी हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्यावेळी सभागृहात असे सांगण्यात आले होते, राज्याच्या हिताच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्री भूमिका मांडणार आहेत. त्यांनी तशी भूमिका मांडली आहे काय ? श्रीमती मेधा पाटकर यांनी आंदोलन केलेले आहे, त्यांची अशी भूमिका आहे की पुनर्वसन व्हावयास पाहिजे. परंतु धरणाची उंची वाढविण्याचे काम हे पावसाळयापूर्वी होणे सुध्दा गरजेचे आहे. पावसाळयापूर्वी धरणाची उंची वाढविण्याचे काम पूर्ण झाले तर आपल्याला 390 मेगावॅट वीज, 5 टीएमसी पाणी मिळेल, त्यामुळे या पावसाळयापूर्वी उंची वाढविण्याचे काम व्हावे या कल्पनेतून सरकार काही करीत आहे काय ?

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

त्याठिकाणी जी बैठक घेण्यात आली होती त्यामध्ये तीन राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी काम स्थगित न करता ते पुढे चालू ठेवावे अशी भूमिका घेतली. आणि चौथ्या आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांकडे काम स्थगिती करण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठवावा अशापध्दतीने मतदान केले. अशाप्रकारचे मतदान करण्यामागचे कारण काय? तसे पाहिलेतर माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार यांनी आश्वासन दिले होते की, महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने राज्य सरकार भूमिका स्वीकारील. तशी आपण भूमिका कां स्वीकारली नाही?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनाच्या अनुषंगाने प्रश्न विचारला की, या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी अशी भूमिका कां स्वीकारली? पुनर्वसनाच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाचे धोरण जाहीर आहे. धरणाची उंची 121 फूटापर्यंत वाढविल्यानंतर कराव्या लागणाऱ्या पुनर्वसनाच्या कामाला त्या राज्यांनी देखील संमती दिली होती. महाराष्ट्राची यामध्ये स्पष्ट भूमिका आहे की, ज्या समितीमध्ये मी जाऊन बसलो होतो त्या समितीपुढे मांडण्यात आलेल्या माहितीप्रमाणे मध्यप्रदेश राज्याने त्यांचे पुनर्वसनाचे काम अद्यापि पूर्ण केले नाही. हा केवळ कागदोपत्री अहवाल नव्हता तर माननीय पंतप्रधानांनी तीन मंत्र्यांची समिती नियुक्त केली त्या समितीने प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन लोकांची भेट घेतली व त्यांच्याशी चर्चा केली. तीन गावांना ते जाऊन आले, प्रत्येक गावामध्ये भेट घेतल्यानंतर त्यांनी आपला अहवाल बैठकीपुढे ठेवला. आणि त्या बैठकीमध्ये मी अशी भूमिका घेतली की, धरणाची उंची वाढविण्यास आमची तयारी आहे, आमचा त्याला विरोध नाही. परंतु ज्यावेळी एकत्रितपणे एखादा प्रकल्प उभा करावयाचा असतो त्यावेळी मध्यप्रदेश हे राज्य सुध्दा या देशाचा एक भाग आहे. आणि म्हणून त्या राज्याकडून जर पुनर्वसनाचे काम झाले नसेल तर आपण याठिकाणी वारंवार ज्या धोरणाची चर्चा करतो की, अगोदर पुनर्वसन आणि नंतर धरण या भूमिकेशी आपण कायम राहिलो आहोत. म्हणून पुनर्वसन हे प्राधान्याने झाले पाहिजे याबद्दल आमच्या मनामध्ये शंका नाही. परंतु ज्या राज्याने पुनर्वसनाचे काम केले नाही त्या राज्याचे मुख्यमंत्री देखील त्या बैठकीला उपस्थित होते. ते या संदर्भात समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. आणि म्हणून माननीय पंतप्रधानांकडे शिफारस करतांना इतर राज्यांमध्ये पुनर्वसनाचे काम झाले नसेल तर केवळ महाराष्ट्रामधील झाले आहे म्हणून तुम्ही धरणाची उंची वाढवावी अशी भूमिका आपण घेणे शक्य नव्हते. मध्यप्रदेश राज्याने आम्ही पुनर्वसनाचे काम करुन देऊ यासंदर्भात त्या बैठकीमध्ये खात्री करुन देण्याची आवश्यकता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख...

होती. तसे झाले असते तर आपल्याला विरोध करण्याचे कारण नव्हते. त्यामुळे कोणताही निर्णय त्या बैठकीमध्ये झालेला नाही. प्रकरण सुप्रिम कोर्टामध्ये प्रलंबित होते त्या संदर्भात 17 तारखेला निर्णय लागणार होता. म्हणून सुप्रिम कोर्टामध्ये पुनवर्सनाच्या संदर्भात कोणती भूमिका मांडावी यासंदर्भात त्याठिकाणी चर्चा झाली. धरणाची उंची वाढविण्यास मी विरोध केलेला नाही, तसेच अनेकांनी देखील केलेला नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : या प्रकरणामध्ये एक चुकीचा संदेश बाहेर गेला. आपण म्हणत आहात त्याप्रमाणे आमचा देखील महाराष्ट्रातील लोकांचे पुनर्वसन करण्याला विरोध नाही. त्या गरिब लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे असे आमचे मत आहे. परंतु या एका विषयामुळे महाराष्ट्रासह तिन्ही राज्यांची बदनामी संपूर्ण जगामध्ये झाली आहे ही अतिशय भयानक गोष्ट आहे. आज महाराष्ट्र वीजेसाठी अंधारात धडपडत आहे, पाण्याशिवाय कुटुंबे उपाशी मरताहेत. अशा परिस्थितीत हा सरदार सरोवर प्रकल्प पूर्ण झाल्यांनंतर महाराष्ट्राला वीज व पाणी मिळणार आहे. त्याप्रमाणे मध्यप्रदेश व गुजरात राज्यालाही मिळणार आहे. तेथील गरिब माणसांचे पुनर्वसन होऊ नये अशी आमची भूमिका नाही.उलट त्यांचे प्राधान्याने पुनर्वसन झाले पाहिजे, त्यांना सर्व सवलती व सुविधा मिळाल्या पाहिजेत ही आमची भूमिका आहे. हा प्रकल्प थांबल्यामुळे अनेक लोकांचे नुकसान होणार आहे, आपल्याला वीज व पाण्याच्या प्रश्नाच्या बाबतीत पाठीमागे जावे लागणार आहे अशी भूमिका आम्ही वेळोवेळी मांडली आहे. म्हणून या प्रश्नाला छेद देणारी भूमिका माननीय मुख्यमंत्र्यांनी घेता कामा नये.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, श्रीमती मेधा पाटकर यांची भूमिका आम्ही कधीही स्वीकारलेली नाही. परंतु मध्य प्रदेश राज्यामध्ये तुमच्या पक्षाचे सरकार आहे. तुमच्या पक्षाचे राज्य असलेल्या सरकारचे माननीय मुख्यमंत्री त्या बैठकीमध्ये काही बोलले नाहीत. ते माननीय श्री नरेंद्र मोदी यांच्या दबावाखाली होते. त्या राज्याने पुनर्वसनाचे काम केलेले नाही. तरीही आपल्याला वीज पाहिजे, प्रकाश पाहिजे म्हणून तेथील गरिब आदिवासी लोकांची घरे पाण्याखाली बुडावीत असे आपल्याला वाटते कां? त्याकरिता मी खंबीर भूमिका घेतली असून त्या भूमिकेचे मी समर्थन करतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 13:35

डॉ.दीपक सावंत : उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, "महाराष्ट्रात पुनर्वसित करण्यात आलेल्या 2730 प्रकल्पग्रस्तापैकी 2400 प्रकल्पग्रस्तांनी जमिनीचा ताबा घेतलेला आहे व 330 कुटुंबांनी जमिनीचा ताबा घेतलेला नाही." 330 कुटुंबांनी जमिनीचा ताबा घेतलेला नाही याचे कारण काय आहे ? महाराष्ट्रामध्ये पुनर्वसित करावयावयाच्या कुटुंबांची संख्या 182 आहे. त्यांचे पुनर्वसन करण्यामध्ये उशीर होण्याचे कारण काय आहे ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, तीन राज्यांचा विचार करता, आपण पुनर्वसन करण्यामध्ये सगळ्यात आघाडीवर आहोत. ज्या गावामध्ये त्यांचे पुनर्वसन करायचे आहे, त्या ठिकाणी 13 नागरी सुविधा पूर्ण झालेल्या आहेत. राज्यातील जनतेला माहीत आहे की, जोपर्यन्त त्या ठिकाणी पाणी येणार नाही, तोपर्यन्त तेथील कुटुंबे तेथून दुसरीकडे जाण्यासाठी हालचाल करत नाहीत. आम्ही त्या ठिकाणी पूर्णपणे सर्वतोपरी सहकार्य केलेले आहे. कोणतीही अडचण आलेली नाही. पुनर्वसित व्यक्तींना चांगल्या जमिनी दाखविल्या तरी त्यांना त्या पसंत नाहीत, त्याबाबतीत ते थोडी तक्रार करतात. आताच सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासी भागातील लोक असल्यामुळे त्यांचे योग्य पुनर्वसन झाले पाहिजे, त्यांना जमिनी देखील चांगल्या मिळाल्या पाहिजेत. त्यांन बी-बियाणे, साधने देखील उपलब्ध झाली पाहिजेत अशाप्रकारचा प्रयत्न शासनाचा आहे. परंतु मी सुरुवातीलाच सांगितले की, काहीजण सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून, इतर आंदोलनाच्या माध्यमातून आंदोलने करतात, त्या ठिकाणी ते एक वर्षपर्यन्त राहिलेले आहेत. त्यांना वाटते की त्याच ठिकाणी जमीन कसली तर काय होईल ? म्हणून पुनर्वसनाच्या कामाला विलंब होत आहे. आपल्याकडून तशाप्रकारे पुनर्वसनाचा प्रश्न शिल्लक राहिला नाही, ही वस्तुस्थिती खरी आहे.

श्री.शरद पाटील : अगोदर पुनर्वसन मग धरण, ही महाराष्ट्राची भूमिका आहे, अशाप्रकारची भूमिका माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ठामपणाने मांडलेली आहे. त्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र सरकारने प्रकल्पांच्याबाबतीमध्ये पुनर्वसन झाल्याशिवाय प्रकल्प सुरु करायचा नाही, यासंबंधीचा कायदा केलेला आहे. तसाच कायदा केंद्रामध्ये व्हावा, या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या वतीने माननीय मुख्यमंत्री केंद्राकडे प्रयत्न करतील काय ?

श्री.अजित पवार : तशा प्रकारचा प्रयत्न केला जाईल.

श्री.विनोद तावडे : माननीय मुख्यमंत्री महोदयांनी ठामपणाने भूमिका मांडली की, दोन दिवसात सुप्रीम कोर्टाच्या विषयामध्ये चर्चा करु. सामाजिक आंदोलने, राजकीय आंदोलने होतात.

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) T-2

श्री.विनोद तावडे (पुढे सुरु....

सुप्रीम कोर्टाच्या आदेशाच्या संबंधातील प्रश्न आहे, त्यामुळे त्या लोकांचे पुनर्वसन लांबणीवर पडणार. आमचे असे म्हणणे् आहे की, अजून पुनर्वसन झालेले नाही, धरणाचे काम जोरात चालू आहे. एवढी घाई काय आहे ?

श्री.विलासराव देशमुख : आपल्याला 90 मे.वॅ. वीज मिळणार आहे. आपली विजेची गरज 950 मे.वॅ. इतकी आहे. वीज मिळणार आहे ती राष्ट्रीय हित लक्षात घेऊन निर्णय केलेला आहे. 5 टीएमसी पाणी मिळणार आहे, ते देखील इतर ठिकाणातून मिळणार आहे. तो हक्क आमच्यासाठी त्यांनी सोडलेला आहे, त्याबद्दल सरकारचे आभार मानतो. या सगळ्या प्रकरणामध्ये राजकीय भूमिका घेण्याची गरज नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, राजकीय भूमिका घेऊन राजकीय भांडवल करणार नाही. उलट त्या राज्यामधील कॉंग्रेस-भाजपा या प्रश्नावर एकत्र आले. महाराष्ट्राची भूमिका अशी आहे की, मध्य प्रदेशमधील आदिवासींची गावे पाण्याखाली जाणार असतील तर त्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने राज्याला संकुचित भूमिका घेता येणार नाही.

---

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वाशिम नगरपरिषदेमध्ये झालेल्या कामांची परत निविदा काढून झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : वाशिम नगरपरिषदेमध्ये झालेल्या कामांची परत निविदा काढून झालेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री दिवाकर रावते व सुरेश जेथलिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते व सुरेश जेथलिया यांनी "वाशिम नगरपरिषदेमध्ये झालेल्या कामांची परत निविदा काढून झालेला भ्रष्टाचार "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्या ठिकाणी ज्या निविदा आलेल्या होत्या त्याबाबत शासनाने निवेदन करावे अशी विनंती केली होती. जी टेंडर नोटीस दैनिक मातृभूमीमध्ये आलेली होती त्यामध्ये नमूद केलेली कामे पूर्ण झालेली असताना पुन्हा ती कामे केल्याचे दाखवून सर्व पैसे हडप केली जातील अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे त्याबाबत तक्रार झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी त्याबाबत स्थगिती दिलेली आहे. यामध्ये 100 टक्के भ्रष्टाचार होणार आहे हे उघड दिसते. जिल्हाधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल केव्हा येईल ? त्यासंदर्भातील कारवाई केव्हा केली जाईल ? यामध्ये मुख्याधिकारी तसेच आयुक्त, उपायुक्त यांचीही जबाबदारी असते. त्यासंदर्भात त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, कलम 308 खाली या सर्व निविदा प्रक्रियेला माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी स्थगिती दिलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा रिपोर्ट पंधरा दिवसांच्या आत मागविण्यात येईल आणि त्या रिपोर्टच्या अनुषंगाने त्यांच्या ज्या शिफारशी असतील त्या अनुषंगाने उचित कारवाई केली जाईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

**पृ. शी.** : प्रिया केमिकल कंपनीचे कॅशिअर श्री. प्रेमनाथ राव यांनी पोलीस कोठडीत केलेली आत्महत्या.

**मु. शी.** : प्रिया केमिकल कंपनीचे कॅशिअर श्री. प्रेमनाथ राव यांनी पोलीस कोठडीत केलेली आत्महत्या याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे व मधुकर चव्हाण यांनी "प्रिया केमिकल कंपनीचे कॅशिअर श्री. प्रेमनाथ राव यांनी पोलीस कोठडीत केलेली आत्महत्या " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

**पृ. शी.** : आरकॉन या स्वयंसेवी संस्थेने जागतिक बँकेकडून मिळालेल्या निधीचा केलेला गैरव्यवहार.

**मु. शी.** : आरकॉन या स्वयंसेवी संस्थेने जागतिक बँकेकडून मिळालेल्या निधीचा केलेला गैरव्यवहार याबाबत डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "आरकॉन या स्वयंसेवी संस्थेने जागतिक बँकेकडून मिळालेल्या निधीचा केलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आरकॉन ही संस्था जे.जे. हॉस्पिटलमध्ये एडसच्या संदर्भात काम करते. आरकॉन या संस्थेची चौकशी करण्यात आली आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. आरकॉनला पहिला हप्ता रु. 1.16 कोटीचा मिळाला. त्या निधीतून आतापर्यंत 1.58 कोटी रुपये एवढा निधी खर्च झाला आहे. या निधीतून आपण काय काय दिले ? यामध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन, तांत्रिक सल्ला शुल्क, डॉक्टर्स, टेक्निशियन्स इत्यांदीचे प्रशिक्षण यासाठी खर्च करण्यात आला. यामध्ये एड्स अवेअरनेस कार्यक्रमावर नेमका किती खर्च झाला ? याला पाच वर्षे मुदतवाढ दिलेली आहे. अशा प्रकारच्या ज्या स्वयंसेवी संस्था काम करतात त्यांना परदेशातून ग्रँट मिळते तसेच राज्य शासनही निधी उपलब्ध करुन देते. यामध्ये 1.58 कोटी रुपये पगारावर खर्च झालेले आहेत. प्रत्यक्षात एडस अवेअरनेस कार्यक्रमावर किती रक्कम खर्च झाली आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, अशा प्रकारच्या कार्यक्रमामध्ये ज्यावेळी वेगवेगळ्या संस्थांकडून पैसे मिळतात त्यावेळी त्यांचे डिटेल्स प्रोजेक्ट रिपोर्ट त्यांनी सादर केलेले असतात. एयआयव्ही, एडस, संशोधन, प्रशिक्षण, अवेअरनेस या वेगवेगळ्या हेडखाली 2 कोटी 16 लाख रुपये एवढा निधी आरकॉनला मिळाला. त्यापैकी 1 कोटी 58 लाख रुपये वेगवेगळ्या कामासाठी खर्च झालेले आहेत. यामध्ये ह्युमन रिसोर्सवर 7 लाख रुपये खर्च झालेले आहेत. इन्फ्रॉस्ट्रक्चरवर 93 लाख रुपये खर्च झालेले आहे. यामध्ये मोठी लिस्ट आहे. हे सर्व डिटेल्स मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव हे आरकॉन संस्थेचे अध्यक्ष असतात. त्यामध्ये नाको असेल किंवा वेगवेगळ्या संस्था असतील त्यांचे प्रतिनिधी असतात. ज्यावेळी तक्रार आली त्यामध्ये चेअरमनच्या परवानगीशिवाय संचालकांनी पैसे खर्च केले अशा प्रकारची तक्रार आहे. यासंदर्भामध्ये राज्य सरकारच्या या विभागाच्या माध्यमातून या अनियमिततेबद्दल आरकॉनीच संपूर्ण चौकशी करण्यात आली. यामध्ये गैरव्यवहार झाला अशातील भाग नाही. नुकतीच नाको बरोबर बैठक झाली. त्या ठिकाणी नाकोचे प्रतिनिधी हजर होते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीप वळसे पाटील....)

आजच्या तारखेपर्यन्त अपटुडेट अशी माहिती देण्यात आलेली आहे. फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झालेला आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. शिक्षण, संशोधन आणि अवेरनेस यासाठी नाको मार्फत पैसे मिळतात. हे मला मान्य करावयास पाहिजे की. ज्या तडफेने हे काम व्हायला पाहिजे होते ते काम यापूर्वीच्या काळामध्ये झालेले नाही. नवीन बॉडी गठित झालेली आहे. या क्षेत्रामध्ये परिणामकारक काम कसे करावयाचे यासंबंधीचा आराखडा तयार करुन हे काम गतिमान करण्याचे ठरविलेले आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अलिबाग तालुक्यातील माची सागरगड, पोवळेवाडी परिसरातील कातकरी कुटुंबाना किमान वेतन नाकारणे

**मु.शी** : अलिबाग तालुक्यातील माची सागरगड, पोवळेवाडी परिसरातील कातकरी कुटुंबाना किमान वेतन नाकारणे याबाबत डॉ. नीलम गो-हे व श्री. अनंत तरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे व श्री. अनंत तरे, वि.प.स. यांनी "अलिबाग तालुक्यातील माची सागरगड, पोवळेवाडी परिसरातील कातकरी कुटुंबाना किमान वेतन नाकारणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, दोन घटना घडलेल्या आहेत. या वेठबिगाराना कोणताही दाखला किंवा ओळखपत्र का देण्यात आले नाही ? तसेच त्यांना दोन महिने पुरेल इतके धान्य देण्यात आलेले नाही. ते धान्य कधी देण्यात येईल ?

श्री. बाबा सिद्दीकी : लवकरात लवकर देण्यात येईल.

**सभापती** : हे 93चे निवेदन मी राखून ठेवीत आहे. हे निवेदन उद्या घेण्यात येईल.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 13:45

**पृ.शी.** : इंदिरा आवास योजने अंतर्गत घरे देण्यामध्ये झालेला गैरप्रकार

**मु.शी** : इंदिरा आवास योजने अंतर्गत घरे देण्यामध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व विनोद तावडे, वि.प.स. यांनी "इंदिरा आवास योजने अंतर्गत घरे देण्यामध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : ज्यांना घरकुले मिळणे आवश्यक होते त्यांना घरकुले का मिळाली नाहीत ?

श्री. रणजित कांबळे : कोणत्या लाभार्थीला घरकुल मिळाले नाही यासंबंधी निश्चित अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे दिली तर त्याबाबतीत उचित कार्यवाही करता येईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर हे या प्रश्नासंबंधी माझ्याशी बोलले होते. त्यांचा आक्षेप असा होता की, अकोला आणि वाशिम जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सदस्यांनी आपल्या स्तरावर यादीतील नावे वगळून स्वत:ची नावे टाकलेली आहे. इंदिरा आवास योजने अंतर्गत घरकुले वाटपाच्या बाबतीत बीपीएलची लोकसंख्या लक्षात घेऊन ग्राम पंचायत कोटा ठरवित असते. एस.सी.एस.टी.साठी 60 टक्के आणि इतरांसाठी 40 टक्के असे घरकुल वाटपासंबंधीचे निकष आहेत. लाथार्थींच्या निवडीबाबत ग्रामपंचायतीचा निर्णय हा अंतिम असतो. माननीय सदस्यांनी निश्चित स्वरुपाची तक्रार माझ्याकडे दिली तर त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ श्री. शिगम नंतर 13:50

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: चंद्रपूर जिल्हयातील केरोसिनचा अवैध व्यवसाय.

**मु.शी.**: चंद्रपूर जिल्हयातील केरोसिनचा अवैध व्यवसाय याबाबत सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजूरीया, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरीपुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री कन्हैयालाल गिडवाणी, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजूरीया यांनी "चंद्रपूर जिल्हयातील केरोसिनचा अवैध व्यवसाय " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) W-2

**निवेदनानंतर**

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटले आहे की जानेवारी,2005 ते मार्च,2006 या कालावधीत 44 परवाने रद्द करण्यात आले तर 39 परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच 275 परवानाधारकांकडून 5,52,318 इतका दंड वसूल करण्यात आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, चंद्रपूर जिल्हयातील ही अतिशय गंभीर अशी घटना आहे. चंद्रपूर जिल्हयातील रॉकेल एजन्सीच्या प्रमुखाचे नांव काय ? या एजन्सीचे लायसन रद्द करण्यात येईल काय ? या एजन्सीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एजन्सी चालकाचे नांव श्री. झवेरी आहे. या एजन्सीचा परवाना रद्द करण्यात आला असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणाची चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SSK/ MHM/ KGS/ श्री. शिगम नंतर 13:50

**पृ.शी.**: अमरावती जिल्हयातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे.

**मु.शी.**: अमरावती जिल्हयातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे याबाबत प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे,श्री.जी.एल.ऐनापुरे,श्री.नानासाहेब बोरस्ते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे,श्री.वसंतराव खोटरे, श्री.जी.एल.ऐनापुरे, श्री. नानासाहेब बोरस्ते यांनी "अमरावती जिल्हयातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**निवेदनानंतर**

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, जे निवेदन आलेले आहे ते वाचून मनापासून वाईट वाटते. महत्तम अनुशेष असलेल्या विदर्भामध्ये या प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी महत्तम दिरंगाई कशी केली जाते याचे हे उत्तम उदाहरण आहे. 12 ऑगस्ट, 2004 रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर अजून कामाची वर्क ऑर्डर झालेली नाही. वर्षानुवर्षे एखाद्या जिल्हयामध्ये इतका मोठा अनुशेष असताना प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर वर्क ऑर्डर निघत नाही ही गोष्ट योग्य नाही. वर्क ऑर्डर 4-8 दिवसांमध्ये काढण्यासाठी सरकारला कोणती अडचण आहे ? वर्क ऑर्डर न काढण्यासाठी कोण जबाबदार आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, निविदा काढण्यात आल्या असून दर जास्त असल्यामुळे वाटाघाटी सुरु आहेत. पूर्ण माहिती घेऊन मुख्य अभियंता याची चाचपणी करीत आहेत आणि या महिन्याच्या शेवटच्या आठवडयापर्यंत याबाबतीत निर्णय घेऊ. निविदा आठ दिवसात फायनल होत आहेत असे ठेकेदाराला समजल्यानंतर ज्या निगोशिएबल पॉवर आहेत त्या वापरता येत नाहीत आणि ठेकेदार दक्ष होतात. 8 दिवसात आपल्याला वर्क ऑर्डर मिळण्याची शक्यता आहे असे ठेकेदाराला समजल्यावर वाटाघाटी करता येत नाहीत असा पूर्वानुभव आहे. तरीसुध्दा लवकरात लवकर हे काम करु.

प्रा. बी.टी. देशमुख: सभापती महोदय, अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे की 2-5 रुपये जास्त खर्च येत असेल म्हणून वर्क ऑर्डर निघत नाही. कोणती वर्क ऑर्डर आणि कोणते निगोशिएशन? मंत्रीमहोदयांनी दिलेल्या अभिवचनाचे पालन झाले पाहिजे. मंत्रीमहोदयांनी स्पष्ट सांगितले आहे की 31.3.2006 पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

मंत्रिमहोदय कशाच्या गोष्टी करीत आहेत ? मला जर शासनाच्यावतीने येथे उत्तर मिळणार नसेल तर मग सभागृह सोडून जावे लागेल. म्हणूनच सभापती महोदय, आपले मला संरक्षण पाहिजे आहे. जलसिंचनाच्याबाबतीत महत्तम अनुशेष असलेला अमरावती जिल्हा आहे. आज जवळ जवळ दीड वर्ष झाले तरी या प्रकल्पाची कामे सुरू होत नाहीत. हे बरोबर नाही. ही निषधार्ह गोष्ट आहे. तेव्हा मंत्रिमहोदयांनी येत्या आठ, दहा, पंधरा दिवसांमध्ये वर्क ऑर्डर दिली जाईल असे आश्वासन द्यावे.

श्री.अजितदादा पवार : सभापती महोदय, अमरावती भागामध्ये जलसिंचनाची कामे मोठया प्रमाणावर केली पाहिजते. या दोन्ही प्रकल्पाचे काम लवकर सुरू झाले पाहिजे हे मलाही मान्य आहे. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन 2006-2007 या वर्षामध्ये निम्नपेढी मोठा पाटबंधारे प्रकल्पासाठी रुपये 23.05 कोटी आणि वर्धा डायव्हर्शन अंतर्गत पंढरी मध्यम प्रकल्पासाठी रुपये 20.04 कोटी हे 100 टक्के खर्च केले जातील. एका कामामध्ये 32 टक्के आणि दुसऱ्या कामामध्ये 37 टक्के अबाऊव्हने निविदा आलेल्या आहेत. त्यामुळे येथे ठोस आश्वासन दिले तर दरासंबंधी निगोशिएशन करता येणार नाही. निविदेतील दर कसे खाली करता येतील व त्यातून महामंडळाचा व शासनाचा कसा फायदा करता येईल हे आम्ही पाहत आहोत. व्हॅट, डी.एस.आर., स्टील, सीमेंट, वर्क कॉन्ट्रॅक्ट इत्यादीमुळे दर वाढवून निविदा दिलेल्या आहेत. म्हणूनच यासंबंधीचे ठोस असे आश्वासन देता येत नाही. तरी पण यंदाच्या बजेटमध्ये जेवढी म्हणून तरतूद या प्रकल्पांवर करण्यात आली आहे, तेवढी 100 टक्के रक्कम दोन्ही कामांवर निश्चितपणे खर्च केली जाईल, याची खबरदारी जलसंपदा विभाग घेईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वर्क ऑर्डरशिवाय खर्च कसा काय होणार आहे ? दीड-दोन वर्ष प्रशासकीय मान्यता मिळून देखील वर्क ऑर्डर दिली जात नाही. 31 मार्च 2006 पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील असे आश्वासन देऊनसुध्दा काम का सुरू झाले नाही ? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, या दोन्ही प्रकल्पाच्या निविदा 32 आणि 37 टक्क्यांनी अबाऊव्ह आलेल्या आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एका जिल्हयातील कामासाठी अबाऊव्हने निविदा आल्या तर जाऊ द्याना. अबाऊव्ह आणि बिलो निविदा येण्यासंबंधीची काळजी इतके दिवस शासनाने का घेतली नाही ? दीड वर्षापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन देखील शासनाने वर्क ऑर्डर दिलेली नाही. शासनाने किती प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता आणि वर्क ऑर्डर किती जलद गतीने दिलेली आहे, यासंबंधीची दहा उदाहरणे मी आपल्याला देऊ शकतो. सभापती महोदय, आमचे ओठ भाजलेले आहेत. त्यामुळे आम्ही ताकसुध्दा फुंकून पितो. 31 मार्च 2006 पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्याचे ठाम आदेश मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. असे असताना 15 दिवसात वर्क ऑर्डर काढण्याससंबंधीचे आदेश देणार नसाल तर मग ही निषेधार्ह गोष्ट आहे. अशा प्रकारे महत्तम अनुशेष असलेल्या भागावर अन्याय करणे चुकीचे आहे. एखाद्या जिल्हयामध्ये 5-10 रुपयाने अबाऊव्ह टेंडर आले असेल तर त्याचा विचार कशाला करत बसता. मी पुन्हा सांगतो की, 31 मार्च 2006 पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरूवात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील असे आश्वासन मंत्रिमहोदयांनी दिले आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी या प्रकल्पाच्या कामासंबंधीची वर्क ऑर्डर किती दिवसात काढणार हे ठामपणे सांगावे. त्यांना जर ठामपणे सांगता येत नसेल तर ही निषेधार्ह गोष्ट आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, अमरावतीमध्ये एका वर्षामध्ये 3 प्रकल्प सुरू करीत आहोत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी ते विचारलेले नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : मी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर न देता माननीय मंत्री महोदय दुसऱ्याच प्रश्नाचे उत्तर देत आहेत. म्हणून त्यांनी माझ्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर दिले पाहिजे.

डॉ.सुनील देशमुख : महोदय, हा जिल्हा महत्तम अनुशेष असल्यामुळे तीन प्रकल्प एका वर्षात सुरु केले आहेत. वास्तविक पाहता हा अनुशेष भरुन निघाला पाहिजे. हे खरे आहे की, याबाबत प्रक्रिया सुरु असली पाहिजे. 188 कोटी आणि 166 कोटी रुपयांच्या निविदा अबव्हने घ्यावयास लागलो तर, तशीच प्रक्रिया संपूर्ण महाराष्ट्रात सुरु होईल आणि ती विभागाला थांबविणे शक्य होणार नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : विकसित भागामध्ये नका अबव्ह करु. मी माननीय मंत्री महोदयांनी 31 मार्च पर्यंत हे काम पूर्ण करतो असे सांगूनही ते काम सुरु न केल्याबद्दल त्यांचा निषेध करतो.

( सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख बहिर्गमन करतात.)

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: औरंगाबाद तसेच वाळुंज महानगर सिडको कार्यालयात लिपिक/टंकलेखक, वसुली क्लार्क, आरेखक, शिपाई या व इतर पदांवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती कंत्राटदारांमार्फत होणे.

**मु.शी.**: औरंगाबाद तसेच वाळुंज महानगर सिडको कार्यालयात लिपिक/टंकलेखक, वसुली क्लार्क, आरेखक, शिपाई या व इतर पदांवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती कंत्राटदारांमार्फत होणे याबाबत श्री.श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 ची सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, विनोद तावडे, यांनी "औरंगाबाद तसेच वाळुंज महानगर सिडको कार्यालयात लिपिक/टंकलेखक, वसुली क्लार्क, आरेखक, शिपाई या व इतर पदांवरील कर्मचाऱ्यांची नियुक्ती कंत्राटदारांमार्फत होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या ठिकाणी जे निवेदन आलेले आहे त्यावरुन माझे समाधान झालेले आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पं.दिनदया उपाध्याय डोंगरला, ता.तुमसर, जि.भंडारा येथील शासन मान्य शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुलै-2004 पासून वेतन अनुदान अदा न होणे.

**मु.शी.**: पं.दिनदया उपाध्याय डोंगरला, ता.तुमसर, जि.भंडारा येथील शासन मान्य शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुलै-2004 पासून वेतन अनुदान अदा न होणे याबाबत सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, राजेंद्र ऐनापुरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, वसंतराव खोटरे, राजेंद्र ऐनापुरे, वि.प.स. यांनी "पं.दिनदया उपाध्याय डोंगरला, ता.तुमसर, जि.भंडारा येथील शासन मान्य शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुलै-2004 पासून वेतन अनुदान अदा न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयोच आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, ही शाळा जुलै 2004 मध्ये अनुदानावर आली. निकषपात्र शाळांची नवीन यादी 31 मार्च पर्यंत जाहीर करण्याचे आश्वासन या ठिकाणी देण्यात आले होते. परंतु ते आश्वासन पाळले नाही. ही शाळा निकषपात्र ठरुन अनुदानावर येऊन 22 महिने झालेले असताना सुध्दा तेथील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार अदा झालेले नाहीत. ती शाळा अनुदानावर आल्यानंतर त्या शिक्षकांना शिक्षणाधिकाऱ्यांनी ॲप्रूव्हड केले आणि त्यांचे वेतन पथकाकडून वेतन मान्य करुन, ते बँकेत जमा झाले. परतु शासनाकडून ते रोखण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांचा पगार 22 महिने बँकेत रोखून धरल्यामुळे शासन गुन्हयास पात्र नाही काय ? महोदय, त्यांना पगार न मिळाल्यामुळे ते शिक्षक कालपासून आमरण उपोषणास बसले आहेत. जर आपणांस या संदर्भात चौकशीच करावयाची होती तर ॲप्रूव्हल देण्यापूर्वीच करावयाची होती. ॲप्रूव्हल देऊन पगार रोखणे योग्य आहे काय ? त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांचे वेतन आज किंवा उद्या अदा करण्याबाबतचे आदेश माननीय मंत्री महोदय देतील काय ?

प्रा.वसंत पुरके : महोदय, जुलै 2004 मध्ये ही शाळा 40 टक्के अनुदानावर आली. या शिक्षकांचे पगार खात्यात जमा झालेले आहेत. परंतु एका शिक्षकाने तक्रार केली आहे की, मान्यता देताना शिक्षणाधिकाऱ्यांनी नियमबाहय मान्यता दिली आहे. परंतु तरीही आठ दिवसांच्या आत चौकशी करुन ते वेतन अदा करण्यात येईल.

---------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डीएमईआरच्या दरकराराप्रमाणेच आरोग्य संचालनालयाने औषध खरेदी करणे बंधनकारक असणे.

**मु.शी.**: डीएमईआरच्या दरकराराप्रमाणेच आरोग्य संचालनालयाने औषध खरेदी करणे बंधनकारक असणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण विनोद तावडे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "डीएमईआरच्या दरकराराप्रमाणेच आरोग्य संचालनालयाने औषध खरेदी करणे बंधनकारक असणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयोच आहे. निवेदनाच्या पती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, औषध खरेदी संदर्भात निवेदनामध्ये जे उत्तर दिलेले आहे ते गोलमाल करणारे असून, संभ्रम निर्माण करणार आहे. या संदर्भात एक सर्क्युलर काढण्यात आले आहे. डी.एच.एस. च्या खरेदीची गंभीर दखल घेऊन खरेदी कशी आणि कोणाकडून करावी, या बाबत सूचना देणारे पत्र डीएमईआर ने दिनांक 3 मार्च रोजी काढले. त्यामध्ये नारी या संस्थेच्या दरानुसार खरेदी करणे आक्षेपार्ह आहे असे कळविले आहे. परंतु निवेदनामध्ये शासनाने जी खरेदी केली आहे ती कशी समर्थनीय आहे ते सांगितले गेले. त्यानंतर निवेदनातातील पृष्ठ क्र.2 मधील परिच्छेद-2 मध्ये हास्यास्पद आणि विसंगत वाक्य आहे. त्यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, ""नारी" या संस्थेकडून आवश्यक त्या बाबी खरेदी करतात. प्रयोगशाळा रसायने व साहित्य कोणत्याही दर करारारवर नसल्याने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने "नारी" या संस्थेकडून खरेदी आक्षेपार्ह आहे असे परिपत्रक वेळोवेळी काढून पुन्हा वेळोवेळी रद्द केले आहे." महोदय, रद्द करणे म्हणजे काय ? हे परिपत्रक तुम्हीच काढले आहे. ही खरेदी मनमानी करुन केली आहे काय ? हा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. नारी या संस्थेकडून खरेदी करु नये असे आपण परिपत्रक काढले होते हे खरे आहे काय ? पुन्हा वेळोवेळी परिपत्रक काढणे आणि रद्द करणे त्यामुळे कोटयावधी रुपयांची मनमानी खरेदी यामध्ये केली आहे काय ? तसेच पान क्र.3 वर असाही उल्लेख आहे की, "शासनाच्या विविध विभागाकडून खरेदी बाबत वेळोवेळी परिपत्रक/शासन निर्णय निर्गमित झालेले आहेत. त्यांचा आधार घेऊनच आरोग्य विभागात खरेदी करण्यात येते. तथापि, खरेदी एकसुत्रता रहावी यासाठी आरोग्य विभागाचा स्वतंत्र दरकरार कक्ष, स्थापन करण्यात येत आहे. यापुढे या कक्षाद्वारे आरोग्य विभागास लागणाऱ्या आवश्यक वस्तुंचे दर निश्चित करुन त्याप्रमाणे खरेदी करण्यात येईल." मग असे तुम्ही पूर्वीच का केले नाही.?

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीपूर्व नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर " होय " असे आहे. सभापती महोदय, हे खरे आहे. डी.एम.ई.आर. यांनी आम्हाला आदेश दिले होते की, खरेदी करावयाची नाही. त्यांचे या संदर्भातील पत्रही माझ्याकडे आहे. डी.एम.ई.आर. हे फक्त औषधापुरतेच आहे. प्रयोगशाळा साहित्य व रसायने हे डी.एम.ई.आर.च्या रेट कॉंट्रॅक्टमध्ये नाही. जेव्हा आम्ही या संदर्भात डी.एम.ई.आर.कडे परवानगी मागितली की, आम्हाला नारीच्या रेटप्रमाणे खरेदी करु द्या. परंतु त्या संदर्भात आम्हाला काहीही सांगण्यात आले नाही. त्यानंतर त्यांनी सांगितले की, आमच्या रेट कॉंट्रॅक्टमध्ये हे नसल्यामुळे आपण ते नारीच्या रेटप्रमाणे खरेदी करु शकता. सभापती महोदय, शेवटी नारीचे रेट कॉंट्रॅक्ट गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, " ज्याअर्थी, दिनांक 21 ऑक्टोबर, 2005 रोजी अशी खरेदी अनियमित असून ती करणाऱ्या अधिकाऱ्यास त्याबद्दल जबाबदार धरले जाईल, असेही परिपत्रक काढले आहे. " याचा अर्थ काय ? सभापती महोदय, या संदर्भात किती अधिकाऱ्यांना जबाबदार धरले आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा जी.आर ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे. आरोग्य विभागाचा याच्याशी काही संबंध नाही. आरोग्य विभागाचा संबंध मेडिकल एज्युकेशन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी येतो.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

मी उत्तर देण्यासाठी तयार आहे. गोंधळ करु नका. ते परिपत्रक आर.डी.डी.चे आहे. पी.एच.सी. सेंट्रर्स व सब सेंटर्स यांच्या खरेदीबाबत ग्रामविकास विभागाने परिपत्रक काढले की, आमच्या विभागाच्या खरेदीसंदर्भात आमचा स्वतःचा रेट कॉंट्रॅक्ट आहे, त्याप्रमाणे आपण खरेदी करा. सभापती महोदय, त्या स्वराज्य संस्था असल्यामुळे त्यांना या संदर्भात अधिकार आहेत. जिल्हा परिषदेला स्वतःचा अधिकार आहे. त्यांनी स्वतःचे रेट कॉंट्रॅक्ट काढल्यामुळे तसे आदेश जिल्हा परिषदेला दिला. जिल्हा परिषदेसाठी ज्या वस्तुंची अथवा औषधांची गरज आहे, ते त्यांच्या रेट कॉंट्रॅक्टप्रमाणे खरेदी करण्याबाबत सांगण्यात आले.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, डी.एन.आर.ई. हे दरपत्रक ठरविते. त्यांचेच दरपत्रक आपण काही भागांसाठी वापरतो, फक्त जंतुनाशके घेण्यासाठी वापरत नाही, असे आपण सांगितले. तरी, माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशनने आपले परिपत्रक कोणत्या साली काढले ? सभापती महोदय, माझी माहिती आहे की, हे परिपत्रक सन 1999-2001 ला काही औषधांसाठीच हे दरपत्रक काढले. राज्य शासनाचे सार्वजनिक आरोग्य खाते स्वत:चे वेगळे दरपत्रक तयार करणार का ? कारण वस्तुस्थिती अशी आहे की, डायरेक्टर ऑफ मेडिकलच्या ठिकाणी दरपत्रक करण्यासाठी एक महिला काम करते आणि त्या एकट्या व्यक्तीवरच संपूर्ण विभाग काम करतो. तरी, माननीय मंत्रिमहोदयांनी यावर प्रकाश टाकावा.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, डी.एम.ई.आर.चे शेवटचे रेट कॉंट्रॅक्ट दिनांक 15.11.2001 ला काढले होते. त्यांनी आम्हाला दिनांक 25 ऑगस्ट, 2004 ला एक्स्टेन्शन दिले होते आणि सांगितले होते की, जुन्या रेट कॉंट्रक्टप्रमाणे आपण खरेदी करु शकता. पण सभापती महोदय, आता आम्ही ठामपणे निर्णय घेतला आहे की, मेडिकल विभाग स्वत:चे रेट कॉंट्रॅक्ट लवकरात लवकर काढणार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य खाते करोडो रुपयांच्या औषधांची खरेदी करते. त्यांना सोयीप्रमाणे खरेदी करावयाची आहे. आपण हे दरपत्रक कधी करणार आहात ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, अगोदर डी.एम.ई.आर. डिपार्टमेंटच आमचे रेट कॉंट्रक्ट करत होते. पण या प्रोसिजरला काही वेळ लागतो. तरी, मी या संदर्भात असे सांगू इच्छितो की, हे स्वत:चे रेट कॉंट्रक्ट आम्ही 3 महिन्यांच्या आत करणार आहोत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. कांबळे.. 14:10

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, काल आपण सभापती स्थानी असतांना मी जॉन्सन ॲन्ड जॉन्सन कंपनीच्या संदर्भातील लक्षवेधीचा मुद्दा मांडला होता. ती लक्षवेधी आज सुध्दा चर्चेला आलेली नाही.

**उपसभापती** : आता आपण लक्षवेधी सूचना धेत नसून विधेयक चर्चेला घेत आहोत, जेव्हा लक्षवधी घेऊ तेव्हा आपण हा मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ इन्फर्मेशन बद्दल बोलायचे आहे, नियम क्रमांक 35 प्रमाणे मी माननीय सभापतीकडे महाराष्ट्राचे माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांच्या संदर्भातील नोटीस दिली होती. त्या नोटीसीच्या संदर्भात मी काल सभापती साहेबांना बोललो. सभागृहात ही नोटीस चर्चेला आलेली नाही. नोटीस त्यांनी नाकारली तर का नाकारली हे आम्हाला कळावयास पाहिजे. दुसरे म्हणजे विधानसभा नियम 35 प्रमाणे यावर खालच्या सभागृहात चर्चा झालेली आहे. विधानसभेचा सुध्दा नियम 35 तोच आहे. विधानसभेच्या नियमाचा अर्थ वेगळा व विधानपरिषदेच्या नियमाचा अर्थ वेगळा होतो असे काही आहे काय ? या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये उलटसुलट बातम्या येत आहेत, वर्तमानपत्रामध्ये असे म्हटले आहे की, त्या प्रकणावर माननीय मुख्यमंत्री महोदयांची सही झालेली आहे. त्याला महसूल मंत्री महोदयांनी स्टे दिला आहे. यावर काय निर्णय झालेला आहे त्यासंदर्भातील माहिती आम्हाला पाहिजे. मुकुंद स्टील कंपनीच्या संदर्भातील तो विषय आहे, मी कोणावर आरोप करीत नाही. परंतु त्या संदर्भातील निवेदन आम्हाला मिळावयास पाहिजे कारण उद्या अधिवेशन संपणार आहे.

**उपसभापती** : मी आपल्या भावना माननीय सभापती यांना कळवितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम क्रमांम 35 मध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे की, " ज्या सदस्यांस एखाद्या व्यक्तीवर मानहानिकारक किंवा अपरोधारोपाच्या स्वरुपाचे कोणतेही अभिकथन ज्या दिवशी करावयाचे असेल त्या दिवशीच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी त्या सदस्याने सायंकाळी 5 वाजेपर्यंत सभापतीस व तसेच चौकशी करुन उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी संबंधित मंत्र्यांस, आवश्यक त्या कागदपत्रांसह लेखी पूर्वसूचना दिल्याशिवाय त्या सदस्यास कोणत्याही व्यक्तीविरुध्द मानहानिकारक किंवा अपरोधारोपात्मक स्वरुपाचे कोणतेही अभिकथन

......2......

श्री. दिवाकर रावते..

करता येणार नाही. परंतु, असे अभिकथन सभागृहाच्या प्रतिष्ठेस कमीपणा आणणारे आहे किंवा असे अभिकथन केल्याने कोणत्याही प्रकारे लोकहित साध्य होणार नाही असे सभापतींचे मत असेल तर कोणत्याही सदस्यास असे कोणतेही अभिकथन करण्यास कोणत्याही वेळेस सभापती मनाई करु शकतील." म्हणून या नोटीसीला उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे.

-------------

......3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक.

**L.C BILL NO.X OF 2006.**

**(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE SELF-FINANCED UNIVERSITIES IN THE STATE; TO REGULATE THEIR WORKING AND FUNCTIONS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTALL THERETO.)**

श्री. दिलीव वळसे-पाटील (उच्चतंत्र शिक्षण मंत्री): सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 10, राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे व कार्यांचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक या सभागृहामध्ये अधिवेशनाचे सत्र सुरु झाल्यानंतरच्या पहिल्या आठवडयात मांडण्यासाठी सभागृहात सादर करण्यात आले होते. सभागृहाची अनुमती असेल तर या विधेयकाच्या संदर्भात काही पार्श्वभूमी मी मांडू इच्छितो. हे विधेयक मांडत असतांना या विधेयकाच्या काही तरतूदी आहेत त्यांच्या संदर्भात मी काही बाबतीत खुलासा करणार आहे. सभापती महोदय, गॅट करार झाल्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये बरीच प्रगती झालेली आहे. अन्य ठिकाणी जसे खाजगीकरण झालेले आहे, तसेच शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये सुध्दा गुंतवणूक व्हावी या दृष्टीने हे विधेयक आणीत असतांना यातून शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक संधी राज्यामध्ये उपलब्ध होणार आहेत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

पूर्वीच्या काळात परदेशातील एखादी गुंतवणूक एखाद्या उद्योगासाठी येत होती. किंवा देशातील उद्योगपती ज्यावेळी गुंतवणूक करावयाचे त्यावेळी ते उद्योगामध्ये गुंतवणूक करीत असत. आज शिक्षण क्षेत्राचे महत्व वाढल्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये सुध्दा सभागृहामध्ये वारंवार चर्चा केली जाते. यामध्ये आपणा सर्वांच्या अपेक्षा वेगवेगळया आहेत. शालेय शिक्षणाच्या संदर्भात किंवा उच्च शिक्षणाच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा सुरु असते त्यावेळी शिक्षण क्षेत्रामध्ये कोणकोणत्या त्रुटी आहेत, उच्च शिक्षणासाठी दिवसें दिवस तरतूद कशी कमी पडत आहे, त्यामध्ये पारंपारिक विद्यापीठांमध्ये संशोधन व विकासाचे काम कसे होत नाही याबाबत वारंवार चर्चा केली जाते. म्हणून त्या संदर्भात राज्य सरकारने विचार केला की, जी स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे आहेत त्यामध्ये पारंपारिक विद्यापीठांसारखे अनुदान या विद्यापीठांना दिले जाणार नाही. परंतु ही सर्व विद्यापीठे पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट असतील, अन्य संस्थांनी त्यामध्ये गुंतवणूक करुन ती विद्यापीठे उभी करावीत अशी अपेक्षा व्यक्त करुन 21 जानेवारी 2004 रोजी विद्यापीठाच्या विधेयकाच्या मसुद्याला मंत्रिमंडळाने पहिल्यांदा मान्यता दिली. तरीदेखील हे विधेयक विधानसभेमध्ये येण्याऐवजी त्या अनुषंगाने 16 ऑगस्ट 2004 रोजी शासनाने त्या संदर्भात एक अध्यादेश काढला. त्यानंतर हिवाळी अधिवेशनामध्ये हे विधेयक मांडून ते संमत करण्यात आले. ते संमत करीत असतांना हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे दिनांक 18 डिसेंबर 2004 रोजी पाठविण्यात आले. त्यानंतर या समितीच्या चार वेळा बैठका झाल्या. संयुक्त समितीने या विधेयकाच्या संदर्भात समाजातील अनेक जाणकार लोकांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. समितीची बैठक 6 जानेवारी 2005 ला मुंबईमध्ये झाली, त्यानंतर 13 जानेवारीला पुणे येथे बैठक झाली, 14 जानेवारीला औरंगाबाद येथे तर 15 जानेवारीला अमरावती येथे बैठक झाली. सुरुवातीला या विभागाचे मंत्री माननीय श्री. सुरेशदादा जैन हे या समितीचे समिती प्रमुख म्हणून काम करीत होते. समितीने मुंबई येथे 8 फेब्रुवारीला बैठक घेतल्यानंतर 7 जूनला सर्व गटनेत्यांची बैठक घेतली. दरम्यानच्या काळात या विधेयकाच्या संदर्भात या खात्याचा कारभार माझ्याकडे आला. त्यानंतरच्या काळात फेब्रुवारी 2005 मध्ये एक घटना घडली. छत्तीसगड या राज्यामध्ये व या देशाच्या अन्य राज्यांमध्ये अशाप्रकारची खाजगी विद्यापीठे निर्माण झाली होती त्या विद्यापीठांच्या स्थापनेच्या कायद्यामध्ये काही त्रुटी राहिल्या होत्या. त्यामुळे हे प्रकरण सुप्रिम कोर्टामध्ये गेल्यानंतर देशामध्ये खाजगी विद्यापीठे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील..

कुणीही काढावीत, कुणीही आपल्या इमारतीच्या चार-सहा खोल्यांमध्ये काढावीत अशाप्रकारचे एक वातावरण निर्माण झाले. आणि मग त्यामधून या विषयाच्या संदर्भात शंका निर्माण झाली. आणि म्हणून या विधेयकाच्या बाबतीत पुर्नविचार केला पाहिजे अशाप्रकारची भूमिका विभागाने घेतल्यानंतर मागील जुलै महिन्यातील अधिवेशनामध्ये सभागृहामध्ये प्रस्ताव मांडला आणि जुने विधेयक मागे घेण्यासाठी सभागृहाची परवानगी मागितली. त्यावेळी सभागृहामध्ये अशी भूमिका मांडण्यात आली की, संयुक्त चिकित्सा समितीमध्ये या विधेयकावर चर्चा झाली असतांना व त्या समितीचा अहवाल सभागृहामध्ये येण्यापूर्वी आपण हे विधेयक मागे कां घेत आहात? त्यावेळी हे विधेयक मागे घेण्याबाबत सभागृहाची परवानगी मागत असतांना मी सभागृहाला आश्वस्त केले होते की, हे विधेयक मागे घेतल्यानंतर संयुक्त चिकित्सा समितीच्या सन्माननीय सदस्यांना मी बोलावून त्यांच्याबरोबर चर्चा करीन. त्या अनुषंगाने 1-2 जुलैला लोणावळा येथे बैठक झाली. त्या बैठकीला सनमाननीय सदस्य उपस्थित होते. दोन दिवस या विधेयकावर संपूर्णपणे चर्चा झाली. त्यावेळी अनेक मते व्यक्त करण्यात आली. त्यामध्ये काही त्रुटी असल्यामुळे संपूर्ण विधेयक बदलले पाहिजे. त्यामुळे असलेल्या विधेयकावर आपण सूचना करण्याऐवजी ते संपूर्ण विधेयक आपण बदलले पाहिजे अशाप्रकारची भूमिका त्याठिकाणी घेण्यात आली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

ती भूमिका घेऊन पुन्हा बिलाचा ड्राफ्ट तयार केला आणि मंत्रीमंडळासमोर पुन्हा गेलो आणि सुधारित स्वरुपातील विधेयक सभागृहात मांडण्यात आले. खरे तर या विधेयकाच्या संदर्भात मंत्रीमंडळामध्ये निर्णय झाल्यानंतर सरकारला ऑर्डिनन्स काढणे शक्य होते. परंतु सरकारने ऑर्डिनन्स काढण्याची भूमिका घेतली नाही. मार्चच्या अधिवेशनामध्ये विधानपरिषदेमध्ये अगोदर या विधेयकावर चर्चा होऊन विधानसभेमध्ये जावे, ही आम्ही भूमिका घेतली. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेबांनी 10 दिवसाची नोटीस मागितली होती. त्याप्रमाणे 10 दिवस पूर्ण झालेले आहेत. त्यानंतर या विधेयकावर चर्चा करण्याची ज्यावेळस वेळ आली, त्यावेळेला सन्माननीय श्री. गडकरी साहेबांनी सुचविले की, या विधेयकाच्या संबंधात वेगवेगळी मते आहेत. त्यावेळेस विभागाने या संबंधात प्रेझेन्टेशन करावे ही अपेक्षा नव्हती. पण त्या संदर्भात महावीर जयंतीच्या दिवशी विभागाने या विषयामध्ये पॉवर प्रेझेंटेशन आयोजित केले. त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला. मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, कोणाचा यामध्ये व्यक्तिगत प्रश्न नाही, कोणाला कमिटमेंट करुन ठेवलेले नाही. लगेचच 50-100 नवीन विद्यापीठे येणार आहेत, अशातला भाग नाही. मुळामध्ये वर्षभरामध्ये त्यांना विद्यापीठ स्थापन करण्यासाठी डिपॉझिट भरावे लागते. देशातील अन्य राज्यामध्ये अशाप्रकारचा कायदा केला, परंतु त्या ठिकाणी मोठया प्रमाणात विद्यापीठे झालेली नाहीत. गुजरातमध्ये कायदा झाला, हरियाणा, सिक्कीम, मध्यप्रदेशने 2005 मध्ये कायदा मंजूर केला. या लहान लहान राज्यांनी कायदे केले आणि आपले राज्य हे लिडींग घेणारे असतानाही आपण कायदा मंजूर करु शकलो नाही, अजून आपण त्यावर चर्चा करत आहोत. ही चर्चा होणे अनुचित आहे,असे माझे म्हणणे नाही. छत्तीसगढमध्ये कायदा केल्यानंतर तो न्यायालयामध्ये टिकला नाही. कायदा न्यायालयामध्ये टिकला पाहिजे. विद्यार्थ्यांचे, पालकांचे हित त्यामध्ये असले पाहिजे. आर्थिक, सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांची चिंता त्यामध्ये असली पाहिजे, त्यामध्ये त्यांना संरक्षण असले पाहिजे. या ओघामध्ये नवीन गुंतवणूक या क्षेत्रामध्ये आली पाहिजे,असा उद्देश आहे. या संदर्भाने एका बाजूला आपण जन प्रतिनिशी चर्चा करत आहोत, दुसऱ्या बाजूला शासनाच्या काही मर्यादा आहेत. पुण्यामध्ये ज्ञानेश्वर विद्यापीठ आहे. त्याचे अध्यक्ष हे श्री. मनोहर जोशी आहेत. त्या विद्यापीठाला ऐ.आय.सी.इ.टी.ची परवानगी नाही. ते कायद्याने स्थापन झालेले विद्यापीठ नाही तरी देखील विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या सगळया मुलांना जॉब मिळत असेल,तर अशा प्रकारच्या शिक्षण देणाऱ्या संस्थांना लिगल फ्रेम..कायदेशीर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.दिलीप वळसे-पाटील...

व्यवस्था निर्माण करुन देण्याची आवश्यकता आहे, अशाप्रकारचा विचार आपण मांडत आहोत. आपण पारंपारित विद्यापीठांचा अभ्यास केला तर ती विद्यापीठे रिसर्च डेव्हलपमेंटचे काम करतच नाही असे मी म्हणणार नाही. पण बी,अे,बी.कॉम अशा पारंपारिक कोर्सेसपेक्षा उच्च स्तरीय दर्जाचा विचार करण्याचे प्रमुख उद्दिष्ट यामध्ये ठेवलेले आहे.

यानंतर श्री.बरवड.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

शिक्षण, प्रशिक्षण, अत्याधुनिक सुविधा निर्माण करणे, अध्यापन व संशोधन , संशोधन व विकास, इ ाानाचे आदानप्रदान करणे हे सर्व यामध्ये आहे. या देशामध्ये मोठमोठया इंडस्ट्रीज शैक्षणिक संस्था काढण्यासाठी पुढे येत नाहीत. याचे कारण असे की, या देशामध्ये शैक्षणिक संस्था काढत असताना त्याचे रजिस्ट्रेशन पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्टखाली तसेच इंडियन सोसायटीज ॲक्टखाली करावे लागते. परवा मला श्री. बाबा कल्याणी भेटले होते. त्यांना जागतिक दर्जाचा कॉन्ट्रॅक्ट मिळाला. त्यांना जागतिक दर्जाचे ऑटोमोबाईचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले परंतु त्यांना आमच्या इंजिनिअरींग कॉलेजेसचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्टॅण्डर्डमध्ये मॅच करण्यासाठी पुरेसा आहे असे वाटत नाही. यासंदर्भात संस्थेमध्ये काही सुरु करता येईल काय अशी भूमिका त्यांच्या मनामध्ये आहे किंवा तसा प्रयत्न ते त्यांच्या कंपनीच्या माध्यमातून करीत आहेत. त्यामुळे यामध्ये इंडस्ट्रियल एज्युकेशनशी याचे लिंकेज करण्याच्या संदर्भात आपण या विधेयकाच्या माध्यमातून विचार करीत आहोत. सभापती महोदय, या विधेयकामध्ये ज्या गोष्टी करीत आहोत याबाबत मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, ही जी विद्यापीठे स्थापन करण्यात येणार आहेत ती अन्य विद्यापीठांसारखी ट्रॅडिशनल विद्यापीठे नाहीत. आताची ट्रॅडिशनल विद्यापीठे ही ॲफिलिएटेड विद्यापीठे असतात आणि ही विद्यापीठे कॅम्पस विद्यापीठे आहेत. त्यांना महाराष्ट्रभर किंवा देशभर कॉलेजेस सुरु करता येतील अशी भूमिका नाही. जसे आपण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट ॲक्ट अंतर्गत शैक्षणिक संस्था स्थापन करतो तसेच इंडियन कंपनीज ॲक्ट च्या अंतर्गत सुध्दा कंपनीला आता विद्यापीठे स्थापन करता येतील अशी यामध्ये तरतूद केलेली आहे. ज्यावेळी आपण पब्लिक लिमिटेड किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा विचार करतो त्यावेळी असा प्रश्न निर्माण होतो की, कंपनी म्हटली की ते गुंतवणूक करणार आणि गुंतवणूक म्हटली की मग डिव्हीडंड मागणार आणि त्यासाठी प्रॉफीट मिळविणार. कंपनी अधिनियम, 1056 च्या कलम 25 मध्ये अशी तरतूद आहे की, या नॉन प्रॉफीट मेकींग इन्स्टीटयूशन्स असल्यामुळे त्यामध्ये विद्यार्थ्यांकडून किंवा पालकांकडून पैसे घेऊन कंपनी मोठी करता येणार नाही. त्या ठिकाणी मिळवलेले पैसे किंवा उत्पन्न त्याच संस्थेच्या विकासासाठी त्यांना खर्च करावा लागेल. ते उत्पन्न अन्य ठिकाणी घेऊन जाता येणार नाही. यामध्ये एखाद्या प्रमोटींग बॉडीने प्रोजेक्ट रिपोर्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

RDB/ SBT/ MAP/

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

तयार करावयाचा, तो रिपोर्ट त्यांनी राज्य सरकारकडे सादर करावयाचा, राज्य सरकार त्यासंदर्भात छाननी कमिटी नेमील आणि राज्य सरकारने नेमलेल्या छाननी समितीने छाननी केल्यानंतर त्या संस्थेला इरादापत्र देण्यात येईल. यामध्ये विविध अटी घातलेल्या आहेत. 30 एकर जमीन पाहिजे. एवढे बांधकाम पाहिजे. एवढा स्टाफ पाहिले. एवढी मशिनरी पाहिजे यासंदर्भात एक वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी राज्य सरकारला कळवावयाचे आहे. विषय कोणते निवडावयाचे आहे त्यासंदर्भात प्रमोटीग बॉडीला स्वातंत्र्य दिलेले आहे. या सगळ्या बाबी केल्यानंतर वर्षभराच्या आत त्यांनी सरकारला कळवावयाचे आहे. यामध्ये दाननिधीच्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. शहरी भागासाठी जास्तीत जास्त 5 कोटी रुपयांचा निधी त्यांनी ठेवला पाहिजे. ग्रामीण भागासाठी वेगळी रक्कम आहे. एखादे विद्यापीठ काढले आणि त्यांनी त्या ठिकाणी अफरातफर केली व ते तेथून निघून गेले तर विद्यार्थी आणि शिक्षकांचे त्यामध्ये नुकसान होऊ नये यासाठी ही व्यवस्था या विधेयकामध्ये केलेली आहे. साधारणपणे एआयसीटी, युजीसी आणि ज्या ॲफिलिएटेड बॉडीज आहेत त्यामध्ये त्यांचे जे नियम आहेत ते नियम पाळण्याचे बंधन यामध्ये घालण्यात आलेले आहे. या विद्यापीठांना विसर्जित करण्याच्या संदर्भात राज्यसरकारकडे अधिकार ठेवलेले आहेत आणि राज्य सरकार यासंदर्भात वेळोवैळी जे नियम घालून देईल ते नियम पाळण्याच्या संदर्भात या कायद्यामध्ये तरतूद करण्यात आली आहे. या कायद्याच्या खंड 14, 15, 17, 19, 21 यामध्ये विद्यापीठाच्या रचनेच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. खंड 20 मध्ये नियामक मंडळ, कार्यकारी परिषद या सगळ्या गोष्टी सांगितलेल्या आहेत.

( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी )

यानंतर श्री. कानडे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

या कायद्याच्या खंड 4 मध्ये विद्यापीठ स्थापन करण्याची कार्यपध्दती कशी असावी हे नमूद करण्यात आले आहे. इरादापत्र दिल्यानंतर व एक वर्षानंतर कंपायलेशन रिपोर्ट आल्यानंतर प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे येईल आणि फायनल स्वरुपामध्ये परवानगी द्यावयाची किंवा नाही हे बिलाच्या स्वरुपात,ठरावाच्या स्वरुपात विधानमंडळासमोर आले पाहिजे अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाने स्वीकारलेली आहे. महावीर जयंतीच्या दिवशी या विद्यापीठाच्या संदर्भात जे प्रेझेंटेशन झाले त्यावेळी माननीय सदस्यांनी सांगितले की, खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक या क्षेत्रात आकर्षित करीत आहात त्यावेळी या विद्यापीठावर सरकारचा जेवढा कमीत कमी कंट्रोल ठेवता येईल तेवढा ठेवा. कारण सिस्टीममध्ये दोष असतात. त्याचा गैरफायदा घेऊन गुंतवणूक करणाऱ्या माणसाला त्रास देण्याचे काम झाले तर त्यामुळे कोणी गुंतवणूकदार पुढे येईल असे त्यांना वाटत नाही. या संदर्भात राज्य शासनाची जी भूमिका आहे ती अतिशय स्पष्ट आहे. हे विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर या विद्यापीठामध्ये निश्चित प्रकारे असे कोणते विषय आहेत हे पाहिले तर बायोटेक्नीकल सारखे विषय आहेत. मी माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांना विनंती करतो की, त्यांनी मुलुंड येथील वझे-केळकर महाविद्यालय जरुर पहावे. भाऊसाहेब केळकर यांनी स्वत: 8 कोटी रुपये खर्च करुन बायोटेक्नॉलॉजी अभ्यासक्रम सुरु केलेला आहे. याठिकाणी नुसते शिक्षण देतात असे नाही तर त्यांनी तयार केलेले ॲग्रीकल्चर प्रॉडक्ट,वनस्पती प्रॉडक्ट तसेच रोपे शेतकऱ्यांना द्यावयाची,शेतकऱ्यांनी त्यापासून उत्पन्न घ्यावयाचे आणि ते एक्सपोर्ट करावयाचे यातून मोठया प्रमाणात पैसे वझे-केळकर कॉलेजला मिळतो. या क्षेत्रामध्ये दर्जेदार शिक्षण देण्याची व्यवस्था हे विद्यापीठ स्थापन झाल्यामुळे होणार आहे. आजकाल ग्लोबलायझेशन झाल्यानंतर परदेशातील विद्यार्थी भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये आल्यानंतर त्यांना या ठिकाणी येऊ नका असे सांगणारा कायदा आपल्या देशामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये कुठेही नाही. ॲटॉनामस कोर्सेस, ॲटोमेशन कोर्सेस,डिग्री कोर्सेस,डिस्टन्स एज्युकेशन यासाठी येथे आलेल्या विद्यार्थ्याला प्रतिबंध करण्यासाठी आपल्याकडे कोणताही कायदा नाही. या देशात शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करावयाची असेल आणि या राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्यावयाचे असेल तर आपल्याला ही व्यवस्था करणे आवश्यक आहे. गरीब घरातील मुलगा बुध्दीमान असेल आणि त्याची अमेरिकेमध्ये शिक्षण घेण्याची क्षमता असताना सुध्दा केवळ आर्थिक क्षमता नाही म्हणून त्याला जाता येत नाही म्हणून त्याच

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 14:30

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

दर्जाचे शिक्षण आपल्या राज्यामध्ये निर्माण करता आले पाहिजे. ज्यावेळी हे सगळे आपण प्रायोगिक विचार मांडत असतो त्यावेळी शासनाची भूमिका स्पष्ट असली पाहिजे. हा कायदा आणीत असताना सरकारचा प्रतिष्ठेचा कोणताही प्रश्न नाही. सरकार प्रामाणिकपणाने या राज्यात शिक्षणाचा दर्जा वाढवू इच्छितो. शिक्षणाच्या उदारीकरणाशी स्पर्धा निर्माणकरावयाची नाही,कोणाला मारायचे काम करावयाचे नाही किंवा कोणाला फेवर करावयाचे काम करावयाचे नाही. याराज्यात दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी नव्याने कायदा आपण करीत आहोत. ज्यावेळी प्रेझेंटेशन करताना चर्चा झाली त्यावेळी सामाजिक न्यायाच्या संदर्भात सुध्दा चर्चा झाली. घटनेने जे आरक्षण दिलेले आहे ते या देशातील कोणालाही नाकारता येणार नाही. मध्यंतरी सुप्रीम कोर्टाच्या 7 सदस्यीय खंडपीठाने निर्णय दिला की या देशातील कोणत्याही खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण लागू होणार नाही अशा प्रकारची भूमिका सुप्रीम कोर्टाने घेतली. या राज्यात आणि देशात ज्या ज्या खाजगी शिक्षण संस्था आहेत त्यांना कोणतेही अनुदान मिळत नाही मग मेकॅनिकल इंजिनिअरींग असोत,पॉलिटेक्नीक असो,फार्मसी कोर्सेस देणाऱ्या संस्था असोत या सगळया शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण लागू राहणार नाही अशा प्रकारचा निर्णय सुप्रीम कोर्टाने घेतल्यानंतर एक चिंतेचे वातावरण निर्माण झाले. या क्षेत्रामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्यानंतर देशातील केंद्र सरकारपासून राज्य सरकारपर्यंत कोणतेही सरकार आता खाजगी शिक्षण संस्थांना आरक्षणाच्या बाबतीत आग्रह धरु शकणार नाहीत अशा प्रकारचे वातावरण निर्माण झाले. माननीय मंत्री श्री. अर्जुनसिंग साहेब यांनी यासंदर्भात एक बैठक घेतली.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील..

देशातील शिक्षण मंत्र्यांची परिषद बोलाविली होती. त्यावेळी मी महाराष्ट्राची बाजू मांडताना केंद्र सरकारला जे काही करावयाचे असेल तर करावे, पण आम्ही सामाजिक न्यायाची भूमिका घेताना तसू भरही मागे हटणार नाही हे सांगितले होते. वाटल्यास, त्यासाठी घटनेमध्ये दुरस्ती करावी अशी देखील सूचना केली होती. याबाबत महाराष्ट्राची भूमिका आम्ही केंद्र सरकारला लेखी स्वरूपात देखील कळविली आहे. एवढेच नव्हे तर एज्युकेशन बँक स्थापन करण्याची देखील सूचना केली आहे. मला अभिमानाने सांगितले पाहिजे की, आम्ही जी सूचना केली होती त्याप्रमाणे केंद्र शासनाने दुरूस्ती केली. खाजगी शिक्षण संस्थांमध्ये किती आरक्षण असले पाहिजे, याचा निर्णय केंद्र सरकारने पार्लमेंटला दिलेला आहे. केंद्र सरकारने एनेमब्लिंग प्रोव्हीजन केली आहे. त्यासाठी स्वतंत्र कायदा असला पाहिजे. आरक्षणा बरोबर प्रवेश नियंत्रण समिती देखील वेगळी आहे. फी फिक्सेशन संबंधीची देखील वेगळी कमिटी आहे. कुठली संस्था राज्यात येते त्याची नोंद नसते. म्हणूनच उच्च शिक्षणामध्ये एक नवीन कायदा करण्याची गरज आहे. हे सर्वंकष बिल आहे. यामध्ये अनेक विषय आहेत. आरक्षण ठेवणे, फी संबंधीचा निर्णय घेणे, प्रवेशाची प्रक्रिया, संस्थेचे हक्क शाबूत ठेवणे हे देखील महत्त्वाचे आहे. तसेच विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने एक स्वतंत्र कायदा देखील राज्य शासन तयार करीत आहे. तो या सभागृहापुढे आणण्याच्या मी प्रयत्न केला होता. परंतु, काही कारणांमुळे तो मला आणता आलेला नाही. आता यासंबंधी मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल. हे विधेयक तयार करीत असताना शिक्षण संस्थेमध्ये आरक्षण ठेवण्यासंबंधीच्या मर्यादा होत्या. घटनेमध्ये एनेम्ब्लिग प्रोव्हीजन झाल्यानंतर तो कायदा अस्तित्त्वात येईल. खाजगी शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग या सर्वांना आरक्षण ठेवण्यासंबंधीची भूमिका राज्य शासनाने नक्कीच घेतली आहे. मी एक गोष्ट पुन्हा येथे स्पष्ट करू इच्छितो की, सामाजिक न्यायाच्या भूमिकेपासून शासन तसूभरही बाजूला हटणार नाही. ज्यावेळी मंडल आयोगाला विरोध झाला त्यावेळी महाराष्ट्राने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची भूमिका स्वीकारली. ती भूमिका नंतर इतर राज्य पुढे घेऊन गेले. अशीच भूमिका यापुढे देखील आपली चालू राहील हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. आर्थिकदृष्टया, सामाजिकदृष्टया जे मागासलेले विद्यार्थी असतात, त्यांच्यासाठी एज्युकेशनल बँक स्थापन करण्याची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी प्रयत्न केला होता. यासबंधी मी राष्ट्रीय बँकेचे अधिकारी तसेच एच.डी.एफ.सी.बँकेचे प्रमुख श्री.पारेख यांच्या देखील चर्चा केली होती. बुद्धिमत्ता असलेल्या मुलांना आर्थिकस्थितीमुळे प्रवेश घेता येत नाही म्हणून काही तरी व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला होता. टीचिंग, नॉन टीचिंगसबंधी तसेच विद्यापीठांच्या संबंधी अडचणी आहेत. विद्यापीठला जेवढे पैसे पाहिजे असतात, तेवढे ते मिळत नाही. त्यासंबंधीची चाचपणी करूनच हे विधेयक येथे मांडत आहे. या विधेयकासंबंधी आपल्या ज्या काही सूचना/सुधारणा असतील त्याचा खुला मनाने विचार करण्यास मी तयार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

परंतु हे विधेयक महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने एक पुढचे पाऊल आहे. या विधेयकासाठी सभागृहाने सहकार्य करावे असे मला वाटते. आतापर्यंत विरोधी पक्षासोबत या विधेयकाच्या अनुषंगाने जेव्हा जेव्हा बैठका घेतल्या, चर्चा झाल्या तेव्हा तेव्हा त्यांनी समजूतदारपणाची आणि समन्वयाची भूमिका घेतलेली आहे. म्हणून हे विधेयक सभागृहाचे विचारात घ्यावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त ) : सभापती महोदय, वि.प.वि.क्र-10, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, आताच सन्माननीय मंत्री महोदयांनी महाराष्ट्राची परंपरा आणि महाराष्ट्राची शिक्षण क्षेत्रातील कामगिरी या विषयावर उद्‌बोधक भाषण केले आहे. त्यांनी महाराष्ट्राची सामाजिक बांधिलकी आणि शासनाची सामाजिक बांधिलकीबाबत आपले विचार व्यक्त केले. महाराष्ट्राची शिक्षणाची परंपरा फार मोठी आहे. स्त्री शिक्षणाचा वारसा सांगणारा हा महाराष्ट्र आहे. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा वारसा महाराष्ट्राला दिला आहे. एसएनडीटी च्या माध्यमातून महर्षी धोंडू केशव कर्वे यांनी शिक्षण क्षेत्रात अलौकीक काम केले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पै अन पै गोळा करुन ग्रामीण भागातील मुलगा शिकला पाहिजे आणि पुढे गेला पाहिजे अशी भूमिका मांडली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी यातना भोगून, शिक्षण घेतले आणि जात बांधवांना सांगितले की, शिक्षणाशिवाय पर्याय नाही, त्यामुळे सर्वांनी शिक्षण घ्यावे. अशा परिस्थितीतून महाराष्ट्र जात असताना मी मागे बोललो होतो की, ज्या प्रकारची उत्क्रांती घडते आहे, सिध्दांत बदलत आहेत त्याचा विचार होणे आवश्यक आहे. किंग्स, मार्क्स यांनी वेगवेगळे सिध्दांत मांडलेत. 1929 साली ग्रेट डिप्रेसन आले. त्यातून पायाभूत सुविधा जोपर्यंत सरकार उपलब्ध करुन देत नाही तोपर्यंत आपली अर्थव्यवस्था टिकू शकत नाही, असा मुद्दा पुढे आला. जागतिकीकरणाच्या संकटामध्ये हा पर्याय स्वीकारला गेला आणि गेट डिप्रेसन मधून आपण बाहेर आलो.

महोदय, शिक्षण क्षेत्रात या घडीला बदल करणे गरजेचे आहे. म्हणून या विधेयकाचे मी मनापासून स्वागत करतो. हे विधेयक मांडत असताना शिक्षण क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणावर बदल घडवून आणणे गरजेचे आहे. शिक्षण हे फक्त श्रीमंताचाच वारसा होऊ नये, अशी भिती या विधेयकातून वाटते आहे. कारण तसे झाले तर शिक्षणाचा दर्जा चांगला असेल, परंतु ते महाग होईल. त्यामुळे दहा बाय दहा च्या खोलीमध्ये राहणाऱ्या मुलाला शिक्षण घेता आले नाही तर, आपल्या मुळ उद्देशाचाच पराभव होईल. ग्लोबलायझेशनमध्ये गरीब माणसाला स्थान नसेल तर, ग्लोबलायझेशनचे वारे केवळ श्रीमंतांच्याच घरात वाहत राहील. अशी भिती माझ्या मनात निर्माण होत आहे. तीच भिती मला या ठिकाणी मला व्यक्त करावयाची आहे. ..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

माननीय मंत्री महोदयांनी मागासवर्गीयांसाठी विधेयकात 27 टक्के आरक्षण असल्याचा उल्लेख केला. परंतु आपल्याकडे 52 टक्के लोकसंख्या ही इतर मागासवर्गीयांची आहे. त्यामध्ये मग माळी असतील, वंजारी असतील, जे कोणी असती ते असतील. या समाजाची लोकसंख्या मोठी आहे. ही मंडळी चातुर्वण्याच्या वरवंटयाखाली गेली तर हा समाज वर येणार नाही. त्यामुळे या समाजाला वर आणण्याचे काम आपण करणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदयांनी 27 टक्के आरक्षणाबाबत उल्लेख केला. शाहू महाराजांनी या देशामध्ये 1904 मध्ये दीनदुबळयांना पुढे आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी 50 टक्के आरक्षण ठेऊन, त्यांना सवलती देणे आवश्यक आहे अशी भूमिका मांडली होती आणि ती अंमलातही आणून दाखविली होती.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

त्यांनी ते करुन दाखविले. ज्यावेळेस हे सगळे पंडित राज्य सत्तेवर आपली सत्ता गाजवत होते, त्यावेळी शाहू महाराजांसारख्या विद्रोही समाजसुधारकाने पुढे येऊन सांगितले की, आपल्याला हे करावे लागेल, हे बदलावे लागेल आणि त्यांनी ते बदलून दाखविले. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आपण हे राज्य पुढे चालवत आहोत. महाराष्ट्राच्या मातीचे या जातींशी असलेले नाते आहे. या जातींच्या उत्कर्षासाठी आपल्यात योगदानात कुठेही कमतरता राहू नये असे मला वाटते. सदरहू विधेयकात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राविषयीचा उल्लेख नाही. मला वाटते की, त्यांना मर्यादित स्वरुपाचे कार्यक्षेत्र असू नये. पैसा आला की, ठाणे, पुणे, मुंबई या पुरताच तो मर्यादित राहतो. सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी उद्योजकांना जरा पटवावे लागेल. आपण ते येण्यासाठी त्यांना पाहिजे असेल त्या सोयी-सुविधा द्या. औद्योगिकरणाची लाट आली आणि कुठपर्यंत गेली तर मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक आणि थोड्या फार प्रमाणात औरंगाबाद येथे ही लाट गेली. महाराष्ट्र म्हणजे ही पाचच महत्वपूर्ण शहरे नव्हेत. चंद्रपूर, नंदूरबार येथील जनताही महाराष्ट्रातील रहिवासी आहेत. ते जर मागे राहणार असतील, त्यांना याचा फायदा मिळणार नसेल तर ते योग्य नाही. औद्योगिक वातावरणामध्ये काम करणारी माणसे सामाजिक बांधिलकी ठेवून कामे करतात हा महाराष्ट्राचा इतिहास आहे. जमनालाल बजाज हे त्यातीलच एक मोठे उदाहरण आहे. सभापती महोदय, याबाबतीत अपण काही करु शकलात तर फार मोठे उपकार होतील. आपण ऐतिहासिक काम करत आहेत. त्याची इतिहासामध्ये नोंद घेतली जाणार आहे. हे काम जर आपण करु शकलात तर महाराष्ट्राशी बांधिलकी जपणारा कार्यक्षम मंत्री म्हणून आपली इतिहासात नोंद होईल. विद्यापीठ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असावे अशी तरतूद कलम 9 मध्ये देण्यात आलेली आहे. त्यासाठी विद्यापीठाला वैधानिक मार्गाने अर्थपुरवठा करण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात अधिकार प्रदान करण्यात यावा, हा स्वतंत्र मुद्दा आहे. त्यांनी पैसा कोठून आणावयाचा यामध्ये जास्त हस्तक्षेप करणे योग्य होणार नाही. विद्यापीठाने पाच कोटी अथवा दोन कोटी इतकी रक्कम विशेष निधी म्हणून शासकीय लेखे या कोषागारात ठेवण्याची तरतूद कलम 10 मध्ये केलेली आहे. सभापती महोदय, एवढ्या मोठ्या निधीची तरतूद केवळ धनदांडगेच करु शकतील. शिक्षण क्षेत्रे धनदांडग्यांच्याच हातात चालले आहे. त्यांची दादागिरी शिक्षणक्षेत्रात वाढत

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

आहे असे सर्वसामान्यांना वाटायला लागले आहे. हे विधेयक आपण महाराष्ट्राच्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणत आहात. ग्लोबलायझेशनच्या वाऱ्यामध्ये जर हॅवर्ड विद्यापीठ येथे आले तर त्यांच्याशी जॉईंट कोलॅबरेशन होऊन हॅवर्ड स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची एखादी शाखा येथे उघडली तर माझ्या सारख्याचा आनंद गगनात मावेनासा होईल. आम्ही आमची स्वप्ने पूर्ण करु शकलो नाही याला विविध कारणे असतील. परंतु आमचे स्वप्न आमच्यातीलच एखादा मागासवर्गीय विद्यार्थी पूर्ण करणार असेल तर त्याने ते करावे. सभापती महोदय, कलम 14 मध्ये असे सांगण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांची कुलपती म्हणून नियुक्ती करावी. आज कुलपतींवर 19 विद्यापीठांचा न पेलवणारा भार लक्षात घेता हे कलम पूर्णतः चुकीचे आहे. आता प्रायव्हेट युनिव्हर्सिटी येणार आहे, त्यासाठी पैसा बाहेरुन येणार आहे तर मग त्यामध्ये हस्तक्षेप करणे बरोबर होणार नाही. मी माझे विद्यापीठ काढणार असलो तर मग कुलपती कोण असावा याबाबत इंटरफिअर कोणी कशाला करावे ?

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ SBT/ यापूर्वी श्री. कांबळे.... 14.50

श्री. जितेंद्र आव्हाड ....

आता सुध्दा खाजगी विद्यापीठे आहेत त्यांचे कुलपती डॉ. पतंगराव कदम आहेत, असे अनेक कुलपती असतील, त्यामुळे यामध्ये राज्यपाल कुलपती असावयास पाहिजे याची काही गरज नाही. आता बाबा कल्याणी सामाजिक क्षेत्रात आहेत ते सुध्दा कुलपती होऊ शकतील. उद्या राहूल बजाज यांनी सुध्दा विद्यापीठाची स्थापना केली तर ते कुलपती राहू शकतात. अशा प्रकारे आताच अनेक खाजगी विद्यापीठांचे कुलपती आहेत. यामध्ये राष्ट्रपतींनी राज्यपाल यांची कुलपती म्हणून नेमणूक करण्याची जी अट आहे त्याची आता काही गरज नाही असे मला वाटते. सन्माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी विधेयक मांडतांना शेवटी ज्या 5 ते 6 मुद्यांचा ऊहापोह केलेला आहे त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, महाराष्ट्राचा सामाजिक असमतोल यातून दूर करावा, समाजातील तळागाळाच्या गरीब जातीबांधवांना त्याची फळे चाखायला मिळाली पाहिजे, याची संधी त्यांना मिळावी व त्यांना सुध्दा शिक्षण घेता यावे. मी या बिलाचे अभिनंदन करीत असतांना हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराने चालणारा असल्याने, मंत्री महोदयांनी एक चांगले पाऊल टाकलेले आहे, परत या बिलाचे अभिनंदन करुन मी धन्यवाद देतो व माझे दोन शब्द संपवितो.

-----------------

......2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, हे विधेयक विचारात घेण्यात येत असतांना माननीय मंत्री महोदयांनी जे भाषण केले ते मी काळजीपूर्वक ऐकले आहे. माझ्‍ा असा समज झालेला आहे की, आता मंत्री महोदयांनी हे विधेयक अंतिम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या विधेयकाच्या संदर्भात संयुक्त सभागृहामध्ये ज्यावेळी सादरीकरण झाले त्यावेळी त्यातील काही चुकांवर सदस्यांनी प्रकाश टाकला होता व त्या दुरुस्त करण्याबाबत सूचना केल्या होत्या. मला असे वाटले की हया सर्व दुरुस्त्या करुन माननीय मंत्री महोदय हे विधेयक सभागृहात मांडतील. या सर्व दुरुस्त्या करण्याचे त्या दिवशी ठरले होते. या विधेयकावर मी जास्त बोलणार नाही. येथे जी भाषणे होतील ती विधेयकाला पाठिंबा देणारीच होतील. येथे फक्त मी दोन तीन मुद्दे मांडणार आहेत. संयुक्त समितीची जी फार्मल कमिटी लोणावळा येथे झाली त्यावेळी सुध्दा आम्ही चुका व उणिवा या विधेयकात दर्शविल्या होत्या. सदर चुकाकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत. त्या बदलानंतर सुध्दा बैठक झाली होती. त्या कमिटीला माझ्यासह अनेक सदस्य उपस्थित नव्हते. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर कायद्याने विद्यापीठ स्थापन करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. मेंन्टेन्स् ऑफ स्टॅण्डर्ड ॲन्ड को-ऑर्डीनेशन ऑफ हायर एज्युकेशन हा विषय त्यांच्या अधिकार क्षेत्रातील आहे. त्यासाठी अनेक तरतुदी करावयास पाहिजे. या नवीन विधेयकामध्ये स्वावलंबी असण्याचा उल्लेख अनेक ठिकाणी झालेला आहे. गांभीर्याची गोष्ट म्हणजे त्या ठिकाणी असे चर्चेला आले होते की, महाराष्ट्र राज्य स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करणार नसेल तर इतर कोणते राज्य करीन. माननीय मंत्री महोदयांचा या विधेयकाला मनातून जरी विरोध असला तरी त्याला पाठिंबा आहे.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

विधेयकामध्ये तरतूद नाही त्यावेळी आम्हाला बाहेर भाषण करावे लागते. मागासलेल्या वर्गासाठी, आर्थिकदृष्टया मागासलेल्या वर्गासाठी या देशाच्या सुप्रिम कोर्टाने 50:50 टक्के अशाप्रकारची काही विशेष व्यवस्था करुन दिली होती. तशी व्यवस्था आपल्याला याठिकाणी करणे कठीण नाही. सुप्रिम कोर्टाचा याबाबतचा निर्णय लक्षात घेऊन सुध्दा एकाही गोष्टीची व्यवस्था याठिकाणी करण्यात आलेली नाही.म्हणून या विषयावर विधेयकाच्या बाहेर जास्त बोलावे लागणार आहे. विधेयकातील इतर दोष किंवा उणीवा आहेत, त्यामध्ये मी जास्त वेळ घालवीत नाही. त्याबाबत मी समितीच्या बैठकीमध्ये बोललो आहे. जर हे विधेयक आहे याच स्थितीत मांडले जाणार असेल आणि त्यामध्ये दुरुस्ती होण्याकरिता ते संयुक्त चिकित्सा समितीपुढे जाणार नसेल तर त्याला ठामपणे विरोध करणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये या विधेयकाला पाठिंबा द्यावा अशाप्रकारची जनमानसाची स्थिती नाही एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी दहा क्रमांकाचे विधेयक आपणासमोर मांडले आहे. या विधेयकावर यापूर्वी अनेक वैचारिक मल्लिनाथी झालेली आहे. त्या संदर्भात अनेक बैठका झालेल्या आहेत. शिवसेनेतर्फे माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी त्या बैठकीमध्ये भाग घेतला आहे. त्याचप्रमाणे माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनीही भाग घेतला आहे. त्याचप्रमाणे अनेक विचारवंत ज्येष्ठ सदस्यांनी आपले कॉंट्रीब्युशन दिलेले आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय मंत्र्यांनी हे विधेयक मांडतांना केलेल्या प्रेझेंटेशनला मी उपस्थित नव्हतो. या पूर्वीच्या विधेयकाच्या वेळी संयुक्त समितीच्या बैठकीमध्ये माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी त्यांनी केलेल्या सूचना अव्हेरल्या गेल्याचे सांगितले. "स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ" या शब्दामध्ये सेल्फ फायनान्स कुणाकडे आहे? ज्याच्याकडे सेल्फ फायनान्स आहे त्याची आर्थिक बाजू अधिक मजबूत व्हावी म्हणून ही विद्यापीठे काढली जात आहेत काय अशाप्रकारची माझ्या मनामध्ये शंका आहे? ही विद्यापीठे कोण काढणार आहेत? जे लोक आर्थिकदृष्टया सक्षम आहेत असेच लोक ही विद्यापीठे काढणार आहेत असा त्यामधून अर्थ निघतो. या महाराष्ट्रामध्ये खाजगी वैद्यकीय, इंजिनिअरींग कॉलेजस निघाली आहेत, अभिमत विद्यापीठे निघाली आहेत, काही सुपरस्पेशालिटी इंस्टिटयुशन निर्माण झाली आहेत या सर्वांचा आढावा घेतल्यानंतर या क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशामध्ये मायनास आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.महाराष्ट्र राज्याने वैद्यकीय क्षेत्रामध्ये, उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रामध्ये असलेले आपले नियंत्रण घालविले आहे याचे जीवंत उदाहरण सभागृहाबाहेर देता येईल. आज डीम युनिव्हर्सिटी या स्वायत्त संस्था झाल्या आहेत. त्या केवळ विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अखत्यारित आहेत. त्या युनिव्हर्सिटीवर आपले कोणतेही नियंत्रण नाही हे आपण वारंवार सभागृहामध्ये सांगत आहोत. आपण याठिकाणी जागतिकीकरणाचे उदाहरण देता व काळाची गरज असल्याचे सांगता. परंतु आपण काळाच्या पाठीमागे किती धावावयाचे हे राज्य सरकारने ठरविले पाहिजे. आपण उदाहरण देतांना सांगितले की, उत्तरांचल, गुजरात, हिमाचल प्रदेश, राजस्थान या राज्यांनी प्रगती करुन अशाप्रकारची विद्यापीठे आणली.परंतु मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचा एक दर्जा आहे. शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्राकडे वेगळया नजरेने बघितले जाते. दिल्ली किंवा मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थ्याकडे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

वेगळया दृष्टीकोनातून, आदराने बघितले जाते. ते लोक पुढें गेले म्हणून आपण त्यांचे अनुकरण करावे कां? असा आपल्यासमोर मोठा प्रश्न आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे...... 15:00

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु....

कोणी तरी येऊन आपल्याकडे युनिव्हर्सिटी काढणार, मग आपण काय करायचे असे मंत्री महोदय वारंवार आपल्या भाषणातून सांगतात. दर्जेदार शिक्षण देणाऱ्या संस्था तयार व्हाव्यात असे वारंवार आपण म्हणतो. आपण दर्जेदार शिक्षण संस्थां काढणार असाल तर त्यांना आर्थिक सहाय्य कशाकरिता देणार आहोत. शिक्षणाला दर्जेदार क्रायटेरिया लावायचा असेल तर जरुर विद्यापीटे काढा त्याला आमचा पाठिंबा राहील. परंतु शिक्षणाच्या नावाने बाकीचे धंदे त्या ठिकाणी चालणार असतील तर महाराष्ट्रातील जनता ते सहन करणार नाही. ऐआयसीईटीची याला मान्यता घ्यावी लागते हे आपल्या भाषणामध्ये आपण सांगितले परंतु प्रायव्हेट मेडिकल कॉलेजेसच्या बाबतीत आरक्षणाच्या संबंधात, त्याची फी ठरविण्यासंबंधात शेवटी न्यायालयात जावे लागले. आपला त्यावरील कंट्रोंल निघून चाललेला आहे ही वस्तुस्थिती आहे. काही राज्यकर्ते आहेत, काही शिक्षण सम्राट आहेत, काही अर्थिक सम्राट आहेत ती ही विद्यापीठे काढू पहात आहेत. आपल्या भाषणामध्ये आपण म्हटलेले आहे की,दर्जेदार शिक्षण संस्थांना लिगल फ्रेम देण्याचा प्रयत्न या विधेयकातून केलेला आहे. त्यातून काही गैरव्यवहार केलेला असेल तर त्यांना लिगलाईज करणार आहात काय ? या विधेयकामध्ये प्रायोजक मंडळाने विद्यापीठ विसर्जित करण्याचा अधिकार घेतलेला आहे. त्यांना 45 दिवसाची नोटीस देणार आणि विसर्जित करणार. शासनाने अधिकार घेतलेले आहेत. त्या संदर्भात म्हटलेले आहे की, " हा अधिनियम व त्याखाली तयार करण्यात आलेले नियम,परिनियम किंवा आदेश यांच्या तरतुदी पार पाडण्यास किंवा त्यांचे पालन करण्यास विद्यापीठांना निदेश देणे". तुम्ही निदेश देणार आणि ते कोर्टामध्ये जाणार आणि त्याला स्टे मिळविणार. तसेच भ्रष्टाचाराच्याबाबतीत होणार. पुढे असे म्हटलेले आहे की, " या अधिनियमाच्या तरतुदींचे योग्यपणे पालन केले जात असल्याबाबत खात्री करुन घेण्यासाठी, विद्यापीठाचे प्रशासन व कामकाज यांच्या तपासणीची पूर्वसूचना देऊन, कोणत्याही वेळी अशी तपासाी करण्यासाठी, समितीची नियुक्ती करणे." म्हणजे चोराला चोरी करण्यास सांगण्याचा प्रकार आहे. तुमचा कारभार तपासण्यासाठी आठ दिवसांनी येतो असे सांगणार आणि मग त्यांची तपासणी करणार म्हणजे हे हास्यास्पद आहे. आपल्याला खरोखरच परिपूर्ण विधेयक आणावयाचे असेल तर अचानक जाऊन चौकशी केली पाहिजे. सरकार त्या विद्यापीठाला पत्र पाठविणार की पुढच्या महिन्यामध्ये इन्स्पेक्शन होणार आहे त्याची तयारी करा. प्रायव्हेट मेडिकल कॉलेजच्याबाबतीत असेच होते . त्या ठिकाणचे इन्स्पेक्शन होणार म्हणून बाहेरुन कोठून तरी पेशंटची भरती करायची, 1 हजार रुपये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/

डॉ.दीपक सावंत (पुढे सुरु...

त्यांना द्यायचे आणि  त्या दिवसापुरती व्यवस्था करायची. इन्स्पेक्शनला गेलेली माणसे काय करणार. सगळे आलबेल.

तालिका सभापती (श्री गुरुनाथ नाईक ): सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर बोलावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी विधेयकावरच बोलत आहे. अफिलिएटेड युनिव्हसिटी म्हणून ते आपल्याकडे येणार आणि त्यांचे पॅटर्न दुसरेच असणार. या संदर्भातील योग्य प्रावधान असायला पाहिजे. अफिलिएटेड  युनिव्हर्सिटी असली  तर त्यांच्याबाबतीत नेमके काय करणार याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

या बिलामध्ये याबाबतीत काहीही म्हटलेले नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या ॲफिलिएटेड युनिव्हर्सिटीज असणार नाहीत.

**तालिका सभापती ( श्री. गुरुनाथ कुलकर्णी )** : परवा मंत्रिमहोदयांनी या बिलाच्या संदर्भात सादरीकरण केले त्यावेळी यावर चर्चा झाली होती. सन्माननीय सदस्य त्यावेळी उपस्थित नव्हते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी ते मान्य केलेले आहे. तरी सुध्दा मला या बिलावर बोलण्याचा अधिकार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, परवा जो वर्कशॉप झाला त्यामध्ये सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्यासारख्या वजनदार मंत्रिमहोदयांची सादरीकरणाची क्षमता, विरोधी पक्षाबाबत त्यांचा असलेला ॲप्रोच तसेच हे बिल पास व्हावयास पाहिजे याबाबतची त्यांची कळकळ यासाठी त्यांनी त्या सादरीकरणचा उपयोग केला. सगळ्या बिलांच्या बाबतीत तसे होईल असे नाही. सिलेक्ट कमिटीमध्ये झालेली चर्चा महत्वाची असते. सिलेक्ट कमिटीमध्ये दोन्ही सदनाचे सन्माननीय सदस्य असतात. त्या कमिटीमध्ये माननीय मंत्रिमहोदय तसेच मंत्रालयाचे, विधिमंडळाचे अधिकारी असतात. त्या कमिटीमध्ये चर्चा करुन प्रत्येक शब्दाच्या बाबतीत चिकित्सा केली जाते. त्या कायद्याबाबतची काय चर्चा झाली याबाबत मिनिट्स तयार केले जाते. आक्षेप घेत असताना प्रत्येक शब्दामागची भूमिका काय आहे हे त्या ठिकाणी नोंदवले जाते. सिलेक्ट कमिटी ही महत्वाची कमिटी आहे. सिलेक्ट कमिटीकडे विधेयक पाठवले होते. त्या कमिटीने ज्या सूचना केलेल्या होत्या त्या यामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत काय ? हे समजले पाहिजे. सभागृहात चर्चा करुन काही त्रुटी असतील तर त्या समजवून घेतल्या पाहिजेत. एकदा सिलेक्ट कमिटीमध्ये चर्चा झालेली आहे. परवा जो वर्कशॉप झाला ते काही रेकॉर्ड नाही. ज्यावेळी एखादा महत्वाचा कायदा सदनामध्ये पास होत असतो त्यावेळी तो कायदा महाराष्ट्राच्या जनजीवनावर परिणाम करणारा असेल तर सिलेक्ट कमिटीकडे पाठवला पाहिजे. कायदा पास होण्यासाठी महिना दोन महिने उशीर झाला तरी चालेल परंतु चांगले बिल तयार झाले पाहिजे. आपण सद्शील बुध्दीने हे केले आहे. हे बिल सिलेक्ट कमिटीकडे गेले असते तर कदाचित ते नीट झाले असते. सभापती महोदय, आपण वर्कशॉपचा रेफरंस दिला म्हणून मी हे बोललो. या गोष्टी रेकॉर्डवर येणे महत्वाचे आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विधेयकाच्या खंड 3 मध्ये जी उद्दिष्टे दिलेली आहेत त्यामध्ये "उच्च व तंत्र शिक्षण या विषयामधील शिक्षण, अध्यापन व प्रशिक्षण देणे, तसेच संशोधनासाठी तरतूद करणे" असा उल्लेख केलेला आहे. ही व्हेग टर्मिनॉलॉजी आहे. याची व्याप्ती फार मोठी आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी सांगितले की, ठराविक अभ्यासक्रमासाठी हे आहे. यामध्ये बी.ए., बी.कॉम. यासारखे अभ्यासक्रम नसतील. यापेक्षा वेगळे अभ्यासक्रम यामध्ये असतील. असे अभ्यासक्रम यामध्ये सूचवू इच्छित आहेत. याच खडामध्ये पुढे "उच्च प्रतीची बौध्दिक क्षमता निर्माण करणे" असा उल्लेख केलेला आहे. उच्च प्रतीची बौध्दिक क्षमता तयार करावयाची असेल तर त्याचे इन्फ्रॉस्ट्रक्चर सुध्दा तेवढेच बौध्दिक पाहिजे. या विधेयकामध्ये खंड 4 मध्ये "या अधिनियमान्वये स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्यास इच्छुक असलेले कोणतेही प्रायोजक मंडळ ( शैक्षणिक कार्यक्रम चालविणारी केणतीही संस्था धरुन )" असा उल्लेख केलेला आहे. ही अर्हता आहे काय ? एका ठिकाणी आपण सांगत आहात की, सुपर स्पेशालिटीच्या माध्यमातून एखादी गोष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहोत. उदा. कोणी एमबीए झालेला असेल त्याला फायनान्समध्ये काही करावयाचे असेल, इंडस्ट्रीयल मॅनेजमेंटमध्ये काही करावयाचे असेल तर त्यासाठी सक्षम प्रायोजक मंडळ असावयास नको काय ? एका छत्राखाली अनेक संस्था सुरु करण्याची परवानगी देणार नाही असे आपण म्हटले आहे. ठराविक कोर्सपुरते हे आहे असे आपण म्हटले आहे. त्याबाबत या बिलामध्ये स्पेसिफिक तरतूद करावयास नको काय ? या कोर्समध्ये जे प्रायोजक मंडळ आहेत त्यांचा अनुभव काय आहे ? त्यांची सँटीटी काय आहे ? अशा प्रकारची कोणतीही तरतूद या विधेयकामध्ये केलेली नाही. खंड 3 मध्ये " शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करणे" अस उल्लख केला आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 15:10

(डॉ. दीपक सावंत...)

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 4 वर "(पाच) जमिनीची उपलब्धता तसेच तीवर इमारती व पायाभूत सुविधा आधीपासून अस्तित्वात असल्यास, त्याचा तपशील" असे म्हटलेले आहे. तसेच यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी असल्यास, अशी शब्द रचना केलेली आहे. अशा प्रकारची "जर तर" ची भाषा विधेयकामध्ये वापरणे संयुक्तिक आहे काय, याबाबत थोडे मार्गदर्शन झाले तर बरे होईल. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, इमारती, पायाभूत सुविधा या गोष्टी उपलब्ध झाल्यानंतर अशा विद्यापीठास परवानगी देण्यात येणार आहे काय ? अशा प्रकारच्या सुविधा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचे रजिस्ट्रेशन होणार आहे काय ? पृ.क्र. 4वरील मुद्दा क्रमांक (चार)मध्ये "विद्यापीठाची उद्दिष्टे" असा शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, मला हे सांगितले पाहिजे आपल्याकडे संशोधन आणि विकास कोठेही होत नाही. महाराष्ट्र राज्यामध्ये रिसर्च डिपार्टमेंट आहे पण त्यामध्ये एका पैशाचाही विकास झालेला नाही. माननीय मंत्री महोदयांकडे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन हे खाते आहे. त्यांच्याबद्दल मला आदर आहे. त्यांनी मला हे सांगावे की, आपल्या संशोधन विभागामध्ये, सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये कोणत्या प्रकारचे संधोधन झालेले आहे ? एखादी तरी लस आपण शोधून काढलेली आहे काय ? लसीच्या बाबतीत आपण हाफकीन इन्स्टिटयूटवर अवलंबून आहोत. विधेयकातील अशा प्रकारच्या त्रुटीमुळे या विधेयकाला पाठिंबा देण्यासंबंधीचा प्रश्न निर्माण होतो. या विधेयकामध्ये व्हेग टर्मिनॉलॉजी वापरण्यात आलेली आहे. म्हणून अशा विधेयकाच्या बाबतीत सर्वंकष विचार होण्याची आवश्यकता आहे. मघाशी माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी सांगितल्या प्रमाणे संयुक्त समितीमध्ये उपस्थित झालेल्या मुद्यांचा या विधेयकामध्ये कोठेही अंतर्भाव करण्यात आलेला नाही. विधेयकाच्या पृ.क्र. 3 वरील "(ज)" मुद्यामध्ये "परीक्षांच्या आधारे किंवा मूल्यमापनाच्या अन्य कोणत्याही पध्दतीच्या आधारे पदव्या," असे म्हटलेले आहे. या पदव्या देताना आपण कोणते निकष लावणार आहात ? "परीक्षांच्या आधारे किंवा मूल्यमापनाच्या आधारे" याचा नेमका अर्थ काय होतो ? "परीक्षांच्या आधारे किंवा मूल्यमापनाच्या अन्य कोणत्याही पध्दतीच्या आधारे पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी देण्याचे सुरु करणे" अशा प्रकारची तरतूद विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे. याचा अर्थ आपण पदव्या देण्याचे कारखाने या राज्यात काढणार आहोत ? पदव्या, पदविका, प्रमाणपत्र देण्याचे कारखाने आपण काढणार असल्यामुळे या विधेयकाला कोणत्याही प्रकारची सँक्टीटी नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

अशा प्रकारचे हे विधेयक आम्ही पास करावयाचे काय, असा प्रश्न आमच्या समोर आहे. विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 10 वरील खंड 15 मध्ये प्र-कुलपती हा विद्यापीठाचा प्रमुख असेल असे म्हटलेले आहे. परंतु या प्र-कुलपतीचे बेसिक क्लॉलिफिकेशन काय असावे यासंबंधीचा उल्लेख या विधेयकामध्ये नाही. संयुक्त समितीमध्ये या प्र-कुलपतीच्या क्लॉलिफिकेशनच्या मुद्यावर चर्चा झालेली होती. प्र-कुलपतीचे क्लॉलिफिकेशन काय असावे हे ठरविले गेले पाहिजे. प्र-कुलपती हा विद्यापीठाचा प्रमुख असेल असे म्हटलेले आहे. दीक्षांत समारंभाच्या वेळी या प्र-कुलपतीच्या हस्ते पदवीदान समारंभ होतो. मग याचे बेसिक क्वालिफिकेशन काय असावयास पाहिजे यासंबंधीची तरतूद करावयास नको काय ? म्हणून हे अतिशय व्हेग अशा प्रकारचे विधेयक आहे.

सभापती महोदय, छत्तीसगड राज्याच्या शासनाने काढलेल्या राय युनिव्हर्सिटीचे पेपर्स माझ्याकडे आहेत. या युनिव्हर्सिटीचे 1300 विद्यार्थी आज रस्त्यावर आलेले आहेत. त्यांनी राज्य शासनाला अनेक विनंत्या केल्या, माननीय राष्ट्रपतींना देखील त्यांनी लिहिले. परंतु त्या 1300 विद्यार्थ्यांना नयाय मिळाला नाही. या महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारची युनिव्हर्सिटी का आली ? ही राय युनिव्हर्सिटी नवी मुंबईमध्ये आली.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ 15:15

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, Rai University was established in Maharashtra in 2003. 2003 साली सुरु झाले आणि 2006 मध्ये विद्यापीठ बंद पडले. या विद्यापीठात 1300 विद्यार्थी होते ते आज रस्त्यावर आले आहेत. या युनिव्हर्सिटीमध्ये कोणकोणते कोर्सेस होते याचे मी उदा. देतो B.A. in Interior Design, Diploma in Architectural Design, B.A. in Fashion Designing & Animation. हे विद्यापीठ affiliated नव्हते किंवा ऐआयसीटीची मान्यता नव्हती. मला माहीत आहे की उत्तर देताना मंत्रीमहोदय सांगतील की अशा प्रकारचे कोर्सेस सुरु करणार नाही मग काय करणार याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सुपर स्पेशॅलिटी म्हणजे नेमके काय ? Whether you are going to give admission to post graduate students or HSC students? याचे उत्तर येणे आवश्यक आहे. राय युनिव्हर्सिटी मधील 1300 मुले आज रस्त्यावर आहेत. अनेक पत्रे त्यांनी लिहिले आपण ती मान्य केलेली नाहीत. मुंबई युनिव्हर्सिटीकडे affiliate करणार आहात काय ? अशा प्रकारचे विद्यापीठ काढण्यासाठी एखादी युनिव्हर्सिटी अगतिक झाली आणि अचानक बंद पडली तर त्या विद्यार्थ्यांचे काय ? याचे प्रावधान या बिलामध्ये दिसून येत नाही. या विधेयकामध्ये आपण काय म्हटले आहे याचा विचार केला पाहिजे. एखाद्या विद्यार्थ्याने आपल्या विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला आणि जर त्याला कोर्स पसंत पडला नाही आणि त्या विद्यार्थ्याला परत जायचे असेल तर तशा प्रकारची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आलेली नाही. राय युनिव्हर्सिटीने 19 स्टडी सेंटर्स काढली अशा प्रकारची परवानगी आपण देणार काय ? पठाणकोट,दिल्ली,बंगलोर,कोचिन इ. ठिकाणी सेंटर्स काढली. या विद्यापीठाची व्याप्ती नेमकी किती आहे ? We are inviting unwarranted trouble. हे बिल परिपूर्ण नाही. म्हणून हे बिल पुन्हा संयुक्त चिकित्सा समितीकडे जाणे आवश्यक आहे. एकेका शब्दाबद्दल दोन-अडीच तास बोलता येईल इतक्या त्रुटी यामध्ये आहेत. सभापती महोदय, इतका वेळ बोलण्याची आपण मला परवानगी देणार नाही याची मला कल्पना आहे...

**तालिका सभापती** : काल सभागृहाचे कामकाज रात्री 10.30 वाजेपर्यंत सुरु होते. आज आणि उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. बिलावर किती वेळ माननीय सदस्य बोलू शकतात हे मला माहीत आहे. परंतु बिलावर बोलत असताना सभागृहाचे दैनंदिन कामकाज देखील पाहिले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण मार्गदर्शन केल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. सभागृहाची जी दिवसाची कामकाजपत्रिका येते ती माननीय सभापतींच्या निदेशाने येते. सरकारने गेल्या तीन आठवडयामध्ये एकही बिल मांडले नाही. आता बिल मांडून पास करणे म्हणजे "चटावरचे श्राध्द उरकण्यासारखे" आहे. अशा प्रकारचे सभागृहाचे कामकाज चालणार असेल तर ते बरोबर होणार नाही. प्रत्येक बिलावर बोलण्याचा आमचा अधिकार आहे. इतर विषयावर बोलण्याबाबत आम्ही समजू शकतो. परंतु बिलावर मत मांडण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. कायदा व्यवस्थित होतो किंवा नाही हे पाहण्याचा आणि तो अधिकार बजावता आला पाहिजे. तसे पाहिले तर आम्ही कितीही वेळ बिलावर बोलू शकतो. याचा अर्थ आम्ही बोलावे असा नाही.

या नंतर श्री. ओटवणेकर-

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

विधेयकावर विचार मांडण्यासाठी सन्माननीय सदस्यांना पूर्णपणे मुभा असते. या सदनामध्ये चटावरील श्राद्ध उकरतात त्याप्रमाणे कामकाज उरकले जाते. त्यामुळे आता आम्ही या बिलावर बोलण्याचा निर्धार केला आहे. जे साधे बिल असते, ते आम्ही दोन मिनिटांमध्ये मंजूर करून देतो. मी येथे एक गोष्ट सांगू इच्छितो की, नागपूर अधिवेशनात मंजूर झालेली बिले सुरूवातीला सभागृहाच्या पटलावर का मांडण्यात आली नाहीत ? तेव्हा सरकारच्या मानसिकतेबद्दल आपण तंबी द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने एक महत्त्वाचा निर्णय दिलेला आहे. या निर्णयात असे म्हटले आहे की, "No court or no judges have any authority or right to find the meaning, to find the definition to get meaning on its' own conscience. Law making is not the authority of judges. It is the sole responsibility of the legislators and the legislators after full thought and debate make law. Hence, no court or judges have any authority to make law.

**The Panel Chairman(Shri Gurunath Kulkanri)**: That is the very function of the Legislature.

श्री.श्रीकांत जोशी: आपण वकील आहात. माझ्या पेक्षा आपल्याला कायद्याचे ज्ञान जास्त आहे.

**तालिका सभापती**: अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसांमध्ये भरपूर विधेयके चर्चेला येतात. सदर विधेयके वेळेत मंजूर होण्याच्या दृष्टीने कोणती पध्दती अवलंबिता येईल याचा विचार केला पाहिजे. हे जर आपण सिस्टीमेटीकली केली तर मला वाटते काहीही अडचण येणार नाही.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सदर बिल हे अधिवेशन सुरू झाल्यानंतर दुसऱ्या आठवडयातील पहिल्या दिवसामध्येच कार्यक्रम पत्रिकेवर दाखविले होते.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, पुढच्या अधिवेशनापासून काही तरी नवीन पध्दती सुरू केली पाहिजे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** :  यापुढे विधेयकासंबंधी अडचण येऊ नये म्हणून पुढच्या अधिवेशनापासून पहिल्या दिवसांपासून रोज एक विधेयक घेण्याचे नियोजन केले पाहिजे.  रोज एक विधेयक मंजूर केले तर आपले कामकाजही व्यवस्थित पूर्ण होईल. त्यामुळे आपल्याला शेवटच्या एक-दोन दिवसांमध्ये घाईघाईने विधेयक मंजूर करून घ्यावे लागणार नाही.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, विद्यापीठ स्वयं अर्थ सहाय्यितासंबंधीची व्याख्या पान क्र.9 वरील खंड 9 मध्ये देण्यात आली आहे. तत्पूर्वी मी शैक्षणिक अर्हतेविषयीचा मुद्दा मांडला होता. प्रायोजक मंडळ विद्यापीठासाठी दाननिधीची स्थापना करण्यात येणार आहे. हे विद्यापीठ मुंबई किंवा मुंबई उपनगर जिल्हयामध्ये स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी दाननिधी हा पाच कोटी रुपये इतका आहे. एवढा व्हाईट पैसा कुठल्या संस्थेकडे असेल ? माझ्या माहिती प्रमाणे हाताच्या बोटावर अशा संस्था असतील की, त्यांच्याकडे व्हाईट मनी असेल. म्हणजे हे विद्यापीठ धनदांडग्यांसाठी आहे, असे ध्वनित होते. निधी जमविण्यासाठी तीन नियम करण्यात आले आहेत. खंड 11 (क) मध्ये विद्यापीठाला प्राप्त झालेली फी व इतर शुल्के असे नमूद केले आहे. तर 11 (ख) मध्ये प्रायोजक मंडळाने दिलेली कोणतेही अंशदान किंवा प्राप्त झालेली कोणतीही देगणी किंवा दान असे नमूद करण्यात आले आहे. पुढे खंड 11 (ग) मध्ये असे नमूद केले आहे की, इतर कोणत्याही मार्गाने मिळणारे उत्पन्न. म्हणजे या तरतुदीनुसार संस्था चालक इतर कोणताही मार्ग चोखाळण्यासाठी मोकळा आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 15:25

डॉ.दीपक सावंत....

You are inviting corruption. असा याचा सरळसरळ अर्थ होत आहे. हे उत्पन्न कोणत्या मार्गाने मिळवावे यासाठी संस्था चालकांना किंवा प्रायोजक मंडळांना उपदेशाचे डोस पाजले पाहिजेत. पान क्र.6 वर (क) मध्ये "प्रायोजिक मंडळाची आर्थिक सुस्थिती आणि मत्ता तसेच प्रस्ताविक विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्या मंडळाकडे असलेली क्षमता" असा उल्लेख आहे. मग ही क्षमता 5 कोटी रुपये करुन आपणास त्यांना द्यावयाची आहे काय ? तसेच पुढे (ख) मध्ये असाही उल्लेख आहे की, "प्रायोजक मंडळाची पार्श्वभूमी, म्हणजेच शिक्षण क्षेत्रातील मंडळाची विशेष तज्ञता व अनुभव, त्याचा सर्वसाधारण लौकिक इत्यादी आणि विनियामक मंडळाची मानके अनुसरण्यासंबंधातील त्यांची बांधीलकी" : असे जर आपण म्हटले असेल तर, अशा प्रकारची प्रायोजक मंडळे आपल्याकडे आली आणि पेपरवर त्यांनी दाखविले की, आम्ही या विषयातील तज्ज्ञ आहोत, आम्हाला अनुभव आहे, आमचा लौकिक आहे, त्यामुळे प्रायोजक मंडळामध्ये आम्ही बसतो. मग त्यांचे रजिस्ट्रेशन करण्याबाबत आपल्याकडे कोणता कायदा अस्तित्वात आहे ? याबाबत कसलाही उल्लेख विधेयकामध्ये नाही.

महोदय, "कुलसचिव" हे विद्यापीठाचे प्रमुख अंग असते. महाराष्ट्र आरोग्य विद्यान विद्यापीठामध्ये काय प्रकार झाला हे आपण सर्वच जाणतो. कुलसचिव पद निर्माण करीत असताना, त्या व्यक्तीचा शैक्षणिक अनुभव विचारात घेणे आवश्यक आहे. कुलसचिव पूर्ण कालीक वेतनी अधिकारी असेल तर त्याचे कामाकडे किती लक्ष असेल ? कुलसचिव हा प्रत्येक विद्यापीठाचा गाभा असतो, आत्मा असतो. कुलसचिव चांगला असेल तर विद्यापीठ चांगले असते. याबाबत आपण सर्व सहमत असाल. पुढे आपण असेही म्हटले आहे की, "कुलसचिव हा विद्यापीठाच्या अभिलेखांच्या, सामाईक मुद्रेच्या आणि कार्यकारी समिती त्याच्या सुपूर्द करील अशा, विद्यापीठाच्या इतर मालमत्तेच्या अभिरक्षेसाठी जबाबदार असेल". म्हणजे नेमके काय ? याचे विवेचन माननीय मंत्री महोदयांच्या भाषणातून व्हावे.

फी रचनेच्या संदर्भात खंड 38 मध्ये असे म्हटले आहे की, "विद्यापीठाने चालविलेल्या अभ्यासक्रमांसाठी, विद्यापीठाकडून वेळोवेळी, फीची रचना निधारित करण्यात येईल. तथापि

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.

होईपर्यंत लागू असेल." हे चांगले आहे. परंतु ही फी ठरविण्यासाठी एक समिती असणे आवश्यक आहे. कारण आपण बघतोच की, प्रायव्हेट मेडिकल कॉलेजसमध्ये कशा प्रकारे 2 लाख, 3 लाख रुपये फी घेतली जाते. अद्यापही त्या विद्यार्थ्यांचा पैसा त्यांना परत मिळत नाही. त्यामुळे या अनुभवातून आपण शहाणपण घेऊन, ठराविक फी ठरवून देणे आवश्यक आहे. कमीत कमी इतकी फी आणि जास्तीत जास्त इतकी फी घ्यावयास पाहिजे याबाबत विचार होणे आवश्यक आहे.

महोदय, खंड 39 मध्ये "महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, 1987 याचा विद्यापीठाने किंवा त्याच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याने केलेली कॅपिटेशन फीची मागणी किंवा वसुली यांच्याशी संबंध असेल तेथवर, त्याच्या तरतुदी या अधिनियमाअन्वये स्थापन केलेल्या विद्यापीठाला जणू काही ते विद्यापीठ, शैक्षणिक परिसंस्था किंवा उक्त अधिनियमाच्या कलम 2 च्या खंड (ब) च्या यथांतर्गत संस्था असल्याप्रमाणे, लागू होती" असा उल्लेख आहे. महोदय, यामध्ये विसंगती आहे. केवळ श्रीमंतांच्याच मुलांनी शिकावयाचे आणि गरीबांच्या मुलांनी आहे त्याच ठिकाणी राहावयाचे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? मागासवर्गीयांसाठी शिक्षण देत असताना, त्याला वर्षाला भराव्या लागणाऱ्या फी मध्ये सूट देत नाही. आर्थिकदृष्टया जे मागासवर्गीय आहेत त्यांनाही आपण सवलती लागू करावी असे मला वाटते. माननीय मंत्री महोदयांनी उदाहरण देतांना सांगितले की, ..........

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ MHM/ KGS यापूर्वी श्री. बोर्डे .. 15.30

डॉ. दीपक सावंत ....

अमेरिकेमध्ये तो मुलगा जर पैशाअभावी जाऊ शकला नाही तर त्याला मुंबईमध्ये किंवा महाराष्ट्रात कोठेही शिक्षण घेता येईल. आपण जर अशाप्रकारे फी ची रचना करणार असाल तर त्याला ही फी परवडणार कशी ? कदाचित अमेरिकेतील फी कमी असेल आणि महाराष्ट्रातील फी जास्त असेल. परदेशात एखादा विद्यार्थी पार्ट टाईम जॉब करुन शिक्षण घेऊ शकतो. या संदर्भातील धोरणासंदर्भात मी आपल्याला असे सांगतो की, आपण फी ची रचना आपल्याकडेच ठेवा. आपण सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार जी समितीची रचना केलेली आहे ती अतिशय योग्य आहे. कारण त्यांवर अंकुश असायलाच पाहिजे. विद्यापीठ अनुदान आयोग व ए.आय.सी.टी. ह्या दोन्ही जरी ॲपेक्स बॉडीज असल्या तरी राज्य सरकारच्या मॉनिटरिंग एजन्सीज याला आवश्यक आहे. म्हणजे ॲडमिशनचा, आरक्षणाचा, फी चा जो गोंधळ होतो तो थांबेल. या संदर्भातील सर्व अधिकार राज्य शासनाने आपल्याकडे ठेवण्याची आवश्यकता आहे. निदान क्वॉलिटी मेंटेनन्स संदर्भात तरी नियम करुन घेतले पाहिजेत. धनदांडग्यांना नजरेसमोर न ठेवता सामान्य विद्यार्थ्याला नजरेसमोर ठेवून या संदर्भातील निर्णय झाले पाहिजेत. एखादा विद्यार्थी सुपरस्पेशॅलिटीचे शिक्षण घेत आहे असे मानून आपण एक नियमावली तयार करा आणि मॉनिटरींग बॉडीला त्या संदर्भातील अधिकार द्या. मी या संदर्भात आपल्याला रॉय युनिव्हर्सिटीचे उहदाण देतो. आज 1300 विद्यार्थी रस्त्यावर आलेले आहेत, त्यांचे आपण काय करणार आहात ? हेही सांगणे गरजेचे आहे. आपण हात झ टकून चालणार नाही. आपण जर हात झटकले तर उद्या हेच करणार हे आम्हाला यातून ध्वनित होत आहे. उद्या जर एखादे विद्यापीठ सुप्रिम कोर्टाने सांगितले की, बंद करा तर त्या विद्यार्थ्यांचे काय होणार ? यासाठी तुम्ही स्पिअर ऑफ ॲक्शन नक्की करुन घ्यावे. येणाऱ्या विद्यापीठाला संबंधित विषयापुरतीच परवानगी द्यावी. जर इकोनॉमिक्समध्ये सुपरस्पेशॅलिटी करणार असेल तर तेच कॉलेज काढण्याची परवानगी द्यावी, जसे यु.के. आणि यु.एस.ए.मध्ये आहे. एका छत्राखाली अनेक युनिव्हर्सिटी असे करत असतील तर त्यांना तसे करु देऊ नका. वेळ लागला तरी चालेल, परंतु एक चांगले विधेयक येणे आवश्यक आहे. ग्लोबलायझेशनच्या बरोबर

..2

डॉ. दीपक सावंत ....

पावले टाकून चालणे जरुर आवश्यक आहे, आम्ही याच्या विरोधात नाही. पण कोणीतरी काहीतरी करते म्हणून आम्ही देखील तसे करणे योग्य नाही. सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवून यावर सांगोपांग विचार करुन ठरल्याप्रमाणे बदल करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

----

..3

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने अत्यंत चांगले असे सेल्फ फायनान्स युनिव्हर्सिटीसंबंधी विधेयक आणले आहे, त्याचे मी स्वागत करतो. गरीब व मागासलेल्या माणसांना न्याय देण्याची भूमिका सातत्याने महाराष्ट्राची राहिलेली आहे. विदर्भामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी, सामान्य, गरीब माणसांकरिता जास्तीत जास्त शिक्षणाची दालने उघडण्याची भूमिका घेतली. विदर्भामध्ये शिक्षणाचे संपूर्ण जाळे पसरविण्यापाठीमागे तेच आहेत.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे....

आज या महाराष्ट्रामध्ये आपण जे शिक्षण देत आहेत, त्या शिक्षणामध्ये उच्च व तंत्रशिक्षण आहे. ते तंत्रशिक्षण या महाराष्ट्रामधील, देशामधील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर आणण्यासाठी दिले गेले पाहिजे. जगामध्ये जे विकसनशील व विकसीत देश आहेत त्यांच्याकडे जशी विद्यापीठे आहेत त्याप्रमाणे या महाराष्ट्रामध्ये विद्यापीठे स्थापन झाली पाहिजेत. जागतिक स्पर्धेला तोंड देण्यासाठी आपण तयार असतो पाहिजे. शासनाची ही भूमिका चांगली आहे. या विधेयकांवर बोलतांना माझ्या काही सहकाऱ्यांनी अशी भीती व्यक्त केली आहे की, या विद्यापीठांमध्ये धनदांडग्यांच्या मुलांनाच शिक्षण मिळेल, गरीबांच्या मुलांना शिक्षण मिळणार नाही, गरीब माणसाला न्याय मिळाला पाहिजे, यासंदर्भातील पारदर्शक निर्णय शासनाने घ्यावयास पाहिजे. त्यांच्यादृष्टीने कायद्यामध्ये वेगळी कलमे टाकावयास पाहिजेत. आज आपण पाहत आहोत की जी शिक्षण व्यवस्था आहे, त्या शिक्षण व्यवस्थेच्या संदर्भात माझा स्वत:चा अनुभव आहे., माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी जे विधेयक आणलेले आहे ते अतिशय चांगला आहे. यामध्ये मागासलेल्या माणसावर अन्याय होणार नाही, ओबीसी माणसांवर अन्याय होणार, त्यांना न्याय देण्याची भूमिका शासनाची असावयास पाहिजे. कायद्याच्या त्रुटीमुळे या गोष्टी होऊ शकत नाहीत. आज राज्यामध्ये उच्च व तंत्रशिक्षणाची काही दालने उघडलेली आहेत. त्यावर काही सल्लागार नेमलेले आहेत. काही लोकांनी त्यावर उद्योजकांना अध्यक्ष म्हणून निवडलेले आहेत. पण कायदा कमी पडत असल्यामुळे मागासवर्गीय माणसांवर व निरपराध माणसांवर अन्याय होत असेल तर त्याची दखल शासनाने घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात मला अनुभव आलेला आहे. यासंदर्भातील जाणीव मंत्री महोदयांना आहे. धनदांडग्यांच्या हातात ही विद्यापीठे देऊन या राज्यामध्ये गरीब माणसांवर कोठे अन्याय होत असेल तर तो कोठे तरी रोखला गेला पाहिजे. त्यासाठी कोणताही कायदा पारदर्शक असावयास पाहिजे. या विद्यापीठाची स्थापना करतांना आपण 5 कोटी रुपये डिपॉझिट ठेवावे अशी अट घातलेली आहे. या राज्यामध्ये जे मोठे व्यावसायिक आहेत तेच लोक 5 कोटी रुपये देऊ शकतील. जे आर्थिक दृष्टया दुर्बल आहेत, मागासलेले आहेत, त्यांच्यामध्ये काही एक्सपर्ट आहेत, तज्ज्ञ आहेत, असे जर 10-15 लोक एकत्र आले आणि त्यांनी जर स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन्याचा प्रस्ताव दिला

......2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) RR-1

श्री. सुधाकर गणगणे....

तर त्या प्रस्तावाबाबत आपण काय विचार करणार, कारण ते मागासलेले असल्यामुळे, गरीब असल्यामुळे 5 कोटी रुपयांचे डिपॉझिट देऊ शकणार नाहीत. मग त्या तज्ज्ञांना आपण अनुदान देणार काय ? या दृष्टीने सुध्दा विधेयकामध्ये विचार होण्याची आवश्यकता आहे ? त्यांना अनुदान देण्याचे काम शासनाकडून झाले पाहिजे. असे मला येथे सूचवावयाचे आहे.

यानंतर श्री. सरफरे...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे...

आणि जर ते कुठे चुकत असतील तर त्यांच्या बाबतीत आपण वेगळी भूमिका घ्यावी. विद्यापीठाला काळिमा लावण्याचे काम त्यांच्याकडून होत असेल तर त्यांना बाजूला काढण्याचे काम शासनाने केले पाहिजे व ती काळाची गरज आहे. देशाच्या पातळीवरील आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ आपल्या महाराष्ट्रात आहेत. परंतु निधीच्या अभावी ते या क्षेत्रामध्ये झेप घेऊ शकत नाहीत त्यांना आपण सामाजिक न्याय मिळवून दिला पाहिजे. मागासलेल्या समाजातील,आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाजातील या क्षेत्रातील एक्सपर्ट 5-10 माणसे एकत्र येऊन अशाप्रकारचा खाजगी विद्यापीठ उघडण्याचा प्रस्ताव शासनाकडे देत असतील तर वेळ पडल्यास शासनाने त्यांना अनुदान देण्याचे किंवा बँक गॅरंटी उपलब्ध करुन देण्याचे काम करावे. या विद्यापीठासाठी बनविण्यात येणारे कायदे पारदर्शक असले पाहिजे. यामध्ये जे उद्योजक येतील त्यांच्यावर कशाप्रकारे नियंत्रण राहील, अंकुश राहील यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. जागतिक स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी महाराष्ट्रामध्ये विद्यापीठांची निर्मिती झाली पाहिजे यासंबंधात माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी आणलेल्या विधेयकाचे स्वागत करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, खाजगी विद्यापीठांना मान्यता देण्यासंबंधीचे विधेयक माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांनी सभागृहामध्ये मांडले आहे ते आवश्यक आहे असे मला वाटते. परंतु आपण पहातो की, 1950 सालापासून विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये प्रचंढ वाढ झाल्याचे दिसून येते. त्या तुलनेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या देखील वाढल्याचे दिसून येते. एकूण विद्यार्थी संख्या पाहिल्यानंतर विद्यापीठाच्या उंबरठयावर राहून 60 टक्के विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ शकतात. या पार्श्वभूमीवर खाजगी विद्यापीठांची नक्कीच आवश्यकता आहे. परंतु या विधेयकामध्ये अनेक त्रुटी असल्यामुळे त्याचे पुढे दुष्परिणाम भोगावे लागणार आहेत. त्यामुळे समाजामध्ये उच्च शिक्षणाचा बाजार भरु शकेल. विद्यापीठ स्थापन करण्यासाठी किती जागा आवश्यक आहे, त्या ठिकाणी अभ्यासक्रम निहाय कोणत्या सुविधा असल्या पाहिजेत याचे निकष असले पाहिजेत. परंतु ते निकष शासनाने जाहीर केले नाही. अर्जदार संस्थेने आपला प्रकल्प आराखडा तयार केल्यानंतर त्या संस्थेची पहाणी करुन त्या आराखडयाला मंजूरी देण्यात आली पाहिजे तशाप्रकारची तरतूद यामध्ये दिसत नाही. छत्तीसगड राज्यामध्ये अशाप्रकारची खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यात आली. परंतु त्याठिकाणी गैरवापर झाल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने त्या राज्यातील 100 विद्यापीठे घटनाबाहय असल्याचे ठरविले. त्यामध्ये राय, मंगलमय या विद्यापीठांचा समावेश आहे. या खाजगी विद्यापीठांना तेथील कॉंग्रेस विद्यार्थी संघटनेचा विरोध असल्याचे दिसून येते. त्यांचे असे म्हणणे आहे की, खाजगी विद्यापीठ उघडणारे लोक हे पूर्णपणे व्यावसायिक आहेत. दिवसेंदिवस शिक्षण खूप महाग होत जाणार आहे, आणि त्याला विद्यार्थी वंचित रहाणार आहेत अशी भीती निर्माण झाली आहे. विधेयकाच्या पृष्ठ क्र. 8 वर "प्रत्येक विद्यापीठ, विद्यापीठाला प्राप्त झालेली फी व इतर शुल्के, प्रायोजक मंडळाने दिलेले कोणतेही अंशदान किंवा प्राप्त झालेली कोणतीही देणगी किंवा दान, आणि इतर कोणत्याही मार्गाने मिळणारे उत्पन यांचा अंतर्भाव असलेला, सर्वसाधारण निधी म्हणून संबोधण्यात येणारा, निधीदेखील स्थापन करील"

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अभ्यासार्थ प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (पुढे सुरु...

यावरुन असे लक्षात येते की, केवळ पैसे खाणारी खाजगी विद्यापीठे निर्माण होणार आहेत की काय, अशी भीती समाजामध्ये वाटायला लागलेली आहे. उद्योगधंद्याचे साधन म्हणजे शिक्षण हे ठरु पहाते. त्यामुळे जागोजागी पैशाला पासरी सारखी खाजगी विद्यापीठे शहरामध्ये तयार होतील की काय ? अशी भीती वाटायला लागलेली आहे. शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांना आणि पालकांना लुटायला सुरुवात होईल की काय, अशीही शंका येते. त्यामुळे खाजगी विद्यापीठांना परवानगी देताना अनेक गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे. या विद्यापीठांचा मुखडा कसा असणार आहे ? हे स्पष्ट झाले पाहिजे. या विद्यापीठांना परवानगी देण्यासाठी एक समिती तयार केली पाहिजे. त्यामध्ये मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीचा समावेश असावा. शासकीय विद्यापीठ हे बोजड असते, कारण तिची रचनाच क्लिष्ट असते. ती क्लिष्टता या ठिकाणी रहाणार नाही हे पाहिले पहिजे, त्या विद्यापीठाचा दर्जा चांगला असायला पाहिजे, यादृष्टीने अनेक सन्माननीय सदस्यांनी काही गोष्टी सांगितलेल्या आहेत. मला जे वाटले, ते मी सांगितलेले आहे. धन्यवाद.

---

(यानंतर श्रीमती फौजिया खान,वि.प.स यांचे हिंदीतील भाषण.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ विधेयक क्रमांक 10 के ऊपर विचार प्रकट करने के लिए मैं खड़ी हुई हूँ.

सभापति महोदय, आज की जागतिक परिस्थिति के अनुरुप यह अनिवार्य है कि महाराष्ट्र राज्य में इस तरह की प्राईवेट यूनिवर्सिटी स्थापित हों, क्योंकि नेशनल बाउन्ड्री के ऊपर नो एन्ट्री का बोर्ड नहीं हो सकता है. अगर हम अपनी यूनिवर्सिटी स्थापित नहीं करेंगे तो बाहर की यूनिवर्सिटी हमारे पास आएंगी. हमारे देश की परिस्थिति कुछ इस तरह की है कि एक तरफ तो स्पीड से साइंस और टेक्नोलोजी का एडवान्समेंट हो रहा है और उसके साथ कदम से कदम मिलाकर चलना जरुरी है और उसी के साथ हमारे देश में जो पिछड़ा वर्ग है, जो गरीब वर्ग है तो इस बड़े ह्यूमन रिसोर्स को उस एडवान्समेंट की ओर ले जाना जरुरी है. ऐसी हमारी दोहरी परिस्थिति है. एक जमाना ऐसा था जब हर काम आहिस्ते आहिस्ते होता था, लेकिन आज की परिस्थिति बदल चुकी है. आज सेटेलाइट, टी.वी., इन्टरनेट, स्पीड ऑफ प्रोग्रेस का जमाना है और डिवलपिंग कंट्री डिवलप्ड कंट्री बन सकते हैं. जब तक हम डिवलप्ड स्टेट बनने का उद्देश्य अपने सामने नहीं रखते हैं, तब तक हम डिवलपिंग स्टेट ही बने रहेंगे. मैं आपके सामने एक शेर पेश करना चाहती हूँ :

"चाँदी जैसा रुप है तेरा, सोने जैसे बाल,
एक कोई धनवान है गोरी, बाकी सब कंगाल,"

अगर हमें कंगाल ही रहना है, पिछड़ा ही रहना है तो फिर हमारे राज्य में प्राईवेट यूनिवर्सिटी नहीं आनी चाहिए. हमने जो सामाजिक परिस्थिति पिछले 4 हजार साल से देखी है, उसकी तरफ भी ध्यान देना जरुरी है. इसीलिए जब हम प्रोग्रेस की बात करते हैं तो प्राईवेट यूनिवर्सिटी न हो, इस तरह की बात करना कोई अच्छी बात नहीं है. ऐसा मुझे लगता है. मैं आपको एक लड़की की सच्ची कहानी बताना चाहती हूँ. यलो फीवर की वजह से वह एक साल की उम्र में ही विकलांग हो गई थी और उसके पैर पर सपोर्ट लगाया गया. सपोर्ट के बिना वह चल नहीं सकती थी, ऐसा डॉक्टर का कहना था. लेकिन जब वह लड़की 10 साल की हुई तो उसने अपने दिमाग में यह बात निश्चित की कि मैं दुनिया की सब से तेज दौड़ने वाली बनूंगी. उस समय उसने अपने पैर का सपोर्ट निकाल दिया और कोशिश करके चलना शुरु किया. सब ने कहा कि तुम चल नहीं सकती हो, अपना सपोर्ट मत निकालो, लेकिन उस लड़की ने हार नहीं मानी और कहा

.....UU-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान जारी

कि मैं दुनिया की सब से तेज दौड़ने वाली बनूंगी. आहिस्ता आहिस्ता वह लड़की बड़ी मुश्किल से चलने लगी और उसने अपने जीवन की पहली रेस में हिस्सा लिया. यह नैसर्गिक है कि वह लड़की उस रेस में सब से अंतिम स्थान पर रही, लेकिन उसने हिम्मत नहीं हारी और उसने दूसरी रेस में हिस्सा लिया, जिसमें वह फिर से अंतिम स्थान पर रही. वह इस प्रकार से कोशिश करती रही और जब वह 14 साल की थी तो उसने अपनी जिन्दगी की पहली रेस जीती और उसके बाद वह रेस जीतने लगी. मैं इस घटना का लम्बा वर्णन करने की बजाय इतना ही कहना चाहती हूँ कि एक दिन ऐसा आया कि जब उस विकलांग लड़की ने ओलम्पिक की रेस में हिस्सा लिया और वह जीत गई. इस लड़की ने यह नहीं कहा कि ओलम्पिक नहीं होना चाहिए, इस लड़की ने यह नहीं कहा कि दुनिया की प्रोग्रेस रुकनी चाहिए. उसने आगे बढ़ने का काम किया और मैं यही बात अपने समाज और देश के लिए कहना चाहूंगी कि अगर आगे बढ़ने का कोई मोटिव हमारे सामने है तो उसके लिए एक सपोर्ट सिस्टम का होना जरुरी है. लेकिन उसके साथ सोशल मोटीवेशन भी जरुरी है और वह शासन की जिम्मेदारी है, ऐसा मैं समझती हूँ.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ....

इस बारे में भी सोचने की जरुरत है. जहां तक उच्च शिक्षा का सवाल है, आज परिस्थिति ऐसी हो गई है कि पैसे दिए बिना उच्च शिक्षा हासिल नहीं हो सकती है और किसी हद तक हम इस बात को इंकार भी नहीं कर सकते हैं. क्योंकि जैसे इस विधेयक के 3 बी में विद्यापीठ की स्थापना के उद्देश्य के बारे में बताया गया है कि उच्च दर्जे की बौध्दिक क्षमता निर्माण करना इस विद्यापीठ का उद्देश्य है. लेकिन मैं इस संबंध में यह कहना चाहूंगी कि बौध्दिक क्षमता बढ़ाने का काम उच्च शिक्षा से ज्यादा प्राथमिक शिक्षा स्तर पर जरुरी होता है क्योंकि एक इंसान की जिंदगी में 10 वर्ष की उम्र तक 80 प्रतिशत इन्टलेक्च्युअल डेवेलपमेंट होती है. इसलिए आज हमारा प्रायमरी एज्युकेशन किस स्थिति में है और हम किस प्रकार का मेरिट प्रोडयूस कर रहे हैं, इस ओर ध्यान देने की जरुरत है. क्योंकि जब तक मेरिट की बात नहीं होगी तब तक हमारे बच्चे विश्व स्तर पर स्पर्धा करने के लिए तैयार नहीं हो सकते हैं और जब तक हम मेरिट के बच्चे नहीं बना पाते तब तक हम उच्च शिक्षा की बात कैसे कर सकते हैं ? यह स्थिति समुद्र में तैरने की तरह है. तैरने के लिए समुद्र के किनारे पर तैयार है लेकिन तैर कर बीच समुद्र में जाकर खुद को तैरना है. उच्च शिक्षा भी समुद्र की ही तरह है जहां से इंसान को खुद ही तैर कर निकलना है. इसलिए सपोर्ट सिस्टम से ज्यादा मेरिट जरुरी है. इसलिए मैं इस विधेयक का समर्थन करती हूं. महोदय, एक जमाने में तक्षशिला और नालंदा विश्व प्रसिध्द विश्वविद्यालय थे. इन विद्यालयों में विदेश से विद्यार्थी पढ़ने के लिए आते थे. एक अच्छा स्टेण्डर्ड इन विद्यालयों का था. इसलिए अगर इन विद्यापीठों का तक्षशिला एवं नालंदा विद्यालय जैसा स्टेण्डर्ड रहे तो ही उन्हें नैतिक अधिकार है कि विद्यापीठ बनाए. नए नए रिसर्च हो, नये नये कोर्सेस इन विद्यापीठों में हो. क्योंकि आज यह स्थिति है कि हमारा ब्रेन ड्रेन हो रहा है. आज हमारे मेरिट के बच्चे विदेश में पढ़ने के लिए जा रहे हैं, वे बौध्दिक क्षमता रखते हैं और विदेश में जाकर वे अपना मेरिट प्रूव्ह कर रहे हैं. हमारे देश के बच्चे विदेश के बच्चों से बहुत ज्यादा आऊट-स्टेण्डिंग होते हैं. तो उसी प्रकार से इन विद्यापीठों में अच्छी शिक्षा की व्यवस्था हो ताकि अच्छे बच्चे तैयार हो सके. इसलिए हमें बच्चों को मेरिटोरियस बनाने की जरुरत है, ऐसा मैं समझती हूं. इसलिए ये विद्यापीठ यहां पर आने चाहिए. क्योंकि हम प्राईवेट इनवेस्टमेंट को प्रोत्साहन दे रहे हैं और साथ ही साथ अच्छी रिसर्च और अच्छे कोर्स को प्रोत्साहन दे रहे हैं. लेकिन हमारे सामने लोकसंख्या की समस्या है. लोकसंख्या

...2

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) VV -2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

की समस्या को हम भूल नहीं सकते हैं. इसलिए हमें लोकसंख्या की बात को ध्यान में रखकर, मानव संसाधन को साथ में रखकर पावर बनाने का काम करना है. जिस तरह से चायना ने किया है. चायना की लोकसंख्या हमारे देश की लोकसंख्या से ज्यादा है. लेकिन चायना ने मानव संसाधन को साथ में रखकर विकास किया है, अपनी शक्ति बढ़ाई है. इस विधेयक का यह भी उद्देश्य है कि -

"This university does not create hurdles for the education of the under privileged sections of the society or allow mismanagement of any sort, detrimental to the public interest or general education policy of Government;"

सभापति महोदय, अगर हम इस उद्देश्य को इस विधेयक में मेन्शन कर रहे हैं तो वह किस तरह से हो रहा है, यह मुझे इस विधेयक में नहीं दिखाई दे रहा है. क्योंकि अगर हम अण्डर प्रिविलेज सेक्शन की शिक्षा का सवाल युनिवर्सिटी पर छोड़ते हैं कि वे युनिवर्सिटी स्वेच्छा से सामाजिक दायित्व सँभाले, तो शायद वह उद्देश्य पूरा नहीं हो पायेगा. इसलिए कहीं न कहीं इस संबंध में विद्यापीठों पर प्रेशर बनाया जाना जरुरी है इसलिए इस संबंध में मेंडेटरी प्रोवीजन होनी चाहिए, ऐसा मेरा मत है. विकलांग, एस.सी.,एस.टी.,एवं आर्थिक रुप से पिछड़े वर्ग के विद्यार्थी को इन विद्यापीठों में पढ़ने का अधिकार कैसे मिल सकता है, उसके लिए मैं यह सुझाव रख रही हूं.

सभापति महोदय, इसी प्रकार से मैं इन्डोमेंट फंड के संबंध के संबंध में यह बताना चाहती हूं, जैसा कि विधेयक में कहा गया है,

"The sponsoring body shall establish an endowment fund for the university with an amount of five crore rupees in case the university is situated in Mumbai or Mumbai Suburban District and two crore rupees in case the University is situated outside Mumbai or Mumbai Suburban District."

इसके बाद श्री शर्मा ..

असुधारित प्रत/प्राधिकृत नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 10 - राज्यात स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापनाकरण्याची तरतूद करण्यासाठी त्यांच्या कामाकाजाचे व कार्याचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे. हे विधेयक जेव्हा पहिल्यांदा सभागृहासमोर मांडण्यात आले तेव्हा ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यासंबंधीची मी सूचना केली होती व त्यास अनेक सन्माननीय सदस्यांना अनुमोदन दिले.

त्यावेळी माझी सूचना तत्कालीन मंत्री महोदयांनी मान्य केली व हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. त्या समितीमध्ये विधेयकावर चर्चा झाली नाही असे नाही. या विधेयकातील काही तरतुदी काढून टाकाव्या असे आम्ही सांगितले होते. परंतु संयुक्त समितीचा अहवाल येण्यापूर्वीच, संयुक्त समितीकडून हे विधेयक मागे घेतले गेले आणि आमच्या चर्चेच्या अनुषंगाने ज्या गोष्टींवर चर्चा झाली त्या अनुषागाने हे विधेयक या ठिकाणी मांडले गेले आहे. परंतु आम्ही ज्या सूचना केल्या होत्या त्यांचा या विधेयकामध्ये अंतभार्व करण्यात आला नाही असे सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले. त्यामुळे हे विधेयक पुन्हा संयुक्त समितीकडे पाठवावे अशी त्यांनी मागणी केली आहे. हे विधेयक या ठिकाणी येऊ नये असा त्या मागील उद्देश नव्हता, तर त्यावर परिपूर्ण चर्चा व्हावी असा प्रा.बी.टी.देशमुख यांचा उद्देश आहे. महाराष्ट्राची शैक्षणिक दृष्टया प्रगती व्हावी हा त्यांचा उद्देश आहे आणि हे निर्विवाद सत्य आहे. कारण आज ज्यांच्याकडे आर्थिक प्राप्ती आहे, ज्यांची आर्थिक परिस्थिती आहे तीच माणसे शिक्षण घेतात. कंपनी ॲक्टमध्ये तरतूद नसताना, प्रत्येक क्षेत्रात पैसा कसा कमाविता येईल याचा प्रयत्न केला जात आहे. शिक्षणाच्या बाबतीत महत्वाचा निर्णय घ्यावयाचा असेल तर उच्च न्यायालयामध्ये जावे लागते आणि त्या निर्णयानुसार शिक्षण क्षेत्र पुढे जात आहे. लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे यांनी शिक्षण क्षेत्रासाठी स्वत:ला वाहून घेतले होते आणि गुरुकुल परंपरा महाराष्ट्रात निर्माण केली. आपल्याला फायदा व्हावा अशा प्रकारचा विचार त्यांनी त्यावेळी कधीच केला नाही. परंतु आज पैसा कमवावा म्हणून विद्यापीठे, शाळा-कॉलेजेस उघडण्यासाठी शिक्षण क्षेत्रामध्ये पाऊल टाकले जात आहे. परंतु त्यावेळी शिक्षण महर्षींनी आर्थिक फायदा डोळयासमोर ठेऊन शिक्षण क्षेत्रात प्रवेश

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

केला नाही. परंतु आज दुर्दैवाने शिक्षण सम्राट बनण्यासाठी माणसे शिक्षण क्षेत्रात येत आहेत. ते शिक्षण महर्षी होण्यासाठी येत नाहीत. पूर्वी ऋषीमुनी अशी पदवी दिली जात होती. परंतु आज पूर्वीसारखे कोणतेही शिक्षण महर्षी नाहीत, आहेत ते सर्व सहकार महर्षी आहेत. पूर्वी जसे शिक्षण महर्षी होते तसे आज नाहीत.

महोदय, गॅट करारामुळे देशात ही परिस्थिती निर्माण झाल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. त्यामुळे अशा प्रकारची तरतूद करुन, अशा प्रकारच्या संस्था निर्माण करण्याजोगी परिस्थिती देशात निर्माण झाली आहे असे त्यांनी सांगितले. आपल्याकडे ज्या परंपरागत पदव्या होत्या त्या देण्यावर बंधन आले आहे. प्रत्येक ठिकाणी निरनिराळया क्षेत्रातील कॉलेज असतात. परंतु त्या पलिकडे आपली झेप जात नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, कॅम्पस युनिव्हर्सिटी आपण राज्यात आणत आहोत. महोदय, अमेरिकेमध्ये कॅम्पस युनिव्हर्सिटीची परिस्थिती अशी आहे की, आपल्या देशातील मुलगा त्या ठिकाणी जातो. तेथे व्यवसाय करतो आणि आपले पोट भरतो, तसेच दुसऱ्या बाजूला तेथे शिक्षण सुध्दा घेतो. अशा प्रकारे शिक्षण घेणारे आपल्या देशातील अनेक तरुण अमेरिकेमध्ये आहेत. दिवसभर कष्ट करुन ते त्या ठिकाणी शिक्षण घेतात. कॅम्पस युनिव्हर्सिटी आणणार असू तर, आपल्या राज्यात व्यवसाय करुन शिक्षण घेता येईल काय ? कारण आज आपल्या राज्यात व्यवसायच उपलब्ध नाही. आपल्याकडे जे उद्योग आहेत ते बंद होत आहेत. पूर्वी उद्योगाला शासन जमीन द्यायची. 50 वर्षांपूर्वी उद्योगासाठी जमीन दिली गेली. जेणेकरुन, शासनाला त्यातून महसुल मिळेल आणि गरीब मुलांना नोकऱ्या मिळतील.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, उद्योग बंद करणे हाच एक व्यवसाय झालेला आहे. जमिनी विकायच्या आणि व्यवसाय करायचा, परंतु उद्योग करायचा नाही, असे सुरु आहे. उद्योग सुरु केला पाहिजे असे बंधन शासन घालू शकत नाही आणि जमिनी विकायला मात्र परवानगी देते, अशी काही तरी चमत्कारिक परिस्थिती आपल्या देशात तयार झालेली आहे. जर कॅम्पस युनिव्हर्सिटी निर्माण झाल्या आणि व्यवसाय करुन काही मुलांनी पुढील शिक्षण घ्यायचे ठरविले तर त्यांना ते मुंबई, पुण्यामध्ये शक्य होईल का ? छोट्या शहरांमध्ये हा प्रश्न उपस्थितच होणार नाही. सभापती महोदय, आता ही विद्यापीठे कुठे निर्माण होणार आहेत ? शिक्षणसम्राट विद्यापीठ काढण्यासाठी रांगा लावून तयार आहेत. शिक्षण क्षेत्राला कॉंट्रीब्युट करण्यासाठी हे चालले आहे, असा त्याचा अर्थ नाही. त्यांनी आता सांगितले की, ॲक्टच्या सेक्शन 25 खाली ते असे करणार आहेत. सेक्शन 25 मध्ये असे म्हटले आहे की, डिव्हिडंट न देता, आलेल्या नफ़्यातून व्यवसाय पुढे वाढविण्यास हे पैसे खर्च करु शकतात. विद्यापीठे नफा मिळविण्यासाठीच काढणे, असा याचा अर्थ आहे. अन्य काही सोर्स नाही. मी मुद्दाम ॲक्टमधील प्रोव्हिजन घेऊन येथे आलो आहे. कंपनी ॲक्ट म्हटला की, कंपनीमध्ये जो पैसा इन्व्हेस्ट केला जातो, तो प्रॉफिट मिळविण्यासाठीच असतो. कंपनी निर्माण करताना मूळ उद्देश हा फायदा मिळविणे असतो. कंपनी ॲक्टच्या कायद्यात असे लिहिले आहे की, " p0wer to dispense with 'Limited' in name of charitable or other company" असा सेक्शन 25 चा अर्थ आहे. त्यामध्ये पुढे असे लिहिल् आहे की, "where it is proved to the satisfaction of the Central government that an association- (a) is about to be formed as a limited company for promoting commerce, art, science, religion, charity or any other useful object," नंतर त्यातील "बी" असे म्हणतो की, "intends to apply it's profits, if any, or other income in promoting it's objects, and to prohibit the payment of any dividend to its members..." डिव्हिडंटमधून आलेले ते पैसे पुन्हा त्या गोष्टीमध्ये इन्व्हेस्ट करायचे ठरविले आहेत. अशाप्रकारे या प्रोव्हिजन्स दाखविल्या आहेत.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

सभापती महोदय, रजिस्ट्रेशन होत असल्यामुळे प्रॉफिट कमाविण्याचा प्रश्न येणार नाही, अशा प्रकारचा युक्तिवाद याच्या समर्थनार्थ केला जातो. अशा युनिव्हर्सिटीज यायला पाहिजेत, हे आम्हालाही मान्य आहे. कारण आपल्याकडे शिक्षण मर्यादित आहे. ठराविक आर्टस, कॉमर्स, सायन्स, इंजिनिअरिंग, मेडिकल यांच्या डिग्रीज सोडल्या तर इतर कोणत्याही शिक्षणाची सोय नाही. देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने रिसर्च अँड डेव्हलपमेंटचा मुद्दा देखील महत्वाचा आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

अशी डेव्हलपमेंटची तरतूद आहे. कोणत्याही प्रकारची व्यवस्था करीत असतांना जगाच्या स्पर्धेमध्ये आपण कोठेही कमी पडू नये याचाही विचार करण्याची गरज आहे. आपली मानसिक तयारी करीत असतांना जगातील प्रत्येक गोष्टीला सामोरे जाणे आवश्यक आहे. कोणतेही आव्हान असले तरी त्याप्रमाणे माणसे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. Various faculties are necessary. या दृष्टीकोनातून कंपनी ॲक्ट प्रमाणे आपण हे विद्यापीठ रजिष्ट्रेशन करणार आहात. आपल्या देशातील लोकांची प्रवृत्ती ही सहकारची आहे, आपल्या महाराष्ट्रात 106 सहकारी साखर कारखाने आहेत, यातील फक्त 30 ते 35 सहकारी साखर कारखाने फक्त चालू स्थितीमध्ये आहेत व इतर सहकारी साखर कारखाने कर्जामधे बुडालेले आहेत. काही कारखान्यांनी सुरुवातीला बँकाचे कर्ज घेतल्यामुळे ती चालू होती, आपला कारखाना आजारी पडणार नाही या संदर्भातील जबाबदारी तेथील संचालक मंडळ व व्यवस्थापकीय कमिटीची आहे. Eventually, the factory has started incurring losses. अशा प्रकारची परिस्थिती आहे. याबाबत सुध्दा या विद्यापीठांचे असे होणार नाही काय ? याबाबत आपण काही करार केलेले आहेत काय ? याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. विधेयकाच्या संदर्भात बोलत असतांना विधेयकाचा मसूदा बनविणारे जो लोक आहेत त्यांनी मराठीमध्ये बऱ्याच चूका केलेल्या आहे. इंग्रजीच्या संदर्भात मला काही म्हणावयाचे नाही, आपला कारभार हा मराठीमधून चालत असतो, माझ्या कडे विधेयकाची मराठी प्रत आहे, विधेयकाच्या पान क्रमांक 2 वर " कलम 25 अन्वये घटित केलेली कार्यसमिती असा आहे " येथे "घटित" च्या ऐवजी "गठीत" असा शब्द पाहिजे. घटित आणि गठीत मध्ये काहीही फरक नाही काय ? या संदर्भात विधानमंडळामध्ये जे काम करणारे लोक आहेत त्यांनी सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच माननीय मंत्री महोदयांचे मराठी चांगले आहे त्यांनी सुध्दा याकडे लक्ष दिलेले दिसत नाही. महाराष्ट्राची भाषा ही मराठी असतांना याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, कोर्टाचे कामकाज मराठीमधून कामकाज करावे म्हणून आम्ही आग्रही असतांना अशा मराठीच्या चूका होणे योग्य नाही. यादृष्टीकोनातून येथे "गठीत" शब्द असावयास पाहिजे होता.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

आपण या विधेयकामध्ये ज्या अनेक तरतुदी केल्या आहेत त्यावर मी येणार आहे. मी माझी लेखी नोट दिली होती त्यामध्ये काही गोष्टींचा उल्लेख केला होता. आपण लोणावळा येथे घेतलेल्या बैठकीमध्ये खंडनिहाय नोट दिली होती, त्यामध्ये मला ज्या गोष्टी खटकतात त्या मी मांडल्या होत्या. सभापती महोदय, या विधेयकाच्या पृष्ठ क्र. 5 वर (बावीस) मध्ये "विद्याविषयक मूल्यमापन करण्यासाठी प्रस्तावित केलेली व्यवस्था" असे म्हटले आहे. ही व्यवस्था स्वतंत्र असावी अशी माझी सूचना आहे. खरे म्हणजे विद्यापीठे स्वायत्त आहेत तर मग आपण त्यांच्यावर बंधन कशासाठी घालावयाचे? त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी काही गोष्टी करणे आवश्यक आहेत. आणि नियंत्रण असतांना सुध्दा खूप घोटाळे होत आहेत. या सदनामध्ये रोजच्या रोज भ्रष्टाचाराची प्रकरणे, पोलिसांकडून होणारे अन्याय यावर चर्चा होते. अशा सर्व गोष्टी कायद्याने एस्टॅब्लिश झाल्या असल्यातरी त्याप्रमाणे होत नाहीत म्हणून त्यावर चर्चा चालू आहे. या सभागृहामध्ये कोणत्याही विधेयकावर बोलत असतांना दोन मिनिटे झाल्यानंतर बेल वाजविली जाते. या विधेयकातील प्रत्येक शब्द व त्यामधील तरतूद अतिशय महत्वाची आहे, कारण त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. सभापती महोदय, पृष्ठ क्र. 7 वर क्रमांक 30 मध्ये "कोणत्याही व्यक्तीवर तिचे लिंग, वंश, जात पंथ, वर्ग, मत, जन्मस्थान, धर्मश्रध्दा किंवा राजकीय मत यासंबंधातील कोणतीही चाचणी लादणे विद्यापीठासाठी विधिसंमत असणार नाही" अशाप्रकारचा क्लॉज याठिकाणी टाकण्यात आला आहे. या देशामध्ये कोणत्याही विद्यापीठामध्ये प्रवेश घेत असतांना त्या विद्यार्थ्याला जात विचारली जाते काय? कोणत्याही जातीचा विद्यार्थी शिक्षण घेऊ इच्छित असेल तर त्याला शिक्षणाची दारे मोकळी असली पाहिजेत . त्याचबरोबर गरिबातल्या गरीब विद्यार्थ्याला देखील शिक्षणामध्ये प्रोत्साहन मिळाले पाहिजे. ही माझ्या दृष्टीने महत्वाची गोष्ट आहे. जो विद्यार्थी आर्थिकदृष्टया गरीब असेल व त्याला शिक्षण घेण्याची खूप इच्छा असेल तर त्याला शिक्षणापासून कुणीही अडविणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. आपण याठिकाणी स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे आणल्यानंतर तेथील फीचे स्ट्रक्चर त्यांनीच ठरवावयाचे आहे. ती फी किती असावी याबाबत आपण त्यांच्यावर बंधन घालू शकत नाही. अशाप्रकारच्या या स्वायत्त संस्थांमधून गरिबांना शिक्षण घेणे परवडेल काय? काही वर्षापूर्वी झोपडपट्टीमध्ये राहणारा चिकित्सक विद्यालयातील कु. मंगेश म्हसकर नावाचा विद्यार्थी एस.एस.सी. परिक्षेमध्ये पहिला आला. अशाप्रकारे प्रतिकूल परिस्थितीमध्ये संघर्ष करुन शिक्षण घेणारी मुले झोपडपट्टीमध्ये राहतात. आजच्या वर्तमानपत्रामध्ये एक फोटो छापून आला आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )3A 2

DGS/ MAP/ SBT/ 16:20

श्री. मधुकर सरपोतदार...

त्यामध्ये कचरा गोळा करुन आपल्या भावंडाना संभाळणारी मुलगी परिक्षेला जाऊन बसली आहे. अशाप्रकारे खरोखरच परिस्थितीने नागवलेली जी मुले आहेत, ज्यांना दोन वेळचे अन्न मिळत नाही अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आपण काहीतरी करावे. अशा मुलांना आपण मदत करतांना त्यांची जात-पात पाहू नये. तो कोणत्याही जाती-धर्माचा नागरिक असला तरी त्याला शिक्षणामध्ये सवलत मिळाली पाहिजे असे माझे मत आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु....

नवीन मूल जन्माला येण्यापूर्वी ते भविष्य काळत काय शिकणार आहे ? हे सांगू शकत नाही. तो जन्माला आल्यानंतर त्याची गुणवत्तेची क्षमता आणि बौध्दीकता काय आहे, यावरुन तो काय करणार आहे, हे समजते. त्याप्रमाणे विद्यापीठे स्थापन होण्या अगोदरच त्यांच्यावर अटी घालू नका. कायदा झ ाल्यानंतर विद्यापीठे येण्यासाठी त्यांना अशा प्रकारच्या सवलती मिळतील असे काही सांगितले तरच विद्यापीठ काढण्यासाठी लोक पुढे येतील. सुरुवातीलाच अटी घातल्या जर त्यांची क्षमता कळत नाही. आपण पृष्ठ क्रमांक 8 मधील कलम 10 मध्ये म्हटलेले आहे की, "विद्यापीठ मुंबई किंवा मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्रमध्ये असेल तर पाच कोटी रुपये दान निधी घेणार आहात आणि विद्यापीठ, मुंबई किंवा मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्राच्या बाहेर असेल तर दोन कोटी रुपये दान निधी घेणार आहात. ज्यांचा दोन क्रमांकाचा धंदा आहे, तोच दान निधी देऊ शकणार. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब हे 5 कोटी देऊ शकणार नाहीत, त्यामुळे ते विद्यापीठ काढू शकणार नाहीत. याचा अर्थ असा की, शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणारी माणसे ही विद्यापीठे काढू शकणार नाहीत आणि ज्यांनी वेगवेगळया मार्गाने मिळविलेला पैसा आहे, तेच असे विद्यापीठ काढतील. ज्या संस्थेकडे आर्थिक क्षमता आहे, ते विद्यापीठ काढतील आणि लाख घेऊन डिग्री देतील, अशी परिस्थिती आहे. आज दिल्ली,चेन्नई येथील शिक्षण संस्थांमधून अशाप्रकारे डिग्री मिळवून महाराष्ट्रामध्ये विद्यार्थी येतात आणि नोकऱ्या मिळवितात. अशा अनेक बोगस डिग्री मिळवून देणाऱ्या संस्थांवर धाडी पडल्यानंतरसुध्दा अशी स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची आपण स्थापना करणार. शिक्षण क्षेंत्राकडे व्यवसाय म्हणून पाहिले जाते. अशाप्रकारची विद्यापीठे डिग्री मिळवून देणारी केंद्रे झ ाली तर शिक्षण क्षेत्र हे व्यवसाय क्षेत्र होईल. नालंदा विद्यापीठाचे उदाहरण देता येईल. या नालंदा विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्यासाठी परदेशी लोक येत होते, आज त्या विद्यापीठाची काय परिस्थती आहे ? 'जगत विद्यापीठ' म्हणून धुळयाला झाले, त्याचे काय झाले ? पृष्ठ क्रमांक 8 वर म्हटलेले आहे की, "या अधिनियमान्वये स्थापन केलेले प्रत्येक विद्यापीठ, स्वयं-अर्थसहाय्यित असेल", हीच माणसे बॅक डोअरनी नालंदा विद्यापीठासारखे पैसे घेतील. दाऊद सारखी माणसे तेथून कोणी तरी माणूस पाठवून विद्यापीठ काढण्यासाठी पुढे येतील आणि नंतर त्याचे उद्योग सुरु होतील. आज दाऊदशी कोणी बोलले तरी त्याच्यावर आरोप होऊन त्याला जेलमध्ये टाकले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरु...

जाते. मंत्री टेलिफोनवर बोलला तरी त्यांच्यावर आरोप केले जातात. असे होत असेल तर आपण शिक्षण क्षेत्रामध्ये प्रगती करु शकू काय ? हा आमच्यासमोर प्रश्न आहे. या दृष्टीने मी नेहमी विचार करतो.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 18 वर खंड 37 मधील परंतुकामध्ये असे म्हटले आहे की, "परंतु, पूर्वोक्त पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीच्या आत कोणत्याही परीक्षेचा निकाल जाहीर करणे कोणत्याही कारणांमुळे विद्यापीठाला शक्य झाले नाही तर ते, अशा विलंबाची तपशीलवार कारणे नमूद करुन, शासनाला एक अहवाल सादर करील. त्यावर शासनास, भविष्यात असा निकाल वेळेवर जाहीर केला जावा यासाठी, त्यास आवश्यक वाटतील असे, निदेश देता येतील." ही सवलत कशासाठी दिलेली आहे ? महाराष्ट्राचा युनिव्हर्सिटी ॲक्ट वेगळा आहे आणि ही जी विद्यापीठे निर्माण करणार आहोत ती निराळी आहेत. त्यांच्यासाठी दुसरी काही तरी तरतूद करावी. आपण त्यांना कायद्याने स्वायत्त ठरविले आहे. स्वत:च्या पायावर सर्व करण्याचे ठरवल्यानंतर अशा गोष्टी त्या ठिकाणी घडणार आहेत. त्यासाठी अधिक जास्त रिगरस पनिशमेंट ठेवली पाहिजे. कारभारामध्ये गोंधळ निर्माण झाला की, या गोष्टी ओघानेच येणार आहेत. आज शिक्षण क्षेत्राची काय परिस्थिती आहे ? सगळ्या प्रकारचे कायदे, चांगले प्राध्यापक, चांगली विद्यापीठे असताना ज्यावेळी परीक्षा येतात त्यावेळी अमूक ठिकाणी अमूक पेपर विकला गेला अशा घटना घडतात. राजरोसपणे नोट्स घेऊन त्याच्या कॉपीज काढल्या जातात. त्यासाठी शिक्षकही मदत करतात. आज हे घडते. उद्या स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे निर्माण झाल्यानंतर काय होणार आहे ? आपणच नोट्स तयार करुन द्यावयाच्या आणि त्या नोट्स पेपरमध्ये लिहा आणि पास व्हा अशी परिस्थिती निर्माण होईल. शिक्षण हा व्यापार होणार असेल, शिक्षणावर कोणत्याही प्रकारचे बंधन नसेल, शिक्षणाचे क्षेत्र हे व्यापारी क्षेत्र होणार असेल तर अशा विद्यापीठांपासून आपण सावधान राहिले पाहिजे. आज देशामध्ये मुंबई विद्यापीठाला, पुणे विद्यापीठाला जी प्रतिष्ठा आहे ती प्रतिष्ठा जाणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. ज्यावेळी अशी स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे निर्माण होतील ती पहिल्यांदा मुंबईमध्ये स्थापन होतील. आज तरी कोणी मुंबईबाहेर विद्यापीठ स्थापन करणार नाही. इतर दोन चार ठिकाणी होऊ शकतात. कोठे कोठे मागणी आलेली आहे हे माहीत नाही. परंतु प्रामुख्याने मुंबईमध्ये ही विद्यापीठे काढण्याचा प्रयत्न होईल. त्या ठिकाणी पदव्या विकल्या जाण्याची शक्यता जास्त आहे. सूचना करणे माझे कर्तव्य आहे म्हणून मी सूचना करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

RDB/ MAP/ SBT/

श्री. मधुकर सरपोतदार ....

आहे. सभापती महोदय, या विधेयकामध्ये आणखी एक महत्वाचा क्लॉज आहे. पृष्ठ क्रमांक 20 वर परंतुकामध्ये असे म्हटले आहे की, "परंतु समापनाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत, शासन, विद्यापीठाने विद्यार्थी आणि कर्मचारी यांच्या हितासाठी, ते विद्यावर्ष किंवा विद्यमान अभ्यासक्रम संपेपर्यंत विद्यापीठाच्या कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि ते चालवण्यासाठी, अधिकारी किंवा समित्या यांची नियुक्ती करण्याबरोबर योग्य ती व्यवस्थाही करील." हा अतिशय महत्वाचा क्लॉज आहे. या क्लॉजकडे लक्ष ठेवावे. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामधील परिच्छेद क्रमांक 4 मध्ये असे म्हटले आहे की, "अशा विद्यापीठांना पुरेशी स्वायत्तता देण्याच्या हेतूने, शासनाने त्यांची उभारणी आणि कार्यचालन यांच्या नियमनात कमीत कमी हस्तक्षेप करण्याचे ठरविले आहे." म्हणजे शासन हस्तक्षेप करणार आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

सभापती महोदय, हे सगळे विषय मी मांडलेले आहेत. विधेयक क्रमांक 10च्या अगोदर याच विषयाच्या संदर्भातील जुने विधेयक क्रमांक 20 रद्द करण्यात आलेले आहे. जुने विधेयक आणि आताचे नवीन विधेयक यांची तुलना करुन मी माझे मुद्दे मांडलेले आहेत. जुन्या विधेयकाच्या खंड 4 मधील (च) मध्ये "मानशशास्त्र व समाजशास्त्र या विषयांमधील शिक्षण देण्यावर भर दिला जाण्याची सुनिश्चिती करण्यासाठी योजना " असे म्हटलेले आहे. समाजशास्त्र आणि मानसशास्त्र हे दोन विषय नवीन विद्यापीठाला देण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. नवीन विद्यापीठाचे विषय दिलेले आहेत. Govt. should strictly adhere to their subjects, beyond that one should not go. डिग्री विकण्यासाठी आमचे लोक उत्सुक आहेत. याबाबतीत बंधन आणण्याची गरज आहे. सभापती महोदय, संशोधन, रिसर्च आणि डेव्हलपमेंट हे विषय अतिशय महत्वाचे आहे. आपल्या देशामध्ये ज्या नवनवीन गरजा निर्माण होतात, उदा. एमबीअे सारखे नवीन संशोधनाचे विषय पुढे येतात अशा स्पेशल सब्जेक्टचा विचार होणे आवश्यक आहे. आपल्याकडे जी विद्यापीठे सुरु आहेत त्यामध्ये हस्तक्षेप होणार नाही, त्या विद्यापीठांचे नुकसान होणार नाही, ती विद्यापीठे आजारी पडणार नाहीत याची काळजी शासनाने घ्यावी एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठाच्या स्थापने संबंधी हे जे वि.प.वि.क्रमांक 10 या ठिकाणी मांडलेले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सन 2004च्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये देखील माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री. सुरेशदादा जैने यांनी पहिल्यांदा अशा प्रकारचे विधेयक परिषदेमध्ये सादर केले होते. त्या विधेयकावर बरीच साधकबाधक चर्चा झाल्यानंतर अनेक प्रकारच्या शंकाकुशंकांचे केवळ सभागृहामध्येच नाही तर राज्यामध्ये देखील सर्वत्र काहूर माजले होते. त्या विधेययकावर सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर ते विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले. संयुक्त चिकित्सा समितीच्या त्या विधेयकाच्या संदर्भात अनेक बैठका झाल्या आणि संयुक्त चिकित्सा समितीचा अहवाल सभागृहापुढे येण्यापूर्वीच ते विधेयक मागे घेण्यात आल्याचे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले. संयुक्त चिकित्सा समितीचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्यय प्रा. बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकीमध्ये ज्या अनेक सुधारणा सुचविण्यात आलेल्या होत्या त्या या विधेयकामध्ये इन्कार्पोरेट करण्यात आल्या नाहीत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )3E -1

SSK/ MAP/ SBT/ श्री. शिगम नंतर 16:40

प्रा. जोगेंद्र कवाडे ...

सभापती महोदय, आमच्या अनेक मित्रांनी उच्च शिक्षणाचे समर्थन केले. आम्ही देखील उच्च शिक्षणाचे समर्थक आहोत. उच्च शिक्षण मिळावे मग ते तंत्रशिक्षण असो,व्यवसाय शिक्षण असो अथवा व्यवस्थापकीय असो ते मिळाले पाहिजे आणि या शिक्षणामधून एक अत्यंत उत्कृष्ट शा प्रकारचे उच्चशिक्षित तरुणांचा, बुध्दीमान तरुणांचा आणि गुणवान तरुणांचा वर्ग निर्माण व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. आजकाल ग्लोबलायझेशन म्हणजे जागतिकीकरण याचा बाऊ केला जातो. जागतिकीकरणाच्या संधी आता कुणी थोपवू शकणार नाही. मल्टीनॅशनलायझेशन थोपवू शकणार नाही. पाश्चिमात्य राष्ट्रे आणि युरोपियन कंट्री प्रगतीकडे झेप घेत आहेत. नवे नवे तंत्रज्ञान आणि विज्ञान आम्ही थांबवू शकत नाही. पाश्चिमात्य आणि युरोपियन राष्ट्रांची सामाजिक तसेच आर्थिक जडणघडण आणि आमच्या देशाची सामाजिक आणि आर्थिक जडणघडण यामध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी एका अपंग मुलीची गोष्ट याठिकाणी सांगितली. जिद्द, चिकाटी आणि हिंमत याच्या बळावर आकाशाकडे झेप घेण्याची आकांक्षा होती. त्या मुलीने कुबडया झटकल्या मेहनत केली पण पहिल्यांदा,दुसऱ्यांदा यश मिळाले नाही. परंतु नंतर तिने ऑलिंपिकमध्ये पहिला क्रमांक पटकावला. ही संधी अपंग असलेल्या मुलीला प्राप्त झाली. परंतु येथे स्टेडियमचे दरवाजेच बंद करण्यात आले आहेत. अनु.जाती,अनु.जमाती,कुणबी, सोनार, लोहार, माळी, आग्री, कोळी, धोबी हा जो ओबीसी समाज आहे त्यांच्यासाठी संधीच नाही. मुलीला संधी देण्यात आली म्हणून ती धावली. येथे संधीच नाकारली जाते. समुद्राच्या किनाऱ्यावर उभे केले जाते परंतु पोहण्याची संधी नाकारली जाते. पाटया लावल्या जातात तुम्हांला समुद्रात जाता येणार नाही. ही व्यवस्था काय आहे ? पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये अनेक सुधारणा झाल्या त्या आल्याच पाहिजेत त्या आपण थांबवू शकत नाही. पण हे थांबवावे लागेल. माननीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी गॅट कराराचा याठिकाणी उल्लेख केला. इतर राष्ट्रांप्रमाणे आमच्या देशाने सुध्दा गॅट करारावर सही केली. चीन सरकार असताना सुध्दा सही केली. शरणागती पत्करुन सही केली. चीनने मात्र अटी आणि शर्ती ठेवून सही केली. आमच्या देशाच्या राज्यकर्त्यांना हा फार ओळखता आला नाही. गांधीजींचा वारसा सांगणारे आमच्या देशाचे सरकार आहे. गांधीजींनी ब्रिटीशांना "चलेजाव " म्हटले आमचे सरकार "चलेआव" म्हणते आहे. हा विरोधाभास दिसत आहे. या विरोधाभासाचे जिवंत चित्र म्हणजे हे स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ आहे असे मला वाटते.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

या देशातील कोणत्याही जाती, धर्म, पंथाचा, कोणतीही भाषा बोलणारा माणूस असेल त्याला उच्च शिक्षण हे मिळाले पाहिजे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. फक्त पैसेवाल्यांना संधी देणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार म्हणाले की, झोपडपट्टी राहणाऱ्यांकडे देखील बुद्धिमत्ता असते. परंतु, त्यांच्याकडे पैसे नसल्यामुळे तो उच्च शिक्षण घेऊ शकणार नाही. ही जी तफावत आहे, ती शासन दूर करणार आहे काय ? त्याचा कधी शासनाने विचार केला आहे आहे काय ? माझे तर असे म्हणणे आहे की, या बिलाच्या शीर्षकामध्येच दुरूस्ती करायला पाहिजे. आपण आपल्या राज्यात शैक्षणिक क्षेत्रासाठी थ्री टायर सिस्टीम स्वीकारली आहे. येथे असेसुध्दा नमूद करावेसे वाटते की, प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारल्याशिवाय काहीही होणार नाही. शेवटी आडात नाही तर पोहऱ्यात येणार कुठून ? प्राथमिक शिक्षणापासून विद्यार्थ्यांची बौद्धिक संपत्ता कशी वाढेल याचा विचार केला पाहिजे. या नव्या शैक्षणिक पध्दतीमुळे नवीन वर्ण व्यवस्था, नवीन वर्ग व्यवस्था निर्माण होत की काय असा संशय निर्माण होत आहे. अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित अशी थ्री टायर सिस्टीम आपण शिक्षणासाठी स्वीकारली आहे. आमच्या उच्च शिक्षण क्षेत्रात अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित या शब्दांचा वापर का केला जात नाही ? स्वयं अर्थसहाय्यित या शब्दा ऐवजी सेल्फ सफिशिएंट युनिव्हर्सिटी असे नाव असावयास पाहिजे होते. सेल्फ फायनान्स युनिव्हर्सिटी ऐवजी कायम विनाअनुदानित विद्यापीठ का म्हटले जात नाही ? आज आपण भांडवलदारांचे हस्तक बनू पहात आहात. पुंजीवाल्यांचे हस्तक बनू पहात आहात. फुले, आंबेडकर, शाहू कर्मवीर भाऊराव पाटील,पंजाबराव देशमुख यांच्या आदर्शाने चालणारे आपले राज्य आहे. These are the private Universities registered under the companies act 1956 amended so many times ..... प्रत्येकाला उच्च शिक्षण मिळाले पाहिजे याबद्दल शंका नाही. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे BOT वर फार प्रेम आहे. रस्ते, पूल, वीज निर्मिती इत्यादी कामे BOT वर देण्यात यावीत असे ते सातत्याने मागणी करीत असतात. मग हे विद्यापीठ BOT वर का देत नाहीत ? या विधेयकाच्या माध्यमातून श्री.दिलीप वळसे पाटील राज्याच्या सामाजिक न्यायाच्या धोरणाविषय कमिटमेंट व्यक्त केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. शासनाची नीति आणि धोरण साफ असले पाहिजे. नीति आणि धोरणामध्ये कधीही तफावत असता कामा नये. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

याचे भान पुरोगामी राज्याच्या सरकारने ठेवले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, म.फुले, शाहू, कर्मवीर भाऊसाहेब पाटील, शिक्षण महर्षि कर्वे यांचा वारसा सांगणारे राज्य आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

मग या गोष्टीचे भान आपण ठेवणार आहात की नाही ? माननीय मंत्री महोदयांनी अनेक सुधारणावादी कार्यक्रम शैक्षणिक क्षेत्रात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु मी त्यांना विचारु इच्छितो की, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन, नॉलेज बँकेची आज काय स्थिती झाली ? महोदय, राज्यातील उपेक्षित वर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा किती लाभ घेतला हे कळत नाही. सामाजिक समतेच्या दिशेतून, आम्ही सामाजिक विषमतेकडे तर वाटचाल करीत नाही ना ?

महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.सुरेशदादा जैन यांनी हे विधेयक मांडले होते. हे विधेयक सादर झाल्यानंतर संयुक्त समितीकडे पाठवावे अशी मागणी करण्यात आली होती. त्यानंतर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविले गेले. त्यानंतर या विधेयकाच्या समर्थनार्थ जनमत फेवर करण्यासाठी तत्कालीन मंत्री माननीय सुरेशदादा जैन यांनी विभागवार यात्रा केल्या. त्या यात्रेमध्ये त्यांना काही ठिकाणी काळे झेंडे दाखविण्यात आले, काही ठिकाणी त्यांच्या संदर्भात मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या, तर काही ठिकाणी विशिष्ट वर्गाने त्यांचे स्वागत केले. खरे म्हणजे सर्वप्रथम शिक्षणाचा उच्च दर्जा सुधारला पाहिजे. ज्ञानाच्या क्षेत्रात आज सतत बदल होत चालला आहे. नवीन क्षेत्रात आमच्या देशातील तरुणांनी प्रवेश केला पाहिजे ती जबाबदारी घेण्याची तयारी आमच्या देशातील विद्यार्थ्यांनी स्वीकारली पाहिजे. हा देश सर्वांचा आहे. परंतु तो केवळ मूठभर लोकांचा राहू नये, याबाबत शासनाने काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे दर्जेदार शिक्षण दिले गेले पाहिजे. दर्जेदार समाजाला दर्जेदार शिक्षणाची गरज असते. या ठिकाणी आज समाजाचा दर्जाच उरलेला नाही आणि आपण केवळ शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या गोष्टी करीत आहोत. त्यामुळे शिक्षणाबरोबर समाजाचाही दर्जाही सुधारण्याची गरज आहे.

महोदय, पूर्वीच्या काळात लेसर इन्टरफिअरन्स पॉलिसी होती. या पॉलिसीमध्ये काहीही करा, लूटा, मारा, कसेही वागा अशी पध्दत होती. अमेरिकेसारख्या भांडवलशाही असलेल्या देशात हे तत्व मात्र गुंडाळले गेले. पुंजीवादी अमेरिकेत खाजगी क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण आहे. आज मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, खाजगी क्षेत्रात अनुसूचित जाती-जमाती, ओ.बी.सी. वा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

तत्सम जातींना आरक्षण मिळावे म्हणून मागणी करावी लागते. महोदय, 2002 साली 3 लाख जनसमुदायांचा मोर्चा मी पार्लमेंटवर काढला होता. अमेरिकेमध्ये खाजगी क्षेत्रात मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. आपण जे विद्यापीठ करीत आहात ते शैक्षणिक डिसीप्लीनसाठी करीत आहात. विधेयकाच्या उद्देश आणि कारणे यामध्ये आपणच असे म्हटले आहे.

नंतर श्री.कांबळे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

राजकोषावर कोणताही वित्तीय भार पडू न देता तंत्रविषयक, व्यावसायिक आणि व्यवस्थापकीय शिक्षणामध्ये उच्च दर्जा प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र राज्यास स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे निर्माण करण्यास उत्तेजन देणे शासनाला इष्ट वाटते, असे यामध्ये दिले आहे. या पलीकडे यांच्याकडे कोणते विषय नाहीत का ? सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या विधेयकाची फार चांगली चिकित्सा केली आहे. मी त्यांच्याशी सहमत आहे. या विधेयकामध्ये सांगण्यात आले आहे की, " महिला, शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्ती आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्याकरिता विशेष तरतूद करण्यापासून विद्यापीठाला प्रतिबंध करणार नाही. " सभापती महोदय, हे काय चालले आहे ? आमच्या माननीय मंत्रिमहोदयांनी इतक्या सुंदर पध्दतीने सामाजिक न्याय समजावून सांगितला की, या महाराष्ट्रामध्ये कोणीतरी या वर्गांची काळजी घेणारा आहे असे वाटले. काही गोष्टी मॅन्डेटरी केल्या आहेत हीच महत्वाची सामाजिक बाब आहे सामाजिक न्यायाशी, सामाजिक समतेशी निगडीत बाब आहे. या संदर्भातील गोष्टी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी एक गोष्ट लक्षात आणून दिली की, अनेक संदर्भामध्ये काही गोष्टी स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांवर कंम्पलसरी लादल्या आहेत. सभापती महोदय, यामधून ओ.बी.सी. समाज कसा काय सुटला ? याचा खुलासा व्हायला पाहिजे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

याबाबतीत खुलासा झाला पाहिजे, आपण सांगितले आहे की, 52 टक्के समाज हा ओबीसी आहे. सन्माननीय फौजिया मॅडम यह मेन्डेटरी करना इसलिए जरुरी है कि हमारी समाज व्यवस्था मजबूत हो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आपली समाज व्यवस्था तशी आहे काय ? मी घटनेच्या संदर्भातच बोलत आहे. या विधेयकावर माझे बोलणे संपविण्यापूर्वी या विधेयकाचे स्वरुप हे शुगर कोटेट पॉयझन असे झालेले आहे, माझ्या मताशी सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख सहमत होतील. कारण आपण केलेल्या शिफारशी मंत्री महोदयांनी स्वीकारलेल्या नाहीत. हे विधेयक येथे साखरेच्या पाकात डुबवून आणलेले आहे. आज उच्च शिक्षणाचे व्यापारीकरण कॉर्पोरेट होत चालले आहे. या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, केवळ कोणतीही संस्था स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करतांना त्यामध्ये अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आर्थिक सामाजिक व दुर्बल घटक यांना सवलती देतांना या बाबी विचारात घेऊन फीचे स्ट्रक्चर सादर करीन. कलम 8 बाबत मी मघाशीच सांगितले आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, महिला, अपंग यांना मेन्डेटरी करण्याची आवश्यकता आहे. आपण विधेयकामध्ये इच्छुक असेल असे म्हटले आहे. कायदा अस्तित्वात असतांना आरक्षणाची अंमलबजावणी केली जात नाही, आपण येथे जर इच्छुक ठेवले तर त्यांना रान मोकळे मिळेल त्यामुळे अनुसुचित जाती, जमाती, ओबीसी, महिला, अपंग यांना आरक्षण त्यामध्ये ठेवणे आवश्यक आहे. आपण विधेयक मांडतांना सामाजिक न्यायाचा उल्लेख केला, सामाजिक न्यायाच्या भूमिकेला आमचे समर्थन आहे, येथे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ मंत्री महोदयांनी दिलेला आहे. नोव्हेंबर, 2005 मध्ये सर्वोच्च न्यायलयाने खाजगी अभियांत्रिकी, विद्यापीठे व महाविद्यालये यांच्यामध्ये अनुसूचित जाती, जमाती यांना आरक्षण ठेवणे बंधनकारक राहील असा निर्णय दिला होता. त्यामुळे या देशामध्ये अस्वस्थता व बैचैनी निर्माण झाली आहे. 58 वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर उपेक्षित वर्गाला प्रचंड मोठया प्रमाणात वंचित ठेवण्यात आलेले आहे. या देशामध्ये धर्मसत्ताक समाजाकडे लक्ष देण्यास भाग पाडलेले आहे. हा समाज चिंतित झाला आहे. त्याची दखल केंद्र सरकाला घ्यावी लागली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2....

प्रा. जोगेंद्र कवाडे....

त्याची दखल केंद्राने व लोकसभेने घेतली, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय रद्दबातल करण्यासाठी 104 वी घटना दुरुस्ती करुन कलम 15 मध्ये बदल करण्यात आले. त्यामध्ये असे म्हटलेले अहो की, खाजगी विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, आर्थिक मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण ठेवण्याची तरतूद केली आहे. आणि अशा प्रकारची प्रसिध्दी झाल्यानंतर राज्य शासनाला तशा प्रकारचे नियम करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, ही जी 104 वी घटना दुरुस्ती झाली त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण ठेवण्याची तरतूद केली आहे. त्याबाबत राज्य सरकारला नियम करण्याचे निर्देश दिले तरी आपल्या राज्य सरकारने नियम केले नाहीत. आपले राज्य अनेक बाबतीत प्रगतीशील म्हटले जाते. तर मग अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या वर्गासाठी घटना दुरुस्ती केलेली असतांना शिक्षणामध्ये आरक्षण ठेवण्याची तरतूद महाराष्ट्र सरकारने अजूनपर्यंत कां केली नाही? तेव्हा या विधेयकामध्ये नवीन कलम तयार करुन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, व आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या वर्गासाठी आरक्षण ठेवणे बंधनकारक केले पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. आणि जर हे होणार नसेल तर तो महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाचा पराभव ठरेल. आणि हे शासन प्रतिगामी भांडवलदारांच्या इशाऱ्यावर नाचणारे ठरेल अशाप्रकारची या महाराष्ट्राची प्रतिमा कोणत्याही परिस्थितीत जगापुढे जाता कामा नये. ज्या थोर पुरुषांचा आदर्श या राज्याला लाभला. या मराठी भूमीतून ज्या थोर पुरुषांनी जन्म घेतला व संपूर्ण देशाला जगामध्ये दिशा दाखविली त्या महाराष्ट्राच्या पुरोगामी मातीला कलंग लागणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. या विधेयकाच्या संदर्भात अनेक माननीय सदस्यांनी भूमिका मांडली. उच्च शिक्षण मिळाले पाहिजे, त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. परंतु सर्वांना सोबत घेऊन आपण समान संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. या विधेयकातील त्रुटी दूर करुन आवश्यक असलेल्या बाबींचा समावेश करावयाचा असेल तर हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी विनंती करतो. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी म्हटल्याप्रमाणे मी एक शेर म्हणतो :

"हमारे घर को लूट लिया हमारे घर के सामने,
बेघर होकर खड़े हम अपने घर के सामने."

अशी अवस्था या विधेयकाच्या निमित्ताने होऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.कवाडे जी ने अभी एक शेर पढ़ा. इस पर मैं भी आपके सामने एक शेर कहना चाहता हूँ :

"यारो किसी कातिल से कभी प्यार न मांगो,
अपने ही गले के लिए लोगों से तलवार न मांगो."

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने बऱ्याच दिवसापासून या सभागृहामध्ये वेगवेगळा मतप्रवाह व्यक्त होत होता. या विधेयकाच्या पृष्ठ क्र. 5 वरील (वीस) मध्ये "विद्यापीठाने शेतकरी, महिला आणि उद्योग यांच्या लाभासाठी काही कार्यक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा कसे, असल्यास, त्याचा तपशील द्यावा" असे म्हटले आहे.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (पुढे सुरु...

आपण या विद्यापीठांच्या संबंधात वेगवेगळ्या अपेक्षा करतो. त्यासंदर्भात काही अटी आणि अपेक्षाही व्यक्त करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात खूप तपशीलवार प्रेझेन्टेशन विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांसाठी संबंधित मंत्रिमहोदयांनी आयोजित केले होते. त्यावेळेला आरक्षणाच्या मुद्यावरुनच सगळी चर्चा घोटाळताना दिसत होती. मला असे वाटते की, आरक्षणाच्या संबंधातील जो वाद आहे तो अनेकांच्या दृष्टीने खूप महत्वाचा असला तरीसुध्दा ज्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीमध्ये हे विद्यापीठाचे विधेयक आलेले आहे त्याबबात मत व्यक्त करावयाचे झाले तर ही कल्पना स्वागतार्ह वाटते. ही कल्पना स्वागतार्ह वाटण्याची काही कारणे आहेत. हे विधेयक सर्वगुणसंपन्न आहे असे मी म्हणणार नाही. विद्यापीठाच्या उद्दिष्टामध्ये 3 (ट) मध्ये असे स्पष्ट केलेले आहे की, "वेगवेगळया ठिकाणी असलेल्या अध्यापक, परिषदा, आयोग यापेक्षा कमी दर्जाच्या नसतील अशाप्रकारचे उपक्रम, अभ्यासक्रम या संदर्भात विधेयकान्वये परवानगी मिळणार आहे." विशेषत: आपण व्यवस्थापन क्षेत्र आणि अतिशय उच्चस्तरीय दर्जाच्या अभ्यासक्रमाचा विचार करतो. वेगवेगळया इंडस्ट्रीजची माहिती घेतल्यानंतर त्याचबरोबर बिझनेस मॅनेजमेंटच्या संदर्भात माहिती घेतल्यानंतर असे लक्षात येते की, आपल्या विद्यार्थ्यांना अनेक वेगवेगळया अभ्यासक्रमांसाठी परदेशी जाऊन शिक्षण घेण्याची वेळ येते आणि तेथे गेल्यावर त्या त्या संबंधित इंडस्ट्रीच्या स्टाफला ज्या प्रकारच्या सुविधा त्यांना परदेशामध्ये पुरवाव्या लागतात, त्या तुलनेमध्ये येथे विद्यापीठे असतील तर माझ्या माहितीप्रमाणे जसे वेगवेगळे लोक त्यामध्ये इंटरेस्टेड आहेत त्याप्रमाणे काही इंडस्ट्रीजचे लोकसुध्दा अशा प्रकारची विद्यापीठे काढण्यासाठी उत्सुक असण्याची शक्यता आहे. त्या त्या इंडस्ट्रीजना स्वत:च्या कौशल्याप्रमाणे माणसे तयार करुन द्यायची असतील तर त्यांनी कोठे तरी बँकॉकला, हेगला, अमेरिकेला पाठविण्यापेक्षा त्याच सुविधा येथे उपलब्ध होत असतील तर आऊट सोर्सींगच्या पार्श्वभूमीवर देखील या विद्यापीठांच्या गरजेकडे पाहिले पाहिजे असे मला सांगावेसे वाटते. या विद्यापीठाच्या संबंधात काही चिंता असतील, त्या खऱ्या असल्या तरी देखील मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, संपूर्ण भारत आणि चीन यांची जी तुलना जगाच्या पार्श्वभूमीवर चाललेली आहे. त्यामध्ये यंग वर्कींग जनरेशन, जास्तीत जास्त काम करु शकणाऱ्या आणि बौध्दिक क्षमता असणाऱ्या पिढीतील तरुण-तरुणींची संख्या भारतामध्ये चांगल्या प्रकारची आहे. पुढच्या काही

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

वर्षामध्ये संपूर्ण जगामध्ये अतिशय चांगल्या प्रकारचे भवितव्य आहे अशा प्रकारची परिस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाकडे आपण पाहिले तर एक गोष्ट खरी आहे की, सामाजिक आणि आर्थिक अंतर असणारे युवकांचे फार मोठे दोन गट तयार होतात. एकीकडे साधे मराठी नीट लिहिता न येणारे विद्यार्थी आहेत तर दुसरीकडे उच्च स्तरावर भारताचा भाग म्हणून नव्हे तर इतर परदेशी संस्थांचा भाग म्हणून प्रत्यक्षात भारतीय नागरिक जगभर प्रभुत्व गाजवत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. या पार्श्वभूमीवर पाहिले तर एक इंटलेक्च्युअल व्हॅक्युम म्हणजे बौध्दीक पोकळी भरुन काढण्याचे काम भारतीय युवक जगामध्ये सर्वत्र करत आहेत ही आज वस्तुस्थिती आहे. म्हणून ही जी सामाजिक विकासाची दरी आहे ती भरुन काढण्याचे काम समाजाच्या इतर क्षेत्राशी संबंधित आहे तसे या क्षेत्राशी संबंधित असले तरीही अशी विद्यापीठे म्हणजे एक अपरिहार्यता आहे, हे न टाळता येण्यासारखे सर्कमटेन्सेस आहेत असे मला खास करुन सांगावेसे वाटते. आपण तशा प्रकारे विचार करायला लागलो तर असे निर्णय घेणे हे आपल्याला क्रमप्राप्त आहे. आज जगामधील तीन इन्स्टिटयुशन्सची उदाहरणे देता येतील. बँकॉकला इन्स्टिटयुशन ऑफ पाप्युलेशन स्टडीज नावाची संस्था आहे. प्रशिक्षण कसे द्यायचे या संदर्भामध्ये ती संस्था संपूर्ण जगामधील वेगवेगळे कोर्सेस घेत असते. दुसरी बाब अशी की, जेंडर आणि सोशल डेव्हलजपमेंटवर यु.के. आणि हेगमध्ये अनेक वेगवेगळया संस्था आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या दर्जाचे अभ्यासक्रम करत असतात. त्याचबरोबर अगदी योगासारख्या विषयावर किंवा फिजिकल ट्रेनिंगसारख्या विषयावर चांगल्या प्रकारच्या टेक्निकल स्टाफची आवश्यकता आहे. मंदिर व्यवस्थापनासारख्या मुद्यामध्ये देखील आज वेगवेगळया प्रकारच्या लोकांना ट्रेनिंगची आवश्यकता आहे. केवळ ग्रॅज्युएशनचाच प्रश्न नाही तर फार मोठया प्रमाणावर वेगळे ॲव्हेन्यूज म्हणून त्याकडे आपण पाहिले पाहिजे. त्याचप्रमाणे इंटर डिसिप्लीनरी अभ्यासक्रमाच्या बाबतीत देखील अशा प्रकारच्या विद्यापीठांची आवश्यकता असू शकते असे मला वाटते. छाननीच्या निकषाच्याबातीत मात्र हे गृहीत असावे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

छाननीच्या निकषांमध्ये हे गृहीत असते. या विधेयकामध्ये उल्लेख आला नसेल परंतु रुल्स अँड रेग्युलेशनमध्ये हे येणे अपेक्षित आहे. या विद्यापीठांचे जे संचालक आहेत, जे प्रवर्तक आहेत ते गुन्हेगारी पार्श्वभूमीचे नसावेत याबाबतीत काय दक्षता घेण्यात येणार आहे ? दोन कोटी रुपये टाकावयाचे, पाच कोटी रुपये टाकावयाचे म्हटल्यानंतर अंडरवर्ल्डचे पैसे त्यामध्ये येतील. समोर दाखवण्यासाठी दुसरेच लोक असतील. त्या पैशाला लिजिटीमसी मिळणार. चित्रपट उद्योगामध्ये असेच होते. समोर प्रोड्युसर, डायरेक्टर वेगळे असतात आणि मागचा धनी वेगळा असतो. असे यामध्ये होऊ नये. याची काळजी कशी घेण्यात येणार आहे ? याबाबत विचार झाला पाहिजे. त्या ठिकाणी नियंत्रण कशा प्रकारचे असावे याची सातत्याने चर्चा होते. नियंत्रणाच्या बाबतीत बोलले तर कोणाला वाटेल की, मी हा छोटासा विषय मांडत आहे. सिनेटमध्ये प्रतिनिधी म्हणून आमदार जातात. आपण एका बाजूला नियंत्रण नको असे म्हणतो. गुणवत्तेचा दर्जा चांगला असेल तर नियंत्रण नको असे म्हटले तर चालेल परंतु गुणवत्तेचा दर्जा ढासळला असेल तर नियंत्रण असावयास पाहिजे. त्या ठिकाणी नियंत्रण अशासाठी पाहिजे की, त्या ठिकाणी सामाजिकदृष्ट्या वाईट परिणाम होत नाही ना ? हे पाहण्यासाठी काही प्रमाणात नियंत्रण असणे आवश्यक आहे. कमिटीचे जे निकष आहेत त्यामध्ये कुलगुरु आणि उच्च शिक्षणासंबंधीचे दोन तज्ज्ञ असा उल्लेख केलेला आहे. यामध्ये विधिमंडळाचे अधिकार आपण स्वत:च्या हाताने दुसऱ्याला प्रदान करीत असताना दुसरीकडे बाटलीतला राक्षस बाहेर येईल, तसे होऊ नये. त्या ठिकाणी नियंत्रण आवश्यक आहे असे मला वाटते. गुन्हेगारीच्या संदर्भात आपण नियंत्रण करु शकू काय ? याचाही विचार केला पाहिजे. मला असे वाटते की, त्यांचे सगळे आर्थिक व्यवहार तपासले गेले पाहिजेत. याबाबतीत दक्षता घेतली पाहिजे. आपले पाय राजकारणामध्ये कसे रुजलेले आहेत याचा विचार करावयास लागलो तर ज्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले आहेत अशी माणसे त्या कमिटीमध्ये असणार नाही याची निश्चितपणे काळजी घेऊ शकतो. याचा विचार शासनाने केला पाहिजे. त्यांचे सगळे अभ्यासक्रम कोणत्या भाषेमध्ये असणार आहेत ? त्यांचे अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणात इंग्रजीमध्ये किंवा इतर वेगवेगळ्या भाषेमध्ये असण्याची शक्यता आहे. अक्कलकुवा सारख्या भागामध्ये अल्पसंख्यांक समाजाशी संबंधित असणाऱ्या मोठमोठ्या संस्था उभ्या राहिलेल्या आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

डॉ. नीलम गोऱ्हे ......

त्या संस्थांची हळूहळू संस्थाने झालेली आहेत एवढेच नव्हे तर त्यांचे कडेकोट किल्ले तयार झ ाालेले आहेत अशी परिस्थिती आहे. त्यांच्या चार भिंतीच्या आत आणखी काय काय चालले आहे हे देखील कळत नाही. एका बाजूला पारदर्शकता आणि अकाऊंटीबिलिटी याचे भान यामध्ये राहिले पाहिजे. या बिलाच्या संदर्भात संबंधित विभागाने चांगले प्रेझेंटेशन करुन माहिती देण्याचा उपक्रम हातामध्ये घेतला ही चांगली गोष्ट आहे. विविध विभागांमध्ये काम करीत असताना या विद्यापीठांनी पर्यावरणाच्या संदर्भात काही जबाबदारी उचलली पाहिजे. आसपासच्या गावातील स्थानिक गावकरी, त्यांची संस्कृती यांची अप्रतिष्ठा होणार नाही अशा गोष्टींचा जरुर विचार केला पाहिजे. त्याचा उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवते.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, हे बिल मागे सुध्दा आले होते. ते विधेयक संयुक्त समितीकडे जाण्यापूर्वी मी त्यावर विचार मांडले होते. आज पुन्हा हे बिल या ठिकाणी आलेले आहे. संयुक्त चिकित्सा समितीकडे बिल गेल्यानंतर त्यामध्ये खूप सुधारणा होऊन हे विधेयक आलेले आहे असे बिल वाचल्यानंतर वाटत नाही. एक गोष्ट स्वागतार्ह वाटते. जसे एका नाण्याच्या दोन बाजू असतात तशी या बिलाची अवस्था आहे. एका बाजूला आनंद वाटतो की, काही तरी क्षितिजे पुढे येत आहेत. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी ग्लोबलायझेशन, गॅट, डंकेल याबाबतचे मुद्दे मांडले. या ग्लोबलायझेशनमध्ये आज विद्यापीठे कशी जवळ येत आहेत याबाबत सांगितले. त्यांनी परदेशी गुंतवणुकीचा उल्लेख केला.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 17:20

(श्री. अरविंद सावंत...)

जेव्हा गुंतवणूक हा शब्द येतो त्याच्या बरोबर प्रॉफिट हा शब्द येतो. इन्व्हेस्टमेंट आली की रिवॉर्ड येते. म्हणून अशा प्रकारच्या विद्यापीठांमध्ये गुंतवणूक करुन कशा पध्दतीने रिवॉर्ड मिळणार आहे हे लक्षात येते. माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्या प्रमाणे हे स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ आहे. म्हणजे आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेले हे विद्यापीठ, ज्याला कोणाकडेही हात पसरण्याची गरज पडणार नाही असे विद्यापीठ. मग कोणतीही सधन मंडळी एकत्र येऊन किंवा एखादी सधन व्यक्ती पुढे येऊन अशा प्रकारचे विद्यापीठ काढील. तेव्हा याबाबतीत शासन कसे काय निर्बंध घालणार आहे ? माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे आमच्या वेळी आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स् ह्या तीनच फॅकल्टीज् होत्या. त्याच्या पलिकडे काही माहीत नव्हते. सभापती महोदय, मी शिवडी भागामध्ये राहातो. शिवडी येथील रेरोड याठिकाणी एरोनॉटिकल इंजिनिअरिंग कॉलेज आहे. संपूर्ण देशातील मुले तेथे शिकण्यासाठी येतात. परंतु आम्ही तेथे राहात असून देखील ते आम्हाला माहीत नव्हते. किंबहुना मुंबईमध्ये व्हीजेटीआय आणि भवन्स एसपी ही दोन इजिनिअरिंग कॉलेजेस आणि जी.एस., जे.जे. नायर आणि लोकमान्य टिळक ही चार वैद्यकीय महाविद्यालये होती. याठिकाणी असे सांगितले गेले की, उच्च शिक्षणाच्या संदर्भात सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांला संधीची मर्यादा होती. ती संधीची कवाडे या विद्यापीठामुळे आता उघडली जाणार आहेत. इजिनिअरिंग आणि मेडिकल कॉलेजेसमध्ये मोजक्याच जागा असल्यामुळे प्रवेश मिळण्यासाठी मेरिट लिस्ट लागायची. मग राज्यातील विद्यार्थी बाहेरच्या मणिपूर सारख्या राज्यामध्ये जाऊन शिक्षण घ्यायला लागली. तेथे मेरीट नसल्यामुळे पैसे देऊन प्रवेश मिळण्याची सोय होते. त्यावेळचे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय वसंतदादा पाटील यांनी यासंदर्भात विचार केला होता. या स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठामध्ये मेरिटवर प्रवेश देण्यात येणार आहे की नाही हे समजले पाहिजे. आता मेरिटचा प्रश्न आला की पुन्हा त्यामध्ये आरक्षणाचाही प्रश्न येतो. अलिकडेच मेडिकल प्रवेशाच्या संदर्भात हा प्रश्न निर्माण झाला होता. तो प्रश्न मंत्री महोदयांनी निपटला. मेरिटवर प्रवेश देण्याच्या संदर्भात माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जातीचे सर्व वर्ग सांगितले. मी त्या खोलात जाणार नाही. कारण याच कारणामुळे देश आज विघटनाकडे निघालेला आहे. प्रवेश मेरिटवर द्यावयाचा की आर्थिक बाबीवर द्यावयाचा हे

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

विद्यापीठावर अवलंबून आहे. जातीवर आरक्षण असेल तर त्या जातीमध्ये जन्माला आलेला जो आर्थिकदृष्ट्या सबळ असेल त्याला प्रवेश मिळेल. परंतु ज्याच्याकडे मेरिट आहे, परंतु तो आर्थिकदृष्टया सबळ नसेल तर त्याला प्रवेश मिळणार नाही. जो आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे, मग तो कोणत्याही जातीचा असला तरी त्याला शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे अशी माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जी सूचना केलेली आहे ती शासनाने मान्य करायला हरकत नाही. कालपरवा कोणी तरी सांगितले की, केन्द्राने आयआयएममध्ये रिझर्व्हेशन देण्याचे ठरविले आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती कांता नलावडे )**

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदया, आहे रे आणि नाही रे असा जो वर्ग आहे त्याच्यामध्ये जातीवाचक असता कामा नये. आर्थिकदृष्टया नाही रे असला पाहिजे. जो गुणवान आणि त्याला संधी मिळाली पाहिजे. जो आर्थिकदृष्टया दुर्बल आणि गुणवान आहे त्याला संधी मिळाली पाहिजे. याठिकाणी जाणीवपूर्वक उदाहरण मी देऊ इच्छितो. "सारसबाबूची जात कोणती " अशा प्रकारचे पेपरमध्ये एक आर्टीकल आले होते. दक्षिणेतील हा युवक. आई भाजी विकते. मागास समाजातील आहे. आआयएम च्या परीक्षेमध्ये पहिला आला आणि तो गुणवत्तेवर आला. डॉ. आंबेडकरांनी सांगितले सवलतींची गरज असली पाहिजे. सूर्य झाकता येणार नाही. आर्थिकदृष्टया मागासलेल्या माणसाला हे दिले पाहिजे ही माझी मागणी आहे. जातीवाचक म्हणून जमणार नाही. प्रा.बी.टी.देशमुख यांनी याबाबत चांगली माहिती दिली. डॉ. आंबेडकरांनी घटना लिहिली. 14 व्या कलमामध्ये जात,वर्ग,प्रांत,वंश,भेद या सगळया पलिकडे जाऊन भेदाभेद न पाळता शिक्षण क्षेत्रात सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे. आपल्या समाजातील काही लोकांना आरक्षण देण्याची गरज आहे. पण ते घटनेत कधीच नव्हते. आरक्षण देण्याची चर्चा झाली. कोर्टात आव्हान दिले गेले. कोर्टाने म्हटले की घटना काय म्हणते त्यानंतर घटनेत कलम 14(अ) घालून मूळ कलम दुरुस्त करावे लागले. आज प्रगत तंत्रज्ञान येत आहे. त्याच्यामध्ये रोज बदल होत आहेत...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी आरक्षणाच्या संदर्भात घटनेचा संदर्भ याठिकाणी दिला. आरक्षणाचे जे मूळ स्वरुप आहे त्यामध्ये डॉ.आंबेडकर आणि गांधीजी यांच्यामध्ये वैचारिक मतभेद होते. जेव्हा देशाला स्वातंत्र्य देण्याचा मुद्दा उपस्थित झाला तेव्हा रंगनाथ समिती स्थापन केली. डॉ.आंबेडकर यांच्या मागणीप्रमाणे या देशातील अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मंजूर केली गेली. जिना यांच्या मागणीप्रमाणे पाकिस्तान मंजूर झाला. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणी विरोधात गांधीजींनी 22-25 दिवसांचे आमरण उपोषण सुरु केले. गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी करार झाला त्याला पुणे करार म्हणतात.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितलेला प्रसंग एक राजकीय प्रसंग आहे. त्यावेळेस तशी परिस्थिती निर्माण झाली होती. महात्मा गांधी उपोषणाला

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ KGS/ श्री. शिगम नंतर 17:25

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

बसले होते त्याचा उल्लेख केला गेला. स्वतंत्र दलित मतदारसंघ निर्माण करण्यात यावेत यासंदर्भात गांधी म्हणाले तो दलित असला तरी हिंदू समाज आहे. तरीसुध्दा स्वतंत्र मतदारसंघ मिळता कामा नये ही भूमिका सत्य आहे. त्यानंतर कित्येक वर्षांनी घटना तयार करण्यात आली...

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरूनाथ कुलकर्णी...

त्यानंतर काही वर्षाने घटना तयार करण्यात आली. या घटनेचे घटनाकार हे डॉ.बाबासाहेब आंबेडेकर होते. त्यांनी घटना लिहिताना कुठलाही भेदभाव ठेवलेला नाही. प्रा.बी.टी.देशमुख यांनी मद्रासच्या केसचा आधार घेतला आहे. त्या केसमध्ये आर्टिकल 14 चा आधार घेण्यात आला होता. त्यानंतर मग यात सुधारणा करून नवीन कलम समाविष्ट करण्यात आले.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, कार्ल मार्क्स का जन्माला आहे ? मी आपल्याला छोटीशी गोष्ट सांगतो. कार्ल मार्क्स रस्त्यावरून जाताना रोज एका कपडयाच्या दुकानाकडे पहायचा. पण त्यातील वस्तू तो काही घेऊ शकत नव्हता. ती वस्तू त्याच्याकडे असावी असे त्याला नेहमी वाटायचे.पण तो वस्तू काही घेऊ शकत नव्हता. एक दिवशी तो त्या दुकानाच्या समोर आला आणि दगड उचलून त्याने दुकानाच्या काचेवर मारला. त्यातूनच कार्ल मार्क्सचा जन्म झाला. म्हणजे काय माणूस हा काहीना काही मिळविण्यासाठी धडपड करीत असतो. हीच गोष्ट स्वर्गीय वसंतदादा पाटील यांच्या लक्षात आली आणि त्यांनी खाजगी इंजिनिअरिंग आणि मेडिकल कॉलेजेस राज्यात सुरू केली. यामुळे विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध झाली. हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण यामुळे कुठे तरी थोडासा दरवाजा उघडला गेला याची जाणीव झाली. शेवटी जिद्द असली की माणूस काहीही करू शकतो. नीति आणि नियतीसंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी केला आहे.

सभापती महोदय, अशा विद्यापीठांचा प्र-कुलगुरू, प्र-कुलपती कोण असावा हे देखील महत्त्वाचे आहे. आमच्याकडे व्हाईस चान्सलर यांना लाल दिव्याची गाडी लागते. मला कळत नाही विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूच्या गाडीला लाल दिवा का लावायचा ? तेव्हा अशा गोष्टींवरसुध्दा नियंत्रण असले पाहिजे. त्या संस्थेचाच प्र-कुलगुरू असले तर विचारण्याची काहीच सोय नाही. अशा विद्यापीठांच्या प्र-कुलगुरूंचा दर्जा हा चांगला असला पाहिजे. प्रा.राम जोशी, श्री.भालचंद्र मुणगेकर यांच्यासारखा दर्जा असला पाहिजे. या विद्यापीठावर अनुभव, वय, क्षमता, वकूब, ज्ञान इत्यांदी सगळया गोष्टी असलेल्या व्यक्तीलाच व्हाईस चान्सलर या पदावर नियुक्त केले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

माझ्याकडे पैसा आहे म्हणून मीच या विद्यापीठाचा प्र-कुलगुरू होणार अशी वेळ येता कामा नये. संस्थेचा अध्यक्षाने आपल्या व्यक्तीला कुलपती करणे बरोबर होणार नाही. आजही मुंबईत CBSE च्या अनेक शाळा आहेत. मी नाशिकची श्री.शरद पवार यांची शाळा बघितली आहे. या शाळेचे हॉस्टेल सुंदर आहे. तिथे गेल्यावर परदेशात गेल्या सारखे वाटते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि... 17:35

श्री.अरविंद सावंत

त्यात "आहे-रे" वर्गच जास्त फायदा घेईल. परंतु जे आर्थिकदृष्टया संपन्न नाहीत ते काय करतील ? महोदय, अनुदानित शाळांमध्ये खिचडी दिली जाते आणि विना अनुदानित शाळांमध्ये खिचडी दिली जात नाही म्हणून सभागृहात अनेकदा प्रश्न उद्‌भवतो. मला वाटते यातून विद्यार्थी लढा निर्माण होणार नाही याबाबत आपण काळजी घेतली पाहिजे. आदिवासी बांधव असेल किंवा अन्य कोणी विद्यार्थी असेल, त्यांच्यासाठी 10 टक्के जागा गुणवत्तेवर देण्यासंदर्भात या विधेयकामध्ये प्रावधान असावे असे मला वाटते.

मी अगोदर गुंतवणूक आली की, प्रॉफिट आला असे म्हटले होते. या विद्यापीठांतून झालेला प्रॉफिट सर्व संस्थांच्या विकासासाठी वापरावयाचा असे आपण म्हटले आहे. परंतु तो प्रॉफिट कसा वापरणार आहात ? त्यामुळे याबाबतचे मॉनिटरींग होणे आवश्यक आहे. ते मॉनिटरींग संस्था करणार आहे काय ? यामध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत या मताचा मी आहे. परंतु खरोखरच शासनाने दिलेल्या संधीचा योग्य उपयोग समाजाला आणि संस्थेला होतो की, नाही हे देखील पाहणे आवश्यक आहे. कारण ही विद्यापीठे समाजासाठी आहेत. अनेक खाजगी कॉलेजेस आमच्याकडे सुरु झालीत. मग ती कणकवलीतील असोत, धुळयातील असोत की, अन्य कोणत्या ठिकाणची असोत. ज्या ठिकाणी खाजगी इंजिनिअरींग कॉलेजेस आहेत त्या ठिकाणी जर आपण गेलात तर असे दिसून येईल की, त्या ठिकाणी परप्रांतातील धनाढय मुलांना प्रवेश मिळालेला आहे. त्या ठिकाणी महाराष्ट्रातील मुले फार कमी प्रमाणावर आहेत. त्यामुळे शासन निर्माण करीत असलेल्या विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील मुले जावीत हा विचार, असलाच पाहिजे. या विधेयकाचा फायदा आमच्या मराठी विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे असा विचार या विधेयकामध्ये असावयास हवा. आपल्या मातीतील मुलांना कशी संधी उपलब्ध होईल याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. खाजगी महाविद्यालयात किती मुले आहेत ? त्यात परराज्यातील किती मुले आहेत ? आपल्या राज्यातील किती आहेत ? जर या प्रश्नांची उत्तरे आपण शोधलीत तर फार भयावह वस्तुस्थिती आपल्यासमोर येईल. खाजगी विद्यालये मराठी मुलांसाठी काढण्यात आली आहेत. परंतु त्याचा फायदा मात्र भलतीच मंडळी घेत आहेत. त्यामुळे ज्यांच्यासाठी संस्था काढल्या त्या मराठी मुलांना, तळागाळातील मुलांना संधी मिळत नाही, त्यामुळे मराठी गुणवान मुलांना जास्तीत जास्त कशी संधी मिळेल या दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

महोदय, खाजगी महाविद्यालयांमध्ये भूमिपुत्रांना प्राधान्य देण्याबरोबर, जी स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे होणार आहेत त्यामध्ये देखील भूमिपुत्रांना स्थान असावयास हवे. कारण आपण काढलेल्या विद्यापीठांमध्ये आपल्यालाच संधी मिळत नसेल तर त्याचा काय उपयोग ? मेरिटबद्दल माझ्या मनात वाद नाही. महाराष्ट्रातील जे विद्यापीठ आहे, बोर्ड आहे त्या संदर्भात सुध्दा काही तरी निश्चित ठरविणे आवश्यक आहे. केवळ दिल्लीवरुन पैसा आला म्हणून आपण सर्वसंबंधितांना प्रवेश देणार आहात काय ? त्यामुळे या संदर्भात आपल्याकडे मेरिट असणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवारसाहेब यांना सांगू इच्छितो की, आज आपण सी.ई.टी. परीक्षा घेतो. यामुळे इंजिनिअरिंग कॉलेजमधील जागा वाढल्या आहेत. मी तर सुचवेन की, त्या जागा मेरिटवर जाऊ द्या आणि जास्तीत जास्त जागा आमच्या भूमिपुत्रांना द्या. सर्वांना संधी देण्याचे एकदाचे मॉनिटरींग होऊ द्या.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

यामध्ये जर गैरव्यवस्थापन असेल तर त्यांना आपण नोटीस देऊन संधी देणार आहात. समजा त्याही पलीकडे अडचण आली तर ? क्लॉजमध्ये असेही म्हटले आहे की, त्या सर्व परीक्षा त्यांच्याकडून करुन घेतल्या जातील. मला हे समजत नाही की, ज्या संस्था गैरव्यवहार, गैरव्यवस्थापन करतात, त्याच या परीक्षा कशाप्रकारे कंडक्ट करणार ? यामध्ये परीक्षा घेण्यासंदर्भात असेल तर, ती परीक्षा कोण घेणार आहे, हा देखील प्रश्न पडतो. सभापती महोदय, येथे सांगण्यात आले आहे की, " परंतु, विद्यापीठाचे विसर्जन, विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकड्यांनी त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर व त्यांना पदवी, पदविका किंवा यथास्थिती पुरस्कार प्रदान केल्यानंतर अंमलात येईल. " तुम्हाला आता सांगावे लागेल की, हे विद्यापीठ आता फेल्युअर झालेले आहे. सभापती महोदय, हे सांगण्याचा अधिकार आपल्याला असावा लागेल. विद्यार्थ्यांच्या परीक्षा आपण घ्या, हे विद्यापीठ परीक्षा घेऊ शकत नाही, हे सांगण्याचा अधिकार तुम्हाला असला पाहिजे. या विद्यार्थ्यांना परीक्षा घेऊन पदवी, पदविका प्रदान करण्याचा कार्यक्रम आपल्याला करावा लागेल. परंतु अशाप्रकारची कोणतीही तरतूद यामध्ये आम्हाला दिसली नाही, ती असावी असे मला वाटते. सभापती महोदय, मी आपल्याला या संदर्भात इन्फोसिसचे उदाहरण देतो. मी कालच इन्फोसिसच्या श्री. नारायणमूर्तींची मुलाखत पाहिली. सभापती महोदय, 250 डॉलर्स घेऊन 10 लोकांनी एकत्र येऊन हे इन्फोसिस काढले, आता याची प्रगती खूप झालेली आहे. या वर्षी तर त्यांना 31 टक्के प्रॉफिट मिळेल. सभापती महोदय, मला त्यांचे कौतुक वाटते. आज ती देशातील लिडींग कंपनी आहे. सभापती महोदय, संधी उपलब्ध करुन देण्याचा जो आपण पाया घालत आहात त्याचे देखील मी कौतुक करतो. मुंबईमध्ये बजाजने मॅनेजमेंटचे इन्स्टिटयूट काढले आहे. त्यांच्याकडे विद्यार्थ्यांच्या थेट मुलाखती होतात. मॅनेजमेंटच्या मुलांना महिना एक करोड रुपये पगार आहे. त्या विद्यार्थ्यांना ग्रॅज्युएट होण्याअगोदरच नोकरीची संधी मिळते. सभापती महोदय, अशी विद्यापीठे आल्यावर संधी देखील आपोआप प्राप्त होईल. मला तर असे वाटते की, अशाप्रकारे करायलाच पाहिजे. सभापती महोदय, " गंगा आली रे दारी, ती प्राशन करा आणि पवित्र व्हा. " असे केले पाहिजे. अडथळे येत राहणार. नदीच्या प्रवाहाला सागराला गाठायचे

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

असेल तर नदी प्रवाह बदलून सागर गाठते. तुम्हालाही तसेच केले पाहिजे. अडथळे येणारच आहेत. या येणाऱ्या विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील गुणवान विद्यार्थ्यांना चांगली संधी उपलब्ध होवो, तसेच आर्थिक स्थिती खराब असलेल्या विद्यार्थ्यांनाही चांगली संधी उपलब्ध होवो आणि महाराष्ट्र पुढे जावो हीच इच्छा. सभापती महोदय, महाराष्ट्राचे छत्तीसगड होऊ नये, अशी शुभेच्छा व्यक्त करुन मी आपली रजा घेतो.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी 2-3 मुद्दे थोडक्यात मांडणार आहे, या विधेयकाचे जेव्हा सादरीकरण झाले तेव्हा ज्या गोष्टी सूचविण्यात आल्या होत्या त्याप्रमाणे दुरुस्ती केलेली नाही. याबाबत सन्मानीय सदस्य श्री. सरपोतदार यांनी सुध्दा सांगितले आहे की, मोठया कौशल्याने काही बाबी यातून बाजूला केलेल्या आहेत. जगामध्ये स्पर्धा निर्माण झालेली असल्यामुळे त्या स्पर्धेत टीकण्यासाठी या बिलाचे मी स्वागत करतो, यावर बरेच सन्मानीय सदस्य बोलेले आहेत त्यांनी मांडलेल्या मुद्यांची पुनरावृत्ती मी करणार नाही. विद्यापीठे पैसा कमविण्याचे साधन होता कामा नये. कारण हा कंपनी ॲक्ट आहे पान क्रमांक 2 वर कलम 2 मध्ये असे म्हटले आहे की, " कंपनी अधिनियम 1956 च्या कलम 25 अन्वये नोंदणी केलेली कंपनी " सुरुवातील असे ठरले नव्हते. म्हणजेच ज्यांच्याकडे पैसा असेल तोच नफा कमविणार त्याचा अर्थ असाच होतो. विद्यापीठे विकसीत करतांना, त्यासंदर्भातील योजना करतांना जे प्रारुप दिले होते त्यामध्ये हे नव्हते. या सदर कलमांच्या बाबतीत आपणावर कोणाकडून तरी दबाव आलेला दिसतो, त्याबाबतीत स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे. उच्च दर्जाची बौध्दिक क्षमता निर्माण करणे, त्यामध्ये शिक्षण असेल, उच्च प्रतीचे शिक्षण आपल्या देशामध्ये राहिले पाहिजे. कल्पना चावलाचे उदाहरण आपणास माहिती आहे, अतिशय उच्च असे शिक्षण असतांना त्यांना येथे संधी उपलब्ध नसल्यामुळे जगाच्या पाठीवर जावे लागले. यासंदर्भात कुंभकोणी यांनी चांगले उदाहरण दिलेले आहे. विद्यापीठ व विद्यालयातील जो अभ्यासक्रम आहे तो स्पर्धेच्या युगात कमी पडता कामा नये. आता वेगवेगळया क्षेत्रात संशोधन, खगोलशात्र, समुद्रशास्त्र, अवकाश शास्त्र वेगवेगळया शास्त्रांचा अभ्यास जगाबरोबर जाण्यासाठी करणे आवश्यक आहे, तो यामध्ये आहे काय ? याचा कोठेही उल्लेख दिसत नाही. अशा प्रकारची अट त्यामध्ये असावयास पाहिजे. विविध विषय यामध्ये येतात, या विद्यापीठाच्या माध्यमातून विद्यार्थी सक्षम होतील, ते विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतील, परंतु त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करण्यासाठी, त्यांनी संशोधनाचे काम करण्याची संधी त्यांना उपलब्ध करुन दिली पाहिजे, ती व्यवस्था आपण यामध्ये केलेली दिसत नाही. मला तुम्ही लायसन्स दिले, ड्रायव्हिंग शिकविले परंतु चालवायला गाडीच किंवा वाहन दिले नाही तर माझ्या शिकण्याचा काय फायदा होणार असा हा प्रकार होता कामा नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......2....

श्री. मधुकर चव्हाण ....

म्हणून जे विद्यार्थी या देशामध्ये व महाराष्ट्रात तयार होतील त्यांच्या ज्ञानाचा फायदा आपल्या देशासाठी महाराष्ट्रासाठी व्हावयास पाहिजे, यासाठी तरतूद केलेली नाही, विधेयकाच्या प्रारुपामध्ये असे म्हटले होते की यातून राष्ट्रीय भावना वाढीस लागेल अशा प्रकारचा अभ्यासक्रम व गोष्टी सूचविण्यात आल्या होत्या, हा शब्द बीजेपीचा आहे असे आपण मानू नका. सांस्कृतिक राष्ट्रवाद असला पाहिजे, आणखी काही विषय यामध्ये येतील त्यातून समाजाची प्रगती होणे आवश्यक आहे. विधेयकाच्या पान क्रमांक 4 वर असे म्हटलेले आहे की, जमिनीच्या उपलब्धतेच्या संदर्भात व पायाभूत सोई सुविधेच्या संदर्भात मूळ प्रारुपात असे म्हटले होते की, विद्यापीठ स्थापन करण्यासाठी 5 किंवा 10 एकर जमीन असावयास पाहिजे. या विधेयकामध्ये त्याचा उल्लेख आता दिसत नाही. विधेयकाच्या पान क्रमांक 4 वरील (पाच) मध्ये असे म्हटलेले आहे की, " जमिनीची उपलब्धता तसेच तीवर इमारती व पायाभूत सुविधा आधीपासून अस्तित्वात असल्यास, मूळ प्रारुपामध्ये आपण 5 एकर जमीन किंवा 10 एकर जमीन असेल तर परवानगी असेल, त्याचा आता विधेयकात उल्लेख केलेला दिसून येत नाही. यामध्ये विद्यापीठ व महाविद्यालयात कोणत्या सुविधा असतील, इमारत कोणाची असेल, त्यामध्ये सुविधा कोण पुरवील याचा उल्लेख कोठेही आलेला नाही. दुसरे असे की पान क्रमांक 4 वरील (पंधरा) मध्ये असे म्हटलेले आहे की, "युनिटावर केलेल्या खर्चाचा तपशील तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग यांच्यातील विद्यार्थी व शारीरिकदृष्टया अपंग विद्यार्थी यांसह, आर्थिकदृष्टया दुर्बल किंवा सामाजिकदृष्टया मागास कुटुंबातील विद्यार्थ्यांना देण्यात आलेली फी मधील सवलत वा सूट फी-माफी आणि शिष्यवृत्त्या यांची मर्यादा विचारात घेऊन फी प्रस्तावित केली जाईल." एखाद्या वेळी आपण 2 टक्के फी माफी मागासवर्गीयांना देणार, गरीबांना देणार असाल तर त्यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. विधेयकातील कलम 5 (वीस) मध्ये असे म्हटलेले आहे की, "विद्यापीठाने शेतकरी, महिला आणि उद्योग यांच्या लाभासाठी काही कार्यक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित केले आहे किंवा कसे, असल्यास त्याचा तपशील द्यावा. "

यानंतर श्री. सरफरे..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

मला असे वाटते की, मूळ प्रारुपामध्ये ते सक्तीचे करण्याचे खंडाळयाच्या बैठकीमध्ये ठरले होते. आणि म्हणून शेतीचा विषय असेल, काही उद्योग करावयाचा असेल तर या ज्ञानाचा उपयोग त्यांना त्याठिकाणी करता आला पाहिजे अशी आपण त्यांच्यावर सक्ती केली पाहिजे. याठिकाणी आपण तशाप्रकारची सक्ती त्यांच्यावर केलेली नाही असे मला वाटते. त्यानंतर पृष्ठ क्र. 6 वर "शिकवावयाच्या अभ्यासक्रमांची गुणवत्ता, म्हणजेच समकालीन गरजांनुसार मनुष्यबळ विकसित करण्याची अभ्यासक्रमांची सक्षमता, नवीन अभ्यासक्रमांची नवीन वैशिष्टये आहेत आणि त्यांत नव्याने निर्माण होणाऱ्या शिक्षणशाखांचा अंतर्भाव आहे" असे म्हटले आहे. त्या शब्दाची पुनरावृत्ती मी करतो. नाहीतर पारंपारिक विद्यापीठांच्या बाबतीत माननीय सदस्यांनी शंका व्यक्त केली. त्याठिकाणी बी.ए. किंवा बी. कॉम. चे विषय शिकविले जातात ते आम्ही सुध्दा शिकवू असे जर असेल तर स्पर्धेमध्ये ही विद्यापीठे उतरतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ या पांरपारिक विद्यापीठांचे विषय तुम्हाला घेता येणार नाही अशी अट आपण घातली पाहिजे.

त्यानंतर पृष्ठ क्र. 7 वरील कलम 20 च्या पोट कलम 3 मध्ये "प्रत्येक विद्यापीठ, त्याच्या स्थापनेनंतर पाच वर्षाच्या आत, राष्ट्रीय मूल्यमापन व अधिस्वीकृती परिषदेकडून किंवा राष्ट्रीय अधिस्वीकृती मंडळाकडून, अधिस्वीकृती मिळवील" अतिशय चांगली अट घातली आहे. त्यामध्ये बेछूटपणा येणार नाही. त्यानंतर पृष्ठ क्र. 8 वर "दाननिधीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर विद्यापीठाच्या पायाभूत सोयींचा विकास करण्यासाठी करता येईल. परंतु, विद्यापीठाचा आवर्ती खर्च भागविण्यासाठी त्याचा वापर करता येणार नाही". मला असे वाटते की, नियमावली करतांना याठिकाणी कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तिसरा मुद्दा आरक्षणाचा आहे. याठिकाणी प्रत्येक गोष्टीमध्ये आरक्षण असले पाहिजे असे नाही. माननीय सदस्यांनी याठिकाणी पुणे कराराची माहिती दिली त्याप्रमाणे मी याठिकाणी माहिती देतो. ती माहिती माझ्या वाचनामध्ये आली आहे. ती कदाचित धनंजयरावांच्या पुस्तकामध्ये आहे. ज्यावेळी घटना समितीची बैठक चालू होती, आणि त्यावेळी रिझर्व्हेशनचे कलम आले त्यावेळी दुपारी चहापानाच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना डॉ. राजेन्द्र प्रसाद यांनी विचारले की, "आपने केवल 10 साल के लिए रिजर्वेशन क्यों रखा. हमारे लोगों ने तो आपके लोगों के साथ सदियों तक जानवर से भी बुरा ट्रीटमेंट किया है. 10 साल के बदले अगर आप 100 साल का भी रिजर्वेशन करते तो भी हम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण..

आपका विरोध नहीं करते." त्यांनी सांगितले की, तुम्ही 10 वर्षासाठी ठेवल्याचा उल्लेख केला. त्यावेळी डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले की, तुम्ही 100 वर्षे ठेवले असते तरी चालले असते. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले उत्तर सर्वांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. कारण डॉ. आंबेडकरांसारखा एक विचारी...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे...

(अडथळा)

श्री. मधुकर चव्हाण :सभापती महोदय, मी परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात बोलत नाही मी चांगले उदाहरण देत आहे...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी चांगले स्टेटमेंट केले आहे. परंतु त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, 10 वर्षाचे आरक्षण हे पोलिटिकल रिझर्व्हेशनसाठी आहे. ते दर दहा वर्षांनी वाढविले जाते. परंतु नोकरी आणि शिक्षण क्षेत्रातील आरक्षणासाठी कोणतीही कालमर्यादा नाही. तशाप्रकारची तरतूद राज्य घटनेमध्ये आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्यावे. त्याची थिअरी मी आपल्याला सांगतो. अतिशय संयमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व गोष्टींचा विचार केला होता. त्यावेळी ते म्हणाले होते की मला हे मान्य आहे. या राखीव जागा आपण ठेवल्या पाहिजेत. भारतीय जनता पार्टीचा त्याला विरोध नाही. त्यांचे वाक्य असे आहे की, तो एक दूरदृष्टीचा महान नेता होता. जाती जमातीसाठी सवलती दिल्या पाहिजेत. परंतु त्यांचे विकेंद्रीकरण होता कामा नये. हिंदू समाज विखुरला जाता कामा नये. तो एका राष्ट्रीय भावनेने बांधला जावा. याला डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी उत्तर दिले की, हे बरोबर आहे. माझा जो समाज आहे, त्याला जनावरापेक्षा वाईट वागणूक दिली जाते हे आपण मान्य केले पाहिजे. आपल्या समाजामध्ये एखादी हरिजन व्यक्ती घरामध्ये सारवण करण्यासाठी चालली परंतु ती आपल्या पंगतीला चालली नाही. आपण हे मान्य केले पाहिजे. परंतु त्याचबरोबर त्या महापुरुषाने असे उत्तर दिले होते की,....

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु....

ते म्हणाले की, एका प्रिव्हीलेज क्लासच्या विरोधात मी रिझर्व्हेशन ठेवलेले आहेत. जर मी कायम रिझर्व्हेशन ठेवली तर हा वेगळा प्रिव्हीलेज क्लास तयार होईल,त्याच्या विरोधात लढण्यासाठी आंबेडकर नसेल. म्हणून मला समाजात भांडणे लावायची नाहीत. हा 'नाही रे'वर्ग आहे, त्याला इतरांच्या बरोबर आणून ठेवायचा आहे. एकाला सांगायचे की तू मागे उभा रहा आणि दुसऱ्याला सांगायचे की तू पुढे जा. समान पातळीवर त्याला आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिक दृष्ट्या आणायचे आहे. एका समान पातळीवर आणल्यानंतर त्याला सांगायचे की, आता जा, तुझ्या गुणवत्तेवर तू पुढे जा. मला असे वाटते की, त्याच्या मागची ही भावना आहे, रिझर्वेशन असले पाहिजे, प्रमोशनमध्ये रिझर्व्हेशन असले पाहिजे. ते अधि□ 20 वर्षे रिझर्व्हेश-ा ठेवा, त्याबाबत वाद -ाही. अजू-ाही □रीब मा□ासवर्गीय मा□ासाला रिझर्वेश-ाचा फायदा मिळालेला -ाही, याच्याशी मी सहमत आहे. परंतु मी माझ्या जीव-ामध्ये शै□□□ संस्था अशा पाहिलेल्या आहेत □, त्या ठि□□ बौध्दि□ता, □ुणवत्ता हाच -ि□ष लावलेला आहे. हेही मला मा-य आहे □, अली□डे □ही लो□ांचे असे मत आहे □, 50,55, 60 टक□ मा□स् असलेल्या मा□ासव□ीय विद्यार्थ्याला मेडि□ल प्रवेश मिळतो. पण तसे होत नाही. त्या समाजात दे□ील अतिशय □ुणा-ा विद्यार्थी आहेत, त्यां-ी 80-85 टक□ मा□स् मिळविलेले आहेत, अशाच विद्यार्थ्या-ाच मेडि□लमध्ये प्रवेश मिळतो. 60-65 टक□ मिळविलेल्या विद्यार्थ्यां-ा प्रवेश मिळत -ाही. आर्थि□दृष्ट्या समा-ा पातळीवर ये□यासाठी रिझर्व्हेश-ा ठेवावे ला□ेल. परंतु ही ज्ञा-ाची □ोत्रे आहेत. आप□ येथे म्ह□तो □, ज□ाच्या बरोबर आपल्याला जायचे आहे. आज अमेरि□ सर्व ज□ाला □ुलाम समजते, त्यांची □ुलामि□रीची मा-ासि□ता बदलायची असेल तर या विद्यापीठातू-ा उच्च दर्जाचे ज्ञा-ा प्राप्त व्हायचे असेल तर त्या स्वयं आर्थि□ विद्यापीठामध्ये रिझर्व्हेश-ा असू -ाये, असे माझे मत आहे. शेवटी आप□ धो□ादाय□ □लम घालू-ा मोठी पळवाट ठेवलेली आहे. तुमचेच शि□□ सम्राट या लुपहोलचा फायदा घेतील. □लम 48 मध्ये असे म्हटलेले आहे □, "या अधि-ियमाच्या तरतुदी अंमलात आ□ता-ा, □□तीही अडच□ उद्भवल्यास शास-ााला, प्रसं□ानुरुप, अशी अडच□ दूर □र□याच्या प्रयोज-ां□रिता त्याला आवश्य□ ि□वा इष्ट वाटेल अशी, □□तीही □ोष्ट राजपत्रात आदेश प्रसिध्द □रु-ा, □रता येईल" जसे तुम्ही सा□ार□र□ा-ा लॉस □ेले त्यां-ा आप□ पैसे देता. □ो-ऑपरेटिव्ह सोसायटी लॉसमध्ये □ेली □ पैसे देता. माझे □दाचित अज्ञा-ा असेल, ते पहा. परंतु शास-ातर्फे □□तीही आर्थि□ मदत दिली जा□ार -ाही, असे या □लमामध्ये स्पष्ट □ेले पाहिजे. स्वयंसहाय्यित विद्यापीठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु....

अडच□ीत आले तर शास-ा त्यांच्या□डू-ा □ढू-ा घेऊ-ा चालवि□ार आहे □य ? त्यां-ाा तात्पुरती आर्थि□ मदत □र□ार आहे □य ? शास-ा सं□टाच्या □ळात मदत □रेल म्ह□जे □य ? डबघाईला आलेल्या सा□र□र□ा-यां-ाा तुम्ही आर्थि□ मदत □रता, लो□ं-ाी ठेवी ठेवलेल्या असतात त्या लुट□ाच्या संस्थां-ाा आर्थि□ मदत आप□ □रता, तसा त्या □लमाचा अर्थ आहे □य ? हे स्पष्ट □रावे.

सभापती महोदय,शेवटचा मुद्दा सां□तो □, धर्माच्या आधारावर अशी विद्यापीठे येऊ देऊ -ायेत. -ाही तर अलि□ढ विद्यापीठासार□ होईल. स्वयं अर्थसहाक्य्यत विद्यापीठ आम्ही □ढतो परंतु विशिष्ट धर्माच्याच लो□ं-ाा येथे प्रवेश दिला जाईल, असे □ठेही असता □मा -ाये. या प्रारुपाच्या संबंधात सुरुवातीला □ाज□मध्ये चर्चा झाली, त्यावेळेस मलाही बोलाविले, त्याबबदल मंत्री महोदय मी आपला आभारी आहे. आप□ मो□ळ्या म-ाा-े चर्चा □ली होती. मी मंत्री महोदयांचे व्यक्क्तश: अभि-ांद-ा □रतो. त्यांच्या प्रामा□ि□प□ाबद्दल आमचा विश्वास आहे परंतु त्यांच्या-ांतर दुसरे □ी□ येतील, ते प्रामा□ि□ असतीलच असे -ाही. मी शास-ा□र्त्यांबद्‌दल अतिशय स्पष्ट बोलतो □, □ही ला□ंवर आमचा विश्वास -ाही. □ी□त्याही □यद्याचा स्वत:च्या फायद्यासाठी □सा वापर □रु-ा घ्यायचा याबाबतीत □ही लो□ मातब्बर आहेत. प□ या बाबतीत □ी□ीही □यद्याचा ॲडव्हा-टेज घेता □मा -ाये. शेवटी ए□ □ोष्ट सां□तो □, व□ि□ टेरिटरी असायला पाहिजे. वे□ळे अभ्यास□म असायला पाहिजे, त्यांची स्वत:ची जमी-ा असली पाहिजे. या सर्व □ोष्टींबाबत शास-ााचे -ियंत्र□ असले पाहिजे. बा□ीच्या मुद्यां-ाा मी स्पर्श □रत -ाही. परंतु स-मा-ा-ीस सदस्य श्री.अरविंद सावंत यां-ाी अतिशय चां□ला मुद्दा मांडला □, त्या विषयांच्या संबंधात परी□ा □ी□ घे□ार ? -ाही तर माझ या विद्यापीठातू-ा लो□ चां□ले बाहेर पडले पाहिजेत, म्ह□ू-ा स□ळ्या विद्यार्थ्यां-ाा 100 टक्□ पास □रतील, त्याला □ाही अर्थ रहा□ार -ाही. म्ह□ू-ा परी□ा ही अतिशय स्ट्रीक्ट □शी राहील, त्या अभ्यास□मामध्ये तो विद्यार्थी तरबेज □सा हाईल, हे पाहिले पाहिजे. चां□ले अशाप्र□रचे विधेय□ आ□लेले आहे. विरोधी प□ाच्या सदस्यां-ाी □िंवा सत्ताधारी प□ाच्या बा□ंवर बसलेल्या सदस्यां-ाी ज्या □ही सूच-ाा □लेल्या आहेत, त्याचा -ियम आ□ि उप -ियम □रतां-ाा त्याचा विचार □रावा. प□ महाराष्ट्राच्या पुढच्या पीढीवर शै□ि□□दृष्ट्या अतिशय दूर□ामी आ□ि प्रभावी अशाप्र□रचा चां□ला परि□ाम होईल, या दृष्टी-े जे □ही लुपहोल्स आहेत ते बंद □रावेत. म्ह□ू-ा ज□ाच्या बरोबर आपल्याला जावयाचे असेल तर हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ MAP/ KGS/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरु....

विधेय□ चां□ले आहे. ही सुरुवात आहे. हळूहळू वर्षभरामध्ये अ-नुभव येत रहातील. शेवटची वि-नंती □रावयाची आहे □, मंत्री महोदय आप□ ए□ शब्द दिला होता □, सुरुवातीला आम्ही ती विद्यापीठे □शी चाललेली आहेत, हे पहा□यासाठी प्रायोगि□ तत्वावर चार-पाच संस्थां-ना मा-यता देऊ-न पाहू.

या-नंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी भीती व्यक्त केली की, दहा वीस लोक यासाठी रांगेत उभे आहेत. त्यांची पार्श्वभूमी, त्यांची शैक्षणिक पात्रता, त्यांचा प्रामाणिकपणा, यांच्याकडे असलेली उपलब्धता याचा विचार करुन वर्ष दोन वर्षात दोन चार लोकांनाच परवानगी द्यावी आणि अनुभव घेतल्यानंतर पुढचे निर्णय घ्यावेत. या चांगल्या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी सन 2006 चे वि. प. वि. क्र. 10 जे सभागृहासमोर मांडण्यात आले आहे त्याचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. मी सुरुवातीला माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना धन्यवाद देईन. या बिलाबद्दलची जी काही इंटरॲक्शन आहे ती फार मोठ्या प्रमाणावर केलेली आहे. पूर्वीचे मंत्री श्री. सुरेशदादा जैन यांनी या बिलाच्या बाबतीत सगळीकडे दौरा करुन शिक्षण क्षेत्रातील लोकांशी चर्चा केली. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सुध्दा सिलेक्ट कमिटीमध्ये तसेच परवा प्रेझेंटेशन दिले त्यामध्ये सर्वांना विश्वासात घेऊन हे बिल या ठिकाणी आणलेले आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देईन. आज या बिलाची फार मोठी गरज आहे. उलट यामध्ये एक वर्ष उशीर झालेला आहे असे मला वाटते. मागच्या वर्षीच आपले एक नोटिफिकेशन निघाले होते. त्यानंतर हे बिल सिलेक्ट कमिटीकडे गेले. त्यामुळे हा उशीर झालेला आहे. श्री. सॅम पित्रोडा यांनी मुंबईमध्ये एका भाषणात असे सांगितले की, आपल्या देशामध्ये कमीतकमी 2 हजार विद्यापीठे असण्याची गरज आहे. हे करावयाचे असेल तर शासनाकडे एवढे पैसे उपलब्ध आहेत काय ? हा सगळ्यात महत्वाचा विषय आपल्यासमोर येतो. या अधिवेशनाची सुरुवातच बॅकलॉगच्या चर्चेने झाली. आपल्याला पैसे कमी पडतात. विदर्भ, मराठवाडा या भागाचा बॅकलॉग पूर्ण करण्यासाठी पैसे कमी पडतात. आपल्याकडे फायनान्सची कमी आहे. हा खरा महत्वाचा मुद्दा आहे. म्हणून खाजगी क्षेत्राकडून यामध्ये गुंतवणूक व्हावी असा हेतू डोळ्यासमोर ठेऊन माननीय मंत्रिमहोदयांनी स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठाचे बिल या ठिकाणी मांडलेले आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा हा अत्यंत उच्च असला पाहिजे. आज आपल्या महाराष्ट्रामध्ये जगातील टॉपच्या 100 युनिव्हर्सिटीजमध्ये नाव येऊ शकेल अशा युनिव्हर्सिटीज फार कमी आहेत. पुणे युनिव्हर्सिटी सुध्दा जगातील टॉपच्या 100 युनिव्हर्सिटीमध्ये नाही. आपण सगळ्यात महत्वाची एक गोष्ट विसरुन जातो की, यामधला विद्यार्थी हा जो केंद्रबिंदू आहे तो फार चाणाक्ष असतो. कोणत्या विद्यापीठामध्ये ॲडमिशन घ्यावयाची आहे ? कोणत्या कॉलेजमध्ये कोणते कोर्सेस आहेत ? कोणत्या कॉलेजमधील स्टाफ कसा आहे ? कोणत्या कॉलेजची फी किती आहे ? याची सगळी माहिती घेतल्यानंतर तो ॲडमिशन घेतो. या ठिकाणी फी बद्दलची चर्चा झाली. हे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/ MHM/ SBT

डॉ. वसंत पवार .....

विद्यार्थी आपली जास्तीत जास्त काळजी घेत असतात. त्याला परवडेल अशाच ठिकाणी तो विद्यार्थी ॲडमिशन घेत असतो. त्यामुळे विद्यार्थी हा घटक यामध्ये लक्षात घ्यावा लागेल. आपल्याकडे अनेक इंजिनिअरींग कॉलेजेस आहेत. मागच्या वर्षी चार पाच हजार जागा रिकाम्या राहिल्या. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी ॲडमिशन घेतली नाही. कारण त्या संस्था तेवढ्या स्टॅण्डर्डच्या नाहीत. विद्यार्थी हा चाणाक्ष आहे. तोच त्याचे मेरिट ठरवत असतो हे आपण लक्षात ठेवणे महत्वाचे आहे. त्या कॉलेजचे, त्या विद्यापीठाचे इन्फ्रॉस्ट्रक्चर चांगल्या प्रकारचे कसे राहील याची दक्षता सरकारने निश्चितपणे घेणे गरजेचे आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये अनेक परदेशी युनिव्हर्सिटीजचे कॅम्पस येतात. ते मुलाखती घेतात आणि मुलांना ॲडमिशन देऊन घेऊन जातात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 18:05

(डॉ. वसंत पवार...)

ते जर आपल्याला करायचे नसेल तर आपल्या येथील लोकांना इन्व्हेस्टमेंट करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. याबाबतीत सुप्रीम कोर्टाच्या 7 जजेस्च्या बेंचने निर्णय दिलेला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त अधिकार हे मॅनेजमेंटला मिळणार आहेत. ज्याची इन्व्हेस्टमेंट जास्त असते त्याला जास्त अधिकार प्राप्त होतात. शासनाची यामध्ये इन्व्हेस्टमेंट नसेल तर शासनाला काहीही अधिकार राहाणार नाहीत. याठिकाणी मेरिट आणि क्वॉलिटी बाबत बोलले गेले. सभापती महोदय, निती, नियत आणि न्याय या गोष्टी सर्वात महत्वाच्या आहेत. सुप्रील कोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या चौकटीमध्येच हे विधेयक असले पाहिजे अन्यथा हे विधेयक अडचणीत येण्याची शक्यता आहे. या संपूर्ण गॅट कराराच्या पार्श्वभूमीवर मेरीट हाच खरा आमचा क्रायटेरिया आहे. ज्याच्याकडे मेरीट आहे परंतु पैसे नाहीत अशा विद्यार्थ्यांला मदत करण्याची भूमिका आपण सर्वांनी घेतली पाहिजे. मेरिटोरियस कॅण्डीडेटला संधी उपलब्ध करुन देण्याची जबाबादारी आपणा सर्वांवर आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी अमेरिकन स्टुडण्टस्पुढे भाषण करताना सांगितले की, " I request you to all the students that you have to improve your quality and your skills. Otherwise, all your jobs will be taken out by the Indians, Chinese and Asian country students. "माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी सामाजिक न्यायाची भूमिका ठेवलेली आहे. त्या भूमिकेचे मी स्वागत करतो. माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी देखील याठिकाणी आपले विचार मांडले. याठिकाणी मी सांगू इच्छितो की, विधिमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीने आमच्या संस्थेला भेट देऊन सर्व रेकॉर्ड तपासून पाहिले आणि त्यांना 100 टक्के बॅकलॉग भरल्याचे दिसून आले. जेव्हा सुप्रीम कोर्टाच्या 7 जजेस्च्या बेंचने निर्णय दिला त्यावेळी आमच्या मिटींगमध्ये मी सांगितले की, सरकार कायदा करील अथवा न करील, सुप्रीम कोर्ट निर्णय देईल अथवा न देईल, आम्ही आमची सामाजिक न्यायाची भूमिका सोडणार नाही. मेरिटला पर्याय ठेवावयचा अशी परिस्थिती आजच्या काळामध्ये राहिलेली नाही.  मेरिटला जास्तीत जासत प्रोटेक्शन देण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. या विधेयकाला माझा निश्चितच पाठिंबा आहे. परवा एका व्हाईस चॅन्सलरने मला सांगितले की, यामध्ये जे प्रायोजक मंडळ आहे त्यामधील ट्रस्ट काढून टाका. सेक्शन 25 प्रमाणे कपंनीला परवानगी द्या. असे केले तरच चांगले कॉम्पीटण्ट विद्यार्थी

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. वसंत पवार...)

तयार करता येतील. पब्लिक ट्रस्ट आणि को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांना देखील परवानगी दिलेली आहे. अशा संस्था यामध्ये आल्या तर त्या क्वालिटी आणि स्टॅण्डर्ड मेण्टेन करतील काय असा प्रश्न निर्माण होतो. या विधेयकाच्या संदर्भात सिलेक्ट कमिटीमध्ये देखील चर्चा झाली. ह्या कंपन्या डिव्हिडण्ड वाटतील असे सांगण्यात आले. मी सांगू इच्छितो की, सेक्शन 25 अंतर्गत ज्या कंपन्या पुढे येतील त्यांना डिव्हिडण्ड वाटण्याची आवश्यकता भासणार नाही. सहकारी संस्थांच्या बाबतीत मात्र फेर विचार करावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

..नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

त्याचप्रमाणे या बिलामध्ये अत्यंत चांगल्या सूचना आलेल्या आहेत. युजीसी च्या ॲक्टप्रमाणे जी काही स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे निर्माण होतील त्यासंदर्भात प्रत्येक विद्यापीठाच्या बाबतीत बिल दोन्ही सभागृहात बिल मंजूर व्हावयाला पाहिजे असे नाही. याठिकाणी फक्त नोटिफिकेशन काढून विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. सेक्शन (7) प्रमाणे दोन्ही सदनामध्ये अशा आशयाचा ठराव संमत केल्याशिवाय असे नोटिफिकश्ेान काढता येणार नाही. जर त्या विद्यापीठाला चांगला दर्जा द्यावयाची गरज असेल तर परवानगीसाठी सभागृहात बिल येणे आणि सदनाची मंजुरी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. कलम नं.7 मध्ये ज्या व्यक्तींसाठी हे विद्यापीठ खुले करणार त्यानुसार हे विद्यापीठ धर्म,वंश,लिंग,जात,पंथ,वर्ग जन्मस्थान,धर्मश्रध्दा किंवा राजकीय मत काहीही असले तरी सर्व व्यक्तींसाठी खुले असेल असे नमूद केले आहे. सगळया विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल आणि शिक्षकांना नोकरी दिली जाईल याचे मी मनापासून स्वागत करतो. परंतु कलमामध्ये या गोष्टी नमूद केल्यानंतर परंतुकामध्ये कोणतीही गोष्ट महिला,शारीरिकदृष्टया अपंग व्यक्ती आणि अनु.जाती व अनु.जमाती आर्थिकदृष्टया दुर्बल घटक यांच्यामधील व्यक्ती यांच्याकरिता विशेष तरतूद करण्यापासून विद्यापीठाला प्रतिबंध करणार नाही. कायदेशीर ज्या अडचणी येतील त्याचा विचार करुन ठेवा. माझी ओपन मागणी आहे की एससी,एसटी आणि ओबीसी हे शब्द त्याठिकाणी असायला हरकत नाही. कारण प्रायोजक मंडळाने ठरविले तर त्यांच्यासाठी काही जागा निश्चितपणे ते ठेवू शकतील. मुलींची फी सरकारकडून परत करण्यात येईल एवढे जरी सरकारने म्हटले तरी कोणीही असे करण्याची तयारी ठेवील. कारण प्रायोजक मंडळाची गुंतवणूक होणार आहे. फी ची बाजू सरकारने स्वीकारली तर कोणतीची अडचण येणार नाही. याचा विचार सगळयांनी करण्याची गरज आहे. कलम 9 मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, या अधिनियमान्वये स्थापन केलेले प्रत्येक विद्यापीठ स्वयं-अर्थसहाय्यित असेल,विद्यापीठास,शासनाकडून कोणत्याही स्वरुपाचे कोणतेही वित्तीय सहाय्य मिळविण्याचा हक्क असणार नाही. हे अगदी स्पष्ट आहे. कारण संस्था बंद पडली तरी शासन मदत करणार नाही किंवा टेकओव्हर करणार नाही. त्यांचा जो काही फंड असेल त्याच्यामध्ये कोणत्याही प्रकारची नि:संदिग्धता दिसत नाही. यासाठी मी सरकारचे मनापासून स्वागत करतो. विद्यापीठाचे कुलपती म्हणून राज्यपाल राहणार आहेत. तेच हवे आहेत. त्यामुळे विद्यापीठाला स्टेटस राहील. एकंदर कामकाजाचा सुध्दा दर्जा राहील. बाकीचे जे सगळे विषय

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 18:10

डॉ.वसंत पवार ...

आहेत म्हणजे मुलाखती,नियामक मंडळ, वित्त व लेखा अधिकारी हे सगळे विषय चर्चेमध्ये आलेले आहेत. त्या त्या वेळी गरज पडली तर त्यामध्ये बदल करण्याची पण सरकारची तयार असली पाहिजे.

नंतर भारवि

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार..

ते जे काही करतात त्यावेळी त्यांना अडचणी येतात. त्यातून मार्ग काढणे गरजेचे आहे. खंड 35 (1) विद्यापीठामध्ये देण्यात यावयाचा प्रवेश हा काटेकोरपण गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल असे आहे. हे जे कलम आहे, त्याचे मी स्वागत करतो. विद्यापीठाच्या परीक्षा होतात, पण निकाल तीन महिने लागत नाही. मी श्री.दिलीप वळसे-पाटील यांना धन्यवाद देतो. त्यांनी 30 ते 45 दिवसांमध्ये निकाल लावला नाही तर चौकशी केली जाईल नोटीस देण्यात देण्यात येईल असे सांगितले आहे. खंड 39 चे देखील मी स्वागत करतो. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध), अधिनियम 1987 लागू केले आहे. त्यामुळे विद्यापीठाचा कारभार पारदर्शी होईल. कॅपीटेशन फी न घेण्याची तरतूद केल्यामुळे मी मंत्रिमहोदयांची स्वागत करतो. मी जास्त वेळ न घेता या विधेयकाला माझे समर्थन देतो. या बिलाची आज गरज आहे. हे बिल आताच मंजूर करावे अशी मी सभागृहाला न्रम विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, या विधेयकावर अनेक सन्मानीय सदस्यांनी विचार व्यक्त केले आहेत. मी 2-3 मुद्दांचा उल्लेख करणार आहे. खरे म्हणजे सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात एक आमूलाग्र बदल करणारे विधेयक सभागृहासमोर आणले आहे. यासंबंधी यापूर्वी देखील अनेक वेळा चर्चा झालेली आहे. सादरकरणामध्ये अनेक मुद्दांवर, कलमांवर सविस्तर चर्चा झाली आहे. तसेच आता या सदनामध्ये गेल्या तीन तासापासून चर्चा सुरू आहे. या विधेयकाचे मी समर्थन करणार आहे. या विधेयकाच्या संदर्भात दिनांक 4 मार्च रोजी माननीय राज्यपाल महोदयांनी एक विधान केले होते, ते मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, खाजगी विद्यापीठ कायद्याच्या नावाखाली ठिकठिकाणी कुत्र्याच्या छत्रीसारखे दर्जा नसलेल्या शिक्षण संस्था उभ्या राहणार असतील तर ते योग्य नाही. सरकारने याचा जरूर विचार केला पाहिजे. दर्जा नसणाऱ्या खाजगी शिक्षण संस्था उभ्या राहणार असतील तर त्याने विद्यार्थ्यांचे आणि समाजाचे नुकसान होईल. शैक्षणिक पाया हा भक्कम असला पाहिजे. छत्तीसगडच्या कायद्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. तो महाराष्ट्र सरकारला मान्य करावा लागेल. छत्तीसगड राज्याचा निकाल लागण्या अगोदर आपण या विधेयकासंबंधी चर्चा सुरू केली होती. त्या निणर्यानंतर हे विधेयक आता चर्चेसाठी सभागृहासमोर येत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख करण्यात आला आहे त्या या विधेयकामध्ये निदर्शनास आल्या पाहिजेत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

महोदया, आपण गॅट करार स्वीकारलेला आहे. आपण स्पर्धेच्या युगात आहोत. त्यामुळे या स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्ताधारक विद्यापीठ सुरु करण्याशिवाय पर्याय नाही. या स्पर्धेच्या युगात शिक्षण हे सेवाक्षेत्रात मोडणार आहे. त्यामुळे सर्वांना ते खुले केले पाहिजे. त्या दृष्टिकोनातून हे विधेयक या ठिकाणी आणले असावे असे मला वाटते.

पान क्र.2 वर म्हटले आहे की, कोणालाही असे स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठ सुरु करता येईल. Page 2,in Section (2) (i) , it has been stated that :"A trust registered under the Bombay Public Trust Act, 1950 or a society registered under the Societies Registration Act,1860."आज महाराष्ट्रात ज्या काही शिक्षण संस्था आहेत, मग त्यामध्ये माध्यमिक शाळा असतील, उच्च माध्यमिक शाळा असतील, डीग्री कॉलेजेस असतील, या सर्वांसाठी कम्पलसरी केले आहे की, ती संस्था डी.टी.पी. आणि सोसायटी ॲक्ट खाली रजिस्टर असावी. परंतु या विधेयकामध्ये जे विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे ते यापैकी एका ॲक्टखाली रजिस्टर असले तरी चालू शकेल असे म्हटले आहे. त्यामुळे दोन्ही ॲक्टखाली हे विद्यापीठ रजिस्टर करण्यासंदर्भात शासनाने विचार करावा.

महोदया, विधेयकातील खंड-3 हा विद्यापीठाच्या उद्दीष्टांसंदर्भातील आहे. त्यातील (ट) च्या शेवटी "इतर कोणत्याही सांविधिक मंडळाने निर्धारित केलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसतील, याची सुनिश्चिती करणे ;" असा उल्लेख आहे. अशा प्रकारचे उद्दीष्ट ठरवून दिले आहे. परंतु हे उद्दीष्ट कोण निश्चित करणार आहे ? ते निश्चित करण्यासाठी आपल्याकडे काही यंत्रणा आहे काय ? जर असेल तर त्याबाबतचा उल्लेख होणे आवश्यक आहे. तसेच याच खंडातील (ठ) मध्ये "विद्यापीठ अनुदान आयोगाने आणि अन्य संबंधीत सांविधिक मंडळांनी वेळोवेळी दिलेल्या निदेशांचे किंवा मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन होत असल्याबद्दल सुनिश्चिती करणे." असा उल्लेख आहे. याही ठिकाणी पूर्वीचाच प्रश्न निर्माण होईल की, ही सुनिश्चिती कोण करणार आहे ? आपण जे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे, त्याची पूर्तता त्या विद्यापीठाकडून होते की, नाही, युसीजी ने जे नॉर्म्स ठरवून दिले आहे त्याची पूर्तता योग्य प्रकारे होते की नाही, याची पडताळणी कोण करणार आहे ? त्यामुळे या बाबतीत शासनाने पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

श्री.रामनाथ मोते....

महोदया, खंड-4 मधील (दोन) मध्ये "मागील पाच वर्षांतील लेखापरीक्षित लेख्यांसह प्रायोजक मंडळाच्या आर्थिक स्त्रोतासंबंधीची माहिती ;" असा उल्लेख आहे. महोदया, ही माहिती या विद्यापीठांना सादर करावी लागणार आहे. याचा अर्थ महाराष्ट्रामध्ये ज्या शिक्षण संस्था पाच वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत आहेत, त्यांनाच विद्यापीठ म्हणून मान्यता देण्याबाबत आपण विचार करणार आहात काय ? कारण स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे निर्माण करावयाची असल्याने, काही संस्था दोन-तीन वर्षांपूर्वी निर्माण झाल्या आहेत. मग त्यांच्यासाठी ही पाच वर्षांची अट आपण शिथिल करणार आहात काय ? कारण या संस्थांना दोन-तीन वर्षे झाल्यामुळे लेखापरीक्षित लेख्यांसंदर्भातील माहिती प्रायोजक मंडळास सादर करु शकणार नाहीत. मग अशा संस्थांचे आपण काय करणार आहात ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये खुलासा करावा.

महोदया, खंड-10 तील (एक) मध्ये "विद्यापीठ, मुंबई किंवा मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्रामध्ये असेल तर पाच कोटी रुपये" आणि (दोन) मध्ये "विद्यापीठ, मुंबई किंवा मुंबई उपनगर जिल्हा क्षेत्राच्या बाहेर असेल तर दोन कोटी रुपये "असे म्हटले आहे. मुंबई उपनगर हे केवळ ठाण्यापर्यंत आहे. ठाण्याच्या पुढील किंवा अन्यत्र ठिकाणचा जो भाग आहे, त्यासाठी दोन कोटी रुपयांची मर्यादा ठेवली आहे. मला वाटते मुंबई बाहेर सुध्दा ही मर्यादा पाच कोटी रुपयांचीच ठेवण्यात यावी. कारण श्रीमंतांची मुले या विद्यापीठांतून शिक्षण घेणार आहेत. देणगी किंवा शुल्क स्वीकारण्यासाठी या कायद्यामध्ये तरतूद केली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

एक हमी म्हणून ती सुध्दा पाच कोटी करण्यास हरकत नाही. विनाअनुदानीत संस्था, कायमस्वरुपी विनाअनुदानित संस्था यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. सभापती महोदय, अशा संस्था राज्याचे माजी माननीय मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांच्या मागदर्शनाखाली सुरु झालेल्या आहेत. कारण त्यांच्या हे लक्षात आले होते की, हा पैसा अन्य राज्यांमध्ये जात आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रातील विद्यार्थी दुसऱ्या राज्यांमध्ये गेल्यामुळे प्रचंड पैसा अन्य राज्यांमध्ये जात आहे. या राज्यातील पैसा याच राज्यात रहावा या उद्देशानेच हे आपण सुरु कले आहे. आज पॉलिटेकनीक कॉलेजची अवस्था काय आहे ? एका चांगल्या उद्देशाने ही कॉलेजेस सुरु झाली होती. पण हळुहळू ही सर्व कॉलेजेस बंद होत आहेत. काही ठिकाणी फक्त 60-65 प्राध्यापक आहेत. सर्व विद्यार्थी दिशाहीन झाले आहेत. 15-20 वर्षे नोकरी केलेले प्राध्यापक जॉबलेस झालेले आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देण्यात आलेले नाही. कायद्यामध्ये तरतूद असून देखील त्यांना संरक्षण देण्यात आलेले नाही. त्यामुळे अशा प्रकारची विद्यापीठे जर काही काळानंतर बंद होणार असतील तर त्याचाही विचार होणे आवश्यक आहे. या ठिकाणी कलम 45(2) मध्ये असे म्हटले आहे की, " विद्यापीठाच्या विसर्जनानंतर, विद्यापीठाची सर्व मत्ता व दायित्वे प्रायोजक मंडळाकडे निहित होतील. " दायित्व असेल तर ठीक आहे. परंतु त्यांची काही प्रॉपर्टी असेल जी संस्थेकडे राहणार असेल आणि त्यांना जर शासनाने संस्था सुरु राहण्यासाठी पूर्वी जागा दिली असेल तर ही सगळी प्रॉपर्टी त्या संस्थेला आपण देणार आहात का ? तरी, याचाही विचार होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कलम 46 मध्ये असे म्हटले आहे की, " विद्यापीठाला निदेशांचे पालन करणे आवश्यक आहे, तपासणी करण्याची शासनाला परवानगी असणार आहे आणि विशिष्ट उणीवा दूर करण्यास विद्यापीठांना निर्देश देण्याचे अधिकार शासनाला आहेत. " पण जर अशाप्रकारे निर्देश देऊनही संबंधित विद्यापीठाने किंवा तेथील व्यवस्थापकीय मंडळाने शासकीय आदेशांचे पालन केले नाही तर काय करणार ? सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी अनेक अनुभवी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. तरी, माननीय मंत्रिमहोदय, श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी मांडलेल्या विधेयकाचे समर्थन करतो व बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले धन्यवाद मानतो.

----

कर्नल सुधीर सावंत ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी उभा आहे. यावर या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेली भाषणे ऐकली आहेत. हे अत्यंत प्रगतीशील विधेयक आहे. या संदर्भात एक अतिशय महत्वाचा मुद्दा आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ MAP/ SBT/ प्रथम श्री. कांबळे.. 18:30

कर्नल सुधीर सावंत...

शिक्षणाचे जागतिकीकरण झालेले आहे, तंत्रज्ञान व इतर बाबतीमध्ये आज आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये आरक्षणाची सीमा राहिलेली नाही. हे होत असतांना लोक भारतातून हॉवर्ड, ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेण्यास प्राधान्य देत आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण हॉवर्ड सारख्या विद्यापीठात मिळते अशा प्रकारचे शिक्षण आपण भारतामध्ये देण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे. या दृष्टीने हे विधेयक अत्यंत योग्य वेळी आलेले आहे, असे मला वाटते. हिंदुस्थानामध्ये अशा प्रकारच्या शिक्षण संस्था निर्माण करण्याची नितांत गरज आहे. अमेरिकेमधून येऊन लोकांनी भारतात शिक्षण घेतले पाहिजे तरच जागतिक स्पर्धेमध्ये आपण टीकू शकतो. 14 ते 40 वर्षाचा वयोगट आपण पाहिला तर या राष्ट्राची संपत्ती खऱ्या अर्थाने संपन्न अशी आहे. तज्ज्ञांची आवश्यकता आज सेवाक्षेत्रामध्ये झपाटयाने वाढत आहे. हिंदुस्थानामध्ये तशा प्रकारचे अभ्यासक्रम, शिक्षणक्रम विद्यापीठामध्ये अस्तित्वात असावयास पाहिजेत. बायोटेक्नॉलॉजी, करमणूक इंडस्ट्री, अशा प्रकारचे शिक्षण जर आपण विद्यार्थ्यांना देऊ शकलो तर जगातील स्पर्धेला तोंड देऊ शकतो. आरक्षण असावयास पाहिजे त्याच्या विरोधात मी नाही, परंतु काही लोकांनी अशी भीती व्यक्त केली की, श्रीमंताच्या मुलांनाच शिक्षण मिळेल, गरीबांना शिक्षण मिळणार नाही, त्यांची ही भीती रास्त आहे, ती चूक आहे असे मी म्हणणार नाही. महाराष्ट्रामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी शिक्षण संस्था सुरु केलेल्या आहेत, अनेक इंजिनिअरींग व मेडीकल कॉलेजेस सुरु केलेले आहेत, त्यांची संख्या आता वाढलेली आहे. या कॉलेजेस मध्ये भारतातील लोक शिक्षण घेण्यासाठी येतात, अशा प्रकारच्या अभ्यासक्रमांच्या विविध संस्था वाढवावयास पाहिजेत, पूर्ण जगातील लोक भारतामध्ये शिक्षण घेण्यासाठी आले पाहिजेत, आपली मुले सुध्दा त्यामध्ये मागे राहू नये म्हणून आपण प्रयत्न करावयास पाहिजेत. त्यांचा बॅलन्स साधला गेला पाहिजे, त्यांच्याकडून आपण पैसा घ्या, तो पैसा मागासवर्गीय व गरीब विद्यार्थ्यांना अनुदानाच्या रुपाने देऊन त्यांना शिक्षण द्यावे, यामध्ये कोणतेही निर्बंध न ठेवता मुक्तपणे या विधेयकाला मोकळीक देऊन जास्तीत जास्त अभ्यासक्रम विद्यापीठामध्ये सुरु झाले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय सहकार्याने शिक्षण दिले गेले पाहिजे, एवढया सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----------

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद पदवीधर विभाग) : सभापती महोदय, आपल्याला कल्पना असेल की, मी येथे 4 तास बसून होतो नंतर थोडा वेळ बाहेर गेलो, हे विधेयक अत्यंत महत्वाचे असल्यामुळे या विधेयकावर मला माझे विचार मांडण्यासाठी थोडा जास्त वेळ द्यावा, अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये एस.एस.सी. पास होण्याऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मराठवाडयात पाहिली तर ती 3 लाख 97 हजार इतकी आहे, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सरासरी 25 लाखाच्या आसपास असण्याची शक्यता आहे, आकडेवारीमध्ये चूक होऊ शकते. तसेच एच.एस.सी. पास होण्याऱ्याची संख्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 12 ते 12.50 लाख इतकी आहे, यातून पदवीधर होणाऱ्यांची संख्या अंदाजे 4 ते 5 लाख इतकी आहे. म्हणजे महाराष्ट्रातील दरवर्षी एस.एस.सी. ड्रापआऊट होणाऱ्यांची संख्या 10 लाख इतकी आहे. हे 20 लाख मुले दरवर्षी शेतीसाठी आवश्यक आहेत काय ? एस.एस.सी. पास झालेले विद्यार्थी उद्योगासाठी आवश्यक आहेत काय ? ते घरकामासाठी आवश्यक आहेत काय ? सन 2020 मध्ये भारताचा व महाराष्ट्राचा जेव्हा नकाशा काढण्यात येईल तेव्हा महाराष्ट्रामध्ये 5 लाखाहून अधिक विद्यार्थी हे वेगवेगळया टेक्निकल एज्युकेशन, मॅकेनिकल, हिंस्ट्री, फिजिक्स, बायोटेक्नॉलॉजी व संपूर्ण इंजिनिअरिंग विभागामध्ये मुलांना शिक्षण मिळावयास पाहिजे, नाही तर यामध्ये बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होईल व तो सुटू शकणार नाही.

...... यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

आणि म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगतो की, The objectives of university shall be मी तुमच्या समर्थनार्थ उभा आहे. आणि ज्या चुका झाल्या आहेत त्या सांगण्यासाठी उभा आहे. (a) to provide instructions, teaching and training in Higher and Technical Education and make provision for research and to create higher levels of intellectual abilities. यामध्ये कुठेही To provide better employment opportunities.

हा विषय आपण विसरला. हे विद्यापीठ कशासाठी आहे? बेरोजगारीचा जो भस्मासूर आलेला आहे, आपण रंग दे बसती सिनेमा पहा. "अपनी तो पाठशाला, मस्तीकी पाठशाला" हे गाणे त्यामध्ये आहे. सद्याची आपली विद्यापीठे ही मस्तीकी पाठशाला अशाप्रकारची विद्यापीठे आहेत. या विद्यापीठामधून 5 लाख विद्यार्थी असतील, माझ्या आकडेवारीमध्ये थोडाफार फरक पडेल. महाराष्ट्राची आकडेवारी गोळा करण्याचा माझ्यावर कधीही योग आला नाही कारण मी मराठवाडयाच्या पातळीवर काम करतो. मी मराठवाडा विद्यापीठाची आकडेवारी काढली आणि त्यांना विचारले की, तुम्ही दरवर्षी देत असलेल्या डिगऱ्यांपैकी किती लोकांना नोकऱ्या देता? फक्त एक टक्का विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामधून आणि स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठामधून नोकऱ्या मिळतात. And 99 per cent students who gets graduate degrees directly goes to Home.त्यांना काहीही मिळत नाही. आपण वेगवेगळया बैठका घेतल्या, खूप चर्चा केली. मागील वेळेस सुध्दा बोललो होतो की, किमान पदवीधर आमदारांना घेऊन आपण एक बैठक घ्यावी. परंतु आपल्याला ते जमले नाही. त्यामुळे आम्हाला जे बेसिक विषय सांगावयाचे होते ते सांगता आले नाहीत. ऑब्जेक्टीव्ह ऑफ द युनिव्हर्सिटीमध्ये if we create better employment opportunities असे वाक्य घातले असते तर ते चांगल झाले असते.

आता इंडिया टुडे मध्ये एक चांगला लेख छापला. टू मेनी जॉब्स व्हेरी फयू टॅलेंट. एक कोटी जॉब्स या देशामध्ये वाट बघत आहेत. परंतु फक्त 5 ते 6 लाख जॉब्सला सॅटिसफाईड करणारे टॅलेंट आपण प्रोडयूस करु शकतो. या उच्च शिक्षणाची किती दुर्दैवी परिस्थिती आहे. आणि म्हणून या उद्देश व कारणांमध्ये आपण असे टाकले पाहिजे की, After the independence, the Government of Maharashtra has miserably failed to create job opportunities. कुठल्या सरकारचे आहे हे मी म्हणत नाही परंतु काही गोष्टी सरकारने मान्य केल्या पाहिजेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

And to produce a good intellectual capacity and to give a real job competence and living confidence in the youths. आणि म्हणून या ठिकाणी एम्प्लॉयमेंटचा विषय यायला पाहिजे होता. आणि जगण्याचा आत्मविश्वास देणारी उच्च शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी यंत्रणा निर्माण करावयास पाहिजे होती. त्याचा कुठेच उल्लेख नाही याचा मला धक्का बसला. मंत्रिमहोदय, शिक्षण व्यवस्थेचा आत्मा काय आहे याचा आपण विचार करावयास हवा होता. मी मागील भाषणामध्ये आपल्याला सांगितले होते. Basically, urge of knowledge should be the soul of the education system.नॉलेजचा पत्ता संपूर्ण विधेयकात कुठेही लिहिलेला नाही. त्यामुळे आपण त्या ब्युरॉक्रेटीक सर्कलमध्ये आणि ऊर्जेमध्ये एवढे अडकला की, या विधेयकाला गंभीरतेने घेण्यास वेळ मिळालेला नसेल. आणि म्हणून मला वाटत होते की, आपल्यासारखा कॉपिटंट माणूस हे सर्व करु शकला असता. या ठिकाणी विरोध करणाऱ्या माननीय सदस्यांना आपण दाखविले असते की, दरवर्षी 15 लाख विद्यार्थी एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढे काहीही न केल्यामुळे एक एकर शेतीमध्ये घरातील कुटुंबातील किती माणसे काम करणार? बायको काम करणार, मुलगा काम करणार. ते काय काम करणार हे आपण एकदा ठरवा. आणि म्हणून जर तुम्ही सांगितले असते की, These are the job opportunities then ..लोकांना वाटले असते की, हे होत आहे ते चांगले होत आहे. ही आकडेवारी आपण आपल्या उद्देश व कारणांमध्ये कां नमूद केली नाही हे मला समजले नाही?. आणि म्हणून आज महाराष्ट्राची आकडेवारी लक्षात घेतली तर किमान 1 कोटी एस.एस.सी. उत्तीर्ण झालेले बेरोजगार आहेत ही वस्तुस्थिती आहे. घरी आईवडिलांच्या शेतीवर फुकट काहीतरी खातो, आणि रिकामपणामध्ये असलेले उद्योगधंदे करतो, काहीच जमले नाहीतर राजकारणामध्ये कुणाच्या तरी मागेपुढे फिरण्याचे काम करतो. सन 2020 मधील महाराष्ट्र तुम्ही असा बघितला आहे काय? प्रत्येकाला 8 तास व्यवस्थित काम मिळाल्यानंतर व ते काम केल्यानंतर तो महिन्याचा व्यवस्थित पगार घेऊन जात आहे अशी आपण व्यवस्था करु शकत नाही कां? ती व्यवस्था करण्यासाठी हे विधेयक आणले आहे असे जर स्पष्ट झाले असते तर खूप चांगले झाले असते. आता मी पूर्वपिठीकेमध्ये न जाता विधेयकावर बोलतो. या विद्यापीठाच्या संदर्भात माझ्या दृष्टीने चार महत्वाचे भाग आहेत. त्यामध्ये पहिला भाग म्हणजे ही मुले स्वत:च्या पायावर कां उभी राहू शकत नाहीत? त्यासाठी आपल्याकडे नॉलेज देण्याची व्यवस्था विद्यापीठामध्ये केली नाही फक्त डिग्री देण्याची

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )4B 3

DGS/ SBT/ MAP/ 18:35

श्री.श्रीकांत जोशी...

व्यवस्था केली आहे. त्याकरिता नॉलेज देण्याची सिस्टीम आपण आणली पाहिजे. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे व्यवस्थापन कसे असावे या करिता विद्यापीठाला आपण स्वायत्तता देण्याची आवश्यकता होती.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरु...

याचा अॅकडमिक दृष्टीकोन कसा वाढवावा याबाबतची स्वायत्ता विद्यापीठाला द्यायला पाहिजे होती. कोणताही अॅकॅडॅमिशियन फार इंटरेस्टेड असेल तर तो चालत नसतो. माननीय मंत्रिमहोदय सगळ्यांचे म्हणणे ऐकून घेत आहेत त्याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांचे कौतुक केले पाहिजे. कोणत्याही ॲकॅडॅमीशियनला लोकांचा फार इंटरफिअरन्स आवडत नसतो, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सरकारचा संबंध कोठे यायला पाहिजे ? याविषयी निश्चित धोरण असले पाहिजे. What is the role of the Governance of the Government ? गव्हर्नमेंटची यातील जबाबदारी काय आहे ? मला ज्ञान घ्यायचे आहे, मला शिकायचे आहे. मंत्री महोदयांनी ज्ञानेश्वर विद्यापीठाचे उदाहरण दिले, ते बरे झाले. पण त्याचबरोबर याच महाराष्ट्रामध्ये गेल्या काही वर्षामध्ये लोकांनी येऊन परस्पर किती हजार कोटीचा व्यवसाय केला ? याचे कोठेतरी रेकॉर्ड झाले पाहिजे. एक डॅक कोर्स आला, एक कोडॅक कोर्स आला, एक सॅप आला, एक इआरपी आला. छोट्याछोटया ठिकाणी लातूर, सिकंदराबादला कोण कोण आले ? त्या ठिकाणी सॉफ्टवेअर शिकवितो असे म्हणाले. 20-20, 25-25, 50-50 हजार रुपये देऊन दर वर्षी 5 हजार कोटी, 7 हजार कोटी असे करत करत गेल्यावर्षी 8 ते 10 हजार कोटी रुपयाचा बिझनेस आय.टी.मध्ये झाला. ज्याला कोणत्याही सरकारची मान्यता नाही. आपण एवढा रिझर्व्हेशनचा खटाटोप करतो. सॅपला कोणती रिझर्व्हेशनची पॉलिसी होती ? अेआरपीला कोणती रिझर्व्हेशनची पॉलिसी होती ? त्यांना कोणी विचारले काय ? 25 हजार रुपये फी घेऊन धडाधड मुलांना अॅडमिशन्स दिली. छोट्या मोठया खेड्यात 25 लाख रुपये जमा झाले. अेआरपीच्या बाबतीत कोणीच काही विचारले नाही. मुले सगळी बेरोजगार राहिली. मी अशा प्रकारची शेकडो उदाहरणे देऊ शकतो. म्हणून नॉलेज सिस्टीमच्या बाबतीत शासन किती कंट्रोल आणणार आहे ? तो कंट्रोल शासन आणू शकणार आहे काय ? याचा विचार करावयास. राय विद्यापीठ आले होते ते निघून गेले. म्हणून गव्हर्नमेंटच्या स्वत:च्या काही मर्यादा आहेत हेही या ठिकाणी सांगायला पाहिजे होते. We do not have to control the Education System capacity.

सभापती महोदय मला अजून बोलायचे आहे. मी एक दुबईचे उदाहरण देतो. दुबईतील शेख याची इंटेलेक्चुअल कॅसिटीची काय आहे. शारजा येथील शेख यांनी अडीच हजार कोटी

...2...

SKK/ SBT/ MAP/

श्री. श्रीकांत जोशी .....

रुपयाचे विद्यापीठ स्थापन केले. त्याला मी म्हटले की, श्री. शेख तुमचा तर लॉ वेगळा आहे. त्यावर तो म्हणाला जोपर्यंत माझा लॉ माझ्या देशाच्या विरुध्द आहे असे मला वाटत नाही तोपर्यन्त मी हे काम करु देतो. ज्या दिवशी मला वाटेल की हे देशाच्या विरुध्द आहे तर मी त्यांना हाकलून देऊन सगळाच्या सगळा कोर्स ताब्यात घेऊ शकतो. असा हुकूमशाही डिक्टेटरशीपचा किंग असताना अडीच हजार कोटीची इन्व्हेस्टमेंट शारजा मध्ये येते. दीड-दोन हजार कोटीची इन्व्हेस्टमेंट दुबईमध्ये येते. त्या ठिकाणी नॉलेज व्हीला तयार होतात आणि जबरदस्त पध्दतीने एकाहून एक युनिव्हर्सिटीमध्ये या देशातील, महाराष्ट्रातील मुले लाखो रुपयाची फी देऊन शिक्षण घेण्यासाठी कोणी सिंगापूरला जातो, कोणी दुबईला जातो, कोणी मॉरिशसला जातो आणि आपण मात्र हे पहात बसतो, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून ही विद्यापीठे कशाप्रकारच्या संकल्पनेने आणायची आहेत ? त्याचे नेमके प्रारुप काय आहे ? त्यामध्ये गव्हर्नमेंटचा रोल काय आहे ? या विषयीची स्पष्ट कल्पना दुर्दैवाने यामध्ये कोठे दिसत नाही. सगळे कन्फ्युजन आहे. मी उद्देश व कारणांच्या संबंधात सांगितले तसे पुढे म्हटलेले आहे की, 3(k) "to ensure that the standard of the degrees, diplomas, certificates and other academic distinctions conferred by a university are not lower that those etc. etc." सगळी नावे कळत नाहीत. Further, in Clause 3(l), it has been stated that: " to ensure the compliance of the directions or guidelines issued, from time time, by the University Grant Commission and other concerned statutory bodies." मंत्री महोदय, आपल्या महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये 5 हजार प्राध्यापक नेटसेट नसल्यामुळे त्यांना ॲडहॉकवर ठेवलेले आहे. नेटसेट पास झालेला एकही प्राध्यापक आम्हाला मिळत नाही. सगळी कॉलेजेस ओस पडायची वेळ आलेली आहे. विद्यापीठाच्या ॲक्टमध्ये तरतूद अशी आहे की, 6 महिन्याच्या कालावधीसाठी दोनवेळाच एक्स्टेन्शन देता येते. ते सगळे मोडून काढून दोन दोन वर्षाची त्यांना एक्स्टेन्शन कॉन्ट्रक्ट बेसीसवरील प्राध्यापकांना द्यायला लागलेला आहत. उद्या विद्यापीठे निघाली आणि नेटसेट झालेले लोक जास्त पगार मिळतो म्हणून त्या ठिकाणी गेली तर आपल्या विद्यापीठाकडे नेटसेट उत्तीर्ण झालेले कोणीच रहाणार नाहीत. कॉलेजे ओस पडतील. मी यु.के

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री. श्रीकांत जोशी ....

मधील प्रोफेसर हे दुसरे काय काम करतात याबाबतची माहिती मागविली. त्याप्रमाणे तेथील प्राध्यापक हे तीन कंपन्यांचे डायरेक्टर म्हणून काम करतात आणि बिसनेस विषयातील तज्ज्ञ म्हणून 6 महिने बिझनेसचे टिचिंग करतात. त्या प्राध्यापकांना 50 लाख डॉलर पगार मिळतो. म्हणून तशा प्रकारची कल्पना या ठिकाणी मांडायला पाहिजे होती. आता नेटसेट राहिलेले नाही. फिजिक्सचा विषय असेल तर त्यामधील एक प्राध्यापक हा लाईट या विषयाचेच शिकविणार, लाईट शिकविणारा प्राध्यापक साऊंडचा विषय शिकविणार नाही.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ......

दुसरा येतो तो फक्त साऊंडच्या बाबतीतच शिकवतो. तिसरा येतो ते केमिस्ट्रीमधला मोल कंसेप्ट शिकवतो. चौथा येतो तो फक्त केमिकल बाँडींगच शिकवतो. They are experts in their own studies, faculties and topics only. अशा पध्दतीची सिस्टीम यावयास लागली आहे. तुम्ही यामध्ये जी तरतूद केली आहे त्यामध्ये येणाऱ्या युनिव्हर्सिटीने युजीसीकडे जावयाचे, युजीसीचे क्वालिफाईंग क्रायटेरियाचे प्राध्यापक बघावयाचे. ते प्राध्यापक उपलब्धच नाहीत. आता एखाद्याला मेडिकल विद्यापीठ काढावयाचे असेल तर त्यांनी मेडिकल विद्यापीठासाठी काय करावयाचे ? आपल्यासारखा पोस्ट ग्रॅज्युएट असला पाहिजे. कारण तसे तुम्ही या विधेयकामध्ये लिहिले आहे. पोस्ट ग्रॅज्युएट झालेले डॉक्टर्स तुमच्याकडे उपलब्ध आहेत काय ? आपण वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री आहात. आपल्याला डॉक्टर्स मिळतात काय ? आपल्याकडे जे डॉक्टर्स आहेत त्यांना पाय धरुन थांबवावे लागते. पोस्टग्रॅज्युएट झालेला, इतकी वर्षे टिचिंग असलेला, त्याला आपण प्रोफेसर करणार. या सगळ्या क्रायटेरियामध्ये एक तरी विद्यापीठ येऊ शकेल काय ? याबाबत आपण छातीठोकपणे उत्तर द्यावे. नंतर क्रायटेरिया रिलॅक्सेशनची मागणी होणार. नाही तर आमच्यापैकी कोणीतरी उठून म्हणणार की, हा कायदा असताना या कायद्याचे व्हायोलेशन झाले आहे त्यामुळे चौकशी समिती नेमावी. आपण कोठल्या दिशेला जावयाचे हे एकदा सांगा. आपण सगळ्या ट्रॅडिशनल युनिव्हर्सिटीबाबत आणि ट्रॅडिशनल काऊन्सिलबाबत सांगितले. मी आपल्याला काही उदाहरणे सांगतो. एखाद्याला जर युनिव्हर्सिटी ऑफ स्पोर्टस् काढावयाची असेल, एखाद्याला युनिव्हर्सिटी ऑफ म्युझीक काढावयाची असेल, एखाद्याला युनिव्हर्सिटी ऑफ सिव्हिल एव्हीएशन अँड एअर ट्रॅफीक काढावयाची असेल, खगोलशास्त्राची एखादी युनिव्हर्सिटी काढावयाची असेल, पब्लिसिटी आणि मिडियाची एखादी युनिव्हर्सिटी काढावयाची असेल तर त्यांनी कोणाचे ॲप्रूव्हल घ्यावयाचे ? हे आपण मला एकदा समजावून सांगावे. त्या पब्लिसिटीमधला एक्स्पर्ट कोठून आणावयाचा ? तसा शहाणा माणूस युजीसीमध्ये आहे काय ? त्याला आपण कोठून पकडून आणावयाचे ? अशी मी शंभर नावे काढलेली आहे. पण वेळ कमी असल्यामुळे मी सांगू शकत नाही. पेट्रोकेमिकल्सची एक युनिव्हर्सिटी आहे. परवा मी त्याचे सगळे लिटरेचर घेतले. पेट्रोकेमिकल्सच्या युनिव्हर्सिटीसाठी लागणारे सगळे लेक्चरर्स, प्रोफेसर्स हे तुमच्यापैकी एकालाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

माहीत नाहीत. एखाद्याला युनिव्हर्सिटीला दी इंटरनॅशनल लॉ हा कोर्स सुरु करावयाचा आहे. इंटरनॅशनल लॉ च्या बाबतीत सगळ्या तपासण्या करायला आपले बार काऊन्सिल ऑफ इंडिया सक्षम आहे काय ? मग आपण काय करावयाचे ? त्याबाबतचा उल्लेख या विधेयकामध्ये नाही. कॅम्पस युनिव्हर्सिटीला हे कंपल्सरी केलेले आहे. त्यामुळे जी चांगली विद्यापीठे यावयाची आहेत ती पळून जातील आणि नको ती साडेसाती येईल की काय ? अशी वस्तुस्थिती आहे. याबाबत शासनाने आम्हाला वस्तुनिष्ठपणे सांगावयास पाहिजे. आता पुढच्या काळामध्ये 1 लाख लॉ ग्रॅज्युएट्सना ऑन लाईन काम करण्याची आऊटसोर्सीन्गची अपॉर्च्युनिटी महाराष्ट्रात येणार आहे. त्यामुळे एखाद्याला जर लॉ ची युनिव्हर्सिटी काढावयाची असेल तर त्यासाठी येत असताना ही बंधने बघून तो पळूनच जाईल. एवढे असूनही तो आला तर तो एक तर येतानाच बदमाश असला पाहिजे. त्याच्यामध्ये गव्हर्नमेंटकडून वाटेल ते करुन घेण्याची ताकद असली पाहिजे. नाही तर तो पळून गेला पाहिजे. म्हणून मी म्हटले की, या बिलाची रचना पारदर्शक पध्दतीने केलेली नाही. त्याचप्रमाणे दुसरी एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो. पृष्ठ क्रमांक 4 वर 4(2) मध्ये असे म्हटले आहे की, " The information regarding financial resources of the sponsoring body along with audited accounts for the past five years."एखादी नवीन कंपनी काढली असेल आणि त्यांना विद्यापीठ स्थापन करावयाचे असेल, एखादा नवीन ट्रस्ट स्थापन केला असेल आणि त्यांना विद्यापीठ स्थापन करावयाचे असेल, 100 इंटेलेक्च्युअल एकत्र येऊन त्यांना विद्यापीठ स्थापन करावयाचे असेल तर त्यांनी पाच वर्षाचे ऑडिटेड बॅलंस शीट कोठून द्यावयाचे ? वैयक्तिकरित्या आम्ही सगळे कॉम्पीटंट आहोत. समजा मला, तुम्हाला आणि सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांना विद्यापीठ काढावयाचे असेल तर ते आपण काढू शकणार नाही. कारण आपली पाच वर्षाची बॅलंस शीटच नाही. In clause 2 (v), it has been stated that:" The availability of land and details of buildings infrastructure facilities, if already exist." मला याबाबतीत एक गोष्ट सांगावयास पाहिजे की, याबाबतीत थोडेसे स्पेसिफाय करण्याची गरज होती. परत मी एकदा आपल्याला सांगू इच्छितो की, खरोखरच जागेची अट आपण टाकावयास पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. श्रीकांत जोशी .....

कॅम्पस युनिव्हर्सिटीला जागा लागतेच ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे किमान 25 एकर, 30 एकर अशी काही ना काही अट तुम्ही टाकावी. शेवटी या युनिव्हर्सिटीज तुम्ही मुंबईच्या फ्लॅटमध्ये नेणार असाल तर ते चुकीचे आहे. मला असे वाटत नाही की, लँडलेस युनिव्हर्सिटीज, कॉम्प्युटराईज्ड युनिव्हर्सिटीज यामध्ये असाव्यात. यामध्ये दुसरा एक महत्वाचा विषय आहे. Details of study centers, to be started in next five years. त्यांना महाराष्ट्राच्या बाहेर स्टडी सेंटर्स काढता येतील की नाही ? त्यांना भारताच्या बाहेर स्टडी सेंटर्स काढता येतील की नाही ? याबाबत या बिलामध्ये स्पष्टता नाही. याबाबत उल्लेख बिलामध्ये उल्लेख नाही. महाराष्ट्राच्या बाहेर ज्युरिसडीक्शन करावयाचे की नाही ? महाराष्ट्राच्या कायद्यातून निर्माण झालेल्या युनिव्हर्सिटीला महाराष्ट्राच्या बाहेर जाऊन आपले सेंटर्स काढता येतील की नाही ? असा कायद्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. आपण कॅम्पस युनिव्हर्सिटीज म्हणतो तसेच स्टडी सेंटर्स म्हणतो. स्टडी सेंटर म्हणजे ते कॉलेज नाही काय ? त्या ठिकाणी जाऊन फक्त अभ्यास करावयाचा असे होणार आहे काय ? समजा एखाद्याने संभाजीनगरला किंवा पुण्याला एखादी युनिव्हर्सिटी काढली आणि त्याचे स्टडी सेंटर जर हिंगोलीला काढले तर अप्रत्यक्षपणे हिंगोलीला कॉलेजच सुरु झाले असे होईल.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी...)

एखादी ॲग्रिकल्चरल प्रोसेसिंग युनिव्हर्सिटी पुण्याला काढली आणि स्टडी सेंटर ऑफ कॉटन हिंगोलीला काढून त्याठिकाणी ॲडमिशन द्यायला सुरुवात केली तर ते आपल्याला चालणार आहे काय ? हे असे चालवायचे की नाही हा तुमचा चॉईस आहे. पण हे आपण ठरविले पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, कॅम्पस युनिव्हर्सिटीची कन्सेप्ट एखादा स्वीकारल्या नंतर स्टडी सेंटरला नेमके काय स्वरुप प्राप्त होणार आहे हे स्पष्ट झाले पाहिजे, त्याची लॅण्ड देखील क्लिअर झाली पाहिजे. Agriculture process University should also be there. Sir, a provision is made for the constitution of the Committee. The committee shall consist of following members and two experts in the concerned filed of higher education is to be nominated by the Govt. in that Committee. असे लिहिलेले आहे. मला अजूनही असे वाटते की, कन्सर्ण्ड सब्जेक्टचा एक्सपर्ट् हा चेअरमन असावा तो प्रिसिपल सेक्रेटरी नसावा. कारण प्रिन्सिपल सेक्रेटरी ऑफ हायर एज्युकेशनने उद्या वेळ दिलाच नाही तर काय करायचे ? महात्वाची अडचण अशी आहे की, आपण एक स्पेसिफिक डेट ठेवता आणि त्या डेटला सर्व ॲप्लिकेशन्स आले पाहिजेत असे तुम्ही सांगता. मग एखाद्याला विद्यापीठ काढावयाचे असेल तर त्याला विशिष्ट मुहूर्ताची काय गरज आहे, असा प्रश्न निर्माण होतो. ही सायण्टिफिक कमिटी राहील. त्या त्या विषयाचा चेअरमन, ज्याला तुम्ही अपॉईण्ट कराल तोच स्क्रुटिनी कमिटीचा चेअरमन असला पाहिजे.That he may be the under the Head of the expert.कारण आपल्या सेक्रेटरीने वेळ दिला नाही, त्याने बैठका घेतल्या नाहीत तर एक्सपर्टची फार मोठी अडचण होऊन जाईल. तो काहीच करु शकणार नाही. आपले प्रिन्सिपल सेक्रेटरी ऑफ हायर एज्युकेशन यांना भेटायचे म्हटले तर ते खूप कठीण असते. मग 50 युनिव्हर्सिटीज काढायच्या म्हटल्या तर त्यांनी त्यासाठी कसा काय वेळ द्यायचा ? प्राध्यापकांचे प्रश्न, त्यांच्या बदल्या असे अनेक प्रश्न आपल्या समोर आहेत. मला अजूनही असे वाटते की, त्या एक्सपर्ट कमिटीचे हे सदस्य असायला हरकत नाही. तुम्ही सदस्य म्हणून एक्स जॉइण्ट डायरेक्टर घ्या, एक्स आय.ए.एस. ऑफिसर घ्या, एक्स सेक्रेटरी घ्या, एक्स डायरेक्टर ऑफ पोलिटेक्निक घ्या आणि एक दोन सेक्रेटरी सदस्य म्हणून घ्यायला हरकत नाही. परंतु प्रिन्सिपल सेंक्रेटरीला चेअरमन केले तर त्या चेअरमन शिवाय कोणतेही पान हलणार नाही आणि मग स्क्रुटिनीमध्ये

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी...)

ट्रान्स्परन्सी येण्याऐवजी गव्हर्नमेंट इन्फ्ल्युअन्स येण्यास सुरुवात होईल.. दुसरी गोष्ट म्हणजे या संबंधीचा रिपोर्ट स्टिप्यूलेटेड टाईममध्ये शासनाला सादर झाला पाहिजे. Sir, while drafting the Bill, there should not be any ambiguity. याबाबतीत ॲटॉनॉमस फंक्शनिंग झाले पाहिजे. There should not be any interference of the Govt. in the functioning of the University. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, याबाबतीत विशिष्ट कालमर्यादा ठेवली पाहिजे. तुम्ही कमिटीला 3 महिन्याचा वेळ दिलात तर त्या वेळेमध्ये त्या कमिटीने काम केलेच पाहिजे. तुमच्या सेक्रेटरीला वेळ मिळत नाही म्हणून कोणत्याही एखाद्या व्यक्तीचे विद्यापीठ थांबू शकेल. या प्रोसेसमध्ये पोलिटिकल इन्टरफिअरन्स यायला सुरुवात झाली की मग नॉलेजेबल पर्सन्स बाहेर जातात आणि अन्य लोक तेथे येऊन बसतात. म्हणून यामध्ये intigrety of the sponsering== हे कुठेच लिहिलेले नाही. उद्या दाऊद इब्राहीम इथे कॉलेज काढणार असेल तर त्याला तुम्ही परवानगी देणार आहात काय? Integrity urge for education, ही कुठे ना कुठे घेतली पाहिजे इण्टिग्रिटीला आपण स्पेसिफिक वेटेज दिले पाहिजे. इण्टिग्रिटी डाऊटफूल आहे. मोठमोठे उद्योगपती येत आहेत असे आपण सांगितले, ही चांगली गोष्ट आहे. कोणताही एखादा उद्योगपती विद्यापीठ चालवू शकणार नाही. त्यांचा हा रोल असतो की,ण्ण्ण The role of Industries is that they get research done by the Scholars. स्वत:चा उद्योग वाढविण्यासाठी त्याला स्कॉलर्सकडून काम करुन घ्यावे लागते आणि त्या बदल्यात तो काही इन्व्हेस्टमेंट करीत असतो. यामधील सर्वात महत्वाचा विषय हा आहे की, जनरल फंड In Section 11 of the Bill it has been stated that "Every university shall also constitute a fund call the General Fund which shall consist of, - (b) any contributions made by the sponsoring body or any donation or gift received; and income from any other source." यातील सर्वात मोठे डोनेशन जे असते ते reseach work sold to be sponsoring body. यातील किती डिव्हिडण्ट हा रिसर्च करणा-या स्कॉलरकडे जाणार आहे ? विद्यराथ्र्यांकडे किती जाणार आहे ? की, सर्वच रिसर्चचा पैसा स्पॉन्सरिंग बॉडीकडे राहाणार अहे? हा माझ्या पुढील सर्वात मोठा प्रश्न आहे. म्हणून या स्पॉन्सरिंग

..3..



(श्री. श्रीकांत जोशी...)

डोनेशन मधला income from any other source. हे वेगळे हेड ठेवले पाहिजे. 50 % of that income should be spent on the students facilities. आता जेवढी विद्यापाठें आहेत. त्या विद्यापीठामध्ये होत असलेले रिसर्च हे इफेक्टिव्हली सेल करुन मोठ्या प्रमाणावर पैसा जमा केला जातो ही वस्तुस्थिती आहे. Thus knowledge can create wealth but wealth can not purchase the knowledge. ्या सिध्दांतावर सर्व जगाने विद्यापीठे काढलेली आहेत. आपल्याकडे मात्र अत्यंत चुकीच्या पध्दतीने ह्या गोष्टी होत आहेत. पेमेंट ऑफ सॅलरिज अलॉउन्सेसची प्रायॉरिटी खूप खाली ठेवलेली आहे. या प्रॅायारिटीच्या बाबतीत मी परत एकदा सांगतो की, विद्यापीठाचा संपूर्ण आत्मा हा क्वालिफाईड स्टाफ असतो. स्पॉन्सरिंग बॉडी, गव्हर्निंग बॉडी यांना 12 (e) मध्ये पाचव्या क्रमांमावर प्रायॉरिटी दिलेली आहे.

...नंतर श्री. कानडे...

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ MHM/ SBT/ 18:55

श्री. श्रीकांत जोशी...

सभापती महोदया, 12(e) मध्ये त्यांनी पेमेंट कसे करावयाचे याबद्दल माहिती दिलेली आहे. पहिले पेमेंट कशाचे करावयाचे तर " Payment of Salaries and allowances of the officers and employes etc.,दुसरे Payment of the cost of audit carried out for the purpose of this Act तिसरे For meeting the expenses of any suit or proceedings to which the university is the party चौथे आणि पाचवे पेमेंट आपण दिलेले आहे ते Payment of salaries and allowances of the officers and employees as well as members of the teaching and research staff." इत्यादी. शिक्षक म्हणून मी म्हणत नाही. पण लक्षात ठेवले पाहिले की विद्यापीठ हे फॅकल्टी चालवीत असते. फॅकल्टी विद्यापीठ चालवत नसेल तर मला असे वाटत नाही की कोणत्याही उद्योगपतीला विद्यापीठ चालविण्याचा अधिकार आहे. कुठल्याही एखाद्या स्पॉन्सरर बॉडीला असू शकत नाही. आज आपण पाहतो की, एखाद्या चांगल्या शिक्षण संस्थेचा दर्जा चांगला आहे की खराब आहे हा सगळयात पहिल्यांदा ठरतो तो तेथील चांगल्या शिक्षकांवर ठरतो. प्राध्यापकांवर आणि चांगल्या फॅकल्टीवर ठरतो. जर त्यांना चांगल्या फॅकल्टी नसतील तर कुठल्याही शिक्षण संस्था चांगल्या समजल्या जात नाहीत. चांगली फॅकल्टी बघून चांगले विद्यार्थी तेथे येतात आणि चांगले विद्यार्थी बघितल्यानंतर चांगले विद्यापीठ समजले जाते. बिल्डींग,लॅन्ड हे सेकंडरी असते. म्हणून मी म्हटल्याप्रमाणे या मधील ज्या प्रॉयॉरिटी आहेत त्या तुम्ही पहिल्या प्रॉयॉटिवर घ्या तरच ही विद्यापीठे टिकतील. सध्या पाहिलेल्या प्रॉयॉरिटी बघून एक भीतीचे वातावरण निर्माण झ ाालेले आहे. त्यानंतर चान्सलर आणि प्रो-चान्सलर यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. खरेच आपल्याला चान्सलरला त्रास द्यावयाचा आहे काय ? चान्सलर गेल्याशिवाय पदवीदान समारंभ होणार नाही. चान्सलरकडे पत्र गेले आणि त्याने उत्तर दिले नाही की विद्यापीठ लटकले म्हणून समजा. याच्यामध्ये पदवीदान समारंभाच्या कार्यक्रमाला को-चान्सलरचे नाव द्यावयाचे ठरले होते. शासनाने दिले नाही. मंत्रीमहोदयांना माझी हात जोडून विनंती आहे की, व्हाईस चान्सलरचे पद सुध्दा तुम्ही बदला. प्रिन्सीपॉल किंवा चीफ ऑफ द ॲकडमी असे वेगळे नांव द्या. आम्ही तुम्हांला बैठकीच्या वेळी तशी विनंती केली होती. त्यातून जर विद्यापीठाचे रेप्युटेशन झाले तर We will allot them Vice-Chancellorship. पण आता काहीच नसताना कुलगुरु, उपकुलगुरु कशासाठी ? आपला सगळयात महत्वाचा रोल असला

.....2

श्री. श्रीकांत जोशी ....

पाहिजे आणि तो म्हणजे ॲडमिशन ऑफ दी स्टुडंट. येथे खरी म्हणजे सरकारची पहिली जबाबदारी आहे. ॲडमिशन होताना कोणत्याही विद्यार्थ्यांची कोणत्याही प्रकारे पिळवणूक होणार नाही याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. त्याविषयी काहीच बोललो नाही. कुठली एंटरन्स एक्झ ाम घ्यावयाची याविषयी बोललो नाही. एंटरन्स एक्झामिनेशनमध्ये बाहेरच्या विद्यापीठाच्या स्कोअरवर ॲडमिशन दिल्या जातात. आपण ते मान्य करणार काय ? आयआयटीच्या एंटरन्स एक्झामिनेशवर कुणी प्रवेश देणार नाही. बाकी कुठल्याही परीक्षेला आपण परवानगी देणार नाही. मला असे वाटते की, Either reputed Institution should hold the entrance examination or the entrance test or examination should be carried out under the strict supervision and scrutiny of the Government..याविषयी माझा स्पष्ट आणि स्वच्छ आग्रह आहे आणि तो मंत्रीमहोदयांनी नोट करुन घ्यावा. शासनाला जर असे वाटत असेल की स्वायत्तत्ता धोक्यात जात आहे तर तर टॅलेटेंड मुलांचा ज्याठिकाणी अपमान होत असतो त्या मुलांना खड्डयात घालून कुठलीही स्वायत्त संस्था टिकू शकत नाही. चांगला हुशार मुलगा नको आणि अनटॅलेटेंड मुलगा पाहिजे फक्त तो जवळचा आहे म्हणून असे असेल तर ही अत्यंत घातक गोष्ट आहे. म्हणून ॲडमिशनच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की कायद्यातील हे कलम बदलण्यात यावे आणि Admissions should be made on the merits only and the process of examination or entrance tests should be 100 per cent transparent and open for the Government's inspection. याच्यामध्ये काय अडचण आहे समजत नाही. ॲडमिट एकदा झाला की तो संपला. ॲडमिशन देतानाच जर पैसे घेऊन होत असतील कशी पारदर्शकता राहणार आहे. ॲडमिशन या विषयामध्ये शासनाने आग्रही रहावे अशी मी विनंती करतो. बाकी छोटया छोटया गोष्टी आहेत परंतु ज्या 2/3 महत्वाच्या गोष्टी आहेत त्या सांगणे आवश्यक आहे. स्वत:हून परीक्षा घेण्याच्या संदर्भात सांगितले त्याचप्रमाणे डिक्लेरेशन ऑफ रिझल्टच्या बाबतीत मी सांगितले. याबाबतीत 45 दिवसांची मुदत दिलेली आहे ती योग्य आहे. पण काही परीक्षांचे रिझ ल्ट कंपाउंडींग असतात काही ठिकाणी एक्झामिनेशनची सिस्टीम वेगवेगळी असते.यामध्ये इनीशिअल काळामध्ये काही अडचणी त्यांना येऊ शकतात. त्यादृष्टीकोनातून नियम ठरविण्याच्या बाबतीत काही

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

रिलॅक्सेशन मागितले आहे किंवा रिझल्टची सिस्टीम मागितली आहे. आपल्याला असे वाटते की, रिझल्ट एखाद्या विद्यापीठामध्ये कुणाला तरी मॅनेज करुन देऊन टाकला किंवा दिला किंवा विद्यार्थ्याची पिळवणूक केली तर काय करावयाचे ? काही ठिकाणी रिझल्ट अडवून ठेवला जातो हे होणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी अशी मी विनंती करतो. On page 19 of the Bill, Clause41(2), it has been stated that: "A copy of the annual accounts together with the audit report and the observations, if any, of the Governing Body, shall be submitted to the Government." यामध्ये सरकारचा रोल काय आहे ऑडीट कॉपी केली पुढे काय ? माझे असे म्हणणे आहे की, आपल्या महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनकडे चांगले लोक आहेत त्यामुळे My suggestion is that you may please make an appointment of a Chartered Accountant.

नंतर भारवि ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सी.ए.ने त्यांच्या बॅलन्सशीटची स्क्रूटीनी केली पाहिजे. In case, having mal-practices, either in the admissions of the students or giving salaries and facilities to the teaching staff or selling research work done by the students... या विषयी शासनाच्या कॉमेंट आल्या पाहिजेत. या कायद्याचा 10-15 वर्षानी फटका बसू नये म्हणून सांगत आहे. समजा एखाद्या विद्यार्थ्याने शोध निबंध लिहिला आणि तो कोटयवधी रुपयाला विकला तर... त्यासंबंधींची काहीही तरतूद या कायद्यामध्ये नाही. संभाजी नगर येथील एमआयटी सारख्या खाजगी इंजिनिअरींग कॉलेजमधील 15 इंजिनिअरींगच्या मुलांनी एक शोधनिबंध लिहून रुपये 15 लाख मिळविले आहेत. तेव्हा काहीना काही ॲनालिसिस करून मॅनेजमेंटला सांगण्याचा अधिकार असला पाहिजे. हा माझ्या दृष्टीकोनातून सर्वात महत्त्वाचा विषय आहे. पण त्याचा यात कुठेही उल्लेख नाही. ज्या गोष्टी सरकारी अधिकाऱ्याला कळत नाहीत, त्यात त्यांनी दहा पाने या कायद्यात टाकलेली आहेत. आम्ही शिकवायला गेल्यानंतर आम्हाला पगारच दिला जात नाही. लाखो रुपयाची परस्पर वसुली केली जाते. आज शासकीय इंजिनिअर कॉलेजमधील प्राध्यापकांना पैसे मिळतात का ? खाजगी इंजिनिअरिंग कॉलेजचा खर्च गृहीत धरून फीचे स्ट्रक्चर ठरविले आहे. यात शासनाचे अनुदान नाही हे मला मान्य आहे. आज अशी स्थिती आहे की, खाजगी इंजिनिअरींग कॉलेजमधील प्राध्यापकांना दहा दहा महिने पगार मिळत नाही. यासंबंधी आपण काहीही करू शकलेलो नाही. इथेच खरे एक्सप्लॉयटेशन होते. तेवढा पुरता जरी चार पानांचा सुटसुटीत कायदा केला असता तर बरे झाले असते. आता सगळे पॉलीटेक्निक कोर्सेस बंद होत आहेत, असे श्री.मोते साहेबांनी सांगितले आहे. त्याप्रमाणेच अशी विद्यापीठे येतील आणि जातील. माझ्या दृष्टीकोनातून There should be a strict control over it of the Government. As far as admission of students, salaries and qualification is concerned, a criteria should be laid down. दुर्दैवाने तसा कायदा आलेला नाही. म्हणून मला पाठिंबा देताना साांगवयाचे आहे की, बिना कामाच्या ज्या गोष्टी आहेत त्या दूर केल्या पाहिजेत. विद्यार्थ्यांना प्रवेश, प्राध्यापकांना पगार, हा कायद्याप्रमाणेच मिळाला पाहिजे. As per the Universities Act, पोलीस केस असेल तर व्ही.सी.चे पत्र घ्यावे लागते. उद्या अशी परवानगी या विद्यापीठांना देणार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ कानडे.. 19:00

श्री.श्रीकांत जोशी....

आहे काय ? या विद्यापीठांना CRPC लागू होत नाही. तो शासन लागू करणार आहे काय ? अन्य जी विद्यापीठे आहेत त्यांचा दर्जा अशा विद्यापीठांना शासन देणार आहे काय ? Whether Workmen Compensation Act will be applicable? हे प्रथम क्लिअर झाले पाहिजे. जाता जाता मी दोनच महत्त्वाच्या सूचना करणार आहे. लातूरमध्ये विद्यापीठ काढावयाचे म्हटले तर ते काढता येणार नाही. याला कारण आज मराठवाडा विभागामध्ये एक फूट सुध्दा जागा शिल्लक नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

पुणे आणि मुंबई मध्ये कोणी जर अशा प्रकारचे विद्यापीठ स्थापन करणार असेल तर, त्या ठिकाणी आपण इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन देणार आहात. मग जो भाग मागासलेला आहे त्या ठिकाणी असे विद्यापीठ जर कोणी स्थापन करावयास तयार असेल तर त्या ठिकाणी सुध्दा तशाच प्रकारच्या सवलती देण्यास आपल्याला काय अडचण आहे ? Why the Government is not coming into the role of participation in universities? Why the Government is not thinking to come into the role of participation in universities, if it fits for it?

त्यामुळे याचाही विचार होणे आवश्यक आहे. As per clause 9, the university shall not be entitled to any financial assistance of any nature from the Government. Thus it will be strictly un-aided and Government has no authority to finance it. हे जे कलम टाकले आहे त्याबाबत विचार होणे आवश्यक आहे, रिझर्व्हेशनचाही विचार करावा लागणार आहे. महोदया, या विधेयकाला पाठिंबा देत असताना भावी काळात येणारी आव्हाने ओळखून या कायद्याची पुनर्रचना करावी, एवढीच या चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 19:05

श्री.दिलीप वळसे-पाटील (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदया, या सदनामध्ये वि.प.वि.क्रमांक-10, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक सभागृहात मांडले आहे.

या विधेयकावर सत्ताधारी आणि विरोधी बाजूच्या दोन्हीही सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली आणि दर्जेदार चर्चा कसल्याही प्रकारचा राजकीय वा अन्य अभिनिवेष न बाळगता केल्याबद्दल मी प्रथम त्यांना धन्यवाद देतो. साधारणत: चार तास चर्चा या विधेयकावर झाली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेतला असून, काही सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घेता आला नाही. राज्य सरकारचे धोरण, राज्य सरकारची निती आणि नियत, ही सामाजिक न्यायाच्या संदर्भात, आर्थिकदृष्टया मागासलेल्यांच्या संदर्भात, अतिशय सार्थ अशीच आहे. त्यामुळे या संदर्भात कोणाच्याही मनात शंका असण्याचे कारण नाही.

मी अगोदरच सांगितले आहे की, एखादी नवीन गोष्ट करण्यास ज्यावेळी सुरुवात करतो त्यावेळी त्यामध्ये सुरुवातीला काही अडचणी असू शकतात. या सभागृहात या विधेयकावर खूप चर्चा झाली. खाजगीत सुध्दा चर्चा झाली, शिवाय या विधेयकाच्या संदर्भात ज्यावेळी प्रेझेंटेशन करण्यात आले त्यावेळी देखील काही चर्चा झाली. त्यावेळी दोन्ही बाजूंकडून मते मांडण्यात आली. एका बाजूला हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे असे सांगितले गेले. त्यानुसार हे विधेयक अगोदर संयुक्त समितीकडे पाठविले होते. त्या समितीमध्ये सुध्दा या विधेयकावर चर्चा झाली. काही मते अशीही व्यक्त झाली की, शासनाचे या विद्यापीठांवर अजिबात नियंत्रण असू नये. परंतु मी सांगू इच्छितो की, ही विद्यापीठे स्थापन करण्यासाठी सर्वच मंडळी काही परदेशातून येणार नाहीत. आपल्याकडे देखील जगात श्रीमंत असलेल्या व्यक्ती आहेत. त्यामुळे या विद्यापीठांवर शासनाचे नियंत्रण असावे की, असू नये हा देखील महत्वाचा भाग आहे. परंतु जर विद्यापीठे स्थापन करणारी मंडळी गुंतवणूक करणार असतील तर, शासनाकडून त्यांच्यावर कमीतकमी नियंत्रण ठेऊन, त्यांना जेवढी मोकळीक देणे शक्य आहे तेवढी देण्यात येईल. प्रवर्तक स्वायत्त असावा की नसावा, याबाबत चर्चा झाली आहे. मी सांगू इच्छितो की, अभ्यासक्रम कोणता निवडावयाचा याबाबत प्रवर्तकाला स्वातंत्र्य असल्याचे विधेयकात नमूद केले आहे.

.3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.भारवि.... 19:05

श्री.दिलीप वळसे-पाटील....

महोदया, आरक्षणाच्या संदर्भात सुध्दा या ठिकाणी चर्चा झाली. अशी भावना मांडली गेली की, कदाचित या विधेयकामुळे सामाजिक न्यायाच्या तत्वाला शासन हरताळ फासण्यास निघाले की, काय ? परंतु याबाबत चुकीचा मेसेज बाहेर जाऊ नये असे मला वाटते. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सांगू इच्छितो की, 1994 च्या महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यातील सेक्शन 7 आणि 65 कडे मी त्यांचे लक्ष वेधू इच्छितो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

महाराष्ट्र युनिव्हर्सिटीज ॲक्ट हा या महाराष्ट्रामध्ये वर्षानुवर्षे चालत आलेला ॲक्ट आहे. या कायद्यांतर्गत 12-12 विद्यापीठे आपण स्थापन केलेली आहेत आणि त्यांचा कारभारसुध्दा सुरु केला आहे. सभापती महोदय, Section 7(2) (a) reads as under: " The university shall adopt Government policy and orders issued, from time to time, in regard to the reservation for Scheduled Castes, Scheduled Tribes, (De-notified Tribes),(Vimukta Jaties), Nomadic Tribes and Other Backward Classes for appointment to different posts of teachers and non-teaching officers and employees and for the purpose of admission of students in the affiliated or conducted colleges, university departments, university institutions or recognised institutions." ही टिचिंग स्टाफ, नॉन टिचिंग स्टाफच्या संदर्भातील तत्वे आहेत. सभापती महोदय, सेक्शन 65 मध्ये ॲडमिशन संदर्भात एक तरतूद आहे. सभापती महोदय, Section 65 reads as under: " In accordance with the reservation policy of the State Government for the for the weaker sections of society, admissions to all courses in the university department and affiliated colleges shall be made on the basis of competitive merit in accordance with the rules, if any,made by the State Government and published in Official Gazette or by the university and published in the university gazette by the Universities." यामध्ये 27 टक्के, 52 टक्के असे कोठेही म्हटलेले नाही. त्यामुळे मागासवर्गीयांना प्रवेश मिळण्याच्या कामांमध्ये कोणताही अडथळा आलेला नाही. राज्य सरकार टाईम टू टाईम निदेश देईल आणि त्या निदेशांची अंमलबजावणी करण्याचे काम या विद्यापीठांचे असेल. राज्य सरकार सामाजिक न्यायाच्या, आरक्षणाच्या भूमिकेपासून बाजूला जायला निघालेले आहे, अशा प्रकारची भूमिका तुम्ही कृपया घेऊ नका. आपण गैरसमज करुन घेऊ नका. सुप्रिम कोर्टाच्या 7 न्यायाधीशांच्या बेंचने निर्णय दिल्यानंतर, खाजगी व सरकारी शिक्षण संस्थांमध्ये ओ.बी.सी.ला तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

राहूदेच पण एस.सी., एस.टी.ला सुध्दा आरक्षण ठेवता येणार नाही आणि राज्य सरकारला आपल्याला तशी सक्ती करता येणार नाही. अशाप्रकारचे जजमेंट सुप्रिम कोर्टाच्या बेंचने दिल्यानंतर कुठल्या राज्य सरकारला या संदर्भात अधिकार आहे ? आरक्षणाच्या संदर्भात तरतूदी करताना महाराष्ट्र युनिव्हर्सिटी कायद्यातील काही तरतुदी, राज्यघटनेतील काही तरतुदी या सर्वांचा अभ्यास करुन चांगले ते निवडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी अजुनही असे मानत नाही की, हे बील परिपूर्ण आहे. यामध्ये त्रुटीही असू शकतात तसेच अधिक सुधारणांचीही गरज लागेल. ज्यावेळी आपण नवीन गोष्टी करायला निघतो, त्यावेळी प्रश्न निर्माण होतो की, ती स्टार्टर करायची की नॉन स्टार्टर करायची ? आरक्षणाच्या संदर्भात घेतलेल्या सुप्रिम कोर्टाच्या भूमिकेबाबत देशात शिक्षणमंत्र्यांची परिषद झाली. राज्याच्या वतीने मीही तेथे जाऊन सामाजिक न्यायाची भूमिका मांडली, त्या ठिकाणी माझे लेखी भाषण दिले. आमची अपेक्षा अशी होती की, केंद्र सरकारने आरक्षणाच्या संदर्भात जी काही टक्केवारी ठरवायची ती ठरविली पाहिजे, संसदेने ते बील मंजूर केले पाहिजे. परंतु तसे करण्याऐवजी संसदेने कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंट केली आणि राज्य सरकारांना आरक्षण ठरविण्याच्यासंदर्भात मुभा दिली. त्या संदर्भातील कायदा राज्य सरकार काही दिवसांतच करेल. आम्ही त्याच प्रोसेसमध्ये आहोत. या संदर्भात निर्णय घेता येईल, असे मी प्रत्येक वेळा सांगितले आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे.. 19:15

श्री. दिलीप वळसे-पाटील...

आज मी आपणाला एवढे सांगू इच्छितो की, या विधेयकाच्या माध्यमातून ज्या ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत अनेक काही शब्द वापरले आहेत त्याच्याबद्दल माला काही म्हणावयाचे नाही, परंतु या महाराष्ट्रामध्ये राज्य सरकारने ज्या ज्या वेळी काही नवीन प्राजेक्ट सुरु करण्याची वेळ आली त्यावेळी राजकीय व्यक्तींनी वेगवेगळया भूमिका घेतल्या, त्यामुळे या राज्यामध्ये मोठमोठे प्रोजेक्ट येऊ शकले नाही, मोठे आयटी पार्क येऊ शकले नाहीत हे सर्व प्रोजेक्ट हैद्राबाद व बंगलोर येथे गेले आपण त्याची नुसती चर्चा करतो. आज दिल्ली येथे हॉस्पिटल, मेडीकल कॉलेज यांच्या माध्यमातून सरकार काम करतांना एका वर्षामध्ये 500 कोटी रुपये मिळतात. आपणाकडे यासाठी दरवर्षी 10 ते 20 कोटी रुपये तरतूद होते. मेडीकलच्या क्षेत्रात सरकाने काम करावे अशी अपेक्षा राहणार त्यामुळे नवीन प्रश्न निर्माण होते. कर्नाटक येथे एक पावर प्रोजेक्ट प्रकल्प गेलेला आहे हा प्रकल्प केंद्र सरकारच्या माध्यमातून सरकारने खाजगीकरणाच्या भूमिकेतून तेथे स्वीकारलेला आहे त्यातून त्यांना 15 टक्के पावर मिळणार आहे. आज ज्या ज्या ठिकाणी इलेक्ट्रीक पॉवरचे प्रकल खाजगीमध्ये गेलेले आहेत ते समर्थपणे उभे राहून त्यातून त्यांना पॉवर मिळत आहे, याबाबत दिल्ली सरकारने भूमिका घेतलेली आहे. आज खाजगी प्रकल्पांच्या माध्यमातून 1 लाख मेगावॅट वीज निर्माणकरण्याचे उद्दिष्ट केंद्र सरकारने ठरविलेले आहे. त्यावेळी एन्रॉनसारखा प्रकल्प आपण बासनात गुंडाळून ठेवला होता. केंद्र सरकारने वीज नियामक आयोग 2003 मध्ये मंजूर केल्यानंतर वीज निर्मितीस खाजगी क्षेत्राला परवानगी मिळालेली आहे. त्यामुळे मोठमोठया कंपन्याना वीज निर्मितीची करण्याची परवानगी मिळालेली आहे. आज या देशामध्ये ज्या ज्या ठिकाणी विजेचे खाजगीकरण झाले त्या त्या ठिाकणी प्रगती झालेली आहे. आता इतर ठिकाणी प्रगती सुरु झालेली आहे. माझी आपणाला विनंती आहे की, या प्रश्नाकडे मोकळया व खुल्या नजरेने पाहावे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा संकोचित हेतू ठेऊ नये. समजा आता सभागृहाची भावना लक्षात घेऊन जर हे विधेयक मी विथ्ड्रा केले तर आपल्या राज्यात शिक्षण क्षेत्रात कोणालाही प्रवेश मिळणार नाही, आपल्या राज्याची इतर राज्याच्या मानाने शिक्षणात प्रगती होणार नाही. मग यातून अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी, महिला, दुर्बल घटक यांना कोणालाच काहीच मिळणार नाही, गरीबाला शिक्षण मिळणार नाही, कारण एवढा पैसा शासन खर्च करु शकणार नाही, शासनाच्या तिजोरीत

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

पैसा नाही, त्यावर बंधने आहेत, आपणाला खर्च करता येणार नाही. आमचे सहकारी प्रा. पुरके साहेब मागे बसलेले आहेत, त्यांच्या शालेय शिक्षण विभागाची तरतूद फक्त 10 ते 11 कोटी रुपयांची असते, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची 1500 कोटी रुपयांची तरतूद असते. मेडीकल एज्युकेशनला 700 कोटी रुपये लागतात, 12 ते 17 कोटी रुपये राज्यामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये खर्च केले जातात. आम्ही अजूनही येथे 2 री 3 री व 4 थीच्या रिक्त जागांच्या संदर्भात चर्चा करीत आहोत. ही वस्तुस्थिती आहे. एका बाजूला आंतरराष्ट्रीय दर्जाची गुंतवणूक आपणाकडे येत असतांना, शिक्षण क्षेत्रामध्ये नवीन नवीन दालने विद्यार्थ्यांना खुली करुन देणे आवश्यक आहे. सेवाभावी संस्था यामध्ये काम करीत असतांना ते धंदा करीत आहेत असे म्हणणे उचित होणार नाही. त्यांनी शिक्षण व्यवस्थेमध्ये लक्ष घालून ज्ञान दानाचे काम करीत असतांना त्यांच्यावर टीका होते. मी आपणास चायनाचे उदाहरण देतो चायना येथे झपाटयाने इंग्रजी शिक्षण धेण्यात येत आहे. ते लोक अमेरिका, इंग्लड, येथे जाऊन इंग्रजी शिकत आहेत. चायना येथील लोकांना कळले की इंग्रजी शिकणे अत्यंत आवश्यक आहे, ते लोक सांगत आहेत की आम्हाला इंग्रजी शिकवा. चायनामध्ये इंग्रजी भाषा शिकणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येत आहे. त्यांना माहिती झाले आहे की, आपण इंगजीशिवाय जागतिक स्पर्धेमध्ये टीकू शकणार नाही. या देशामध्ये शिक्षणाची प्रगती होऊन प्रगत टेक्निशियन मिळाले तर या राज्याची प्रगती होईल, युको टुरिझमच्या माध्यमातून प्रगती करण्याबाबत अनेक वेळा आपण चर्चा केलेली आहे.

यानंतर श्री. सरफरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील..

आणि म्हणून वेगवेगळया क्षेत्रामध्ये आता सरकारी गुंतवणूक आपण करु शकत नाही. या राज्याचा शिक्षण मंत्री म्हणून पाच वर्षे केंद्र सरकारकडे भांडतो की तुम्ही आम्हाला एम्स द्या, तुम्ही आम्हाला आएएम द्या. परंतु त्या संदर्भात गुंतवणूक करण्यामध्ये सुध्दा केंद्र सरकारच्या मर्यादा जरुर आहेत. म्हणून या क्षेत्राच्या संदर्भात निश्चितपणे वेगळया भूमिकेतून पाहिले पाहिजे. दुसरा महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे की, समजा हे विधेयक आपण याठिकाणी मांडले नाही. या राज्यामध्ये उच्च शिक्षणासाठी आपण कोणती भूमिका घेतली? शिक्षण संस्थांना स्वायत्तता देण्याची भूमिका आपण घेतली. व्ही.जे.टी.आय.सारखी, यु.डी.टी.सी. सारखी आणि नांदेडच्या इंजिनिअरींग कॉलेजसारखी, पुण्याच्या इंजिनिअरींग कॉलेजसारखी आणि ज्यांच्यावरील सरकारी नियंत्रण आता काढून टाकले आहे. डॉ. माशेलकर यांच्या हातामध्ये माजी विद्यार्थी म्हणून यु.डी.सी.टी. दिली. त्याठिकाणी 8 कोटी रुपयांची गुंतवणूक करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे वसतिगृह आणि सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणी जर सरकारचा कंट्रोल असता तर आम्ही प्राचार्य देखील देऊ शकलो असतो कां? हे मला माहीत नाही. सरकारचा कंट्रोल ठेवला असता तर आम्ही बाकीच्या गोष्टी देऊ शकलो असतो की नाही माहीत नाही. आणि आता खाजगी शिक्षण संस्थांनी स्वायत्तता घेतली पाहिजे. आणि त्यांचे रिझल्ट त्यांनी लावले पाहिजेत. जेव्हा जेव्हा ॲटॉनॉमीच्या संदर्भातील वेगवेगळया भूमिका व्यक्त केल्या गेल्या त्यावेळी सरकारने भूमिका स्पष्ट केली की, तुम्ही 5 वर्षे तुमच्या पध्दतीने काम करुन दाखवा. आज एखादी शिक्षण संस्था, एखादे कॉलेज चांगल्या पध्दतीचे दर्जेदार शिक्षण देण्याचा प्रयत्न करते. परंतु परिक्षेला विद्यापीठामार्फत बसावे लागते. त्यांच्यावर 20 ते 45 दिवसात रिझल्ट लावण्याचे बंधन आहे. याठिकाणी 100 ते 150 दिवसामध्ये रिझल्ट लागत नाही. त्यामध्ये विद्यार्थ्यांची संधी निघून जाते. केंद्र सरकारच्या कायद्यांतर्गत डीम युनिव्हर्सिटी स्थापन होण्यामध्ये आता कोणतेही बंधन नाही. महाराष्ट्रातील सर्व कॉलेजेस आता डीम युनिव्हर्सिटी झाल्यामुळे केंद्र सरकारच्या निर्णयाने केंद्र सरकारच्या नियंत्रणाच्या बाहेर गेलेली आहेत. अशावेळी यामध्ये येणारी गुंतवणूक असेल, त्यामध्ये एक्सलन्ससाठी, रिसर्चसाठी किंवा डेव्हलपमेंटसाठी किंवा वेगळे विषय घेऊन काही विद्यापीठे या राज्यात उभी राहणार असतील तर त्यामध्ये फार काळजी करण्याचे कारण आहे असे मला वाटत नाही. या राज्यामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये सर्व कॉलेजेसनी ॲफिलिएशन करुन घेतले पाहिजे असे सांगितले. हे सांगितल्यानंतर या राज्यामध्ये 917 कॉलेजेसनी ॲफिलिएशन करुन घेतले. कोणत्याही राज्यामध्ये कॉलेजेसचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील..

ॲफिलिएशन झाले नाही तेवढे महाराष्ट्रामध्ये झाले. त्याबाबत आपण धोरणात्मक निर्णय घेतला. तुम्ही मघाशी सांगितले की, श्री. दिलीप वळसे पाटील बऱ्याच बाबतीत इनिशिएटीव्ह घेतात. आपण मघाशी याठिकाणी एम.पी.सी.एल. चा उल्लेख केला. या राज्यामध्ये एक नवीन इनिशिएटीव्ह घेतला गेला. मी या राज्यामध्ये पाच वर्षे सत्त्ताधारी आणि पाच वर्षे विरोधी पक्षाचा आमदार राहिल्यानंतर 99 सालामध्ये पहिल्यांदा मंत्री झालो त्यावेळी माझ्या मतदारसंघातील लोकांना खूप आनंद झ ााला.परंतु खातेवाटप झाल्यानंतर मला उच्च व तंत्र शिक्षण हे खाते मिळाले तेव्हा माझ्या मतदारसंघातील लोकांची भावना होती की, काय खाते मिळाले? त्यापेक्षा मंत्री झाले नसते तर बरे झ ााले असते. अशापध्दतीने शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टीकोन आहे. लोकांना दुसरी खाती महत्वाची वाटतात, शिक्षण खाते महत्वाचे वाटत नाही. या खात्याचा मंत्री झाल्यानंतर एका बाजूला बजेट नाही. दुसऱ्या बाजूला काही इनिशिएटीव्ह करण्यास वाव नाही म्हणून महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन काढले. त्यासाठी सरकारला पाच कोटी रुपये देण्यास सांगितले. सरकारने आम्हाला अडीच कोटी रुपये दिले. अडीच कोटी रुपयांमध्ये तीन वर्षापूर्वी एक कंपनी काढली, ती कंपनी काढल्यानंतर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये आपण गेलात तर आपल्याला एमएससीआयटीचा बोर्ड बघावयास मिळतो. आम्ही किती सेंटर्स काढले? तीन वर्षामध्ये अडीच हजार सेंटर्स काढले. त्यामध्ये किती विद्यार्थी उत्तीर्ण झाले? तीन वर्षामध्ये साडे 16 लाख विद्यार्थी संगणकामध्ये साक्षर झाले. अडीच कोटीच्या कंपनीचा चेअरमन म्हणून मी सभागृहाला सांगतो की, यावर्षीचा मार्चपर्यंतचा टर्नओव्हर 102 कोटीपर्यंत जाऊन पोहोचला आहे. आणि सरकारचे अडीच कोटी रुपये पहिल्या वर्षी परत करुन टाकले, आणि सरकारला अडीच कोटी रुपयांचा बोनस दिला.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु....

सर□रला अडीच □टीचा बो-ास दिला आ□ि 15 टक□या बो-ास इक्वीटी होल्डर्स-ाा दिला. महाराष्ट्रातील स□ळ्या विद्यापीठां-ाा यामध्ये □ुंत□ू□ □रायला लावली होती. पैसे, बिझ-ोस प्रॉफीट, डिव्हीडंट या बाबी माझ्या दृष्टी-ो महत्वाच्या -ााहीत. प□ आज एम.एस.सी.आय.टी.सार□ा □ोर्स महाराष्ट्राच्या □-ाा□ोपऱ्यातील अडीच हजार सेंटरच्या माध्यमातू-ा 15 ला□ विद्यार्थ्यांपर्य-त पोहोचला. या □ोर्ससाठी दुसऱ्या □ं-या पाच-पाच आ□ि दहा-दहा हजार रुपये विद्यार्थ्यां□डू-ा फी घेत होत्या, तोच □ोर्स 700 रुपयामध्ये, 1200 रुपयामध्ये महाराष्ट्रातील 15 ला□ विद्यार्थ्यांपर्य-त घेऊ-ा □लो. मला सां□ितले पाहिजे □ी, या वर्षी ए□ट्या पु□ शहरामधू-ा आय.टी.च्या माध्यमातू-ा सॉफ्टवेअरच्या बिझ-ोसमध्ये साडेसात हजार □ोटी रुपयापे□ा जास्त एक्सपोर्ट ए□ट्या पु□ शहरामध्ये झालेला आहे, ही बाब आप□ ल□ात घेतली पाहिजे. शेवटी वसंतदादांसार□ -ोतृत्व,ते फार शि□ले -ाव्हते, प□ अ-ाुभव आ□ि जिद्द त्यांच्या □ाठीला होता. ज्यावेळेला □ाज□ी इंजि-ियरीं□, मेडि□ल □ॉलेजेस □ढली, तेव्हा दु□-ो -िघ□ार म्ह□ू-ा सां□ि□ात आले. आज आप□ चर्चा □रतो, त्याच पध्दती-ो त्यावेळेलाही त्याबाबतीत चर्चा झाली. प□ आज -िदा-ा ज्यां-ाा इंजि-ियर व्हायचे आहे, त्याला संधी तरी प्राप्त झाली. स-मा-ा-ीय सदस्य श्री.मोते साहेबां-ाी पॉलिटेक्-ा□ □ॉलेजे बंद पडायला ला□ली असल्याचे सां□ितले. त्यांचे म्ह□□ बरोबर आहे. □ल्याच्या □ल्या वर्षी 50 टक□ पॉलिटेक्-ा□ □ॉलेजमधील जा□ा भरल्या -ााहीत, त्या वर्षी इंजि-ियरीं□मध्ये 12 हजार जा□ा रि□ाम्या राहिल्या, □ल्या वर्षी 4 हजार जा□ा रि□ाम्या राहिल्या. परंतु □ोर□रीब मा□साच्या मुलाला इंजि-ियर व्हायचे असेल तर त्याला डो-ोश-ा दिल्याशिवाय प्रवेशच मिळत -ाव्हता. □र□ त्याची आर्थि□ □ॅपॅसिटीच -ाव्हती. येथे आप□ 40 हजार जा□ांची □ॅपॅसिटी □ल्या-ांतर -िदा-ा त्या विद्यार्थ्याला मुंबईमधील -ाामवंत □ॉलेजमध्ये प्रवेश मिळाला -ााही तरी जळ□ाव, चंद्रपूर, वर्धा सं□म-ोरच्या □िंवा -ा□रच्या □ो□त्या तरी □ॉलेजमध्ये त्याला प्रवेश मिळू श□तो, त्याची संधी जाऊ श□त -ााही. अशाप्र□रची भूमि□ त्यामध्ये घेतली. म्ह□ू-ा शि□□ाच्या □्षेत्रामध्ये मोठे □म झाले. शि□□ाच्या □्षेत्रातील आ□□ी बऱ्याच □ोष्टी सां□ि□ासार□्या आहेत. म्ह□ू-ा माझी आपल्या वि-ांती रहा□ार आहे □ी, आता □्षेत्र बदलत चाललेले आहे. विमा-ााचा प्रवास हे ए□ स्वप्-ा होते, आता ए□ रुपयामध्ये दे□ील विमा-ााचे ति□िट मिळायला ला□लेले आहे. आप□ विजेच्या लोडशेडीं□च्यासंबंधात चर्चा □रत असलो तरी या □्षेत्रामध्ये भारताची प्रो□्रेसिव्ह डेव्हलपमेंट हो□ार आहे. त्या माध्यमातू-ा विजेच्या □्षेत्रामध्ये, एरो-ॉाटि□

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे सुरु...

क्षेत्रामध्ये देखील निश्चितप्रकारे मोठयाप्रमाणामध्ये शिक्षणाच्या संधी, शिक्षणाच्या संस्था निर्माण करणे गरजेचे आहे, हे मी आपल्याला या निमित्ताने सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या निमित्ताने काही विषय मांडले. त्यामध्ये मागचे जे बील होते, त्यामध्ये आणि आताच्या बिलामध्ये काय फरक केलेला आहे? असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मी सभागृहामध्ये सांगू इच्छितो की, मागच्या बिलामध्ये प्रायोजक मडळामध्ये आपण कंपनी कायद्याचा समावेश केला नव्हता तो आता केलेला आहे. असा आक्षेप घेतला गेला की, त्यामध्ये डिव्हीडंट मिळणार नाही तर ते पैसे कोठे जातील ? सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण साहेबांना सांगू इच्छितो की, या कंपनीचा अर्थ, ओरिजिनल कंपनी असा आहे. ओरिजनल कंपनी आणि शिक्षण संस्थेसाठी स्थापन केलेली कंपनी वेगळी आहे. दोन वेगवेगळ्या कंपन्या आहेत. त्या कंपनीमध्ये आलेला पैसा हा त्या कंपनीमधून काढून दुसऱ्या कंपनीमध्ये नेता येईल अशी त्यामध्ये तरतूद नाही तर त्या कंपनीमध्ये सरप्लस उत्पन असेल तर त्याच शिक्षणाच्या संस्थेमध्ये ते पैसे वापरले पाहिजे. सन्माननीय सदस्य म्हणाले की, याचा हिशोब कोण पहाणार ? ही कंपनी मुळात कंपनी कायद्याच्या कलम 25 अन्वये रजिस्टर होणार असल्यामुळे त्या कंपनीला कंपनी कायद्याच्या अंतर्गत ॲन्युअल रिटर्न कंपनी रजिस्टरकडे भरायला लागेल. त्याची कॉपी त्याची फी भरल्यानंतर कोणत्याही सामान्य माणसाला कोणत्याही कंपनीच्या बॅलन्सशीटची प्रत कंपनी रजिस्ट्रारच्या ऑफीसमधून मिळू शकते. त्यामुळे त्यामध्ये फार काळजी करण्यासारखे वाटत नाही. पूर्वीच्या अहवालामध्ये प्रकल्प अहवाल तयार करण्याचे जे काही निकष होते त्यामध्ये मर्यादित बाबी होत्या. आता आपण त्या बाबीमध्ये वाढ करुन त्या 28 पर्यन्त घेऊन गेलेलो आहोत. कंपनीने प्रकल्प अहवाल तयार करुन सादर केला की, मग तो स्क्रुटीनी कमिटीसमोर जाईल. असे होणार नाही की आज कायदा पास झाला आणि उद्या सरकारने निर्णय केला म्हणजे लगेच जून महिन्यामध्ये महाराष्ट्रामध्ये 100-150 नवीन विद्यापीठे येतील. मग आरक्षणाचा मुद्दा समोर येईल, प्रवेश मिळेल की नाही, काही तरी गडबड होईल. परंतु तशी काळजी करण्याचे काही कारण नाही. मी सांगतो की, आज आपण हा कायदा मंजूर केला यामधील पहिले विद्यापीठ वर्षभरामध्ये किंवा 15 महिन्यानंतर महाराष्ट्रामध्ये सुरु होऊ शकेल.

यानंतर श्री.बरवड....

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

वर्षभरानंतर किंवा पंधरा महिन्यानंतर पहिले विद्यापीठ महाराष्ट्रामध्ये सुरु होऊ शकेल. त्याच्या आधी हे विद्यापीठ सुरु होऊ शकत नाही. यामध्ये इरादापत्र देण्याची तरतूद केलेली आहे. इरादापत्र दिल्यानंतर जमीन किती असली पाहिजे ? बांधकाम किती असले पाहिजे ? फॅसिलिटीज किती असल्या पाहिजेत ? हे सर्व त्यांनी स्वत: उभे करावयाचे आहे. ते त्यांनी उभे केल्यानंतर शासन त्याची तपासणी करील. सरकारने तपासणी केल्यानंतर ती बाब मंत्रिमंडळासमोर जाईल. आपण याबाबतीत मंत्रिमंडळापर्यंतच थांबलेलो नाही. एखाद्या विद्यापीठाला परवानगी द्यावयाची असेल तर त्यासंदर्भात माझे मत असे होते की, ते कायद्याच्या स्वरुपामध्ये विधानसभेमध्ये आले पाहिजे. काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, प्रत्येक विद्यापीठ निर्माण करण्यासाठी विधानसभेमध्ये यावयास नको. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विधानसभेमध्ये ठराव करु नका. सरकारनेच ते बघावे. यामध्ये पारदर्शकता दाखवून शिक्षण विभागाकडे परवानगीचे काम न देता त्यासाठी कॅबिनेटमध्ये जाणार आहोत. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये ठराव पारीत होणार आहेत. त्यानंतर त्या विद्यापीठाला मान्यता मिळणार आहे. या बिलामधील सेक्शन 30, 31, 32 जर आपण वाचले तर त्यामध्ये सुध्दा हे विद्यापीठ कसे चालेल ? त्याचे ऑर्डिनन्सेस काय असतील ? त्यांचे स्टॅट्युट्स काय असतील ? त्यांचे सब्जेक्ट सिलेक्शन काय असेल ? यासंबंधीची तरतूद यामध्ये केलेली आहे. या तरतुदी लक्षात घेतल्यानंतर यामध्ये ज्या काही चुका असतील, यामध्ये ज्या काही दुरुस्त्या करावयाच्या असतील त्याबाबतीत जरुर भूमिका ठेवलेली आहे. यामध्ये आपल्याला एक वर्ष लागणार आहे. एकदा हे लोकांसमोर जाऊ द्यावे. यामध्ये कोण कोण लोक येत आहेत ते बघू. आम्ही मागे 500 मेगावॅटपेक्षा जास्तीच्या प्रकल्पांच्या बाबतीतील योजना आणली होती. त्यामध्ये 8 कंपन्य पुढे आल्या आणि 12500 मेगावॅटचे करार झाले. तसेच विंड पॉवर आणि को-जनरेशनच्या बाबतीत योजना आणली. यासंदर्भात राज्यामध्ये आपण यशस्वीपणे पुढे जात आहोत. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये सुध्दा नवीन काही तरी पॉलिसी करुन, नियम करुन ज्यावेळी आपण सभागृहासमोर येतो त्यावेळी निश्चितपणे या विषयाकडे एका वेगळ्या पध्दतीने पाहण्याची आवश्यकता आहे. प्रकल्प अहवालाची छाननी करण्याची तरतूद पूर्वीच्या बिलमध्ये नव्हती.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

ती तरतूद या बिलाच्या सेक्शन 5 मधील पोटकलम 4 मध्ये करण्यात आलेली आहे. विद्यापीठाची जागा तसेच इतर सुविधांबाबत बोलण्यात आले. पूर्वी जागेच्या संदर्भात तरतूद केलेली होती. परंतु त्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या पातळीवर चर्चा होत असताना अशी भूमिका घेतली की, यासाठी लागणारी 30 एकर, 50 एकर, 100 एकर जागेची तरतूद केल्यानंतर कोणकोणत्या भागामध्ये काय करणार याबाबत प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करतील. ते बघून इरादापत्र देत असताना त्यासंबंधी बंधन घालू. जागेच्या संदर्भात बंधन घातल्याशिवाय आपण पुढे जाणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. दान निधीच्या संदर्भात दोन मते आहेत. ही रक्कम 2 कोटी रुपये असावी की 5 कोटी रुपये असावी ? ती रक्कम कॅशमध्ये असावी की, बँक गॅरंटीच्या स्वरुपात द्यावयाची ? ही मते असताना सरकारने फक्त विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ही तरतूद केलेली आहे. ही तरतूद काढून टाकावयाची असेल तर हरकत नाही. परंतु एखाद्या विद्यापीठाने यामध्ये मिसअॅप्रोप्रिएशन केले तर विद्यार्थ्यांच्या नुकसानीच्या संदर्भात त्यांच्याकडून काही वसूल करावयाचे असेल तर ते नंतर वसूल करत बसण्यापेक्षा आजच त्यासंदर्भात आपल्याला त्यासंबंधीची तरतूद करणे आवश्यक वाटले. म्हणून दान निधीची तरतूद यामध्ये केलेली आहे. आपण यामध्ये परीक्षा नियंत्रकाची तरतूद केलेली आहे. मेरीट प्रवेशाची तरतूद केलेली आहे. परीक्षेचे निकाल वेळेवर लावण्याच्या संदर्भात महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अॅक्टमध्ये अशी तरतूद आहे की, 45 दिवसांमध्ये निकाल लावले पाहिजेत. परंतु काही विद्यापीठांमध्ये 100 दिवसानंतर, 150 दिवसानंतरही निकाल लागत नाहीत. त्या विद्यापीठांवर काही कारवाई करण्यासंबंधीची तरतूद नाही. परंतु त्यासंदर्भात तरतूद करावयाची असेल तर याच विद्यापीठामध्ये नाही तर सध्या असलेल्या विद्यापीठांच्या संदर्भामध्ये सुध्दा तरतूद करण्याची आवश्यकता आहे. मी कालच महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमाच्या कलम 8 (4) च्या अंतर्गत सूचना दिलेल्या आहेत की तुम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये वेळेमध्ये निकाल लावले पाहिजेत. सेक्शन 8(4) खाली सरकारने ज्या डायरेक्शन्स दिलेल्या आहेत त्याचे पालन झाले नाही तर यासंदर्भातील क्वॉन्सीक्वेन्सेस काय आहेत हे विद्यापीठ कायद्यामध्ये स्पष्ट केलेले आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 19:35

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

कॅपिटेशन फीची तरतूद पहिल्या विधेयकामध्ये नव्हती. जे प्रायोजक मंडळ आहे त्याबाबतीत तीन ऑप्शन्स दिलेले आहेत. इंडियन सोसायटी ॲक्ट, पब्लिक चॅरिटेबल ॲक्ट आणि कंपनी ॲक्ट . तेव्हा ज्या कंपन्या, संस्था असे विद्यापीठ काढण्यास पुढे येतील त्यांना याबाबतीत स्वातंत्र्य दिलेले आहे. या विद्यापीठाची स्थापना शासनस्तरावर फक्त अधिसूचना काढून करण्याची तरतूद असली तरी विधिमंडळासमोर ही बाब आणण्याच्या बाबतीत आपण सुधारणा केलेली आहे. या सुधारणा लक्षात घेता मी आपल्याला सांगू इच्छितो की, एका वेगळ्या पध्दतीने या विधेयकाकडे पाहाण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी 48(1) चा उल्लेख केला. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, या अधिनियमातील एखाद्या तरतुदींचा अर्थ लावण्यामध्ये काही अडचण निर्माण झ ााली तर त्यासंदर्भात ही तरतूद केलेली आहे. जेव्हा एखादा कायदा केला जातो त्या प्रत्येक कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद अंतर्भूत असते. ही तरतूद कायम स्वरुपी नाही. ही तरतूद फक्त 2 वर्षासाठी आहे. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी घटित आणि गठित या दोन शब्दांबाबत चर्चा केली. या शब्दांच्या बाबतीत आम्ही देखील चर्चा केली होती. डायरेक्टर ऑफ लॅंग्वेजेस बरोबर आम्ही चर्चा केली. घटित म्हणजे फॉर्मेशन आणि गठित म्हणजे कॉन्स्टीटयुटेड असा त्या शब्दांचा अर्थ आहे. तरी देखील ही बाब मी तपासून घेईन. या विधेयकाच्या संदर्भात अनेक प्रकारचे मुद्दे उपस्थित करण्यातय आले. माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी व्हाईस चॅन्सलरचा मुद्दा उपस्थित केला होता. या विद्यापीठाच्या संदर्भात प्रेझेण्टेशन करताना ज्या ज्या गोष्टी मान्य केलेल्या आहेत त्यासंदर्भात रुल्स तयार करताना त्यामध्ये सुधारणा करता येतील. हे विधेयक पास करण्यासाठी मी घाई करीत आहे असे मुळीच नाही किंवा मला स्वत:ला असे कोणते विद्यापीठ काढावयाचे नाही. परंतु एक नवीन इनिशिएटिव्ह घेण्याच्या दृष्टीने मी या विधेयकाकडे पहात आसहे. यासाठी अजूनही 12 महिन्याचा कालावधी जाणार आहे. आरक्षण आणि कुलगुरु यासंदर्भातील मुद्दे देखील याठिकाणी मांडण्यात आले. या सगळया मुद्यांच्या बाबतीत कसा मार्ग काढावयाचा हे देखील पाहिले पाहिजे. याबाबतीत आजच सुधारणा करायला पाहिजे होत्या. काल सभागृहाचे कामकाज रात्री 12.00 वाजेपर्यन्त चालल्यामुळे हे शक्य झाले नाही. परंतु सुधारणा करण्याच्या बाबतीत निश्चितपणे प्रयत्न केला

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 19:35

(श्री. दिलीप वळसे-पाटील...)

जाईल. माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी स्वयंअर्थसहाय्यिता म्हणजे पैसे मिळविणे असे सांगितले. स्वयंअर्थसहाय्यिता याचा अर्थ या विद्यापीठासाठी सरकारकडून जागा, पैसे असे काही मिळणार नाही जे काही उभे करावयाचे आहे ते तुमचे तुम्हीच उभे केले पाहिजे, या अर्थाने हा शब्द वापरलेला आहे. माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी "प्रॉफीट कंपनी असे का म्हणत नाही ?" असा प्रश्न केला. याला प्रायव्हेट म्हणण्यास कोणतीही हरकत नाही. सरकारची देखील महामंडळे आहेत. शासन शिक्षण क्षेत्रामध्ये ज्ञानदानाचे काम करताना पैसे कमावण्याचे काम करते असे समजले जाईल. स्टडी सेंटर्सना परवानगी दिली जाईल का असा प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आला. मी आपल्याला सांगितले की, ही कॅम्पस युनिव्हर्सिटी असेल.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील...

ही कॅम्पस युनिव्हर्सिटी आहे. 5 वर्षे स्टेबल आणि एस्टॅब्लिश झाल्यानंतर एखाद्या ठिकाणी स्टडी सेंटर काढावयाचे असेल तर ते त्यावेळी विचार करु शकतात. आजच त्याच्यावर 100 टक्के बंधन आणण्याचे कारण नाही. कॅपीटेशन फी च्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला. उत्पन्नाच्या संदर्भात देखील चर्चा करण्यात आली. उत्पन्नाच्या बाबीमध्ये डोनेशन मिळणार त्याबाबतचा उल्लेख आला. डोनेशन हे विद्यार्थ्यांकडून घेतलेले नाही. एखादी कंपनी प्रॉफीटमध्ये आहे आणि त्या कंपनीच्या प्रॉफीटमधून फंड जर डोनेशनच्यारुपाने या विद्यापीठाला दिला तर तो विद्यापीठाचे उत्पन्नाचे साधन होईल जेणेकरुन शिक्षणाचा दर्जा जास्तीत जास्त चांगला कसा राखता येईल त्यादृष्टीने हाप्रश्न यामध्ये निश्चित आहे. मॉनिटरींग एजन्सीच्या संदर्भात सांगण्यात आले. खूप मॉनिटरींग करण्याच्या भानगडीत पडू नये. परिणाम काय होत आहे हे पहावे. हे काही सुप्रीम नाही. कायद्यात बदल करण्याची आवश्यकता वाटली तर जेव्हा जेव्हा गरज पडेल त्यावेळी कायद्यामध्ये बदल करता येतील. कायदा केला म्हणजे बदलणारच नाही असे नाही. ज्या ज्या सुधारणा करणे आवश्यक आहे त्या योग्य वेळी करण्यात येतील. रॉय युनिव्हर्सिटीच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. मला इतर राज्यातील विद्यापीठांवर हेत्वारोप करण्याचे कारण नाही. परंतु त्यांनी केलेला कायदा परिपूण्र नसल्याने लोकांनी गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला. आपल्या राज्याचा कायदा जेवढा पारदर्शक आणि परिपूर्ण आहे तेवढा त्यांच्या राज्याचा नव्हता. त्यांनी विद्यापीठ सुरु करताना कोणकोणते विषय घेतले जाणार आहे ते नमूद केले नव्हते. दोन फ्लॅ्टमध्ये विद्यापीठ सुरु करण्यात आले. येथे तसे होऊ देणार नाही. यासंदर्भात स्ट्रीक्ट नॉमर्स पाळले जातील...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, रॉय युनिव्हर्सिटीची 1300 मुले आज रस्त्यावर आली आहेत. छत्तीसगडमधील विद्यापीठाने नवी मुंबईमध्ये ही शाखा सुरु केली होती. परंतु नंतर ती बंद करण्यात आली. या शाखेमध्ये महाराष्ट्रातील 1300 मुले आहे. माझा प्रश्न होता की या मुलांना मुंबई विद्यापीठाशी संलग्न करणार काय किंवा त्यांना अन्य कोणत्या ठिकाणी सामावून घेतले जाणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी काही मुद्दे उपस्थित केले. कायदा करताना यामध्ये सगळया गोष्टींची स्पष्टता करण्यात आलेली

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. पहिल्या वर्षामध्ये 2-5-10 लोक येऊ शकतील. कुठले प्रवर्ग घेऊन येतात ते पाहिले जाईल. अतिशय लिलिटेड कॅपॅसिटीमध्ये या परवानग्या दिल्या जाणार आहेत. माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सोशल रिस्पॉन्सिबिलीटीच्या संदर्भात उल्लेख केला. यासाठी सेक्शन 30(2)(एफ) मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. बाकीचे सोशल रिस्पॉन्सिबिलीटीच्या बाबतीत ज्यावेळी ऑर्डीनन्स काढू त्यावेळी निश्चितपणाने समावेश करण्यात येईल. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी डोनेशन,प्रॉफीट आणि डिव्हीडंड यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. सेक्शन (25) मध्ये यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. या विद्यापीठातील पैसे बाहेर नेता येणार नाहीत. डिव्हीडंड देता येणार नाही. या सगळयाची काळजी घेतलेली आहे. प्रा. जोगेंद्र कवाडे साहेब यांनी बऱ्याच गोष्टी याठिकाणी मांडल्या. माझी खात्री आहे की प्रा. कवाडे यांनी उपस्थित केलेल्या बहुतेक प्रश्नांच्या संदर्भात मी उत्तरे दिलेली आहेत. बीओटी सब्जेक्ट संस्थेने निवडायचे आहेत. त्यामध्ये भांडवलदारांचा हस्तक्षेप होणार नाही. शेवटी गरीब माणसाला शिक्षण मिळणार आहे. सगळयाच शिक्षण क्षेत्रामध्ये काय करावयाचे यासंदर्भात पर्यायी व्यवस्था करण्याच्या बाबतीत जर आणखी एखादी चर्चा घडवून आणली तर सगळयाच विषयाच्या संदर्भात आपल्याला बोलता येईल. डीम युनिव्हर्सिटींना जी  स्वायत्तता दिलेली आहे ती ही विद्यापीठे नसताना देखील विद्यापिठासारखे काम करीत आहेत.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील..

आपण जे काही नवीन करीत आहोत त्याचा परिणाम शिक्षणावर होणार आहे अशी भीती बाळगण्याचे कारण नाही. या विद्यापीठामुळे नवा वर्ण, नवा वर्ग आपल्याला निर्माण होणार नाही हे देखील मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या विद्यापीठामुळे सध्या अस्तित्त्वात असलेल विद्यापीठे बंद करणार नाहीत हे देखील सांगू इच्छितो. अशाप्रकारचे विद्यापीठ आले नाही तर उच्चवर्णीय, ओ.बी.सी.एस.सी., एस.टी. यांना .....

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, जे गरीब मागासवर्गीय नावाजलेले तज्ज्ञ आहेत त्यांना अशाप्रकारचे विद्यापीठ काढावयाचे असेल, परंतु, त्यांच्याकडे निधी नसेल तर सामाजिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासन त्यांना काही आर्थिक मदत करणार आहे काय ?

श्री.दिलील वळसे-पाटील : सभापती महोदय, मागासवर्गीय समाजातील व्यक्तीला अशा प्रकारचे विद्यापीठ स्थापन करावयाचे असेल तर त्याला कायद्यामध्ये जी तरतूद केली आहे, त्याप्रमाणे 2 कोटी रुपये, 5 कोटी रुपये हे भरावे लागतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ आहेत. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा स्वाभिमान घेऊन पुढे आलेले आहेत. अशांच्या टॅलेंटला वाव दिला पाहिजे. माझा त्यांच्याशी घरोबा आहे. पण येथे सन्माननीय सदस्य जी काही निधीची मागणी करीत आहेत ती योग्य नाही असे मला वाटते.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, श्री.गणगणे साहेबांनी ज्या काही सूचना केल्या आहेत, त्या मी तपासून पाहतो. सन्माननीय सदस्य श्री.गणगणे यांनी एकीकडे जे गरीब मागासवर्गीय विद्यार्थी आहेत, त्यांना शिक्षणासाठी निधी देण्याची मागणी करीत आहेत, तर दुसरीकडे अशाप्रकारचे विद्यापीठ काढण्यासाठी आर्थिक मदत मागासवर्गीयांसाठी केली जाईल का ? हा जो मुद्दा आहे तो एकमेकाला छेद देणारा आहे. असे कुठले प्रपोजल येईल तेव्हा निश्चितपणे विचार केला जाईल. यासंबंधी मला आता काहीही सांगता येणार नाही. याबाबतचा निर्णय हा मंत्रिमंडळामध्ये चर्चा करून घ्यावा लागेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी अशा विद्यापीठामध्ये अंडरवर्ल्डचा पैसा येईल अशी भीती व्यक्त केली आहे. जेव्हा एखादी संस्था रजिस्ट्रर्ड करण्यासाठी येईल तेव्हा जे कायदे आहेत, त्याप्रमाणे त्यासंबंधीची कार्यवाही केली जाईल. यामध्ये ....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील...

त्या संस्थेची बॅलन्सशीटसुध्दा पाहिली जाणार आहे. त्यामुळे अशा विद्यापीठामध्ये अंडरवर्ल्डचा पैसा येणार नाही, हे आपण लक्षात घ्यावे.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी गुणवत्ता, भूमिपुत्र आणि मेरिट यांचा उल्लेख केला आहे. यामधून आपण बाहेर जाणार नाही असे मी त्यांना या निमित्ताने सांगू इच्छितो. मी जास्त बोलून सभागृहाचा अधिक वेळ घेऊ इच्छित नाही.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विद्यापीठाला मान्यता दिल्यानंतर परीक्षा कोण घेणार ? असा मुद्दा उपस्थित केला आहे. संबंधित विद्यापीठाला मान्यता दिल्यानंतर परीक्षा त्या विद्यापीठामार्फतच घेतल्या जातील. यापूर्वी अनेक शिक्षण संस्थांनी देखील काही ऑटोनॉमस कोर्सेस सुरू केलेले आहेत. मी सादरीकरण करताना जे आश्वासन दिले होते त्यापासून दूर जाणार नाही हे देखील मी या निमित्ताने सांगू इच्छितो. यात काही तांत्रिक अडचण आहे हे मला मान्य आहे. रुल्समध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता वाटली तर तशा प्रकारची सुधारणा जुलैच्या अधिवेशनामध्ये करता येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सादरीकरण करताना ॲडव्होकेट जनरलने मान्य केले होते की, मेंटनन्स ऑफ स्टँडर्ड इन हायर ॲंड टेक्निकल एज्युकेशन ॲंड कोऑर्डिनेशन हा विषय राज्याच्या अखत्यारित नाही. हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारित आहे. म्हणून सुप्रीम कोर्टाने छत्तीसगडला आडवे करून निर्णय दिला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, स्टँडर्ड आणि को-ऑडिर्नेशन मेंटन करण्यासाठी संस्थांचे नियम आपण बंधनकारक केले पाहिजे. परंतु विधेयकात मात्र आपण केवळ एका ओळीत त्याचा निकाल लावलेला आहे. हे सारे तपशील देणे आवश्यक होते, हा मुद्दा मी मांडला होता त्याला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही, एवढेच मी लक्षात आणून देत आहे.

श्री.अरविंद सावंत : महोदय, विधेयकातील खंड-45 हे विद्यापीठाचे विसर्जन करण्याबाबतचे आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, "विद्यापीठाचे विसर्जन नियमित अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या शेवटच्या तुकडयांनी त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर व त्यांना पदवी, पदविका किंवा यथास्थित पुरस्कार प्रदान केल्यानंतर अंमलात येईल". परंतु एखाद्या विद्यापीठाला आपण गैरव्यवस्थापन म्हणून नोटीस देत असल्यामुळे त्यांची परीक्षा सुध्दा कंडक्ट करु शकणार नाही. त्यांचे आपणांस विसर्जन करावयाचे असल्यामुळे त्यांच्या परीक्षा कोण घेणार आहे ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, प्रथम विद्यापीठ कोणत्या विषयाच्या संदर्भात सुरु झाले आहे, कोणकोणत्या फॅकल्टीज त्यांनी घेतलेल्या आहेत हे लक्षात घेऊन, त्या त्या वेळी या बाबत विचार करता येईल. आज कोणतीही शैक्षणिक संस्था बंद करावयाची असेल, तर त्यासाठी राज्य सरकारची त्यांना परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी जी बाब निदर्शनास आणून दिली ती बाब लक्षात घेतो. सन्माननीय सदस्य श्री.वसंत पवार यांनी सामाजिक न्याय आणि इतर गोष्टींच्या संदर्भात आपले विचार मांडले. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी राज्यपालांच्या स्टेटमेंटचा उल्लेख केला. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, अन्य राज्यामध्ये जसे झाले आहे, तसे आपल्या राज्यात होणार नाही याबाबत काळजी घेतली आहे. इतर राज्यात वीज मंडळाचे अनबंडींग झाल्यामुळे त्या ठिकाणी 40 दिवसांचा संप झाला, परंतु आपल्या राज्यात ज्यावेळी वीज मंडळाचे अनबंडींग झाले त्यावेळी मात्र ते अतिशय स्मुथली झाले. त्यामुळे अशा प्रकारच्या लहानलहान गोष्टींची काळजी घेऊन, त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु तरी सुध्दा काही त्रुटी राहू शकतात. त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांची या संदर्भात काय भावना आहे याबाबत त्यांच्याशी चर्चा करुन जरुर ती भावना समजून घेईल.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : महोदय, मी नॉन ट्रेडीशनल कोर्सेसबाबत उल्लेख केला. परंतु त्यांची कोणतीही कौन्सिल नॅशनल लेव्हलला नाही. परंतु आपण एका बाजूला म्हणता की, नवनवीन क्षेत्रातील विद्यापीठे यावीत. परंतु नवनवीन क्षेत्राच्या क्वालीफाईंग क्रायटेरिया ठरविण्याची कुठलीच नॅशनल लेव्हलची एस्टॅब्लीश नाही. अशा वेळेस त्यांचे क्वालीफीकेशन आणि त्यांचा दर्जा कोणत्याच कौन्सिलने निश्चित न केल्यामुळे, विद्यापीठाच्या स्टाफ-पिक पॅटर्नला अडचणी निर्माण होतात. त्यामुळे याबाबत आपण काय करणार आहात ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : एखाद्या विषयाचे कौन्सिल नसेल तर तशी कौन्सिल राज्य सरकार, केंद्र सरकार अथवा अन्य संस्थेला निर्माण करावी लागेल. अशा वेळी त्याचे स्टँडर्ड आणि पॅरामिटर्स ठरविण्याच्या बाबतीत विचार करता येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : महोदय, स्टार्टर की नॉन स्टार्टर या बाबतचा मुद्दा माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित केला. एखादी नवीन गोष्ट येऊ घातली तर, परंपरा आहे की, त्या गोष्टीला विरोध केला जातो. आम्ही तर या मताचे आहोत की, या व्यवस्थेमध्ये कोणीही वंचित राहता कामा नये. एवढीच आमची चिंता आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जे सांगितले त्याचे काय ? अनेक प्रकारच्या सुधारणांच्या संदर्भात काही त्रुटी आणि उणीवा असतात. ते मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. त्या उणीवा पुढे मागे दूर करु असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या संदर्भात त्रुटी सांगितल्या. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर, त्या निर्णयाला ओव्हर-रुल करणारी, घटनेची दुरुस्ती अलिकडे झाली.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

खाजगी संस्थांमध्ये देखील अलिकडे आरक्षणाची तरतूद केली गेली. आता राज्याने किती करावे याचे प्रमाण ठरलेले आहे. या संदर्भात निर्णय घेण्याची जबाबदारी आता राज्य सरकारची आहे. ते त्यांना करावे लागणार आहे. चिंता फक्त एवढीच आहे की, मागासवर्गीयांना उच्च शिक्षणात संधी मिळेल की नाही ? म्हणून मी म्हणतो की, " हयात लेके चलो, काईनात लेके चलो, चलो तो सारे जमाने को साथ लेके चलो. " तरी, सभापती महोदय, या संदर्भात प्रयत्न व्हावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या विधेयकाला एकमताने पाठिंबा द्यावा अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांना कळकळीची विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : विधेयक विचरात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 48 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 10 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 10 संमत झाले आहे.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) ( सुधारणा ) विधेयक

L.A. BILL NO.XVI OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.)

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर ( पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 16, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व निनियमन ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 16, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन ( विकास व विनियमन ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

कृषी उत्पन्नाच्या बाबतीत व्यापारीकरणाच्या उदारीकरणामुळे देशातील अंतर्गत कृषी पणन पध्दत एकसंध करण्याच्या दृष्टीने कराराची शेती प्रायोजित करण्याच्या बाबतीतील हे विधेयक आहे. या विधेयकामुळे प्रायोजक पाहिजे त्या पध्दतीचा माल, करार करुन शेतामध्ये निर्माण करु शकेल, त्यावर प्रक्रिया करु शकेल व विक्री देखील करु शकेल आणि त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळेल. म्हणून मी सभागृहाला विनंती करतो की, हे विधेयक सभागृहाने संमत करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

----

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी**)

श्री. विलासराव शिंदे (सातारा-सांगली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या संदर्भातील हे विधेयक आणण्याचा प्रयत्न झालेला आहे त्या विधेयकास पाठींबा देत असतांना आमच्या मनामध्ये काही शंका आहेत, हे विधेयकास मंजूर होण्यापूर्वी आमच्या मनामध्ये ज्या शंका आहे त्याचा परिणाम विधेयकावर होऊ नये म्हणून त्याची दखल घेणे गरजेचे आहे. मला असे वाटते की, या विधेयकाने मागच्या दाराने विशिष्ट अधिकार पध्दती आणण्याचा प्रयत्न झालेला आहे. विधेयकाच्या पान क्रमांक 2 वरील (1) मध्ये असे म्हटलेले आहे की, "कंत्राटी शेती पुरस्कर्ता, विहित करण्यात येईल अशा रीतीने बाजार समितीकडे किंवा विहित अधिकाऱ्याकडे स्वत:ची नोंदणी करील." हा पुरस्कर्ता कोण आहे, तो सावकार असू शकतो ? किंवा एखादा मोठा माणूस असू शकतो ? कसेल त्याची जमीन असा कायदा शेतीसाठी करण्यात आला होता. परंतु येथे पुरस्कर्ता आणलेला आहे, त्याची माहिती काय आहे ? त्याच्याकडे शेती आहे काय ? म्हणजे छोटया शेतकऱ्यांना हाताशी धरुन शेती केली जाईल. म्हणजे शेती कोणाच्या तरी घशात घालण्याचा हा प्रकार होत आहे. लहान लहान शेतकऱ्यांची सगळी जमीन एकत्र करुन ती शेती केली जाईल हा महत्वाचा प्रश्न आहे, कारण यासाठी भांडवल असले पाहिजे. आता आपण पाहात आहोत की, फार्मिंग सोसायटया काढलेल्या आहेत. पाणीपुरवठा संस्था आहोत, इरिगेशनच्या संस्था आहेत तसेच शेती महामंडळ आहे, शेती महामंडळास काय कमी आहे ? महाराष्ट्र सरकारचा पैसा असतांना शेती महामंडळ अनेक वर्षापासून तोटयात का चालत आहे ? आज जो प्रयत्न केला जात आहे त्यातून मला दोन-तीन शंका येतात, लहान शेतकऱ्यांना एकत्र करुन त्यांना पैसा पुरवून कंत्राटी पध्दतीने ही शेती केली जाईल. आज अशी परिस्थिती आहे की, शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करीत आहेत, हया आत्महत्या निरनिराळया विभागामध्ये शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे होत आहेत. आमच्याकडे एक पध्दती अशी आहे की, शेतकरी आपल्या जमीनी करार पध्दतीने देतात, तेथील लोक काही ठराविक दिवस शेती त्यांना खाण्यासाठी देतात. यापध्दतीमध्ये लहान लहान शेतकरी एकत्र येऊन ते शेती करतील हा महत्वाचा भाग आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2....

श्री. विलासराव शिंदे...

यामध्ये दुसरी गोष्ट अशी आहे की, अशा कंत्राटी शेतीसाठी एक फॉर्म आहे, नमुन्यामध्ये उत्पादकाचा माल कोणाच्या नावावर जाणार आहे, त्याचा वाटा किती मिळणार आहे. तुम्ही स्टॅम्पपेपरवर त्याचे करारपत्र घेणार आहात काय ? माल कोणाच्या नावावर विकणार आहात. त्याचा हिशोब कोण करणार आहे ? त्या मालाचा पैसा त्यांना कसा मिळणार आहे. एखाद्या शेतकऱ्यांने यामध्ये पैसा टाकल्यानंतर त्याचे विभाजन कसे होईल] तो त्यांना न्याय देईल काय ? त्यासाठी त्याला न्यायालयात जावे लागणार नाही काय ? एका बाजूला हे सर्व करीत असतांना मालकाकडून त्यांना योग्य न्याय मिळेल काय ? त्यांच्या मध्ये वादविवाद होणार नाहीत काय ? यासंदर्भातील निश्चित खात्री तेथील छोटया शेतकऱ्यांना दिली गेली पाहिजे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे...

काही प्रमाणामध्ये कृषि उत्पन्न बाजार समितीला अडचणीत आणणारे हे विधेयक आहे. त्याठिकाणी तयार होणारा माल बाहेर विकला तर त्यामध्ये सूट दिली जाणार आहे. अशाप्रकारचे प्रयोग निरनिराळया ठिकाणी झाले. त्यामध्ये सूट मिळविण्यासाठी मोठया कंपन्यांमधून तयार झालेला माल कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये येणार नाही. त्या मालाला सवलत आणि सूट दिली जाईल. तेव्हा आपण या विधेयकातील तरतूद कृषि उत्पन्न बाजार समितीच्या फायद्यासाठी केली आहे काय? आपण या तरतुदीमधून काय निर्माण केले? आपण विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये म्हटले आहे की, पुरस्कर्त्याला पैसे उपलब्ध झाल्यानंतर त्याच्याकडून चांगला माल निघेल आणि त्याला चांगली बाजारपेठ मिळेल. प्रत्यक्षात तरतूद वेगळी केली आहे. ही तरतूद अशी आहे की,"कंत्राटी शेती पध्दतीमुळे, अन्न प्रक्रिया उद्योग,निर्यात आणि किरकोळ माल साखळी उद्योग यांना, कंत्राटी शेती करार करुन, आपणास आवश्यक तेवढया प्रमाणात उत्पादन घेणे शक्य होणार असल्यामुळे या क्षेत्रांना चालना मिळेल" म्हणजेच त्याठिकाणी तयार होणारा माल परदेशामध्ये पोहोचविण्याची साखळी तयार होईल. आणि म्हणून कंत्राटी पध्दतीने शेती करणाऱ्या उद्योजकांनी छोटेछोटया जमिनदारांच्या जमिनी एकत्र करुन त्यामधून निघालेला माल परदेशामध्ये पाठविण्याची यामध्ये तरतूद आहे कां ? हा माझा प्रश्न आहे. याठिकाणी कृषी उत्पादनाची उत्पादकता वाढेल व त्यांचा दर्जा सुधारेल असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे "कंत्राटी शेती करारामध्येच विक्रीदर देण्यात येणार असल्यामुळे, कंत्राटी शेती उत्पादकाला दराचीही हमी मिळेल" याचा अर्थ मला समजला नाही. एकदा उत्पादन काढल्यानंतर विक्रीचा दर आज 10 रुपये ठरला व उद्या बाजारात 20 रुपये दर आला तर प्रत्यक्षात काम करणाऱ्या कंत्राटदाराला 10 रुपयांप्रमाणे पैसे मिळणार आहेत, त्याला जादा पैसे मिळणार नाहीत. त्यामुळे यामध्ये अनेक अडचणी निर्माण होतील. यामध्ये दराची हमी मिळणार असे म्हटले असले तरी किमान भाव धरला जाईल. त्याला मिळणाऱ्या जादा दराचे काय? त्याकरिता सर्व बाबीचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. यामध्ये जर सामान्य शेतकरी अडचणीत येणार नसेल तर आज सुध्दा जी जमीन गहाणवट टाकावी लागते किंवा एखादा शेतकरी कर्जबाजारी झाल्यानंतर त्याची जमीन घशामध्ये जाणार नाही असे तुम्ही लिहिले असले तरी पिढयानपिढया या कंत्राटी शेतीखाली असलेली जमीन तो बाहेर काढू शकणार नाही आणि स्वत:साठी काही करु शकणार नाही. म्हणून याबाबतीत आपणाकडून माहिती मिळावी अशी माझी आपणास विनंती आहे. त्याचप्रमाणे घेण्यात आलेल्या जमिनीला सिलिंग लावले जाईल काय? अशी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे...

शंका माझ्या मनामध्ये येते. जर 100-200 एकराचा फार्म असेल आणि त्याठिकाणी 5-50 शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेती केली तर त्यावर आपले बंधन रहाणार आहे की नाही? ही जमीन बडया लोकांच्या हातामध्ये देत असतांना सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या हितासाठी आपण तरतूद केली पाहिजे त्यादृष्टीने आपण विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधासभेिवडलेले) : सभापती महोदय, हे विधेय महसूल ात्या येथे आायला पाहिजे होते, प विभााचा या विधेयाशी ाही संबंध ाही. शेती भाड्या देयाचा व्यवहार हा महसूल ात्याचा आहे. सरारला हे विधेय आायचे असेल तर त्यां महसूल ात्यामार्फत ते मांडले पहिजे. सरार पुरोामी आहे, असे सांितले जाते. आप सेल त्याची जमीन अशाप्रारचा िय घेऊ, ुळ ायदा ला. त्यावेळेस राज्यामध्ये सावराडून कुळाला दो आ मिळत होते आि सावार 14 आ घेत होता. तशाप्रारे हे विधेय आू पुा सावारी पध्दत आाण्याचा प्रय होतो ी ाय, अशी शंा यावयास लालेली आहे. 50 वर्षापूर्वी माझ्या आजोबांच्या म्हजे श्री.ाासाहेब पाटील यांच्या ेतृत्वााली भेडर, वासी, चरी या ठिाी आंदोल रयात आले. सावार त्यावेळेस शेतऱ्यांा दो आ देत होते.शेतीवर शेतऱ्यां सायचे आणि शेतऱ्याला 2 आ आि सावाराला 14 आ असे मोजमाप केले जात होते. त्या संदर्भात रायड जिल्हयामध्ये आंदोल झाले. तर ुळ ायदा रयात आला. त्या ायद्यामध्ये रायडचा उल्लो आहे. माझ्या आजोबांच्या ेतृत्वााली त्यावेळेला आंदोल झालेले होते. 3 एर आि 5 एरच्या वर शेतऱ्यांडे शेती ाही. सरार पुरोामी आहे, असे म्हटले जाते आि आप ंत्राटी पध्दती शेती रायला िघालेलो आहेत. शेतऱ्याला उभे रु शलेलो ाही, शेतऱ्यांच्या शेतीमधील शेतीचे उत्पाद वाढवियामध्ये सरारला अपयश आलेले आहे, म्हू सरारला अशाप्रारचे विधेय आावे लालेले आहे. प विभााला हे विधेय आायाचा ोताही अधिार ाही. बील आावयाचे असेल तर महसूल ात्यार्फत आावे लाल. त्यालाही आमचा विरोध असेल. शेतऱ्या आपली शेती स्वत: सली पाहिजे, शेतीचे उत्प वाढले पाहिजे म्हू शेतऱ्यांा शासा प्रोत्साह दिले पाहिजे, तसे शासाडू प्रय झालेला ाही. आज शेतऱ्यांची शेती ापि झाल्यामुळे शेतरी विदर्भामध्ये आत्महत्या रीत आहेत. या ठिाीही अशाप्रारची परिस्थिती िर्मा होईल.

श्री.दिवार रावते : हे विधेय प विभााला मांडता येते ाय, याबाबतचे रुलिं द्यावे.

**तालिा सभापती** : ही हरत सुरुवातीला घ्यायला पाहिजे होती, आता या स्टेजला शी ाय हरत घेता योर ?

श्री.दिवाकर रावते : आमची याला हरकत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संधाने मुद्दे उपस्थित केले. हे विधेयक पणन विभ्ांगाने न आणसता महसूल विभ्ांगाने आणायला पाहिजे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणण्ेा आहे. पंरतु आता विधेयक मांडलेले आहेत. त्यावर आपण चर्चा करत आहोत. आता या संदर्भाने मंत्री महोदय आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करतील.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी शेती महामंडळाचा उल्लेख झाला. शेती महामंडळाच्या अधिपत्याखाली असलेली जी जमीन होती त्यासंदर्भातील विधेयक विधिमंडळमध्ये मांडले होते आणि ते विधेयक महसूल खात्याने मांडले होते. ती संपूर्ण जमीन मुक्त करण्यासंबंधीचे बिल या ठिकाणी मांडले होते. याच अधिवेशनामध्ये खंडकरी जमिनीच्या संदर्भात आणखी दुसरे बिल मांडले होते. यासंदर्भात ज्या काही उणिवा राहिल्या होत्या त्या उणिवा दूर करण्याकरिता ते बिल मंजूर केले. ते जे खंडकरी शेतकरी होते त्यांनी आपल्या जमिनी शेती महामंडळाकडे दिल्या होत्या. त्या जमिनी त्यांना परत देण्याचा प्रश्न होता. तो महसूल खात्याचा भाग आहे. या ठिकाणी जे बिल मांडण्यात आले आहे त्या बिलावरची चर्चा पूर्ण करावयाची आहे. या बिलाच्या मार्फत पणनच्या अनुषंगाने जी काही प्रक्रिया होणार आहे त्यावर या ठिकाणी चर्चा करावयाची आहे. कंत्राटी शेतीच्या संदर्भातील हा विषय आहे. उद्या मी जर कंपनी स्थापन केली आणि शेतकऱ्यांकडून 100 एकर, 500 एकर जमीन घेऊन शेती करावयास लागलो तर कंपनीचा व्यवहार शेतकऱ्यांबरोबर होणार आहे. त्या व्यवहाराचा संबंध पणन खात्याशी येणार नाही. त्याचा संबंध महसूल खात्याशी येणार आहे.

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी )** : जे मूळ जमीन मालक आहेत त्यांचे हक्क आणि अधिकारावर कोणत्याही प्रकारची गदा या बिलामुळे येणार नाही. यामध्ये फक्त लिमिटेड कॉन्ट्रॅक्ट आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण ज्यावेळी बँकेचे कर्ज घेतो त्यावेळी सातबारावर त्याची नोंद होते. ज्यावेळी दुष्काळ पडतो, अवर्षणाची परिस्थिती निर्माण होते त्यासंदर्भातील चर्चेला पुनर्वसन खात्याचे मंत्री किंवा अर्थखात्याचे मंत्री उत्तर देत नाहीत. सातबाराच्या संदर्भात महसूल खात्याचे अधिकारी काम करीत असल्यामुळे महसूल खात्याचे माननीय मंत्रिमहोदय उत्तर देतात. ज्यावेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात त्यावेळी शेतकरी हे कृषी खात्याच्या धोरणामुळे, अर्थ खात्याच्या धोरणामुळे आत्महत्या करतात. अर्थ खाते जरी पैसे देत असले तरी या ठिकाणी चर्चेला उत्तर देत असताना माननीय महसूल मंत्री उत्तर देतात. पणन

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

महामंडळाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी मांडला. सभापती महोदय, आपणही यासंदर्भात सहमत व्हाल. यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा. आपण निर्णय देत असताना सावध निर्णय द्यावा. आमचा या बिलाला विरोध नाही. या बिलाच्या संदर्भात आम्हाला काय वाटते ते आम्ही मांडू तसेच त्याबाबत शासनाकडून उत्तर मिळेल. शेतकऱ्यांच्या हिताच्यादृष्टीने यामध्ये सहकाराचा संबंध असेल तर त्यावर चर्चा होईल परंतु जमिनीच्या व्यवहाराचा विषय हा पणन खात्याचा आहे की, महसूल खात्याचा आहे ? याबाबतीत खुलासा झाला पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांना खुलासा करावयाचा असेल तर त्यानी करावा.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. या बिलातील विषय हा पणन खात्याच्या अखत्यारितील विषय आहे. जमिनीचा प्रश्न असता, जमिनीच्या मालकीचा प्रश्न असता तर त्यामध्ये महसूल खात्याचा संबंध आला असता. झाडांचा प्रश्न असता तर कृषी खात्याचा संबंध आला असता. यामध्ये कृषी उत्पन्नाच्या कराराच्या बाबतीत म्हणजे त्या शेतीमधून निघणारा जो माल आहे त्याबाबतीतील कराराचा विषय असल्यामुळे हा विषय पणन खात्याकडे येतो. त्यामुळे पणन खात्याने हे विधेयक मांडलेले आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते या बिलावर बोलतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी कोणत्याही विषयावर बोलत असताना राजकीय बोलत नाही. तो माझा स्वभाव नाही. मी मेरीटच्या संदर्भात बोलतो. शेवटी या सदनामध्ये बसलेले आम्ही सर्व सदस्य कोणत्या तरी पक्षाचे सदस्य आहोत. ज्या पक्षाचा सदस्य असेल त्या पक्षाच्या धोरणाच्या अनुषंगाने आमचे विचार मांडले पाहिजेत. सरकारतर्फे बाजू मांडत असताना त्या पक्षाची धोरणे जाहीर करतात. त्याप्रमाणे निवडणुका लढवितात आणि निवडून येतात.

श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 20:20

(श्री. दिवाकर रावते...)

मी मघाशी बाहेर लॉबीमध्ये बसलो असताना माझ्या सहकारी सदस्यांना असे म्हटले की, अहो, आपण जर प्रामाणिक आणि निष्ठावान काँग्रेसवाले असाल तर या विधेयकाच्या संदर्भात मोकळेपणाने मत मांडले पाहिजे. हे सरकार सर्वसामान्य, गोरगरीब, शेवटच्या पायरीवर असलेल्या, तळागाळातील माणसाच्या हिताकरिता बांधील आहे असे विविध माध्यमातून सांगतले जाते. किंबहुना आम्ही कुठे तरी कमी पडू, आमच्या घोषणा कमी पडतील, आमच्या कृतीकडे संशयाने पाहिले जाईल आणि ते होऊ नये म्हणून कोणाच्या तरी पुण्याईची मदत हे सरकार घेत असते. देशस्तरावर गांधीजींचे नाव घेतले जाते आणि राज्यामध्ये छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन हे शासन पुरोगामित्वाचा ढोल वाजवत असते. हे सरकार जेव्हा महात्मा फुलेंचे नाव घेते त्यावेळी "सावकारी"वर आसूड ओढण्याची भूमिका ते घेते काय, हा खरा प्रश्न आहे. जेव्हा हे सरकार छत्रपती शाहू महाराजांचे नाव घेते त्यावेळी आपल्या जनतेची, रयतेच्या कल्याणाची काळजी ते घेते काय ? प्रत्येक समाजातील माणसाच्या क्षमतेला वाव देऊन त्याला मोठा करण्याची भूमिका छत्रपती शाहू महाराजांची होती. त्यांनी जात-धर्म पाहिला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर फार मोठे अधिकार दिलेले आहेत. या तिन्ही व्यवस्थांचा अर्थ काढायचा झाला तर सर्वसामानय माणूस हा श्रीमंत व्हावा ही त्या पाठिमागची भूमिका नसून सर्वसामान्य माणूस हा आपल्या पायावर कसा उभा राहू शकेल, त्याला सर्व हक्क कसे प्राप्त होतील आणि कुवतीनुसार सर्व गोष्टी त्याला प्राप्त होऊन तो सुखी आणि संपन्न कसा होईल असा विचार त्यामागे होता. याचा सरळ सरळ अर्थ असा आहे की, भांडवलशाही अर्थ व्यव्यस्थेचा बिमोड केल्याशिवाय सर्वसामान्य माणूस सुखी होणार नाही. या विधेयकाच्या माध्यमातून हे सरकार मागच्या दाराने "सावकारी" आणीत आहे असे काँग्रेसचेच निष्ठावंत कार्यकर्ते बोलत आहेत. आज या सदनामध्ये भांडवलशाहीची दोन विधेयके आणली गेली. एक म्हणजे स्वयं अर्थसहाय्यिता विद्यापीठ विधेयक आणि दुसरे कृषि उत्पन्न पणन विधेयक. यामुळे राज्यात सरंजामशाही पुन्हा सुरु होणार आहे. स्वयं अर्थसहाय्यिता विद्यापीठे ही श्रीमंतांचीच असणार आहेत. सभापती महोदय, गोरगरीब, सर्वसामान्य शेतकरी, तळागाळातील माणूस यांच्या हिताकरिता हे सरकार कटिबध्द असले पाहिजे. शेतकरी शेतामध्ये जेव्हा नांगर धरतो त्यावेळी धरणीमातेने त्याला सावरले नाही आणि आकाशाने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

तारले नाही तर तो या मायबाप सरकारकडे मोठया अपेक्षेने पाहात असतो, याची जाणीव सरकारने ठेवली पाहिजे....(अडथळा)...

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4X-1

SSK/ SBT/ MAP/ श्री. शिगम नंतर 20:25

श्री. दिवाकर रावते ...

मी जे सांगतो आहे ते चूक असेल तर अवश्य खोडा. पण मी पक्षीय दृष्टिकोनातून याठिकाणी बोलत नाही. आमच्यासारखे लोक या सदनामध्ये बसल्यानंतर सर्वसामान्यांशी आमची बांधिलकी असतो त्यादृष्टीने मी बोलतो आहे. मी पक्षीय टीका केली नाही. मला प्रा.जोगेंद्र कवाडे यांचा अभिमान वाटतो. त्यांनी शिवसेनाप्रमुख सांगतात त्याप्रमाणे गोऱ्या इंग्रजांना बाहेर घालविल्यानंतर पुन्हा एकदा विद्यापीठाच्या माध्यमातून शासन गोऱ्यांना आणीत आहे असे आपल्या भाषणात सांगितले. गोऱ्यांना परत आणण्याबद्दल ते बोलले. आमच्या श्री. नरेंद्र जाधवांचा तुम्हांला अभिमान वाटला पाहिजे. सभापती महोदय, या बिलाच्या उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटले आहे की," कृषी पणन पध्दत एकसंघ करण्याच्या दृष्टीने आणि त्यात बळकटी आणण्याच्या दृष्टीने" येथे सर्वात महत्वाचा मुद्दा आहे. तुमचे बॉस दिल्लीत बसले आहेत आणि तुम्ही खांद्यावर घेऊन येथे ओढत आहात. भारत सरकारच्या कृषी आणि सहकार विभागाने राज्य कृषी पणन विकास विनियमन अधिनियम तयार केला आहे. केंद्र सरकारने हा कायदा बदलल्यानंतर सर्व देशांच्या राज्य सरकारांनी त्याप्रमाणे हा कायदा बदलावा याचा अंतर्भाव हा येथे दिला आहे. हा कायदा का आणला गेला याचा खुलासा होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या पणन कायद्यामध्ये मूलभूत बदल केलाअ ाणि त्याच्यामध्ये असे बंधन आले की जर केंद्राच्या कायद्याप्रमाणे बदल केला नाही तर जे अर्थसहाय्य तुम्हांला केंद्राकडून मिळणार आहे ते मिळणार नाही अशा प्रकारची अट टाकण्यात आली आहे. त्या अटीप्रित्यर्थ हा कायदा आला आहे. पणनचा कायदा केंद्राने का बदलला हे पाहिले तर गॅट करारांतर्गत जागतिकीकरणाचे दरवाजे उघडायला लागल्यानंतर या सगळया गोष्टी आलेल्या आहेत. जागतिक बँक मुंबईसाठी कर्ज देताना आपल्या सरकारला डिक्टेट करते की विस्थापित होणाऱ्या दुकानदारांना एक वर्षाचा पगार आगाऊ दिला तर आम्ही तुम्हांला कर्ज देतो. आपल्याला किंवा आपल्यावर आपल्याच विचारांचा पगडा असला पाहिजे. जागतिकीकरणाचे दरवाजे खुले झाले आहेत. गॅट करारामुळे जी बंधने आलेली आहेत त्यातून हे सगळे निर्माण झालेले आहे. केंद्रामध्ये पणनचा कायदा का झाला हे मंत्रीमहोदयांनी आम्हांला सांगणे आवश्यक होते आणि ते त्यांचे काम होते. कायदा का आणला आणि त्याच्यामागे उद्देश काय ? केंद्राच्या बंधनावर चालणारे आणि देशाच्या घटनेवर चालणारे हे आपले राज्य असल्याने शासनावर केंद्राची काही बंधने आहेत. केंद्राने एखादा कायदा आणल्यानंतर तो राज्याला पाळावा लागतो. हे घटनात्मक आहे.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 4Y 1

BGO/ MAP/ SBT/ 20:30

दिवाकर रावते...

ते घटनात्मक आहे. हा कायदा केंद्राने बदलल्यामुळे तो आपल्याला बदलावा लागत आहे.हा गॅटचा परिणाम आहे. त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. हा कायदा बदलत असताना अनेक त्रुटी जाणवत आहेत. त्या नसतील तर त्याचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा. या अधिनियमामध्ये कंत्राटी शेती संबंधातील एका प्रकरणाचा अंतर्भाव आहे. ज्यात सर्व कंत्राटी शेती पुरस्कर्तांच्या सक्तीच्या नोंदणीची, कंत्राटी शेती करार अभिलिखित करण्याची, अशा करारामुळे उद्‌भवलला कोणताही विवाद मिटविण्याची विवक्षित शर्तीअन्वये, कंत्राटी शेती कराराखाली येणाऱ्या उत्पन्नावर बाजार फी आकारण्यातून सूट देण्याची आणि या करारामुळे उद्‌भवलेल्या कोणत्याही दाव्यामुळे उत्पादकाच्या त्याच्या जमिनीवरील मालकी हक्क आणि ताबा यांना धक्का न पोहोचण्याची तरतूद आहे. म्हणजे त्याची जमीन जाणार नाही अशी तरतूद केली आहे. यात आपण लँड ओनरशिप सेक्युअर्ड केलेले नाही. हे धोरण केंद्राचे आहे. माझ्या कास्तकरांचे जीवन कसे समृध्द करणार आहे हे पुढे म्हटलेले आहे. कंत्राटी शेती पध्दतीमुळे अन्न प्रक्रिया उद्योग, निर्यात आणि किरकोळ माल साखळी उद्योग यांना कंत्राटी शेती करार करून आपणास आवश्य तेवढया प्रमाणात दर्जेदार उत्पादन घेणे शक्य होणार आहे. म्हणजे आपला शेतकरी हा त्याची जमीन कंपनीला देईल. हा करार झाल्यानंतर त्यातून जे काही उत्पन्न येणार आहे, ते बाजारपेठेमध्ये जाणार आहे काय ? त्याचे उत्तर नाही असे आहे. एखादा सशक्त आणि समर्थ कंत्राटदार, कंपनी दोन हेक्टरमध्ये प्रक्रिया करणारा प्लँट उभा करू शकेल. मी एक कार्यकर्ता म्हणून मराठवाडयामध्ये काम केले आहे. शेती मालावर प्रक्रिया करण्यासाठी प्रयोग केला. हा प्रयोग पश्चिम महाराष्ट्रातील काही शेतकऱ्यांनी राबविला. हा प्रकल्प हरभऱ्याचा होता. हरभरा बाजारात 12 रुपये किलोने विकला जातो. त्याची डाळ बनविली की ते 24 रुपयाने विकली जाते. हरभऱ्याच्या टरफलाचा उपयोग जनावरांचे खाद्य म्हणून करता येतो. हरभऱ्याच्या डाळीपासून बेसन बनवितात. ते 34 रुपयाने विकतात. अशाप्रकारचे एक यंत्र तयार करण्यात आले होते. या यंत्राचा वापर केला चौपट उत्पन्न मिळते. या यंत्रासाठी एक हॉर्स पॉवरचे मशीन लागते. हे मशीन टू फेजवर चालते.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

हे थ्री फेज वर नाही तर टु फेज वर केलेले आहे. हे काम शेतीतच करावयाचे असल्यामुळे यंत्र निर्माण करुन ते टु फेज वर केलेले आहे. शेतकऱ्यांच्या मालाला जास्त भाव कसा मिळेल यासाठी मी या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न केला. मी आताच हरबऱ्याच्या डाळीचे उदाहरण दिले.तशाच प्रकारचे केळीचे सुध्दा उदाहरण देता येईल. माननीय मंत्री महोदयांच्या मतदारसंघात मोठया प्रमाणावर केळी पिकते. हदगाव, परभणी, हिंगोली हा पट्टा केळीचा पट्टा आहे. केळीचा एक घड जर रस्त्यावर विकावयास काढला तर पाच-सात रुपये मिळतात. परंतु त्या उत्पादकांनी कारखाना काढून जर त्या केळीचे वेफर बनविले आणि मार्केटमध्ये विकावयास घेऊन गेले तर, शेतकऱ्यांना किती आणि कशा प्रकारे पैसा देणार आहात ? कारण आज कृषी उत्पन्न बाजार समित्या असल्यामुळे त्यांना हमी भाव मिळतो आहे. खातेदार शेतकरी आला तर तो आपला माल बाजार समित्यामध्ये आणतो, मोजते, ठेवतो व काही प्रमाणात ॲडव्हान्स घेऊन जातो. या व्यवहारामध्ये बेमानी होत नाही.

महोदय, या विधेयकातील उद्देश व कारणे यामध्ये नमूद केले आहे की, "कंत्राटी शेती पध्दतीमुळे, अन्न प्रक्रिया उद्योग, निर्यात किंवा किरकोळ माल साखळी उद्योग यांना कंत्राटी शेती करार करुन, आपणांस आवश्यक तेवढया प्रमाणात दर्जेदार उत्पादन घेणे शक्य होणार असल्यामुळे या क्षेत्रांना चालना मिळेल." सन्माननीय सदस्य श्री.विलासराव शिंदे यांनी या संदर्भात जो शब्द वापरला तो योग्यच आहे. मागच्या दाराने जमीनदार येण्याची परिस्थिती निर्माण होईल. मागच्या दरवाजाने जमीनदार येणार आणि कंत्राटी पध्दतीने शेती करणार आहे. वर्षाचे पैसे त्याला मिळणार आहे. त्याला वाटेल त्यानुसार तो शेती करणार आहे. पुढे असे म्हटले आहे की, "कंत्राटी शेती उत्पादकांना मशागत सामग्री, पैसा आणि तंत्रज्ञान पुरविणे कंत्राटी शेती पुरस्कर्त्यांना शक्य होईल." हे कोण करणार आहे ? शेतीचा मालकच स्वत:च्या शेतीमध्ये मजूर म्हणून राबणार आहे. केवळ तो एकटाच नव्हे तर त्याच्या कुटुंबियातील सर्व मंडळी त्यावर मजूर म्हणून राबणार आहे. त्यामुळे कंत्राटी शेती करणाऱ्याला एकप्रकारे रेडिमेड मजूरच उपलब्ध होणार आहेत. याला माझा आक्षेप नाही. पुढे असे म्हटले आहे की, "जेणेकरुन, कृषि उत्पन्नाची उत्पादकता वाढेल आणि त्याचा दर्जा सुधारेल, तसेच कंत्राटी शेती करारामध्येच विक्रीदर देण्यात येणार असल्यामुळे,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 20:35

श्री.दिवाकर रावते....

कंत्राटी शेती उत्पादकाला दराचीही हमी मिळेल. अशाप्रकारे, शेतकऱ्यांना आणि एकंदरीत व्यावसायिकांना कंत्राटी शेती पध्दती लाभदायी ठरणार असून, ती राज्याच्या विकासाला प्रेरक ठरेल."

नंतर श्री.कांबळे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

हे प्रिॲम्बल आहे. माननीय मंत्रिमहोदय आपण तर शेतकरी आहात. आपणाला याची जाणीव आहे. सभापती महोदय, हा जो येणार आहे, त्याला उत्पन्न काढावयाचे आहे, ते करत असताना त्याला जे जे शक्य आहे, ते तो करणार आहे. मग आपण कृषी खात्याचे धोरण आणि या गोष्टीचा मेळ कसा घालणार ते सांगा. कृषी खात्याने धोरण ठरविले आहे की, रासायनिक खतांनी शेकडो एकर जमीन नापीकीकडे जायला लागली असल्याने शेतकऱ्याला पुन्हा सेंद्रीय शेतीकडे वळवायचे आहे. या संदर्भात भागांभागांमध्ये कृषी खात्यामार्फत शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या जात आहेत, शाळा घेतल्या जात आहेत, मेळावे घेतले जात आहेत. कृषी खाते सांगत आहे की, आपण सेंद्रीय शेतीकडे वळा. सभापती महोदय, अतिरिक्त पाण्याच्या वापराने ऊस उत्पादकांचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. आता ती जमीन तशीच ठेवून पुढच्या दहा एकरांची शेती करु आणि पुन्हा अगोदरच्या शेतीला कसामध्ये आणू, अशी परिस्थिती अतिरिक्त पाण्याने झालेली आहे. अतिरिक्त रासायनिक खतांचा वापर आपल्या जमिनींची धूळधान करीत आहे. आपण कंत्राटी शेतीदारांवर बंधन आणा. ही शेती त्यांची नाहीच. त्यांना जास्तीत जास्त उत्पादन काढावयाचे आहे म्हणून ते जास्तीत जास्त रासायनिक खतांचा वापर करतात. भविष्यात त्या शेतीमध्ये नापिकी निर्माण झाली तर करारापुरते, केलेले उत्पन्न घेऊन ते निघून जातील आणि ती नापिक झालेली जमीन पुन्हा शेतकऱ्यांकडे येईल. सभापती महोदय, असे घडण्याची शक्यता शंभर टक्के आहे. महाराष्ट्रामध्ये सेंद्रीय शेती व्हावी हे कृषी खात्याचे धोरण राबविले गेलेच पाहिजे. भविष्यात शेतकऱ्यांकडे येणारी जमीन चांगली राहिल की नाही याबद्दल मनात शंका आहे. माननीय शिंदे साहेबांनी येथे शेती महामंडळाचा उल्लेख केला. आता सगळी जमीन देण्याचा प्रस्ताव आला होता. सभापती महोदय, हेच बील आज आणावयाचे होते तर शेती महामंडळाची जमीन परत देण्याची गरज नव्हती. शेती महामंडळाकडे असलेल्या 6 ते 7 हजार हेक्टरमध्ये हा प्रयोग करता आला असता आणि शेती महामडळ यामुळे स्वयंपूर्ण झाले असते आणि शेतीच्या माध्यमातून ज्यांच्या ज्या नोकऱ्या आहेत त्या राहिल्या असत्या. हा प्रयोग केला असता तर हे खरेच उपयुक्त आहे की नाही ते आपल्याला कळले असते. हे बील आणावयाचे असताना देखील आपण जमिनी परत दिल्या.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

कंत्राटी शेती याचा अर्थ, " कंत्राटी शेती उत्पादकाने कंत्राटी शेती पुरस्कर्त्याबरोबर केलेल्या लेखी कराराअन्वये केलेली शेती, असा आहे व अशा शेतीचे उत्पन, कंत्राटी शेती पुरस्कर्त्यांकडून खरेदी केले जाईल असा त्या कराराचा आशय असेल व तसे त्या करारात विनिर्दिष्ट केलेले असेल. " सभापती महोदय, बील बनविताना सर्व गोष्टींची फोड केलेली असते. त्यामध्ये " कंत्राटी शेती करार " याचा अर्थ, कंत्राटी शेतीसाठी केलेला लेखी करार असे दिले आहे. सभापती महोदय, करार हा नेहमी लेखीच करायचा असतो. त्यानंतर " कंत्राटी शेती उत्पादक " म्हणजे कोण याचा अर्थ, ज्याने कंत्राटी शेती करारानुसार कृषी उत्पन्न काढून त्याचा पुरवठा करण्याचे मान्य केले असेल असा शेतकरी किंवा शेतकऱ्यांचा संघ असा आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

शेतकरी एकत्र येऊन को-ऑपरेटिव्ह फार्मिंग सोसायटया आताही चालवत आहेत, आमच्या संभाजीनगर येथे अशा प्रकारे तीन मोठे शेतकरी आहेत, त्या शेतकऱ्यांचे संघ फेल गेलेले आहेत. यामध्ये नक्की आपण काय करणार आहात ? जो मोठा माणूस शेतीसाठी पैसा देईल ? यंत्रसामुग्री देईल, मग तो उत्पादित केलेला माल शेतकऱ्यांना कसा काय देईल ? कशासाठी देईल, यामध्ये मग तो विनाकारण पैसा टाकेल काय ? याबाबत विधेयकामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही. या सदनामध्ये एकदा कायदा मंजूर झाल्या नंतर त्याची अंमजबजावणी होते, यामध्ये दुर्देव असे आहे की यापूर्वी महाराष्ट्रामध्ये जमीन घ्यावयाची असेल तर तो शेतकरी असला पाहिजे तेव्हा शेतकरी असणे कंम्पलरी होते, हे सरकार महात्मा फुले यांचे नाव घेऊन शेतकऱ्यांचा आसूड त्यांच्यावरच उगारीत आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव घेऊन सरकारने आता असा कायदा केलेला आहे की या कायद्यामुळे महाराष्ट्रामध्ये जमीन घ्यावयाची असेल तर तो शेतकरी असण्याची आता गरज राहिलेली नाही. आता अभिताब बच्चनला कोणत्यातरी गावी जावून 7/12 च्या उताऱ्याचा दाखला आणण्याची गरज भासणार नाही. याचा परिणाम असा झाला की ज्यांच्याकडे भरपूर पैसा आहे, त्यांनी जमीनी घेण्याचा सपाटा लावलेला आहे. दिल्ली येथे मोठ- मोठया नामवंत लोकांनी, दिल्लीच्या मंत्र्यांनी कोकणामध्ये जमीन खरेदी केलेली आहे. श्री. कृपाशंकर सिंह यांनी कोकणामध्ये जमीन घेतलेली आहे, हिरानंदानी यांनी कोकणामध्ये जमीन घेतलेली आहे. हा निर्णय महाराष्ट्र सरकारने कोणासाठी बदललेला आहे. का बदललेला आहे. याची स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही. या कायद्याच्या अगोदर कोणालाही 7/12 चा उतारा असल्याशिवाय शेती घेता येत नव्हती. सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी त्यांच्या भाषणात अनेक मुद्दे मांडलेले आहेत, आता या कायद्यामुळे बदल झाल्यामुळे कंत्राटी शेतकरी कोण ? शेतकरी संघ कोण ? करार कशासाठी करणार आहात ? आपण यामध्ये असे सांगितले आहे की कंत्राटीशेती पुरस्कर्ता आहे, हा पुरस्कर्ता शेतीसाठी पैसा देईल, तंत्रज्ञान देईल, सामुग्री देईल ते हे कशासाठी देणार आहे ? त्याचा त्यामध्ये काय फायदा आहे ? तो शेतकऱ्यांना उत्पादन का देईल ? यामध्ये नक्की काय प्रकार आहे याचा खुलासा होणे अत्यंत महत्वाचे आहे. कंत्राटदार शेती पुरस्कर्ता याचा अर्थ काय ?

......2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

याचा अर्थ ज्याने कंत्राट केलेला आहे ती व्यक्ती उत्पादक शेतकरी, शेतकरी संघ, कंत्राटी पुरस्कर्ता अशा व्यक्तीला काय द्यावयाचे याचे प्रिॲम्बल मध्ये सांगितले नाही. हया सर्व बाबी आपण पायात पाय घालून अडकविलेल्या आहेत. हे आम्हाला समजत नाही, माननीय मंत्री महोदयांनी हे सर्व मुद्दे आम्हाला समजावून सांगितले पाहिजे. त्यानंतर प्रकरण 1 क मध्ये कंत्राटी शेती करार, तो करार बाजार समितीकडे किंवा विहित अधिकाऱ्याकडे स्वत:ची नोंदणी करेल, हे कोण आहे, डीडीआर आहेत, निबंधक आहेत, विहित केलेल्या अधिकाऱ्याकडे म्हणजे तो अधिकारी नेमका कोण आहे ? त्यांची व्याख्या येथे देणे आवश्यक होते. कारण या कायद्यामध्ये ते दिलेले नाही त्यामुळे आपल्याला नक्की अभिप्रत असा कोणता अधिकारी आहे, महसूल अधिकारी आहे, सहकारी अधिकारी आहे यातून काहीही बोध होत नाही.

यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

विहित केलेला अधिकारी याचा स्पष्ट अर्थ या विधेयकामध्ये देण्यात आलेला नाही. त्यामुळे आमच्या मनामध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. आपण त्या संदर्भात जी व्याख्या ठरविली असेल ती या ठिकाणी सांगितली पाहिजे. तो महसूल विभागाचा अधिकारी आहे की, सहकार विभागाचा अधिकारी आहे? हे याठिकाणी आपण स्पष्ट केले पाहिजे. त्याचप्रमाणे पुढे असे म्हटले आहे की, "कंत्राटी शेती करार, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, असा तपशील आणि अशा अटी व शर्ती अंतर्भूत असलेला असेल", "कंत्राटी शेती करार किंवा भारतीय संविदा अधिनियम, 1872 किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कंत्राटी शेती उत्पादकाच्या शेतजमिनीचा कोणताही मालकी हक्क किंवा अधिकार किंवा तिची मालकी किंवा ताबा, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याकडे किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याकडे किंवा त्याच्या अभिकर्त्याकडे हस्तांतरित, अन्यसंक्रामित अथवा निहित करण्यात येणार नाही" हा क्लॉज फार चांगला आहे. सभापती महोदय, आपण वकील असल्यामुळे आपल्याला नक्की माहीत आहे की, सुप्रिम कोर्टाने लिव्ह ॲड लायसन्सच्या बाबतीत निर्णय दिला आहे की, यापुढे कुणालाही त्या जागेवर आपला अधिकार दाखविता येणार नाही. मी माझी जागा एखाद्याला लिव्ह अँड लायसन्स कराराने दिली तर करार संपल्यानंतर ती जागा खाली करावी लागेल. आणि लिव्ह अँड लायसन्स करार वेळेमध्ये रिनिव्हल केला नाहीतर त्याचा फायदा घेऊन ती जागा बळकावता येणार नाही, ती खाली करावी लागेल. माननीय सदस्य श्री. शिंदे साहेब आपण मघाशी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला त्याप्रमाणे आम्हाला ही बाब संशयास्पद वाटते, वेठबिगारी निर्माण करणारी वाटते. सावकारी पाशामध्ये गेलेल्या शेतकऱ्याची अवहेलना होते, सावकाराच्या ताब्यात गेलेली जमीन तो आयुष्यभर सोडवू शकत नाही अशी आपल्याला भीती वाटते. क्रमांक 4 मध्ये "कोणत्याही कंत्राटी शेती करारातून उद्‌भवलेला विवाद मिटविण्यासाठी, तो विवाद, याबाबतीत विहित केलेल्या समेट प्राधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल." असे म्हटले आहे. यामध्ये विहित केलेला समेट प्राधिकारी कोण आहे त्याची व्याख्या विधेयकात स्पष्ट केलेली नाही. हा प्राधिकारी कोणत्या लेव्हलचा आहे याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. अशाप्रकारच्या अनेक शंका या विधेयकाच्या माध्यमातून आमच्या मनामध्ये निर्माण झाल्या आहेत. "समेट प्राधिकारी, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यावर, तो विवाद, तीस दिवसांच्या आत संक्षिप्त पध्दतीने मिळवील" म्हणजे काय? तो कॉम्प्रमाईज करील असा त्याचा अर्थ होतो कां? (यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवा□र रावते (पुढे सुरु....

पृष्ठ □मां□ 3 वर म्हटले आहे □, " The party aggrieved by the decision of the settlement authority under the sub-section (4) may prefer an appeal to the Appellate Authority as may be prescribed in this behalf, within thirty days from the date of the decision. The Appellate Authority shall dispose of the appeal within thirty days, after giving the parties reasonable opportunity of being heard and the decision of the Appellate Authority shall be final." मराठीमध्ये समिती प्राधिकारी मिटवील असे म्हटलेले आहे. आप□ ए□ादा □यदा □रायचा आ□ि -ंतर त्यामध्ये मिटवामिटवी □रायची. म्ह□जे □ाव □रभार □ल्यासार□ आहे. स-मा-ा-ीय मंत्री श्री.आत्राम साहेबां-ाा माहिती आहे □ त्यांच्या भा□ामध्ये "जात पंचायत" असते. त्याप्रमा□ □ही झाले □ "जात पंचायती"मध्ये प्र□र□ -ेऊ-ा ते प्र□र□ मिटविले जाते. तशाप्र□रे या □यद्यामध्ये अभिप्रेत आहे □य ?

सभापती महोदय, □लम 5 ई (4) मध्ये म्हटले आहे □, "□□त्याही □त्राटी शेती □रारातू-ा उद्‌भवलेला विविद मिटवि□यासाठी, तो विवाद, याबाबतीत विहित □लेल्या समेट प्राधि□ऱ्या□डे -ि□र्यार्थ सोपवि□यात येईल. समेट प्राधि□री, प□□रां-ाा आपले म्ह□□ मांड□याची वाजवी संधी दे□यात आल्यावर, तो विवाद, तीस दिवसांच्या आत सं□ि□त पध्दती-ो मिटवील."

सभापती महोदय, आप□ व□ल आहात. त्यामुळे आप□ त्या शब्दाचा अर्थ □य होऊ श□तो हे आपल्याला माहीत आहे मी सां□□याची आवश्य□ता -ााही. ज्यांच्या मुठीत ता□द आहे ते व्यवक्स्थत मिटवामिटवी □र□र. पुढे म्हटलेले आहे □, "(5) पोट-□लम (4) □ालील, समेट प्राधि□ऱ्याच्या -ि□र्या-ो व्यथित झालेल्या प□□रास त्या -ि□र्याच्या दि-ाां□पासू-ा तीस दिवसाच्या आत, याबाबतीत विहित □र□यात येईल अशा अपील प्राधि□ऱ्या□डे अपील दा□ल □रता येईल." अपील प्राधि□री □□ अस□र आहे ? ते -िवृत्त -यायाधीश आहेत □य ? त्यांचे स्टेटस □य आहे ? याचा यामध्ये □हीच □ुलासा □लेला -ााही.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "तीस दिवसांच्या आत ते अपील निकालात काढील आणि अपील प्राधिकाऱ्याचा त्याबाबतचा निर्णय अंतिम असेल " यामध्ये "निकालात काढील" असा शब्द वापरलेला आहे आणि दुसरीकडे "मिटवील" असा शब्द वापरलेला आहे. यामध्ये "अपील प्राधिकाऱ्याचा त्याबाबतचा निर्णय अंतिम असेल" असे म्हटले आहे. सहकार न्यायालयाच्या बाबतीत मला वेगळे सांगावयास नको. सहकार न्यालयामध्ये योग्य न्याय होत नाही. सभापती महोदय, यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "पोट-कलम (4) खालील, समेट प्राधिकाऱ्याचा निर्णय आणि पोट-कलम (5) खालील अपील प्राधिकाऱ्याचा अपिलावरील निर्णय हे, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे प्रभावशाली असतील आणि त्याप्रमाणे ते बजावणीयोग्य असतील, आणि हुकूमनाम्याची रक्कम जमीन महसुलच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल." जे कंत्राट घेणारे आहेत त्यांनी वसुली काढली तर शेतकरी मरतील. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "कंत्राटी शेती कराराशी संबंधित असणाऱ्या आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या विवादाला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही." आता हे जमीनदारी निर्माण करीत आहेत त्यामुळे आमचे शेतकरी वेठबिगार होतील. सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे हे मघाशी बोलले. त्यांच्यामध्ये काँग्रेसचा मूळ कार्यकर्ता जागा झाला. ही जनतेची बांधिलकी आहे. या निर्णयाला अपिलामध्ये आव्हान देता येणार नाही असे यामध्ये म्हटले आहे. या विधेयकामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "कंत्राटी शेती कराराखालील कृषि उत्पन्नाची बाजारतळाबाहेर, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला विक्री करता येईल." त्या शेतीमध्ये जे जे पिकते त्याची नोंद बाजार समितीमध्ये होते. ते किती रुपयाला विकतात ? शेतकऱ्याला काय मिळते ? तुमची जी आकडेवारी येते, जो वार्षिक अहवाल तयार होतो त्यामध्ये किती उत्पन्न झाले हे समजते. त्याची नोंद बाजार समितीमध्ये असते. यामध्ये असे म्हटले आहे की, "कंत्राटी शेती कराराखालील उत्पन्नाची बाजारतळाबहेर, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला विक्री करत येईल." कंत्राटी शेती पुरस्कर्ता म्हणजे ज्यांनी कंत्राटी शेतीचा करार केलेला आहे तो. तेथील उत्पन्न शेतकऱ्याचे की कंट्राटदाराचे असा प्रश्न विचारला तेव्हा माननीय मंत्रिमहोदय म्हणाले की, ते उत्पन्न शेतकऱ्यांचे आहे. लोकांची भावना आपण गृहीत धरली तर त्यादृष्टीने या कायद्यामध्ये काय तरतूद

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आहे ? जे उत्पन्न होईल ते बाजार समितीच्या बाहेर विकता येईल असे यामध्ये म्हटले आहे. आपण कापूस एकाधिकार खरेदी योजनेचे वाटोळे केले. तसे या ठिकाणी झालेले आहे. कापूस एकाधिकार खरेदी योजनेमध्ये आणि खाजगीमध्ये विकण्यास परवानगी दिली. त्यामुळे गेल्या चार वर्षामध्ये विदर्भामध्ये 1632 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आता या ठिकाणी आपण असे म्हणत आहात की, शेतकरी मालक नाही. या ठिकाणी असे म्हटले आहे की, कंत्राटी शेतीमधून मिळणारे कृषी उत्पन्न बाजारतळाबाहेर विकता येईल. म्हणजे बाहेर कोठेही त्यांना माल विकता येईल. म्हणजे बाजार समितीचा बँडबाजा वाजणार. यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "कोणतीही बाजार फी आकारणीयोग्य असणार नाही." म्हणजे कॉर्पोरेट शेतीवर बाजार समितीच्या फीची आकारणी होणार नाही असे म्हटले आहे. ते यातून मुक्त झाले. हे पुरस्कर्ते म्हणजे कंत्राटी शेती करणारे पुरस्कर्ते. त्या ठिकाणी जे उत्पादन होईल ती त्याची मालमत्ता होणार आहे. या कायद्यामध्ये विसंगती आहे. शेतकऱ्यांना उत्पन्न मिळणार काय ? असे विचारल्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी नाही असे सांगितले. मी असे म्हटले की, जे पैसे टाकतील तेच त्या ठिकाणी उत्पन्न काढतील आणि तेच त्या ठिकाणी प्रक्रिया करतील. ही नवीन वेठबिगारी चालू होत आहे. या शेतकऱ्यांना चारही बाजूने बांधून गरीब शेतकऱ्यांच्या शेतीवर या भांडवलदारांचे पोट भरण्याचे काम करणारा हा कायदा आहे. केंद्राने कायदा केला म्हणून आपल्याला हा कायदा करणे भाग पडत आहे. महाराष्ट्रामध्ये हा कायदा केला नाही तरी काही बिघडणार नाही. परंतु केंद्राकडून पणनच्या संदर्भात जो निधी प्राप्त होतो. तो निधी किती आहे हे माहीत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 21:05

(श्री. दिवाकर रावते...)

परंतु त्यांनी निधी देणार नाही असे बजावल्यामुळे या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे बंधन आल्यामुळे हे विधेयक याठिकाणी आणलेले आहे. हा कायदा शेतक-यांना उद्ध्वस्त करणारा आहे.सभापती महोदय, एक अंक या मंडळाने या पूर्वीच सुरु केलेला आहे. हे विधेयक आणण्यापूर्वी याबाबतीत पणन मंत्र्यांशी चर्चा केली. हा कायदा येण्यापूर्वीच यवतमाळ, वाशिम याठिकाणी हे काम चालू झालेले आहे. श्री. सागर चौताळा नावाचे गृहस्थ वाशिम येथे आयटीसी सेंटर चालवितात. त्यांनी उभे केलेले हे सेंटर आपल्याला अभिप्रेत आहे. त्या सेंटरमध्ये 300 संगणक बसविलेले आहेत. यामुळे त्या गावातील संगणक शिकलेल्या युवकांना रोजगाराची संधी मिळालेली आहे. या सेंटरद्वारे रात्री 8.00वाजता सोयाबीनचे भाव काय असतील हे शेतक-यांना सांगितले जाते आणि त्याप्रमाणे शेतकरी आपला माला तेथे विकण्यासाठी आणतात. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारे दुधाचे भाव ठरविले जातात. पश्चिम महाराष्ट्रामध्ये रात्री इंटरनेटवरुन दुधाचे भाव काय आहेत, दुधामध्ये किती फॅट असले पाहिजे हे सांगितले पाहिजे आणि त्याप्रमाणे गावातील लोक आपले दूध सेंटरवर घेऊन जातात. तशीच पध्दत आज वाशिम आणि यवतमाळ येथे सुरु झालेली आहे. वाशिम मधील 300गावांमध्ये ही पध्दत सुरु झालेली आहे. त्यांनी त्याठिकाणी शेतक-यांसाठी पणन सेंटर काढलेले आहे. या शिवाय शेतक-याने कोणते बियाणे वापरावे, कोणते खत वापरावे, कोणत्या पध्दतीने शेती करावी हेही शेतक-याला सांगितले जाते. इतकेच नाही तर शेतक-याला प्रात्यक्षिके करुन दाखविण्यासाठी, शेती विषयक प्रदर्शने भरविण्यासाठी आणि त्याठिकाणी आलेल्या शेतक-याला आराम करण्यासाठी जागा ठेवलेली आहे. तसेच फाईव्ह स्टार हॉटेलप्रमाणे सब्सिडाईज्ड कॅण्टीन देखील ठेवलेले आहे. त्याठिकाणी आल्यानंतर शेतक-याला समाधान मिळते. त्याठिकाणी कोणत्याही कार्पोरेटला जमीन दिलेली नाही, कोणाशीही करार केलेला नाही. शेतक-याने चांगल्या प्रतीचे बी-बियाणे, खते वापरुन दर्जेदार माल उत्पादित करावा आणि त्याच्या मालाला चांगला भाव मिळावा यादृष्टीने शेतक-यांना त्या आ.टी.सी.मध्ये ट्रेनिंग दिले जाते. यामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य छोटे छोटे शेतकरी सावकारी पाशातून मुक्त होण्यास मदत होते. यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये फारशा शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या नाहीत. बुलढाणा, अकोला, यवतमाळ, अमरावती या भागामध्ये जास्त शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्या ठिकाणी सॉईल

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

टेस्टिंग लॅब देखील सुरु करण्यात आलेली आहे. शेती उत्पादनाच्या बाबतीत शेतकरी ज्ञानी व्हावा असा प्रकारचा प्रयत्न वाशिम येथील आय.टी.सी. मार्फत सुरु आहे.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ श्री. शिगम नंतर 21:10

श्री. दिवाकर रावते ....

मला एवढेच म्हणावयाचे आहे की, जो प्रयोग वाशिममध्ये किंवा इतर काही जिल्हयांमध्ये सुरु करण्यात आला आहे तो सर्वच ठिकाणी राबवावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो. कायदा आणि नियम यामध्ये फरक असा आहे की नियम केव्हाही बदलता येतात आणि कायदा बदलायचा असेल तर सरकारला विधिमंडळापुढे यावे लागते. कायदा करताना सदनाचा कल जाणून घ्यावा लागतो. शेतकऱ्यांच्या हिताचे कायदे करताना आम्हांला आमची मते मांडता येतात हे मी पुन्हा एकदा यानिमित्ताने सांगू इच्छितो. यासंदर्भात अधिक खोलवर चर्चा करण्याची आवश्यकता आहे. केंद्राने कायदा करण्यासाठी जर दबाव आणला असेल तर तो झुगारुन द्या आणि नसेल तर कायदा करताना शेतकऱ्यांची पिळवणूक होणार नाही आणि त्यांचा फायदाच होईल याची काळजी शासनाने घ्यावी एवढी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगन्नाथराव शेवाळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या बिलाला समर्थन करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि श्री. विलासरावजी शिंदे यांनी या बिलाबाबत आपली मते याठिकाणी व्यक्त केली. माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे या बिलाचा अर्थ असेल तर निश्चितच हे बिल शेतकऱ्याला हानीकारक आहे आणि मी जो बिलाचा अर्थ जाणून घेतला आहे तसा जर त्याचा अन्वयार्थ असेल तर हे बिल शेतकऱ्यांच्या दृष्टीने निश्चितच क्रांतिकारक असे या बिलाचे वर्णन करावे लागेल. या देशामध्ये 4-5 राज्यांचा अपवाद वगळता हे बिल स्वीकृत करण्यात आले आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये तशा अर्थाने विचार केला तर हे बिल स्वीकृत करण्यासाठी उशीरच झालेला आहे. मी हे अशासाठी म्हणतो आहे की, महाराष्ट्र हे क्रांतीकारक राज्य असल्यामुळे उशीर झाला आहे. माझ्या काही सहकाऱ्यांचा या बिलाच्या बाबतीत जो समज झालेला आहे तो कदाचित बरोबर असेल आणि माझा गैरसमज असू शकेल. त्यांचा जो समज झालेला आहे त्यावरुन मला असे दिसते की, कंत्राटी शेती या गॅटकरार या शब्दाचा अर्थ आहे. परंतु माझा समज असा आहे की या बिलामुळे कंत्राटी शेती करार हा फक्त शेतमालाचा करार आहे असे मला वाटते. मंत्रीमहोदय त्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये याबाबतचा खुलासा करतीलच. राज्यामध्ये "कसेल त्याची जमीन" हा कायदा आजही अस्तित्वात आहे. शेतकऱ्यांची नेहमीच पाठराखण करणारे असे हे राज्य आहे. पुरोगामी विचारांचे हे सरकार आहे. सरकारकडून या बिलामुळे जे घडणार आहे त्यानुसार शेतीमाल उत्पादित होणार आहे तो माल उत्पादन होण्यापूर्वीच त्या शेतमालाची किंमत ठरविली जाणार आहे आणि त्यानुसार करार होणार आहे. उदा. एखाद्या व्यापाऱ्याला 5-10 हजार कि.टोमॅटो पाहिले असेल तर तो व्यापारी त्या शेतकऱ्याला सांगेल की मला 10 हजार टन टोमॅटो अमुक एका महिन्यामध्ये आवश्यक आहे. हा माल मला तुझ याकडून हवा आहे आणि त्याचा रेट मी हा देणार आहे. 20 रु.किंवा 35 रु. किलो असा मी मालाचा रेट देणार आहे. शेतकऱ्याला तो परवडणार आहे किंवा नाही हे तो सांगणार आहे आणि समजा त्या शेतकऱ्याला तो परवडणार असेल तर त्या व्यापाऱ्याशी तो करार करणार आहे. या रेटचा करार झ ाल्यानंतर तो माल उत्पादन करण्यासाठी नवे तंत्रज्ञान,विज्ञान आणि पैसा जर पुरविणार असेल तर बिघडले कोठे ?

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथराव शेवाळे...

एखाद्या उत्पादित मालाच्या बाबतीत त्याच्याशी करार झाल्यानंतर तो पुरवठादार आमच्याकडून काय घेणार आहे. ? आज आम्ही बँकेकडून शेतीसाठी कर्ज घेतो त्यावेळी बँक व्याज आकारते. व्याज जर वेळेवर फेडले नाही, तर पेनल्टी चार्जेस लावते. त्यामुळे आता तो जे तंत्रज्ञान पुरविणार आहे, बियाणे पुरविणार आहे त्याच्या बदल्यात आमच्याकडून काय घेणार आहे ? उत्पादित माल झ ाल्यानंतर तो पैसे घेणार आहे काय ? निसर्गाच्या अवकृपेमुळे माल उत्पादित होऊ शकला नाही, निसर्गाच्या अवकृपेमुळे नुकसान झाले तर अशा वेळी काय करणार आहे ? त्यासाठी शेतकऱ्यांना काही सूट आहे काय ? निसर्गाच्या अवकृपेमुळे जे नुकसान होईल ते शेतकऱ्यावर कर्ज म्हणून लावण्यात येणार आहे काय ? शेतीचे नुकसान झाल्यामुळे तो आमच्या शेतावर टाच आणणार आहे काय ? या तरतुदीमुळे आमचा शेतीवरचा हक्क शाबूत राहणार आहे काय ? शेतीमध्ये घातलेले पैसे मिळत नसल्यामुळे त्याला कोर्टामध्ये जाण्याचा अधिकार यामुळे प्राप्त होणार आहे काय ? समजा एखादी पार्टी कोर्टात गेली आणि कोर्टाने केस ॲडमिट करून घेऊन शेतकऱ्याच्या विरोधात रूलिंग दिले तर काय होईल ? या सारख्या ज्या गोष्टी आहेत, त्यांचा विचार होणे गरजेचे आहे. हे बिल क्रांतिकारक आहे हे अशासाठी म्हणालो की, आज राज्य शासन सगळया गोष्टींमध्ये प्रगती करू शकत नाही. आज ज्यांची कुवत आहे, ज्यांच्याकडे पैसा आहे, नवे तंत्रज्ञान आहे असेच लोक प्रगती करू शकतात. पण जो सर्वसामान्य शेतकरी आहे तो काहीही करू शकत नाही. तो नव्या तंत्रज्ञानापासून दुर्मुखला राहतो. ज्या मालाची हमी मिळत नाही असे उत्पादन मग त्याला घ्यावे लागते. कांद्यांच्या विषयावर सभागृहामध्ये बरीच चर्चा झाली. कांदा उत्पादक शेतकऱ्यांबद्दल शासनाने सहानुभूती व्यक्त केली. कांद्याबद्दल शासनाचे धोरण बदलत आहे. शासनाच्या धोरणामध्ये निश्चित अशी स्थिरता नसल्यामुळे काय परिणाम झाला आहे ? आज जगाला काय पाहिजे आणि आपण काय पिकवतो आहे ? याचा कधीही विचार केलेला नाही. जागतिक बाजारामध्ये पांढऱ्या कांद्याला मागणी आहे. आपण मात्र तांबडा कांद्याचे उत्पादन घेतो. त्यामुळे आपला तांबडा कांदा जागतिक बाजारात विकला जात नाही. पांढऱ्या कांद्याचे बियाणे नसेल तर ते तयार करून पांढरा कांदा निर्यात करण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. पण त्यासाठी आपण काहीही पावले टाकलेली नाहीत. अशा प्रकारची पावले व्यापारी, पैसेवाले टाकणार असतील आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शेवाळे...

त्यातून त्यांना जर पैसा मिळणार असेल तर ते तुमच्या आमच्याकडे बघणारसुध्दा नाहीत. या बिलाचे समर्थन करीत असताना शेतकऱ्यांच्या हिताला बाधा येणार नाही याकडेसुध्दा पाहिले पाहिजे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.भारवि.... 21:20

श्री.जगन्नाथ शेवाळे....

त्याच्या काळया आईला कोणी बाजूला करु शकणार नाही अशा प्रकारचे संरक्षण जर या कायद्यामध्ये असेल तर कोणीही शेतकऱ्याचे वाकडे करु शकणार नाही. अशा प्रकारचे संरक्षण असेल तर या विधेयकाला विरोध असण्याचे कारण नाही. किंबहुना आपण या विधेयकाचे समर्थनच केले पाहिजे. इंडस्ट्रीज वाढावी म्हणून आपण प्रयत्न करतो. त्यासाठी सोयीसुविधा उपलब्ध करुन देतो. तशाच प्रकारची सुविधा जर शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यासाठी जर कोणी पैसा टाकत असेल, तर त्यालाही सुरक्षितता मिळावयास पाहिजे. शेतकऱ्यांचा उध्दार व्हावा अशा प्रकारची सुरक्षितता या विधेयकातून येत असेल आणि ही सुरक्षितता पैसे टाकणाऱ्याला वाटत असेल तर त्वरित हे विधेयक संमत होणे आवश्यक आहे.

महोदय, शेतमाल हा एकच माल असा आहे की, त्याबद्दल निश्चित सुरक्षितता देता येत नाही. कारण यातील अर्धा माल नाशवंत आणि अर्धा टिकाऊ असतो. हमी भाव मिळत नसेल तर कोणीही या क्षेत्रात पैसा टाकण्यास धजावत नाही. साखरेसारखे उत्पादन लोकांच्या माध्यमातून सहकार पध्दत अवलंबून केले गेले. त्यामुळे देशात साखर निर्यात करण्याजोगी परिस्थिती निर्माण झाली. पूर्वी आपण केवळ गुळाचे उत्पादन करीत होतो. परंतु ते राष्ट्रीय उत्पन्नाची हानी करणारे होते. कारण गुळ तयार करीत असताना क्रशिंगमध्ये 20 ते 40 टक्के ऊस आतच राहत होता. त्यामुळे साखरेचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. त्यामुळे या उत्पादनातून 90 ते 95 टक्के रस काढला जाऊ लागला. म्हणून नवीन तंत्रज्ञान आले तर निश्चिप्रकारे त्याचा आपल्याला उपयोग होणार आहे. असे झाले तरच कदाचित शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत. शेतीच्या मालाचे उत्पादन झाल्यानंतर किमान उत्पादनाच्या खर्चाइतका माल येतो असे बऱ्याच वेळा होत नाही. त्यामुळे या मालासाठी राज्य सरकार हमी भाव देऊ शकत नाही. अशा वेळेला जर शेतकऱ्याच्या दृष्टिकोनातून हे विधेयक हितकारक होणार असेल तर त्याला आपण विरोध करता कामा नये. शेतकऱ्याला कोणी दुसरी व्यक्ती सहकार्य करीत असेल तर त्यापासून आपण त्याला वंचित ठेवता कामा नये. कदाचित या विधेयकाचा तोच उद्देश असावा.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि श्री.विलासराव शिंदे यांनी ज्याप्रकारे या विधेयकाचा अर्थ काढला आहे तसा अर्थ निघत असेल तर मी या विधेयकाचे समर्थन करणार नाही. परंतु माननीय मंत्री महोदयांनी ज्या चांगल्या उद्देशाने हे विधेयक या ठिकाणी आणले आहे तसा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शेवाळे....

उद्देश असेल तर आपण सर्वांनी समर्थन करणे गरजेचे आहे. आज देशामध्ये हिंदुस्थान हा एकमेव देश असा आहे की, शेतीच्या उत्पादनाच्या बाबतीत अनुकूल अशी परिस्थिती आहे. जितके चांगले पर्जन्यमान, हवामान, सुर्यप्रकाश, ऋतुमान आपल्या देशात आहे तितके अन्यत्र कोठेही नाही. साधनसंपत्तीच्या दृष्टिकोनातून प्रतिकुल परिस्थितीला मागे टाकून, जर त्यातून अडचण दूर होणार असेल तर, आपण निश्चितपणाने या विधेयकाला समर्थन देऊन ते मंजूर केले पाहिजे. असे झाले तरच शेतीवरील ज्या प्रोसेस इंडस्ट्रीज आहेत, दूध प्रोसेस इंडस्ट्रीज आहेत त्या सुरु होऊ शकतील. जे शेतकरी आपली शेती करु शकत नाही, अशा वेळी त्यांची शेती पैसेवाले करु शकतील. शेतकऱ्यांची शेती जागेवर राहण्यासाठी आणि पैसेवाल्यांनाही त्यांनी गुंतविलेल्या पैशाची हमी मिळेल यासाठी हे विधेयक आहे. जर या विधेयकामध्ये काही त्रुटी राहील्या असतील तर, त्रुटी दूर करुन शासनाने ते पुन्हा मांडावे. त्यामुळे हे विधेयक मंजूर करावे, एवढीच या निमित्ताने विनंती करतो आणि माझे दोन शब्द पुरे करतो.

-----

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

अध्यक्ष महाराज, देशाच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये एक आवर्तन पूर्ण होवून नव्या आवर्तनाचा अध्याय सुरु झालेला आहे हे स्पष्टपणे दिसून येते. स्वातंत्र मिळण्यापूर्वी त्यावेळच्या राष्ट्रीय नेत्यांनी शेती व्यवसायाविषयी जे विचार मांडले होते, त्यामध्ये एक गोष्ट अतिशय स्पष्टपणे मांडली होती. खेडयापाडयांमध्ये शेती व्यवसाय करणा-यांवर सावकारांनी जमीनदारांनी जे मोठे उपकार करुन ठेवले आणि हजारों एकर शेती काही व्यक्तींच्या ताब्यात होती ही गोष्ट बरोबर नाही. जो कसेल त्याला ती शेती दिली पाहिजे असा तो विचार होता. या विचारांची अंमलबजावणी स्वातंत्र मिळाल्यानंतर, घटना अंमलात आल्यानंतर ज्या वेळेला सुरु झाली, त्यावेळेला पहिल्या एका वर्षामध्ये असे दिसून आले की.... काल परवा मी सांगितले होते, ते परत सांगू इच्छितो. कसेल त्याची जमीन संबंधी श्री.राजेंद्रबाबू त्या भागातील असल्यामुळे पहिल्यांदा बिहारमध्ये कायदा झाला आणि हायकोर्टाने तो रद्द ठरविला. हे असे कसे काय ? जमीनदाराची शेती आहे तो त्याचा मालक आहे. हे राईट टू प्रॉपर्टीच्या अगेन्स्ट आहे. पहिल्या घटनादुरुस्ती मध्ये ही घटना दुरुस्ती आली की या घटनेत काहीही म्हटले असले तरी या परिशिष्टामध्ये दाखल केलेला कायदा हा घटनेच्या विरोधात असल्यामुळे या देशातील कोणत्याही न्यायालयाला रद्द करता येणार नाही. अशी अमेंडमेंड आली आणि सगळे कुळकायदे व त्याची संख्या आज शंभराच्या वर गेलेली आहे, ही त्या परिशिष्टामध्ये आहे. विधेयकात दिलेल्या चारही व्याख्या अभ्यास करण्यासारख्या आहेत. " कंत्राटी शेती पुरस्कर्ता " असा शब्द आहे आणि ज्यांनी कंत्राटी शेती करार केला असेल, अशी व्यक्ती असे त्यात म्हटले आहे. आता हा जो कंत्राटी शेती पुरस्कर्ता आहे, त्यासंबंधी चित्र अतिशय स्पष्ट आहे. हे काही एखाद्या व्यक्तीचे काम नाही. एखादी मोठी कंपनी अशा पुरस्कर्त्याची नियुक्ती करेल ही गोष्ट स्पष्ट आहे. म्हणजे कंत्राटी पुरस्कर्ता आणि कंत्राटी शेती उत्पादक असे वर्णन केलेले आहे. कायद्याचे वर्णन मी सांगत आहे. कायद्याच्याबाहेर ज्या गोष्टी होतात त्या वेगळया आहेत. हा जो कंत्राटी शेती उत्पादक आहे त्याने कंत्राटी शेती करार करावयाचा आहे. या दोघांमध्ये शेती विषयीचा करार होणार आहे आणि हा जो करार आहे, या कराराच्या अटी कायद्याने दिलेल्या नाहीत. हया डेलीगेटेड लेजिस्लेशनमध्ये सोपविलेल्या आहेत. हे जे डेलीगेटेड लेजिस्लेशनचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ....

मेमोरेन्डम दिलेला आहे, त्या मेमोरेन्डममध्ये स्पष्ट म्हटले आहे. या अटी ज्या वेळेला ठरतात, त्यावेळेला बलवान लोक, आर्थिकदृष्टया जे मजबूत आहेत, त्यांचे नियंत्रण किती जबरदस्त असते, हे आपल्याला दिसेल. कंत्राट ठरविणारी ही जी बाजू आहे ही धनदांडगी आहे. ही करोडो रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी उतरलेली आहे. तिला आपल्या गुंतवणूकीची अत्यंत काळजी आहे आणि ती काळजी वाहून नेण्यासाठी अतिशय उत्तमप्रकारचे कायदेशीर आणि तांत्रिक ज्ञान उपलब्ध असलेली ही एक बाजू राहील आणि दूसरी बाजू अशी राहील की, त्या दूस-या बाजूला याबाबतीत काहीच चॉईस राहणार नाही. मग त्याच्याजवळ वकील नाही, तंत्रज्ञान नाही, पैसा नाही. त्यामुळे यांनी सही केली म्हणून मी सही करावी किंवा फार शहाणा असशील तर तू बाजूला रहा, अशी स्थिती होणार आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 21:30

प्रा. बी.टी.देशमुख...

आज कोणत्याही बँकेमध्ये फायन्सस चा करार करतांना त्यांचे करार छापील असतात, आपण फक्त तेथे सही करावी, त्यांचे ते करार सर्व ठरलेले असतात. त्यांना पॅटर्सन लावला जातो. आजच्या बिलामध्ये सगळयात आनंददायी व आल्हाददायक गोष्ट कोणती असेल ती ट्रान्सफर होणार नाही. आपण एकदा करार केल्यानंतर तो ट्रान्सफर होणार नाही. शेती उत्पादकाला त्याची सोय नाही. मग त्याला कंपनीतच राहायला मिळेल कंपाऊंडसह रेस्टहाऊस मिळेल, परंतु करार ट्रान्सफर होणार नाही. एकदा राहायला मिळाले म्हणजे त्याला कसलीही गरज नाही. हे या विधेकयामध्ये अतिशय स्पष्टपणे सांगितलेले आहेत. त्यांचेच एक समाधान जरुर आहे. परंतु ट्रान्सफर म्हणजे एवढे सोडून सर्वच ट्रान्सफर होणार आहे. तेथे तुम्हाला पाणी, मिळेल, खते मिळतील, साहित्य मिळेल याप्रमाणे त्यामध्ये अटी घातलेल्या आहेत. अशा कल्याणकारी अटी त्यांनी घातलेल्या आहेत. सुंदर अशा या अटी आहेत, हे सर्व वनसाईड होणार आहे, महाराष्ट्र इतिहासाच्या या टप्प्यावर आता आलेला आहे असे दिसते. नवीन टप्प्यामध्ये शेती करण्याचे कंत्राट आलेले आहे. हा कंत्राटी ॲक्ट कशासाठी आहे, की यामध्ये हस्तांतरण होणार नाही, हे सांगण्यासाठी तो कंत्राटी ॲक्ट यामध्ये आलेला आहे. करार होतील कराराचे प्रोफार्मा हे प्रिंटेड असतात, त्यावर फक्त त्यांनी सहया करावयाच्या, त्यांच्याजवळ पैसा आहे, दोन्ही प्रकारची बाजू त्यांचीच आहे, महत्वाचे म्हणजे हस्तांतरण होणार नाही, उत्पादना सारख्या जोखीमी शेतकऱ्यांकडे असणार आहेत. मी कराराच्या मसुद्यामध्ये सुधारणा दिलेली आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, सन 2006 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 16 च्या पृष्ठ 5 वरील क्रमांक 2 मध्ये (बावीस) नंतर पुढील मजकूर टाकण्यात यावा अशी मी सुधारणा दिलेली आहे. त्यामध्ये अशाप्रकारे म्हटलेले आहे की, "कंत्राट पध्दतीने शेती करणारा शेतकरी कंत्राटी शेती उत्पादक असणा-या कोणत्याही शेतकऱ्याला मिळणारे वार्षिक उत्पन्न हे वर्ग दोन च्या अधिकाऱ्यांना मिळणाऱ्या वार्षिक वित्तलब्धीपेक्षा कमी असणार नाही." अशा प्रकारची अट त्यामध्ये टाकावयास पाहिजे, शेतकऱ्यांच्या बाजूने काही तरी अटी त्यामध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. नाही तर हे सगळे वनसाईड चालले आहे. सभापती महोदय, आपण योग्य वेळी ती सुधारणा घ्याल याची मला खात्री आहे.

.....2....

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 5K-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KGS/ MHM/ प्रथम श्री. कांबळे... 21:30

प्रा. बी.टी. देशमुख...

अशा प्रकारे कंत्राटी पध्दतीने शेती करणारा शेती उत्पादक संबंध कामाला नवीन दिशा देणारा आहे, त्यांना चुकीची दिशा देणारा आहे, आणि म्हणून माननीय मंत्री महोदयांनी या बाबतीत सुध्दा विचार करावा हे विधेयक फार संभ्रम निर्माण करणारे आहे. कंत्राटदाराने कांदा जरी पिकवला तरी त्याला तो नेऊन द्यावयाचा आहे, हा एक इतिहास होणार आहे, म्हणून मी या विधेकाला विरोध दर्शवून माझ ो भाषण संपवितो.

------------------

यानंतर श्री. सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) विधेयकामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यात आले आहे, त्यावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे...

**तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी)** : सभागृहाला मी सूचित करु इच्छितो की, आजच्या दिवसाच्या कार्यक्रम पत्रिकेवरील विधेयकांवरील चर्चा संपल्यानंतर लक्षवेधी सूचना घेतल्या जाणार आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेत दाखविलेल्या लक्षवेधी सूचना उद्या घेतल्या जाणार नाहीत. फक्त अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा आज होणार नाही. बाकीचे सर्व कामकाज आज पूर्ण करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण अधिवेशनाचा कालावधी शनिवारपर्यंत वाढवावा.

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या विरुध्द मी जावू शकत नाही.

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाला विश्वासात न घेता आपण एकतर्फी निर्णय कसा घेता?

**तालिका सभापती** : याठिकाणी कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व कार्यक्रम असल्यामुळे सभागृहाला त्यासंबंधी विचारण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण आता असे सांगितले की, कार्यक्रम पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना आज घेण्यात येतील. आणि अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा आज घेण्यात येणार नाही. ही चर्चा आज न घेण्यासंबंधीचा निर्णय आपण कसा घेतला?

**तालिका सभापती** : माननीय सभापतींनी यासंबंधी निर्णय घेतला आहे..

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती हे या सभागृहापेक्षा मोठे नाहीत हे आपण मान्य कराल. ती बाब आपण सभागृहासमोर ठेवायला नको कां?

**तालिका सभापती** : यासंबंधी माननीय सभापतींना विचारतो. बाकीचे कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व कामकाज पूर्ण होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमचे एवढेच म्हणणे आहे की, आपण निर्णय घेण्यापूर्वी सभागृहाला विचारुन निर्णय घ्यावा...

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितले होते की, विधेयकावर अमर्यादीत वेळेपर्यंत बोलता येते. त्याप्रमाणे या अगोदर संमत झालेल्या विधेयकावर साडे चार ते पावणे पाच तास चर्चा झाली. त्यामुळे कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाज पूर्ण करण्यासाठी आपली बसण्याची तयारी असली पाहिजे. आपण विधेयकावर कितीही वेळ बोलावे, परंतु कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाज संपविले पाहिजे...

(गोंधळ)

काल आणि परवा दोन्ही दिवस दोन-दोन विधेयके घेण्यात आली. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विधेयके घ्यावयाची आहेत...

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सभागृहाची अशी पध्दत आहे की, कोणताही निर्णय घेतांना तो एकतर्फी घेतला जात नाही...

(गोंधळ)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आजच्या कामकाजात दाखविलेल्या लक्षवेधी सूचना उद्या जाहीर करुन टाका....

**तालिका सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना उद्या घेतल्या जाणार नाहीत असा माननीय सभापतींचा निरोप आहे. उद्या नव्याने लक्षवेधी सूचना येतील. त्यामुळे आजचे कामकाज कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे चालेल. फक्त अंतिम आठवडा प्रस्तावावर आज चर्चा होणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : काल सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आणि इतर सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शेवटच्या दोन-तीन दिवसामध्ये बरीच विधेयके येतात. पहिल्या दिवसापासून विधेयके आली पाहिजेत. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. म्हणून मी काल सन्माननीय मंत्री महोदयांना तसे निर्देश दिलेले होते.

..(अडथळा)....

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, भारत सरकारच्या कृषी विभागाने राज्य कृषी उत्पन्न, पणन विकास अधिनियम जो तयार केलेला आहे. त्या अनुषंगाने कायद्यामध्ये दुरुस्ती करणे क्रमप्राप्त आहे, म्हणून या ठिकाणी हे विधेयक आणण्यात आलेले आहे. या विधेयकावर चर्चा करतांना सन्माननीय सदस्यांनी काही शंका उपस्थित केल्या त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे साहेब म्हणाले की, मागच्या दाराने अप्रत्यक्षरित्या पुन्हा जमीनदारी पध्दती आणण्याचा प्रयत्न तर नाही ना ? अशा प्रकारची शंका त्यांनी व्यक्त केली.

**(सभापती स्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : आज दुपारी 12-00 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु झाले. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर आणि कागदपत्रे सादर झाल्यानंतर मी सांगितले की, 93 ची निवेदने झाल्यानंतर विधेयके चर्चेला घेऊ. त्यानंतर लक्षवेधी सूचना घेऊ आणि त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेऊ. आता आपण दुसऱ्या विधेयकावर चर्चा करत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी मघाशी मुद्दा उपस्थित केला की, सभागृहापेक्षा सभापती मोठे नाहीत. याची जाण मलाही आहे आणि आपणा सर्वांना आहे. सभागृह हे सार्वभौम आहे. मी फक्त असे सूचित केले होते की, वेळ फार वाढत असेल आणि आपल्याला अडीच तासाची चर्चा उद्या घेणे शक्य असेल तर तसा विचार करायला हरकत नाही. ते मी शेवटी येथे येऊन सांगणार होतो. मी हे सगळे ऐकल्यानंतर स्वत: येथे येऊन सांगणे हे माझे कर्तव्य आहे असे समजून मी सभागृहात आलो. माझी आपणा सर्वांना एवढीच विनंती आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेवरील जे कामकाज आहे ते पूर्ण करण्यासाठी काही जास्त वेळ बसून कामकाज पूर्ण करणे गरजेचे आहे. आज आपण जर लक्षवेधी सूचना घेतल्या नाहीत तर उद्याच्याही लक्षवेधी राहणार आहेत त्यामुळे आजच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

**सभापती** .....

लक्षवेधी सूचना उद्या घ्यायच्या झाल्या तर आजच्याही लक्षवेधी सूचना होणार नाहीत आणि उद्याच्याही लक्षवेधी सूचना होणार नाहीत. म्हणून सभागृहासमोरील कामकाज पूर्ण करत असतांना सगळयांनी जर ठरवले तर आज जो अंतिम आठवडा प्रस्ताव आहे तो आपण उद्या सकाळी 10-00 ते 12-30 या वेळेत घेऊ आणि दुपारी 1-45 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु करु. उद्याचे कामकाज करत असतांना जी शासकीय विधेयके आहेत ती करु असे मला वाटत होते. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेब यांना सांगू इच्छितो की, सभागृह हे सार्वभौम आहे, याची आपणा सगळयांनाच कल्पना आहे. आपण असे बोलला म्हणून मला खुलासा करणे गरजेचे वाटले. आपण सगळयांनी ठरविले तर उद्या चर्चा करु. पण मला सदनातील दोन्ही बाजूच्या सदस्यांना विनंती करावयाची आहे की, कोणताही निर्णय घेत असतांना दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विचारुन निर्णय घेत असतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

आपण अनेकवेळा असा निर्णय घेत असतो. मी दालनात बसून सभागृहाचे कामकाज ऐकत होतो. सभागृहात येणे गरजेचे आहे असे वाटल्यामुळे मी सभागृहात आलो. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे आज आपल्याला थोडा जास्त वेळ बसावे लागत आहे याची जाणीव मला आहे. आपण म्हणत असाल तर अंतिम आठवडा प्रस्ताव आज घेऊ. आपण म्हणत असाल तर अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या घेऊ. लक्षवेधी सूचना आज संपवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासकीय कामकाज सुध्दा आपल्या सहकार्याने पूर्ण होईल यादृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपली अनुमती असेल तर मी बोलतो. या सभागृहामध्ये प्रत्यक्षात जे घडले ते प्रत्यक्ष पाहिलेले नाही. आम्हाला राग का आला ? हे आपल्याला समजले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. तावडे बोलण्यासाठी उभे राहिले असता तालिका सभापतींनी त्यांना खाली बसा असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या सदस्यांनाही खाली बसा असे सांगितले आणि त्या बाजूच्या सदस्याला तुम्ही बोला असे ते म्हणाले. The way in which the Hon. Panel Chairman treated the Hon. Members, was not proper. म्हणून त्यांना सांगावे लागले. तालिका सभापतींनी असे सांगितले की, अंतिम आठवडा प्रस्ताव उद्या घेऊ असे आम्ही ठरवून टाकले आहे. लक्षवेधी सूचना तसेच हे सगळे कामकाज आज घेतलेच पाहिजे असे त्यांनी सांगितले. The way in which the Hon. Panel Chairman put the things before the House, was not proper. म्हणून मी असे म्हणालो की, या सभागृहाची परवानगी घेतल्याशिवाय तुम्हाला निर्णय घेता येणार नाही. त्यांनी असे सांगितले की, माननीय सभापतींनी तसे सांगितले आहे. माननीय सभापतींनी सांगितले असले तरी सभागृहाची परवानगी घेणे आवश्यक आहे. हे सभागृह सार्वभौम आहे असे मी त्यांना सांगितले. यामध्ये काही चुकीचे असेल तर मी माफी मागतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आपली यत्किंचितही चूक नाही. हे सभागृह सार्वभौम आहे ही वस्तुस्थिती आपण सांगितलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. कुरुनाथ कुलकर्णी हे तालिका सभापती म्हणून या आसनावर असताना त्यांनी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना किंवा इतर सन्माननीय सदस्यांना काही म्हणाले असतील, परंतु बोलण्याच्या अनेक पध्दती आहेत. एखादवेळी मित्रत्वाने ते बोलले असतील. आपण ते एवढे मनाला लावून घेऊ नका. ते रागावले नसतील. त्यांचा रागावण्याचा स्वभाव नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आज आम्ही किती वाजेपर्यंत बसावयाचे ते सांगावे. सकाळपर्यंत बसावयाचे आहे काय ?

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेमध्ये जे कामकाज आहे......

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाची वेळ संपल्यानंतर आज कोणीही सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवून घेतलेली नाही. आजचे कामकाज संपेपर्यंत सभागृहची वेळ वाढवत आहोत असे कोणीही केलेले नाही.

**सभापती** : मी सभागृहाला विचारतो की, आजचे कामकाज संपेपर्यंत सभागृहाच्या कामकाजाची वेळ आपण वाढवावयाची काय ?

( काही सन्माननीय सदस्य होय असे म्हणतात )

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सार्वभौम सभागृहमध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे तसेच या बाजूचे काही सन्माननीय सदस्य, आपण एकमताने ठरविले तर आजच्या लक्षवेधी सूचना उद्या घेता येतील.

**सभापती** : सभापतींनी परवानगी दिली तर तसे करता येते. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी सभागृहात यावयास पाहिजे आणि त्यांच्यासमोर हा व्यवहार व्हावयास पाहिजे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर जे कामकाज दाखवलेले असते ते कामकाज सल्लागार समितीच्या सल्ल्याने सभापतींनी निश्चित केलेले असते. त्या पध्दतीने हे कामकाज दाखविण्यात आलेले आहे. मी सभागृहाला विचारले की, आता जे कामकाज व्हावयाचे आहे ते पूर्ण करण्याकरिता जो वेळ लागेल तोपर्यंत आपण सभागृहाचे कामकाज चालू ठेवावयाचे काय ? दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी याबाबत सांगावे. अनेकवेळा आपण त्यादृष्टीने निर्णय घेत असतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 21:50

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हे चार दिवसापासून असेच चाललेले आहे. आम्हाला वेठीस धरलेले आहे. अधिवेशनाचा कालावधी एक आठवडा का कमी केला ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन खाली बसावे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपण अत्यंत प्रेमापोटी सन्माननीय सदस्यांना निर्देश दिले. ते निर्देश आपण रागावून दिलेले नाहीत हे मी बोललो आहे. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने हे विधेयक आणलेले आहे. केन्द्र सरकारने घातलेल्या निर्बंधामुळे ही सुधारणा करावी लागत आहे. या विधेयकावर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी या विधेयकान्वये मागच्या दाराने जमीनदारी पध्दत आणली जात आहे की काय अशी शंका व्यक्त केली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये या शंकेची पुनरावृत्ती केली. त्यांनी स्वयंअर्थसहाय्यिता विद्यापीठाच्या बाबतीत देखील वक्तव्य केले. ते करीत असताना शिक्षण क्षेत्रामध्ये नवीन सरंजामशाही आणली गेली आहे असे त्यांनी सांगितले. पूर्वीचे जे स्वयंअर्थसहाय्यिता विद्यापीठ विधेयक आणले गेले होते, त्या विधेयकाला विरोधी करुन ते विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे अशी मागणी मी केली होती. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शिक्षण क्षेत्रातील सरंजामशाही असा जो उल्लेख या नवीन स्वयंअर्थसहाय्यिता विद्यापीठाच्या बाबतीत केला त्या संदर्भातील विधेयक संमत करताना त्यांनी "होय" असे म्हटले. हा दुटप्पीपणा योग्य नाही असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, कॉन्ट्रॅक्ट फॉर्मिंगच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी कसेल त्याची जमीन हे सूत्र देशाने स्वीकारलेले असल्याचे सांगितले. भूमी आणि प्रतिष्ठा यांचा फार जवळचा संबंध आहे. भूमिहिनांना प्रतिष्ठा नाही. म्हणून भूमिहिनांना जमीन मिळून त्यांना प्रतिष्ठा प्राप्त व्हावी त्यांच्या उदनिर्वाहाचा प्रश्न सुटावा म्हणून कसेल त्याची जमीन हे धोरण आपल्या देशाने आणि राज्याने स्वीकारले. पूर्वी देखील आमच्या कोकणामध्ये खोत प्रथा होती. ती बंद झाली. कुळ कायदा आला, लॅण्ड सिलिंग कायदा आला आणि अतिरिक्त जमीन भूमिहीन शेतमजुरांमध्ये वितरित करण्याचा प्रयत्न झाला. या विधेयकाला माझे समर्थन असले तरी काही गोष्टींबाबत खुलासा होणे

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

आवश्यक आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जी सुधारणा सुचवली त्याबाबतीत देखील माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी माझी त्यांना आग्रहाची विनंती आहे. यामध्ये दोन बाबी आहेत. एक म्हणजे शेतकरी आपल्या स्वत:च्या शेतामध्ये उत्पादन करीत असलेल्या मालाच्या विक्रीचा करार केला जाणार आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

...नंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ श्री. शिगम नंतर 21:55

प्रा. जोगेंद्र कवाडे ...

सभापती महोदया, या चर्चेच्या निमित्ताने 2/3 प्रश्न निर्माण झालेले आहेत. या विधेयकाच्या संदर्भात जेव्हा मी विचार केला तेव्हा पहिला प्रश्न असा दिसतो की, शेतकऱ्याची जमीन आणि शेतकऱ्याची स्वत:ची शेती यातून जे कृषी उत्पादन निर्माण केलेले असते त्या मालाच्या विक्रीबद्दलचा हा करार आहे. शेतीचा मालक हा वेगळा आणि शेतीच्या मालकाशी दुसरी इतर व्यक्ती शेती करण्यासाठी केलेला हा करार आहे काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे. जो सधन कास्तकार आहे आणि ज्याची शेकडो एकर जमीन आहे त्याबाबतीत विशेषत: विदर्भामध्ये गटई पध्दतीने शेती केली जाते. शेतीचा मालक आणि शेती करणारा हे आपापसात येणारे उत्पन्न वाटून घेत असतात आणि हे देखील अलिखित करार पध्दतीने होत असते. जर का यामध्ये वाद झाला तर गावामध्ये बसून याचा निपटारा केला जातो. सधन कास्तकार ज्याची शेकडो एकर जमीन आहे तो स्वत: शेती करणार नाही आणि इतरांना कंत्राटी पध्दतीने शेती करण्यासाठी देणार वहिवाट करण्यासाठी देणार आहे. यंत्रसामुग्री,खते,बी-बियाणे,विक्री सर्वांचा तो योग्य प्रकारे वापर करणार आहे. जो शेतीमालक आहे तो त्याला फक्त कराराप्रमाणे ठराविक रक्कम मिळणार आहे. शेतीमध्ये जे काही उत्पन्न होईल ते उत्पन्न मात्र ज्याने करार केला आहे त्या व्यक्तीला असेल. मग तो शेतकऱ्यांचा संघ असेल,प्रायव्हेट कंपनी असेल त्यांना मिळणार आहे. यासंदर्भामध्ये एक महत्वाचा प्रश्न निर्माण होतो आणि तो म्हणजे ज्यांच्याकडे शेकडो एकर शेती आहे ती मंडळी शहरामध्ये बसून रिमोट कंट्रोलने शेती करतील. शेती शेकडो एकर पण शेतीशी संबंध नाही फक्त मालकी आहे. दुसऱ्या कोणाला तरी ती दिलेली असेल. म्हणजे रिमोट कंट्रोलने जो शेती करील त्याला आपण शेतकरी म्हणणार काय ? म्हणूनच कूळकायदा आणि सिलींगचा कायदा अस्तित्वात आला. या पध्दतीमध्ये खऱ्या अर्थाने शेतीच्या मालकाचा अधिकार अबाधित राहील हे अत्यंत चांगले आणि समाधान देणारे वक्तव्य आणि तरतूद यामध्ये आहे. कंत्राटी शेती उत्पादनात मशागत,पैसा पुरविणे शेती करणे शक्य होईल जेणेकरुन कृषी देशाची कृषी उत्पादकता वाढेल आणि शेतीचा दर्जाही सुधारेल असे मला वाटते. त्यासोबतच शेतीउत्पादन मालाला दराची जमी मिळेल आणि अशा प्रकारे त्या शेतकऱ्याला या व्यवस्थेचा कंत्राटी शेतीपध्दतीमध्ये लाभ होईल असा या विधेयकाचा हेतू आहे. या विधेयकाचे समर्थन करताना ज्या काही शंका या निमित्ताने निर्माण झालेल्या आहेत त्या सगळया शंकांचे निरसन करणे आवश्यक आहे. विशेषत: माननीय सदस्य सर्वश्री विलासरावजी शिंदे,

......2

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

प्रा.बी.टी.देशमुख,श्री. दिवाकरजी रावते यांनी यासंदर्भामध्ये खरोखरच या बिलामुळे शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे काय असा प्रश्न उपस्थित केला आहे त्याचे उत्तर यावे अशी माझी विनंती आहे. यामध्ये वैधानिक अधिकार सोपविण्याचे ज्ञापन आहे त्यानुसार कंत्राटी पध्दतीने शेती करावयाची असेल तर त्याला ते रजिस्टर करावे लागेल. ही अत्यंत चांगली बाब आहे.

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

याचा नमुना देखील अधिलिखित करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या कंत्राटीपध्दतीमध्ये काही विवाद निर्माण झाला तर समेट अधिकारी हा 30 दिवसांच्या आत संक्षिप्त पध्दतीने विवाद मिटवील, अशाप्रकारची तरतूद आहे. येथे जर समेट झाला नाही तर मग अपीलात जाण्याची तरतूद आहे. एकंदरीत हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने उचित असे बिल आहे. जुनी जमीनदारी पध्दती व रिमोट कंट्रोल पध्दतीने शेती करणे अशी पध्दत सुरू होऊ नये म्हणून दक्षता घ्यावी. एवढे बोलून मी या विधेयकाला माझे समर्थन देतो. धन्यवाद.

....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 6 - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता जे विधेयक आणले आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभी आहे.

कृषिविषयक वस्तूंच्या व्यापाराच्या उदारीकरणामुळे देशातील अंतर्गत कृषि पणन पध्दत एकसंघ करण्याच्या दृष्टीने आणि त्यास बळकटी आणण्याच्या दृष्टीने हे विधेयक येथे मांडण्यात आले आहे. कंत्राटी शेती करार सक्तीने करणारा हा अधिनियम आहे. कंत्राटी शेती करारातच विक्री दर देण्यात येणार आहेत, उत्पन्नाला सवलत मिळणार आहे. मूळ शेती उत्पादकाच्या जमिनीचा अधिकार शेती पुरस्कर्त्याकडे जाणार नाही, त्याबाबतचे तंटेही समेट अधिकाऱ्याकडे सोपवावे लागतील. गेल्या काही दिवसांपासून शासन नागरी जमीन कमाल धारणेसंबंधीचे बिल आणू असे सांगत आहे. आज शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेती किफायतशीर राहलेली नाही. त्यामुळे आज ते ग्रासलेले आहेत. तसे पाहिले तर हे विधेयक म्हणजे शेतकऱ्याला कंगाल करणारे असे आहे.

सभापती महोदया, या महाराष्ट्रामध्ये पूर्वीच्याकाळामध्ये भूमिहिनांचे फार मोठे आदोलन उभे राहिले होते. कसेल त्याची जमीन या न्यायाने कूळ कायदा अंमलात आणला. कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण यांना प्रश्न विचारला होता की, कसेल त्याची जमीन, नसेल त्याचे काय ? आज राज्यातील छोटया शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. शेती कशी किफायतशीर ठरेल या विवंचनेतच आज शेतकरी आहे. आपल्या देशात ईस्ट इंडिया कंपनी आली तेव्हा तिचे सर्वांनी स्वागत केले. तशी काही मानसिकता कंत्राटदाराना बोलवत असताना करतो की काय ? असा प्रश्न मला पडलेला आहे. साखळी पध्दतीने काम करणारे जे उद्योग आहेत, त्यांना एकसंघ करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. मला या विधेयकाच्या निमित्ताने प्रश्न उपस्थित करावासा वाटतो. ही जमीन कंत्राटदार का घेणार आहेत ? ही जमीन घेणारी माणसे कोण असणार आहेत ? कशासाठी ही जमीन घेणार आहेत व कशाप्रकारे ते शेती करणार आहेत ? या चार प्रश्नांची उत्तरे शोधली तर त्या मागे सूत्रधार कोण आहेत, याचे चित्र स्पष्ट होते. एका बाजूला कागदपत्र व्यवस्थित न झाल्यामुळे अजूनही हजारो कुळांना जमिनी मिळालेल्या नाहीत. आता आपण पणन पध्दत एकसंघ करायला निघालो आहोत. उद्देशामध्ये आपण

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

नमूद केले आहे की, अन्न प्रक्रिया उद्योग, निर्यात आणि किरकोळ माल साखळी उद्योग यांना यातून फायदा होणार आहे. जगामध्ये सँडविच विकणारी कंपनी किंवा केंटुकी सारखी चिकन विकणारी कंपनी या सारख्या ज्या कंपन्या आहेत, त्यांना आपले ट्रेड नेम विकसिनशील देशात न्यावयाचे आहे. यासाठी त्यांना फार्म्स लागतात. त्यांना फार्म्स उपलब्ध करून देण्यासाठी शेतकऱ्यांची जमीन सामदाम दंडभेद वापरून घेतली जाणार आहे. यामध्ये वरकरणी शेतकऱ्याला दर मिळेल असे वाटत असले तरी जे छोटे शेतकरी आहेत, त्यांचे कंगालीकरण होणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.भारवि.... 22:05

डॉ.नीलम गोऱ्हे....

तर वरकरणी असे वाटते की, शेतकऱ्याला यातून काही तरी दर मिळणार आहे. परंतु यातून छोटया शेतकऱ्यांचे कंगालीकरण होणार आहे असे मला वाटते. कारण आज-उद्या यातून आपल्याला घरबसल्या दर मिळत असेल तर असलेल्या शेतीपैकी किती शेती द्यावयाची ? या बाबतीत देखील शेतकऱ्यांची मानसिकता हळुहळु बदलत जाणार आहे. मला शासनाला आठवण करुन द्यावीशी वाटते की, विदर्भ आणि मराठवाडयामध्ये खूप भूमिहीनांनी पडित जमिनीवर अतिक्रमणाचा लढा अनेक वर्षे चालविलेला आहे. माझ्या माहितीनुसार भूमिहीन हक्क संरक्षण समितीने सातत्याने पडित जमिनीसाठी आंदोलन चालविले आहे. कै.सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असताना, अतिक्रमण जमीन धारकांना जी पडित जमीन आहे ती त्यांच्या नावावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला. एका बाजूला शेती किफायतशीर नसली तरी ही गोरगरीब माणसे कुठल्याना कुठल्या माध्यमातून भुमिहीनांकडून स्वत:ची शेती कसण्यासाठी वाटचाल करीत तेथेपर्यंत पोहोचली होती. 1990 मध्ये अतिक्रमण जमिनधारकांच्या नावावर जमीन केली गेली. पुढच्या काळात जी जमीन पडित आहे त्या जमिनीबरोबरच जी जमीन थोडीफार फायदेशीर आहे, त्या जमिनीचे सुध्दा कंत्राट होणार असतील तर आज ना उद्या, पूर्वीच्या पध्दतीने.....त्या जमिनदारी पध्दतीच्या संदर्भात बाकीच्या सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला आहे. महोदया, एका अर्थाने शेतकरी स्वत:ची शेती किफायतशीर बनवून तिचा विकास करण्याची जी प्रक्रिया होती, त्याकरिता आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी नाईलाजाने हा कायदा केला आहे असे म्हणतो आहोत. केंद्राने हे कलम केल्यामुळे आपण ते स्वीकारले आहे. त्यामुळे असे कलम ज्यावेळी आपण स्वीकारतो त्यावेळी शेतकऱ्यांना संरक्षण देणारी कोणती माध्यमे आपण वापरु शकू हे न बघता आपण एकतर्फी पध्दतीने अशा कंत्राटी पध्दतीचा पुरस्कार करावयास लागलो तर, छोटा शेतकरी नष्ट होऊन, मोठा शेतकरी आणि कंत्राटदार हे दोघेच काम करीत राहणार आहेत. आज राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असतांना सामान्य शेतकऱ्याच्या शवपेटीला शेवटचा खिळा मारण्याचे किंवा वेगळया प्रकारे दफन देण्याचे काम या विधेयकाच्या माध्यमातून होणार आहे असे मला वाटते.

महोदया, काही सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाचा असा फायदा होईल, तसा फायदा होईल याबाबत विचार व्यक्त केले. मला असे म्हणावयाचे आहे की, शेतीतून साखळी उद्योगांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

फायदा होणार असेल तर किती जिल्हयामध्ये किती जमीन कंत्राटी पध्दतीाने दिली जाणार याबद्दलच्या निर्णय प्रक्रियेत शेतकऱ्यांना आणि स्थानिक लोकांना काही स्थान राहणार आहे की नाही ? बाजार समितीच्या माध्यमातून अनेक ठिकाणी आपण पाहतो की, जोपर्यंत संगणकीकरण झाले नव्हते तोपर्यंत बेनामी पध्दतीने शेतकऱ्यांनी सहया न करता कंत्राट नोंदविले गेले. त्यामुळे हा प्रकार टाळावयाचा असेल तर या प्रक्रियेबाबत पारदर्शकता आणि पुनर्विचार होणे आवश्यक आहे असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानते व माझे भाषण पूर्ण करते.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता जे विधेयक या ठिकाणी आणले आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांनी शंका-कुशंका व्यक्त केल्या. मला सुध्दा काही ठिकाणी काळजी वाटत आहे. कंत्राटी शेती आजही या ठिकाणी सुरु आहे. परंतु त्याची कोठे लिखापढी होत नाही. हा सर्व व्यवहार तोंडी स्वरुपात चालतो. शेतमालाचे कॉन्ट्रॅक्ट हा विषय वास्तविक पाहता या विधेयकामध्ये यावयास हवा होता. कंत्राटी पुरस्कर्ते आणि कंत्राटी शेती उत्पादक यांच्यातील हा करार आहे. या करारामुळे त्यांच्या जमिनीचा हक्क, ताबा किंवा मालकी हक्क शेती पुरस्कर्त्याकडे जाणार नाही, हे जरी खरे असले तरी यातून शेती उत्पादकाची पिळवणूक होता कामा नये असे मला वाटते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

सभापती महोदय, कालच आमच्याकडे सगळ्या द्राक्षबागायतदारांनी एका व्यापाऱ्याला द्राक्षे विकली आणि तो कलकत्त्याचा व्यापारी 80 लाख रुपयांची द्राक्षे घेऊन फरार झाला. त्याचा ठावठिकाणा नाही. त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देखील झालेली आहे. जो काही शेती माल विकला गेला त्याचे ऑन रेकॉर्ड कॉंट्रॅक्ट झालेले नाही. त्यामुळे अशी जी काही फसवाफसवीची उदाहरणे येतात, त्यासाठीही कायदा करण्याचा अधिकार शासनाला आहे. पण त्याहीपेक्षा जो अल्पभूधारक आहे, ज्याची शेती पाच एकरांपेक्षा कमी आहे, त्याला जास्त चांगल्या दर्जाचे उत्पादन करता येत नाही, त्याला त्या ठिकाणी पतपुरवठा चांगला होत नाही, मशागत सामग्री, पैसा किंवा तंत्रज्ञान चांगल्याप्रकारे मिळत नाही, असे या ठिकाणी दिसत आहे. त्याला या गोष्टी शेती पुरस्कर्ता पुरविणार आहे. कंत्राटी शेती करार करुन दर्जेदार उत्पन्न घेणे शक्य होणार आहे म्हणूनच हे विधेयक आपल्यापुढे आणलेले आहे. आता यामध्ये फक्त कृषी उत्पन्नाची बाजार तळाबाहेर कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला विक्री करता येणार आहे. त्यासाठी कोणतीही बाजार फी आकारणी योग्य असणार नाही. सभापती महोदय, माझे जे दोन-तीन प्रश्न आहेत, त्या प्रश्नांचा आपण जरा जास्त खुलासा करावा. आपण हे जे बील आणत आहात, ते उत्पादकांसाठी आहे की पुरस्कर्त्यांसाठी आहे. यामध्ये जास्त फायदा कोणाचा होणार आहे ? याबाबत कोणत्याही कोर्टात जाता येणार नाही. या संदर्भातील विवादाला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही. कोर्टात जाता येणार नाही असे लिहिले असले तरी कोर्टात जाता येत नाही असे कधी होत नाही. मग हे कलम घालण्याचा उद्देश काय आहे ? सभापती महोदय, कोर्टात जाता येते आणि त्यातून मार्गही निघतात. समेट प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द परत अपील अधिकारी आहे. शेती पुरस्कर्ता व उत्पादक यांमध्ये होणाऱ्या वादातून कसे बाहेर पडायचे हा देखील प्रश्न आहे. यातील फायदा असा आहे की, त्या ठिकाणी फक्त त्या मार्केट कमिटीची फी माफ होणार आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, यामध्ये असे उत्तर आले आहे की, कंत्राटी शेती करारामध्येच विक्रीदर देण्यात येणार असल्यामुळे या उत्पादकांचा दर्जा वाढेल व त्यामुळे त्याला दराची देखील हमी मिळणार आहे. पण तो दर जर कमी जास्त झाला किंवा कमीच झाला तर तो वाद निर्माण हाईल. त्यामुळे त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

संदर्भात काय करायचे असा प्रश्न निर्माण होतो. सभापती महोदय, त्यामुळे त्यामध्ये अनेक तंटे उद्‌भवण्याची शक्यता आहे. तरी, याबद्दल देखील माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे. महाराष्ट्रामध्ये जास्तीत जास्त अल्पभूधारक आहेत. सभापती महोदय, पाच एकरांपेक्षा कमी शेती असणारे शेतकरी, जिराईत शेतकरी या सर्वांचे हित लक्षात घेऊनच या बिलाबाबत आपण उत्तर द्यावे, एवढीच माझी विनंती आहे.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मला या विधेयकाच्या अनुषंगाने दोन तीन टेक्निकल पॉईंट क्लिअर करावयाचे आहेत. यातील सर्वात महत्वाचा पॉईंट असा आहे की, "contract between farmer and sponsorer" हा करार किती कालावधीसाठी असणार आहे ? यासंदर्भात कोणतीही तरतूद विधेयकात दिसून येत नाही. त्यामुळे एखादे 50 वर्षाचे पीक आहे की 5 महिन्याचे पीक आहे, या विषयीची कोणतीही मर्यादा नसल्यामुळे किमान काही काळासाठी मर्यादा घालणे आवश्यक आहे. शेवटी हे विधेयक आणण्यामागे कोणते फॉर्मिंग आपल्या डोळयासमोर आहे. हॉर्टिकल्चर, कॉटन, पल्सेस, एडिबल ऑईल, सीडस्, ऑईल सीडस् यासंबंधीचे फार्मिंग आहे की, अन्नधान्यासंबंधीचे आहे ? आपल्याला माहिती आहे की भारतात कोणत्याही प्रकारचे फॉर्मिंग होऊ शकते. त्यामुळे त्याची किमान मर्यादा ही एक वर्षापासून विशिष्ट काळापर्यंत राहू शकली असती. हॉर्टिकल्चर असेल तर कालमर्यादा वेगळी असू शकते. फार मोठया म्हणजे 25 ते 30 वर्षापर्यन्तची कालमर्यादा घातली गेली तर मालकीहक्क गेल्यात जमा होतो, अशी वस्तुस्थिती आहे. त्याबाबतीतही कायदा क्लिअर असावयास पाहिजे. आपण सांगितलेल्या उद्दिष्टामध्ये पैसा, तंत्रज्ञान आणि टेक्नॉलॉजी यावी म्हणून हे विधेयक आणण्यात आले आहे असे म्हटले आहे. कोणत्याही फॉर्मिंगमध्ये येणारा पैसा, टेक्नॉलॉजी, नवनवीन तंत्रज्ञान आणि मशागत सामुग्री वगैरे कोणतीही गोष्ट असली तरी ती विदाऊट इन्व्हेस्टमेंट येणार नाही. इन्व्हेस्टमेंट आली म्हणजे त्याला फायनान्सर आला, नॅशनलाईज बँकेने केलेला फायनन्स असेल, को-ऑपरेटिव्ह बँकेने केलेला फायनन्स असेल, यासाठी लागणारा चार्ज कोणावर राहणार आहे ? (5-ई) 3 मध्ये असे म्हटलेले आहे की, "कंत्राटी शेती करार किंवा भारतीय संविदा अधिनियम 1872 किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कंत्राटी शेती उत्पादकाच्या शेतजमिनीचा कोणताही मालकी हक्क किंवा अधिकार किंवा तिची मालकी किंवा ताबा, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याकडे किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याकडे किंवा त्याच्या अभिकर्त्याकडे हस्तांतरित अन्यसंक्रमिक अथवा निहित करण्यात येणार नाही." त्यामुळे हे निश्चित आहे की, पुरस्कर्ता त्याचा चार्ज देऊ शकणार नाही. शेती पुरस्कर्त्यांनी जर एखाद्या कोटीचा फायनान्स घेतला आणि त्यासाठी त्यांनी क्रॉप ॲन्ड फिल्ड दाखविले आणि नंतर शेती पुरस्कर्ता पळून गेला तर फायनान्सरने कोणाला पकडायचे ? शेतकऱ्याला काही त्रास होणार नाही, पीक तुमचे गेले, इन्व्हेस्टमेंटच्या संदर्भात शेतक-याचा संबंध नाही,त्यामुळे तो कोठे अडचणीत येणार

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.........

नाही, अशा पध्दतीची कोणतीही तरतूद यामध्ये नाही. मला वाटते सगळयात घातक गोष्ट ही आहे. आपण एका बाजूने इन्व्हेस्टमेंट आणावयाची असे म्हणतो. ही इन्व्हेस्टमेंट कोणाच्या खिशातून येणार आहे काय ? तशी शक्यता बिलकूल नसते. जे चांगले गुंतवणूकदार आहेत ते प्रॉपर्ली गुंतवणूक करतील, नफा घेतील व व्यवस्थित करार पार पाडतील. पण जे बॅड इन्व्हेस्टर आहेत ते मोठी इन्व्हेस्टमेंट टाकतील आणि ज्यावेळी ते फसायला लागतील त्यावेळी स्वत:चा नफा काढून घेतील आणि बँकेला बुडवतील. मग भांडण कोणाचे होईल ? बँकेचे आणि शेतकऱ्यांचे भांडण होईल. त्यामुळे चार्ज ऑन फार्म किंवा क्रॉप ऑन फार्म याविषयीचा जो चार्ज असतो त्या विषयी स्वच्छ आणि स्पष्ट कलम असले पाहिजे. त्यामुळे फायनान्ससरला कोणत्याही प्रकारची रिस्क राहणार नाही. आणि म्हणून मला असे वाटते की, हे विधेयक गडबडीने आणलेले आहे. यामधील कंत्राटदार कसे असले पाहिजेत ? कोणासाठी असले पाहिजेत ? सभापती महोदय, या बिलामध्ये पूर्ण गडबड आहे. मराठवाडयाचा जेव्हा मी अभ्यास केला तेव्हा आम्हाला असे वाटले की, शेतीमध्ये 10 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक यावयास पाहिजे. हे मी मागे सुध्दा बोललो आहे. या गुतवाणूकीची अकाऊंटिबिलिटी आणि चार्ज निश्चित करावा लागेल. मग हा चार्ज कोणावर असाणार आहे ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. त्याचा कोठेही कॉन्ट्रक्ट फॉर्मिंगमध्ये, या पध्दतीमध्ये उल्लेख नाही. बँकेच्या पैशाचा चार्ज नेमका कोठे असणार आहे ? बँकेला ॲक्टप्रमाणे तुम्ही अवगत केले आहे की नाही? तुमचा त्या शेतीवर चार्ज नाही. म्हणून ज्याक्षणी तो पुरस्कर्ता पळून गेला त्याक्षणी तुम्ही संपला असे होईल. तिसरी गोष्ट सर्वात महत्वाची म्हणजे मशागत करण्याचा अधिकार त्या फार्मरकडे शिल्लक आहे किंवा नाही ? त्यांनी कॉन्ट्रक्ट फॉर्मिग केले आणि उद्या जर त्या पुरस्कर्त्याने कलम टाकले की, मला वाटेल त्याच माणसाला मी मशागत करु देईल. म्हणजे तो त्या शेतीपासून येण्यामध्ये बॅन झाला. शेतीच्या मालाची विक्री कीती करावयाची ? भाडे किती द्यावयाचे ? हे ठरविण्याचे अधिकार पुरस्कर्त्याला देणे हे मला ॲक्सेप्टेबल आहे. परंतु मशागत करण्याचा शेतक-याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे किंवा मशागतीची प्रायॉरिटी ठरविण्याचे अधिकार त्या शेतकऱ्याला असले पाहिजेत. मला माहिती नाही की हा मूळ मुद्दा कोणी यापूर्वी सांगितला आहे की नाही.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

त्याबाबत आपण आम्हाला 100 टक्के खात्री दिली पाहिजे. आणि यामध्ये शेतक-याचा मालकी हक्कच नाहीतर कसण्याचा सुध्दा हक्क अबाधित राहिला पाहिजे. तो हक्क जर आपण काढून टाकला तर भयानक परिस्थिती निर्माण होईल.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपवितो. समजा, शेतीमध्ये खूप नफा झ ाला तर त्याची रॉयल्टी, डिव्हिडंड आणि इन्व्हेस्टमेंटमध्ये पार्टनरशीप यासंबंधीचे कन्सेप्ट निश्चित केले पाहिजे. त्या दृष्टीने आपण चांगल्या पध्दतीने विचार करीत असतांना हा दृष्टीकोन शेतकऱ्यांना सुध्दा अवगत करण्यासाठी आपणासमोर प्रारुप आहे काय? शेती उत्पादन चांगल्या प्रकारे झ ाल्यानंतर जे काही प्रॉफीट होईल त्यामधील परसेंटेज ऑफ प्रॉफीट आपण त्यांना दिले पाहिजे. त्यासाठी आपण या विधेयकामध्ये सुधारणा केली तर ते योग्य होईल. हे विधेयक आपण घाई गडबडीने आणले आहे म्हणून मी त्याला विरोध करतो. पुन्हा ते एकदा चांगल्या पध्दतीने आणावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी गणपतराव साठे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय पणन राज्यमंत्र्यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन सुधारणा विधेयक मांडले आहे. त्याला पाठींबा देत असतांना त्यामधील काही शंकांचे निरसन होणे आवश्यक आहे. या विधेयकामधील काही शब्दरचनेमुळे मनामध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे . विधेयकाच्या उद्देश व कारणेमध्ये "कंत्राटी शेती उत्पादकांना मशागत सामग्री, पैसा आणि तंत्रज्ञान पुरविणे कंत्राटी शेती पुरस्कर्त्यांना शक्य होईल" असे म्हटले आहे. पुरस्कर्त्यांना पैसा पुरविणार असाल तर तो आपण कोठून आणणार? ग्रामीण भागात निर्माण होणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सोसायटयांचे काय काम राहील? आणि मग कुणीतरी पुरस्कर्ता येणार तो अनेक शेतकऱ्यांबरोबर करार करणार आणि त्यांना फक्त पगारावर ठेवणार.प्रत्यक्ष जरी मालकी हक्क त्याच्याकडे ठेवणार असला तरी अप्रत्यक्षरित्या तो त्या ठिकाणी मजूर रहाणार आहे.

सभापती महोदय, गेल्या 7-8 महिन्यापूर्वी राज्यामध्ये कांद्याचा भाव हजार ते पंधराशे रुपये क्विंटल होता. त्यानंतर आता कांद्याचा भाव 50 पैसे किलोपर्यंत खाली आला आहे. अशा परिस्थितीत करार केला जाईल त्यावेळी जो भाव ठरविला जाईल, आणि जर त्यानंतर उत्पादन वाढले व भाव कमी झाला तर त्या शेतकऱ्याला कराराच्या माध्यमातून काय मिळणार आहे? या गोष्टीचा देखील उल्लेख झाला पाहिजे. याठिकाणी विवाद मिटविण्यासाठी प्राधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार आहे. हा प्राधिकारी कोण रहाणार आहे? त्याचे डेसिग्नेशन काय रहाणार आहे? ते याठिकाणी स्पष्टपणे मांडलेले दिसत नाही. यावरुन असे दिसते की, शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणात पैसे देऊन त्यांना वेडया वाकडया मार्गाला लावण्याचे काम करार पध्दतीने हाती घेण्यात येणार आहे. जो कुणी पैसा पुरविणारा पुरस्कर्ता आहे त्याच्याकडून शेतकरी पैसे घेणार आणि ते पैसे शेतीवर खर्च न करता अन्य कामावर खर्च करणार. आज विविध कार्यकारी सोसायटयांची प्रकरणे आपण पहातो, शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अशा करार पध्दतीने मोठया प्रमाणात शेतकरी आत्महत्तेकडे वळल्याचे दिसणार आहे. यामधून शेतकऱ्याला वाचविण्यासाठी संस्थेमार्फत करार केला पाहिजे. शेती करार उत्पन्न काढण्यासाठी असला तरी आज ग्रामीण भागात प्रचंड अडचणी असल्याचे आपण पहातो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ध-ंजय साठे (पुढे सुरु....

आज □ामी□ भा□ात अशी परिस्थती आहे □ी,मोठे शेत□री □रीब शेत□्यां-ा शेती त्या □रीब शेत□्याच्या -ावावर असली तरी शेतात त्याला येऊ देत -ाहीत. साव□री □ायदा आप□ आ□ला असला तरी त्यां-ी त्या □रीब शेत□्यांच्या जमि-ी ताब्यात घेतलेल्या आहेत. □ायदा □ड□ □ेलेला असला तरी शेत□्यां-ा त्यांच्या शेतात जा□यास प्रतिबंध □ेला जातो अशी परिस्थिती □ामी□ भा□ामध्ये आहे. आता □रार अधि□ृतप□ □ेला तर शेत□्यां-ा वाऱ्यावर सोडले जाईल. या दृष्टी-े स्पष्टी□र□ हो□ आवश्य□ आहे. राज्यातील शेत□री हा □ठेही भर□टला जा□ार -ाही, याची □ांभीर्या-े द□ल घेऊ-ा □राराच्या माध्यमातू-ा शेत□्यां-ा हमी मिळ□ार आहे □ाय ? याचा □ुलासा □रावा. एवढे बोलू-ा या विधे□ाला पाठिबा देतो आ□ि माझे भाष□ संपवितो.

---

2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.जयप्र□श दांडे□ाव□र (प□ा राज्यमंत्री) : सभापती महोदय □ली अडीच तास या विधेय□ावर चर्चा □र□यात आली. अ-े□ स-मा-ा-ीय सदस्यां-ी □राराच्या शेतीच्या संबंधा-े सूच-ा □ल्या त्याबद्दल त्यांचा मी म-ापासू-ा आभारी आहे. □राराची शेती ही □ाही -वी-ा -ाही. सा□र□ार□ा-े □रारा-े शेत□्यांचा ऊस घेतात, बिया□ महामंडळ दे□ील शेती □रार □रू-ा शेत□्याला बिया□ देऊ-ा त्यांच्या□डू-ा फाऊंडेश-ा सीड परत घेते, पोल्ट्रीच्या व्यवसायामध्ये देखील □रारा-े जमी-ा घेतली जाते. □राराच्या शेतीचा प्र□ार हा □ाही -वी-ा -ाही. आज महाराष्ट्राची परिस्थिती पाहिली तर फळांचे 100 ला□ ट-ााचे उत्पाद-ा होते, भाजीपाल्याचे 50 ला□ ट-ााचे उत्पाद-ा होते अनधा-याचे उत्पाद-ा 200 ला□ ट-ा सा□रेचे 60 ते 80 ला□ ट-ा उत्पाद-ा होते, □ापसाचे 250 ला□ ट-ा उत्पाद-ा होते. परंतु यातील ए□ तृतीयांश उत्पाद-ा बाजार समितीच्या माध्यमातू-ा वि□ले जाते, बा□ीचे बाजार समितीच्या बाहेर वि□ले जाते. यामध्ये सा□र आ□ि दूध व□ळू-ा 35 ते 40 हजार □ोटीच्या आसपास शेतीचे उत्पाद-ा होते. प□ा व्यवस्थेमध्ये सुधार□ा व्हायला पाहिजे, मा□ेटिं□च्या व्यवस्थेमध्ये सुधार□ा झालेली -ाही. मा□ेटिं□मध्ये सुधार□ा व्हावी या दृष्टी-े हे विधेय□ आ□लेले आहे. शेत□री हा वे□वे□ळ्या □त्राशी संबंधित आहे. त्यामुळे ही सारी □ामे ए□ट्या शेत□्याला □रावी ला□तात. बाजार □रेदीपासू-ा ते शेतीच्या मशा□ीपर्य-त, मालाची वि□ी □र□यापर्य-तची □ामे □रावी ला□तात. मा□ेटिं□मध्ये तो □मी पडतो त्यामुळे त्याच्या शेतमालाला बाजार भाव पाहिजे तसा मिळत -ाही. त्याला त्याच्या शेत मालाला चां□ला बाजारभाव मिळावा, म्ह□ू-ा □राराची शेतीचा पर्याय आ□लेला आहे. शेती □ो□त्याही परिस्थितीमध्ये दुसऱ्या□डे जा□ार -ाही. तो □रार ठरावि□ □ाळासाठी असेल. त्यामध्ये ज्या पि□ासाठी □रार झाला असेल त्या पि□ाचा □रेदी भाव सुध्दा □राराच्यावेळीच ठरविला जा□ार आहे. शेत□्याला ए□ वर्षासाठी, दो-ा वर्षासाठी, ती-ा वर्षासाठी □रार □रावयाचे असतील तर ते त्याच्यावर ते ऐच्छि□ आहे.

या-ांतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ......

एखादा प्रायोजक एखाद्या गावामध्ये, एखाद्या जिल्ह्यामध्ये एक हजार हेक्टर, दोन हजार हेक्टर, चार हजार हेक्टर, त्याची जी गरज असेल त्याप्रमाणे त्या जिल्ह्यामध्ये करार करु शकतो आणि हा करार करावयाच की नाही हे पूर्णपणे त्या शेतकऱ्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे. आज शेतीमालाला चांगला भाव मिळावयाचा असेल तर त्यावर प्रक्रिया झाली पाहिजे असे आपण सगळे बोलत असतो. ती प्रक्रिया कारखानदारी उघडावयाची असेल तर सहकार आणि सरकारच्या काही मर्यादा आहेत. आज मॉल्समध्ये आणि मोठमोठ्या हॉटेल्समध्ये दर्जेदार शेतीमालाची मागणी आहे. ग्रेडेड आणि क्वॉलिटीच्या मालाची मागणी आहे. तो पुरवठा परंपरागत शेतीमालाने होत नाही. त्यासाठी सुधारित बियाणे एखादी कंपनी देत असेल तर तो करार शेतकऱ्यांनी करुन शेतकरी आपल्या मालाचा हमीभाव ठरवून घेऊन त्या बियाणांचा आणि रसायनांचा वापर करुन, टर्म्स अँड कंडीशनप्रमाणे करार करुन तो पुरवठा करावयाचा आहे. त्या पुरवठादार शेतकऱ्याला हमीभाव मिळण्यासंबंधीचा हा करार आहे. त्यामध्ये समेट अधिकारी, लायसन्सींग अधिकारी व इतर सर्व अधिकारी आहेत. शेतकऱ्यांची जास्तीत जास्त सुरक्षा या बिलाच्या माध्यमातून पाहिलेली आहे. त्याच्या मालाला भाव मिळावा हा यातील मुख्य उद्देश आहे. आज कोल्ड स्टोअरेज, गोदामे, पॅकेजिंग हाऊसिंग ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढत नाही. हार्वेस्टींगची पध्दत किंवा माल कापल्यानंतर हाताळणीची पध्दत यामध्ये खूप माल खराब होतो. आपल्या देशामध्ये दरवर्षी जवळजवळ 55 हजार टन नाशवंत कच्चा माल मार्केटमध्ये जाईपर्यंत खराब होतो. मार्केटची व्यवस्था जर झाली, ज्या कंपन्या किंवा व्यक्ती असणार आहेत त्यांनी कोल्ड स्टोअरेजची व्यवस्था केली, पॅकेजिंग हाऊसेस उघडून दिले तर कंत्राटी शेतीवर त्या मालाला चांगला भाव ग्रामीण भागामध्ये सुध्दा मिळू शकतो. बाजार समित्यांचे काय होईल याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी भीती व्यक्त केली ? यामध्ये बाजार फी ची तरतूद नाही. आज जे कोणी प्रायोजक असतील त्यांना महाराष्ट्राच्या एखाद्या जिल्ह्यामध्ये किंवा एखाद्या तालुक्यामध्ये खरेदी करावयाची असेल त्या तालुक्यापुरते लायसन्स घेणार. आपल्याकडे आय.टी.सी. कडून सोयाबीनची खरेदी दोन तीन वर्षापासून केली जाते. आय.टी.सी. महाराष्ट्रभर खरेदी करते. त्याची मार्केट फी पणन महासंघाकडे देते. पणन महासंघ ज्या कृषी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ...

उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये सोयाबीनची खरेदी झाली असेल त्यांना पणन महासंघाकडून ती फी पाठवली जाते. त्यामुळे मार्केट फी च्या बाबतीत काय होईल ? अशी जी शंका होती त्यादृष्टीने मार्केट कमिटीची काळजी घेणे जरुरीचे होते. मार्केट कमिटीचे नुकसान होऊ नये याची काळजी या बिलामध्ये घेतलेली आहे. मी आता सांगितल्याप्रमाणे त्या शेतीच्या सातबारावर कोणत्याही प्रकारचा बोजा किंवा कर्ज करारशेती करणाऱ्या प्रायोजकाला घेता येणार नाही याबद्दलची तरतूद आहे.

श्री. श्रीकांत जोशी : ते कोणत्या कलमामध्ये आहे ते सांगावे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : नियमामध्ये ती तरतूद करुन ती सुरक्षितता बाळगली जाईल. करारामुळे शेतकऱ्यांना द्यावयची मालाची हमी, विमा संरक्षण वगैरे यामध्ये आहे. त्यांचा शेतीमाल खरेदी केल्यामुळे शेतकऱ्याला बाजाराची खात्री राहील. आताही बाजाराची खात्री आहे पण दराची खात्री नाही. यामध्ये काही प्रमाणात दराची खात्री होईल.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, कायद्यामध्ये नसले तरी नियमामध्ये ती तरतूद करु. कायद्यामध्ये तरतूद नसताना एखादा नियम केला तर तो नियम मूळ कायद्याच्या चौकटीत बसत नाही म्हणून तो नियम कोर्टात बेकायदेशीर ठरु शकतो. जो नियम करावयाचा आहे त्याबाबतची तरतूद कायद्यामध्ये अंतर्भूत करावयास पाहिजे. पार्लमेंटने केलेला एखादा कायदा घटनेच्या फ्रेमवर्कमध्ये बसणारा नसेल तर पार्लमेंटने केलेला कायदा सुध्दा सुप्रीम कोर्ट घटनाबाह्य ठरवू शकतो. आपण नियम कायद्यामध्ये बसवला पाहिजे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : ही काळजी घेतली जाईल.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश दांडेगावकर...)

प्रत्येक गोष्टीमध्ये बदल हा करावाच लागतो आणि तो बदल करीत असताना सभागृहापुढे यावे लागते. 1960मध्ये केलेल्या कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कायद्यामध्ये जागतिकीकरणाला सामोरे जाण्यासाठी आणि बदलणारी परिस्थिती विचारात घेऊन बदल करणे गरजेचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एक विधान केले ते रेकॉर्डवर रहाणे इष्ट नाही असे वाटते. आपल्या भाषणामध्ये माननीय मंत्री महोदयांनी पारंपरिक शेतीचा उल्लेख केला, आय.टी.सी.चा उल्लेख केला. कोणत्याही पध्दतीचा करार न करता गुणात्मक शेती कशी होईल या दृष्टीने आय.टी.सी. प्रयत्न करीत आहे. तुम्हाला आय.टी.सी. मान्य असेल, यामुळे शेत-यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळत असेल तर हे आाय.टी.सी. महाराष्ट्रभर करा.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : मी पारंपरिक शेतीबाबत बोललो. आय.टी.सी.बाबत इन्कार केलेला नाही. आय.टी.सी. करार करत नाही. आय.टी.सी. त्या दिवसाच्या मार्केट रेट प्रमाणे खरेदी करते. हिंगोली जिल्ह्यामध्ये आय.टी.सी. सोयाबीनची खरेदी करते. सभापती महोदय, शेतक-याला शेतमालाच्या बाबतीत, तंत्रज्ञानाच्या बाबतीत, बाजाराच्या बाबतीत माहिती मिळणार आहे. तसेच प्रक्रिया उद्योगांनाही चालना मिळणार आहे. या सर्व गोष्टींवर शासनाचे नीट नियंत्रण राहाणार आहे. कोणकोणते शेती उत्पादन करारामध्ये घ्यावयाचे हे शासन ठरविणार आहे. याठिकाणी हर्बल, नैसर्गिक शेतीबाबत बोलले गेले. नैसर्गिक शेती ही आज जगाची मागणी झालेली आहे. तीस वर्षापूर्वी हायब्रीड, रासायनिक शेती करण्याचे सुचविले होते. याचे कारण त्यावेळी अन्नधान्याची गरज होती. आज आपण नैसर्गिक शेतीकडे चाललो आहोत. अन्नधान्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागले तर अशा कंपन्या प्रयोजित करुन ठराविक असे उत्पादन घेता येईल. करारामध्ये कोणकोणते उत्पादन घ्यावयाचे हे ठरविण्याचे अधिकार शासनाकडे राहाणार आहेत. सनमाननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी मागच्या दाराने सावकारी प्रवेश करीत आहे असे सांगितले.पण तसे काही होणार नाही. शेतक-याला दोन पैसे जादा मिळावेत हा या विधेयकामागील उद्देश आहे. शेतीच्या 7/12वर बोजा येणार नाही. करार केवळ उत्पादनापुरता राहाणार आहे. करारामध्ये काही वाद निर्माण झाला तर तो सोडविण्यासाठी वेगवेगळया प्रादेशिक अधिका-यांची

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश दांडेगावकर...)

नियुक्ती केलेली आहे. न्यायालयामध्ये जाण्याची तरतूद नाही. न्यायालयामध्ये वाद गेला तर विलंब होतो म्हणून तो वाद सोडविण्यासाठी प्रादेशिक अधिका-यांची नियुक्ती केलेली आहे. तरी देखील वाद मिटला नाही तर हायकोर्टामध्ये जावे लागेल. परंतु तशी वेळ येणार नाही. कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगच्या माध्यमातून अशा प्रकारचे करार पंजाब राज्यामध्ये झालेले आहेत. वाद निर्माण होणार नाहीत याची काळजी आम्ही घेतलेली आहे.

....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ SBT/ श्री. शिगम नंतर 22:40

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर .....

माननीय सदस्य श्री. जयंत पाटील, श्री. दिवाकर रावते यांनी काही मुद्दे उपस्थित केले होते. शेतीमालाचे उत्पन्न निर्यात होऊ शकते. सेंद्रीय शेतीपासून उत्पादित मालाला चांगला भाव आता मिळू लागला आहे. परंतु याची नीट व्यवस्थापन झाले पाहिजे. सेंद्रीय शेतीसंबंधात औरंगाबाद आणि नागपूर अशी दोन सेंटर्स आहेत. सेंद्रीय शेतीचे प्रॉडक्ट चांगले आहेत. काही कंपन्या पुढे आल्या तर शेतकऱ्याला फायदा मिळू शकेल. सेंद्रीय शेतीचा गहू 40 रु. किलो याप्रमाणे विकला जात आहे. परंतु हा माल कोठे पिकतो आणि कोठे विकतो याची व्यवस्था नाही. त्यामुळे एखादी कंपनी पुढे आली तर त्यानिमित्ताने शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होऊ शकतो. माननीय सदस्य श्री. जगन्नाथ शेवाळे यांनी सांगितले की, जमिनीची मालकी सुरक्षित राहिली पाहिजे. ती निश्चितपणाने सुरक्षित ठेवली जाईल. सर्वच माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या बहुतेक शंकाचे मी निरसन केलेले आहे. जमिनीमध्ये जर नुकसान झाले तर वर्ग-2 च्या सरकारी कर्मचाऱ्याला ज्याप्रमाणे पगार मिळतो तशी नुकसान भरपाई शेतकऱ्याला देणार काय असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अशी नुकसान भरपाई दिली तर 10-12 शेतकरी पुढे येतील. कोणीही काहीही पीके घ्या आणि काहीही करा असे होणार नाही. प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी शेती मालक आणि प्रायव्हेट लोक यासंबंधात चर्चा केली. निश्चितपणाने शेतकरी आणि प्रायव्हेट लोक यांच्यामध्ये करार राहील. डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी काही मुद्दे उपस्थित केले. माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांनी बाजार फी वसूल होणार नाही त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीचे नुकसान होईल असा मुद्दा उपस्थित केला. परंतु कृ षी उत्पन्न बाजार समितीचे नुकसान होणार नाही याची काळजी शासन घेईल. पीके कोणती घ्यावीत हे सरकार ठरविणार नाही. पहिल्यांदा परवाना घ्यावा लागेल आणि त्यानंतर शेतकरी आणि प्रायोजक यामध्ये करार होईल. माननीय सदस्य श्री. धनाजी साठे यांनी पगारी मजूर निर्माण होतील काय अशी शंका उपस्थित केली. कुठलीही कंपनी शेतीमध्ये स्वत:चे मजूर लावून काम करणार नाही. शेतकऱ्याला बियाणे,तंत्रज्ञान,औषधे पुरविली जातील आणि त्याची बिलातून कपात केली जाईल. दुसरे कोणीही कर्मचारी शेती करणार नाही. गावातील हजारो हेक्टर जमीलन घेऊन कंपनीच्या स्टाफकडे राहील असे होणार नाही. विक्रीच्या भावासंदर्भातील करार यामध्ये अंतर्भूत केलेला आहे. सर्वच माननीय सदस्यांचे माझ्या उत्तरामुळे समाधान झाले असेल असे मी मानतो आणि हे विधेयक पारित करावे अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

.....2

20-04-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )5Y -2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे : सभापती महोदय, बिलावर चर्चा करताना आम्ही ज्या शंका उत्पन्न केलेल्या होत्या त्यांचा नियमामध्ये अंतर्भाव व्हावा आणि त्यादृष्टीने योग्य ते नियम तयार करण्यात यावेत अशी मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 संपूर्ण शीर्षक विधेयकाचे भाग झाले

खंड 1 संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. हर्षवर्धन पाटील (पणनमंत्री) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 16 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आम्हांला पोल पाहिजे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

( विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य उभे राहून पोलची मागणी करीत असतात )

**उपसभापती** : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 16 संमत झाले आहे.

-----

नंतर भारवि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 16 हे सभागृहाने संमत केले आहे. त्यामुळे आता आपल्याला मागे जाता येणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या बिलावर पोलची घेण्याची मागणी आम्ही केली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

**पृ.शी.**: मुंबई मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL NO.XVII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES ACT,1958)

श्री.धर्मारावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 17 - मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 17- मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, सध्या मोटार वाहनांवरील कर हा कमाल दराने आकारला जात आहे. सदर दर वाढविण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे.

... (गोंधळ) ...

श्री.आर.आर.पाटील : ही पध्दत बरोबर नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही पोल मागितलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण उभे राहून सांगावे की मागे जाता येणार नाही. आपण सरकारच्या बाजूने काम करण्यासाठी बसलेला आहात काय ? आपला रामशास्त्री बाणा हा श्री.नितीन गडकरी यांच्याकरिता आहे काय ? हे सुध्दा आम्हाला बघावयाचे आहे. आम्ही अन्याय सहन करणार नाही. अशा पध्दतीने सभागृहाचे कामकाज आम्ही चालवू देणार नाही. आपल्याला जर गोंधळात कामकाज पार पाडावयाचे असेल तर आम्ही सभागृहाच्या बाहेर जातो. हे पीठासीन अधिकारी सरकारला मदत करीत आहेत, असा आरोप केला तर वाईट वाटता कामा नये.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सभागृहामध्ये अन्य कामकाज करायचे नाही काय ? सभागृहात तुम्हीच नेहमी दादागिरी करायची काय ?

Cont.by Shri Borde..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य उभे राहून पोलची मागणी करतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात सुध्दा अशाच प्रकारे गोंधळात सहा विधेयके मंजूर करुन टाकली. अशा प्रकारे विधेयके मंजूर करण्याची सवयच पीठासीन अधिकाऱ्यांना झालेली आहे असे मला वाटते.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उपसभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 11.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक रात्रौ 10.52 ते 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**विधेयक क्रमांक 16 संदर्भात**

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला काही गोष्टी अत्यंत खेदाने नमूद करावयाच्या आहेत. मघापासून मी शांत बसलो होतो. विधेयक क्रमांक 16 वर आपण पूर्णपणे पार्टिसिपेट केले होते. मलाही या विधेयकावर बोलावयाचे होते. परंतु माननीय संसदीय कार्यमंत्री यांनी सांगितले की, आता उशीर होत आहे, वाढवू नका. माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर संपता संपता, सर्व सन्माननीय सदस्यांनी उभे राहून " पोल " असे म्हटले. सभापती महोदय, एवढे झाल्यानंतरही आपण आमच्याकडे लक्ष दिले नाही.

( यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार..

आमची अपेक्षा अशी होती की, पोल म्हटल्यावर हे विधेयक पास होईल, परंतु या विधेयकाला विरोध केला हे सांगण्याचा विरोधी पक्षाचा सभासद म्हणून आम्हाला अधिकारी नाही काय ? हा अधिकार आमचा नाकारला जात आहे. आम्हाला खेद होणे हे स्वाभाविक आहे, यामध्ये कोण विजयी होतो कोण अपयशी होतो, हा प्रश्न महत्वाचा नाही. प्रश्न असा होता की, हे विधेयक शेतकऱ्यांच्या दृष्टीने व आमच्या दृष्टीकोनातून हानीकारक आहे, अशी भूमिका आमच्या सर्व सदस्यांनी मांडली. तसेच सदस्यांनी काही प्रश्न उपस्थित केले होते. त्या प्रश्नांची उत्तरे सुध्दा आलेली नाहीत. असे असतांना आपण ताबडतोबीने विधेयक पास करण्यासाठी टाकले, आपला तो अधिकार आहे, त्याबद्दल आमचे काही म्हणणे नाही. ज्यावेळी हे विधेयक पासिंग स्टेजला आले, आणि आपण म्हटले की सभागृहाचे काय मत आहे असे म्हटल्याबरोबर आमचे सदस्य डॉ. दीपक सावंत उठले, इतर सदस्य उठले आणि त्यांनी पोल म्हटले, आणि पोल म्हणत असतांना आपण ते विधेयक पुढे धेऊन गेलात, तेवढेच नाही तर माझ्या बाजूला सन्मानीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख बसले आहेत, त्यांनी या विधेयकामध्ये एक छोटीसी सुधारणा त्यांच्या भाषणामध्ये सुचविली होती. ती सुधारणा मूव्ह करुन इन्कार्पोरेट करावयाची होती. सुधारणा लेखी दिली आहे ती इन्कार्पोरेट करावयाची होती. सभापती महोदय, हे आपणाला माहिती आहे. ते सुध्दा करु न देता हे सगळे दडपून आपण विधेयक पुढे घेऊन गेलात. ही लोकशाहीची कोणती पध्दत आहे. या सदनामध्ये असेच कामकाज चालणार आहे काय ? हा माझ ा आपणाला प्रश्न आहे. आपण आम्हाला त्याचे समाधान कारक उत्तर द्यावे, आपल्या दृष्टीने योग्य असेल, समर्थनीय असेल, असे उत्तर सांगा आमची काही हरकत नाही. शेवटी आम्ही कशासाठी सभागृहामध्ये यावे. आम्ही येथे कामकाज करण्यासाठी येतो. हा प्रकार रात्री 11 वाजता घडत आहेत. आम्ही 11 वाजेपर्यंत थांबलो आहोत ना ? कामकाज पत्रिकेवरील कार्यक्रम संपविण्यासाठी आम्ही येथे बसलो आहोत ना ? आम्ही आपणास सहकार्य करतो, या विधेयकाच्या आधी सन्माननीय दिलीप वळसे-पाटील यांचे विधेयक होते, त्यावर 6 तास आम्ही चर्चा केली व ते मंजूर केले, संसदीय कार्यमंत्री महोदयांनी मला लॉबीमध्ये विचारले, की तुम्ही या विधेयकावर पोल मागणार आहात काय ? आमच्या सदस्यांनी सांगितले आम्ही पोल मागणार आहोत, आमचा पोल मागणे हे केवळ टेक्निकल होते. त्या विधेयकास विरोध आहे हे दाखवावयाचे होते. सरकारकडे बहुमत आहे, विधेयक पास होणार हे

......2.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आम्हाला माहिती होते. याशिवाय दुसरा काही आमचा उद्देश नव्हता. शेवटी सदनाचे काम चांगले चालावे, विधेयके मंजूर व्हावीत म्हणून आम्ही पूर्ण सहकार्य करतो. अडचण करुन सरकारचे फंग्शन थांबावे असे आमचे मत नाही. असे असतांना या सन्माननीय पीठासीन अधिकाऱ्यांकडून आमच्या सदस्यांना अशी का वागणूक मिळावी, याचे आम्हाला उत्तर पाहिजे असा प्रश्न मला आपणाला विचारावयाचा आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विधेयक आपल्यासमोर आल्यानंतरच त्याला सुधारणा देता येते. Sir, this Bill was passed by the Legislative Assembly today. On this Bill, it is written that as passed by the Legislative Assembly. हे विधेयक येथे आल्यावर मी छोटीसी दोन ओळीची सुधारणा दिलेली आहे. मला असे सांगण्यात आले की सुधारणा एक दिवस आधी द्यावयास पाहिजे. दोन ओळीची सुधारणा मी आपल्यापर्यंत पोहचविली व ती मांडण्याची मला संधी द्यावी, असे सांगितले. माझे असे म्हणणे आहे की, सुधारणा पास होईल, नापास होईल हा भाग वेगळा आहे, परंतु संधी नाकारली जाणे हे बरोबर नाही. आज बिल आले, आणि आजच बिल मान्य करीत असतांना आम्ही सुधारणा केव्हा देणार ? "As passed by the Legislative Assembly" ही गोष्ट आलेली आहे. तीच गोष्ट डिव्हीजन मागण्याच्या बाबतीत सुध्दा झाली. मला असे वाटते की लोकशाहीमध्ये जे अधिकार आहेत ते वापरण्यामध्ये आपणाकडून संरक्षण मिळणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : या ठिकाणी आपले दुसरे विधेयक वाचण्यात आले, मी त्याचे सायटेशनही वाचले, मला असे वाटते की, आपण पोल मागितल्यानंतर मी आपणाला पोल दिला नाही, याबद्दल आपण या ठिकाणी खेद व्यक्त केला. आपल्या भावना मी निश्चितपणे समजू शकतो. परंतु याचा अर्थ मी घाईगर्दीने कामकाज उरकविण्याचा प्रयत्न करीत होतो असा अर्थ कृपया कोणी लावू नये. असे मी या ठीकाणी सांगतो. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेब आपण जी सुधारणा दिली होती त्या संदर्भात माननीय सभापतींनी त्यांचा निर्णय कळविलेला होता. अर्थात या ठिकाणी मी तो वाचून दाखविणे रास्त राहिले असते. त्यामध्ये असे म्हटले आहे की, ही सुधारणा विधेकाच्या कक्षेबाहेर व नकारात्मक स्वरुपाची असल्यामुळे ती अस्वीकृत करावी असे सदस्यांना कळवावे, अशा प्रकारचा त्यांचा निर्णय होता.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा. उपसभापती**...

आता या ठिकाणी कामकाज होत असतांना माननीय सदस्यांना वाईट वाटेल असे बोलले गेले त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 21.4.2006 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 15 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 21..2006 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही